
[नाट्यात्मक कादंबरी]
रघुवीर सामंत

उपकारी माणसें—

[ या प्रदीर्घ, स्वतंत्र, सामाजिक वास्तववादी चित्रपटाचा- ]

—चतुर्थ खंड.

पारिजात
प्रकाशन

पुष्प
११
वें

# — घरोघरच्या देवी —

[ स्वतंत्र, स्वयंपूर्ण नाट्यात्मक कादंबरी. ]

:: लेखक ::

रघुवीर सामंत.

२४ डिसेंबर १९४४

[ मूल्य साडेचार रुपये. ]

## रघुवीर सामंत
यांच्या
### –कलाकृती–

| प्रसिद्ध कलाकृती | आगामी कलाकृती |
|---|---|
| १ हृदय ( शब्दचित्र–लघुकथा ) द्वितीयावृत्ति लौकरच प्रसिद्ध होईल. | (१९४५ सालीं प्रसिद्ध होतील.) |
| २ वाळूंतील पाउलें ( शब्दचित्र–लघुकथा ) द्वितीयावृत्ति लौकरच प्रसिद्ध होईल. | १४ काहूर ( सामाजिक कादंबरी ) ( छपाई चालूं आहे ) |
| ३ सुरंगीची वेणी ( रूपांतीरत रशियन कथा ) | १५ अंधार–प्रकाश ( लघुनिबंध ) ( छपाई चालूं आहे. ) |
| ४ मासलेवाईक प्राणी ( स्वभाव–चित्रें ) | १६ तांडा ( लघुकथा ) ( छपाई चालूं आहे. ) |
| ५ पणत्या ( लघुनिबंध ) | १७ आजची गाणीं—२ (कविता) ( छपाई चालूं आहे. ) |
| ६ तारांगण ( चित्र–बंध ) | |
| ७ आजची गाणीं—१ ( सांघिक व इतर गीतें ) | |
| ८ रजःकण ( लघुनिबंध–लघुकथा इ. संकीर्ण ) | **छपाईस लौकरच तयार होतील** |
| **उपकारी माणसें १-२-३-४** ( स्वतंत्र प्रदीर्घ समाज–पट ) | १८ आम्हाला जगायचं आहे ! ( सामाजिक कादंबरी ) |
| १० प्रवासांतील सोबती ( पत्रात्मक कादंबरी ) | १९ जिवंत माणूस ! ( सामाजिक कादंबरी ) |
| ११ अभ्र–पटल ( कादंबरी ) | |
| १२ आकाशगंगा ( कादंबरी ) | २० स्वल्प–विराम ( चित्रबंध–शब्दचित्रें ) |
| १३ घरोघरच्या देवी ( नाट्यात्मक कादंबरी ) | |

पारिजात प्रकाशन; १५९–६० व्हिन्सेन्ट रोड, दादर.

प्रिय ज्योति सामंत—

घरोघरच्या देवींपैकीं कोणालाही प्रिय वाटेल अशीच या कलाकृतींत चित्रिलेली ' वासंती ' आहे; तरी कदाचित् ती कांहीं वाचकांना काल्पनिक व कृत्रिम वाटेल.

पण माझी मुलगी म्हणून तुझा चिमुकला जीव माझ्या घरांतच उणीपुरीं तीन वर्षें वावरला; म्हणूनच, तुझ्या बोलक्या प्रत्यक्ष अनुभवाला तर्कशुद्ध कल्पनेचा उजाळा देऊन, मी तुलाच (प्रत्यक्ष सृष्टींत आतांअशक्य अशा) वाढत्या वयांत चितारलें व ही कमळामावशीची ' वासंती ' तयार झाली आहे.

तूं तर आम्हाला चुटपूट–हुरहुर लावून अकालीं नि एकाएकी कायमच्या वियोगासाठीं निघून गेलीस; त्या वियोगांतील विरंगुळा म्हणूनच या 'घरोघरच्या देवी' माझ्या हातून उतरल्या. तेव्हां तुझ्याच स्मृतीला व सर्वच घरोघरच्या देवींच्या इतर असामान्य व बुद्धिमान ' वासंतीं 'ना त्या मी प्रेमपूर्वक अर्पण करीत आहे.

तुझा पिता—**मामा.**

**‘ वाजली तर गाजराची पुंगी—नाहीं तर मोडून खाल्ली !’**

गाजलं तर महाराष्ट्र रसिक प्रेक्षकांसाठीं नाटक !—नाहीं तर—वाचकांसाठीं

**— ना ट्य रू प का दं ब री —**

# – घरोघरच्या देवी –

[ लेखन-काल ]

१ स्थूल कल्पना–जानेवारी १९४०

२ संपूर्ण आराखडा–मकर संक्रांत (१४-१-४४)

३ अंक पहिला–१७-१९जाने. ४४

४ अंक दुसरा–२०-२१ जाने. ४४

५ अंक तिसरा–९-११ मार्च ४४

६ अंक चौथा–१२-१३ मार्च ४४

७ वैचारिक भूमिका–गुढी पाडवा (२५।३।४४)

८ पद्यें–रामनवमी (१–४–४४)

९ प्रथम वाचन–गुड फ्रायडे (७–४–४४)

१० पुनर्रचना व पुनर्लेखन— ९–१५।४।४४

—मुद्रण काळ—

१५ एप्रिल ते १५ डिसेंबर १९४४

—मुद्रण स्थळ—

**सागर साहित्य प्रेस.**

त्रिभुवन रोड, मुंबई ४.

— मुद्रक —

**श्री. शंकर वामन कुलकर्णी**

मालक–सागर साहित्य प्रेस, मुं.४

– प्रकाशक –

**श्री. रघुनाथ ज. सामंत,**

बी. ए. बी. टी.

चालक–‘पारिजात प्रकाशन’, १४ बी, हरजीवनदास एस्टेट, व्हिन्सेन्ट रोड, दादर मुंबई १४.

‘ उपकारी माणसां ’चा

एक नवा दुवा चितारणारा

**चतुर्थ खंड**

**– घरोघरच्या देवी –**

**—नाट्य – रचना—**

अंक १ ला— **घरच्या गुंतागुंती !**

अंक २ रा— **काळें जाळें !**

अंक ३ रा— **देवीला कौल !**

अंक ४ था— **शाप-उःशाप !**

**पा त्रें–प्र सं ग**

**सर्व काल्पनिक आहेत.**

: : मुख्य पात्रें : :

| —पुरुष— | —स्त्रिया— |
| --- | --- |
| वासुदेवरावभाऊ | कमळामावशी |
| विनय | वनिता |
| देवबाप्पा | कुंदा |
| काळेबापू | वासंती |
| धर्मा | ... |

[ या शिवाय, सुधीर, सदू, मुकादम, गंधा, मंदोदरी गिरी, नलिनी, हिरु, इत्यादी इतर उल्लिखित गौण पात्रें. ]

[ नाट्य व लेखन याबाबतचे सर्व हक्क कर्त्याकडे. ]

## वाचकांशीं गुजगोष्ट

( “ उपकारी माणसां ”च्या वाचकांना तरी ‘ अरुण ठाकूर ’च्या ‘ कमळामावशी ’ची नव्यानें ओळख करून द्यावयास नको. )

वासुदेवरावभाऊ नाईक व कमळामावशी हीं नवराबायको;–दोघें आपापल्या परीनें अगदीं प्रेमळ माणसें. तरी पण त्यांचा खेडवळ संसार असमाधानकारकच असतो. (त्यांत वाचकांनीं आतांपर्यंत ओझरतें डोकावून पाहिलेंच आहे.)

त्यांच्या घरीं त्यांच्या शिकलेल्या मुलाचें–विनायकाचें आज लग्न निघालें आहे. प्रत्येकालाच मोठा पेंचप्रसंग आहे तो !–त्यांत पुन्हां ( वाचकांना आतांपर्यंत अपरिचित अशा ) बेरक्या घालमेल्या काळेबापूंमुळें तर, त्या घरांतल्या त्या पेंचप्रसंगांत आणखी भर पडली आहे.

पण मग, त्या घरांत धीराची कमळामावशीही आहेच ना !...पुन्हा ती आजपर्यंतची साधीसुधी सोशिक कमळामावशी नव्हे !...त्या प्रसंगाला खडबडून जागी झालेली,...अगदीं सात्विक संताप एकवटून, जरा देखील न डगमगतां, अगदीं टोंकापर्यंत एकटीच वाटचाल करून जाणारी कमळामावशी !...

त्या कमळामावशीचें स्वभावचित्र पूर्ण करणारा, हा तिच्या स्वभावाचा या प्रसंगींचा पैलू सर्वांनाच हृद्य वाटेल, या उमेदी–आशेनें, ही माझ्या ‘ उपकारी माणसां ’तील ‘ घरोघरच्या देवी ’ची मी स्वतंत्र नाट्यरूप उभारणी केली आहे !

प्रसंग नाट्यपूर्ण वाटला म्हणून मला तरी अजूनही अपरिचित अशी ही ‘ नाटकी ’ उभारणी केली; पण ‘ उपकारी माणसां ’ मधील एक अव्वल पात्र व त्याभोंवतालचें गौण कथानक यांना ‘घरोघरच्या देवी’च्या रूपानें असें प्राधान्य द्यावयाचें एकदां नक्की ठरवल्यावर, केवळ रंगभूमीच्या चालू कालमर्यादेंत बसून तें सर्व अस्पष्ट–अर्धस्पष्ट ठेवणें मला शक्य वाटेना; ..माझ्यानें तें होईना. म्हणूनच, कलेचा हा कोणता न्यारा बरावाईट प्रकार, याचा विचार न करतां, मी स्वैरपणें या कथानकाचा या रूपांत शेवटपर्यंत विकासही करून मोकळा झालों. आणि शेवटीं कल्पनेतील नाट्यपूर्ण ‘ घरोघरच्या देवीं ’ च्या आयुष्यपटला हें असें कांहींसें संमिश्र ( चालू कलेच्या निकषाच्या दृष्टीनें ) ‘अकला’त्मक स्वरूप आलें आहे.

मित्रमंडळींसमोर एकाच बैठकींत या ‘ अकला ’कृतीचें मी प्रथम वाचन केलें, तेव्हां माझ्या स्नेह्यांपैकीं कांहीं रसिकांनीं मला आग्रहानें सांगितलें,...“कथानक छान आहे रचना चांगली आहे. पण त्यावर दोन तासांची एक नाटिका करा बुवा ! हें असं नको;...हें सर्व वाचयला सुंदर असलं तरी स्टेजवर ही मालगाडी अलगद उचलून कशी ठेवणार ? चालूं जमान्याला जागा ! त्याला धरूनच नाटिका करा याची ! मग ती मात्र खास यशस्वी होईल !”

यशस्वी नाटक काय कीं नाटिका काय दोन्हीं गोष्टी मला अपरिचित !-दोन्ही बाबतींत मी पूर्ण अनभिज्ञ !–तेव्हां त्यांच्या त्या अप्रत्यक्ष शेऱ्यावरच आपली मी झडप टाकली–“ हें सर्व वाचायला सुंदर आहे ना ?–बस्स तर !... आपण केवळ वाचण्याकरतांच हें नाटक प्रकाशूं म्हणजे झालं !”

आणि त्या काडीच्या आधाराला लोंबकळूनच ‘उपकारी माणसा’तील या ‘घरोघरच्या देवी’ त्याच स्वरूपांत व त्याच लांबीत या पुस्तकरूपानें अशा आपल्या पुढें माडल्या. याला कादंबरी म्हणतां येत नाही. नाटक म्हणायला कोणी तयार होणार नाही; (माझेंही या बाबतीत निराळें मत नाही.) तेव्हां:मी तिला **‘नाट्यात्मक कादंबरी’** असं म्हणून मोकळा होत आहे.

कारण, कादंबरी लेखनाची अनेक तंत्रें आहेत; मग संवादात्मक कादंबरी व्हायला काय हरकत आहे ?. त्यांत कादंबरीचा भरीव व्यापकपणा व नाटकांतील नाट्यगुण दोन्ही येणें शक्य आहे. आणि या विचारानेंच, मी ‘ घरोघरच्या देवी ’ची ‘यशस्वी नाटुकली’ करण्यापेक्षां हें अयशस्वी दीर्घ नाटक किंवा (माझ्या तऱ्हेवाईक पद्धतीच्या मतांनुसार कांहीतरी नवीन असें,...म्हणजेच...) यशस्वी होऊं शकेल अशी ‘ नाट्यात्मक कादंबरी ’ तयार केली आहे.

मला समाधान असें आहे, कीं, रंगभूमीचा नि वाचकांचा तरी कांही संबंध नसतो; त्यांना कल्पनेनेंच सर्व तयार करावयाचें असतें; तेव्हां त्यांनीं कालमर्यादा घालणारी खरीखुरी रंगभूमी क्षणभर जरा बाजूलाच ठेवावी; एखाद्या फावल्यावेळीं आपल्या मनातील रंगभूमीच्याच सहाय्यानें आपल्यासमोर कल्पनेनेंच एक स्टेज तयार करावें; व त्यावर घरबसल्याच या ‘ घरोघरच्या देवीं ’चा व्यक्तिगत प्रयोग करावा. त्या रसिकांना सोज्वल आनंदास्वाद तरी नक्कीच मिळेल अशी मला पूर्ण खात्री वाटते.

१४ बी, हरजीवनदास एस्टेट;
व्हिन्सेन रोड, दादर.
१५ डिसेंबर १९४४

स्नेहशील,

**रघुवीर सामंत.**

# पात्रांचें बाह्यांग, पोषाख, सामान्य स्वभाव--दर्शन इ.

## —पुरुष—

**१ वासुदेवरावभाऊ:**—( १ ) उंच-नीच, मध्यम स्थूल बांधा, भरघोंस काळ्या (क्वचित् पांढऱ्या) केसांच्या लांब मिशा, डोक्यावर पांढरेकाळे मध्यम राखलेले केस, गौरकांति, प्रेमळ डोळे, लाजाळू भिडस्त चेहरा.

( २ ) तलम धोतर, मलमलचा सदरा; ( सर्व वेळीं एकच पोषाख; मात्र दुसऱ्या अंकाच्या शेवटीं वर साधासुधाच कोट व बनातीची काळी विटकी टोपी. )

(३) प्रेमळ, पडते घेणारे, निर्व्यसनी, छक्केपंजे न जाणणारे, समाजाला अत्यंत घाबरणारे, क्वचितच सात्विक संताप येणारे, अप्रिय गोष्टी होणारच नाहीत असें गृहीत धरणारे व झाल्यावर संतापून बिथरणारे, स्वस्त्रीबद्दल प्रेम असूनही बेफिकीर असलेले, नैसर्गिकपणें पुरुषी घमेंडींत असणारे.

**२ काळेबापू०**–( १ ) मध्यम उंची, कांटकोळी शरीरयष्टी, दाभणकांठी काळ्यापांढऱ्या मिशा, चकोट व घेरा, काळीपांढरी लांब शेंडी, पुढले दोन दांत पडलेले, इतर दांत रंगलेले, गौरकांति, बेरके घारे डोळे.

(२) अंगांत खादीचा जाडाभरडा मोठा डगला, डोक्यावर गांधी टोपी, जाडेंभरडेंच धोतर पण चापूनचोपून नेसून सोगा सोडलेला. (दोन्ही अंकांत एकच पोशाख; गप्पा मारतांना टोपी गुडघ्यावर; शेवटच्या अंकांत पट्यापट्यांचें जाकीट. )

(३) कावेबाज हास्य, धोरणी पण हळूच गोड बोलणारे, पाताळयंत्री, वरवर पहाणाऱ्या सामान्य माणसाला मात्र चोख वाटेल असे वागणारे, प्रसंग पडता आला तरी शांत रहाणारे, बेरकेपणें वेळीं दुसऱ्यावर कुरघोडी करणारे, आपला मोठेपणा बेडरपणें दुसऱ्यावर प्रस्थापित करणारे.

**३ धर्मा:**—( १ ) तोंडाचें जवळ जवळ बोळकें, वाढलेल्या पांढऱ्या दाढीमिशांचें जंगल, प्रेमळ म्हातारे खोल इमानी डोळे, मोठी झुबकेदार पांढरी शेंडी, पण हजामत वाढलेली.

( २ ) गुढग्यावर आवरलेलें ठिगळांचें काळसर धोतर, अंगात फाटकीशीच काळवंडलेली बंडी, डोक्यावर मळलेली विटकी टोपी, ( सर्व अंकांत याच प्रकारचा पोषाख; शेवटच्या दोन अंकांत दाढी व हजामत केलेला...).

( ३ ) आदबशीर विनोदी, विश्वासू, करारी, टोमणेबाज.

**४ विनय :**—( १ ) उंच, रुबाबदार, क्लीन शेव्ह; प्रेमळ डोळे, बोडका, भांग पाडलेला, हसतमुख.

( २ ) सूटाबुटांत ( अंक ३ मध्यें येतो त्यावेळीं), कोट काढलेला फ्लॅनेलच्या विजारींत ( तिसऱ्या अंकाच्या मध्यापासून ), धोतर व शर्ट ( चौथ्या अंकाच्या शेवटीं. )

( ३ ) भिडस्त, प्रेमळ, साधारणतः मोकळा स्वभाव; प्रसंगानें गोंधळणारा; स्वतःची ठाम मतें नसलेला; आत्मविश्वास कमी असणारा.

**५ देवबाप्पा**—(१) उंच व मध्यम बांधा; गौरकांती; गंभीर प्रेमळ रुबाबदार चेहरा; फार लांब नाही पण भरघोस अशी काळी भोर दाढी व डोक्याचे थोडे केस लांब वाढलेले असल्यामुळें चेहरा अधिकच गंभीर.

(२) पहिल्या अंकांत काचा मारलेलें धोतर, शर्ट, कोट असा साधा पोशाख; दुसऱ्या अंकांत खाकी पोशाख, डोळ्यावर गॉगल्स व डोक्यावर हॅट; तिसऱ्या-अंकांत पुन्हां साधा धोतराचा दक्षिणी पोशाख; चौथ्या अंगांत लांब डगला धोतराचा काचा, डोक्यावर काळी उंच दिवाळीची टोपी.

(३) अत्यंत प्रेमळ; आपलें स्थान ओळखणारा; इमानी, करारी, सत्याला जागणारा पण धोरणी; वेळ येईपर्यंत गप्प; पण वेळ आल्यावर अगदीं कठोर व योग्य वाटेल तसें वागणारा.

## —स्त्रिया—

**६ कमळामावशी०**—(१) सांवळी, मध्यम स्थूल मोहक बांधणीची, साधारण केस पिकूं लागण्याची छटा असलेली, प्रेमळ डोळ्याची, गंभीर पण हसतमुख, आंबाडा.



(२) साधी पण चांगली वेशभूषा, गळ्यांत एखाद–दोन मोठे दागिने, हातांत पाटल्या–बांगड्या वगैरे; मध्यम मोठें कुंकू ( पहिल्या व दुसऱ्या अंकांत चांगलें लुगडें; तिसऱ्या अंकांत जुनेरें काळें पण स्वच्छ लुगडें; चौथ्या अंकांत जरीचें लुगडें, दागिने. )

(३) शांत, गंभीर सोशीक, हसतमुख; पण वेळीं अत्यंत कटु व जहाल होणारी; विनयशील, सेवादक्ष पत्नी; पण प्रसंगीं अत्यंत उद्धट आग्रही होऊं शकणारी धर्मपत्नी; प्रेमळ माता; पण वेळी स्पष्टपणें अनुशासन करणारी मातृदेवी.

**७ वासंती**–(१) आठएक वर्षांची चुणचुणित देखणी पोर; बोलके चाणाक्ष प्रेमळ डोळे; नाकीडोळीं अत्यंत मोहक; लांब शेपटा, हसतमुख; गौरवर्ण.

(२) पहिल्या व तिसऱ्या अंकांत छानदार फ्रॉक; चौथ्या अंकांत वाटल्यास लहानशी साडी नेसलेली.

(३) बडबडी, बुद्धिमान; निष्पाप प्रश्नोत्तरें करणारी; चाणाक्ष पण बालिश.

**८ कुंदा :**—(१) १३–१४ वर्षांची; उंचनीच, देखणी, गोड चेहऱ्याची; गौरवर्ण, स्नेहाळ डोळ्यांची, हसतमुख;...शेपटा–गोलपातळवाली—

( २ ) पहिल्या अंकापासून शेवटपर्यंत पातळ नेसलेली, छानदार पोषाखाची...( तिसऱ्या अंकांत पाहिजेतर नऊवारी पाताळ नेसलेली.)

(३) प्रेमळ, बडबडी, पण मास्तरणीच्या विचारांच्या संस्कारानें नवमतवाद बडबडणारी भाबडी तरुण मुलगी.

**९ वनिता :**—( १ ) उंच, किरकोळ, नाजुक प्रकृतीची, साधारण मोहक चेहऱ्याची, सांवळी, शेंपटेवाली.

(२) गोल पातळ, फॅशनेल, जरा उच्छृंखल दिसणारी; एखाददुसरा दागिनाच अंगावर, हातांत एखादीच मोठी कांचेची व एखादीच सोन्याची बांगडी असलेली, ( चौथ्या अंकाच्या शेवटीं वाटल्यास नऊवारी लुगडें नेसलेली. )

( ३ ) बडबडी, लाडीक बोलणारी, प्रेमळ पण स्वयंकेंद्रित वृत्तीची; शहरी वातावर्णांत वाढलेली, शिक्षणाची थोडी फार घमेंड असलेली.

# — घरोघरच्या देवी —

## [ वैचारिक भूमिका. ]

: १०३० :

आम्ही माणसें तशीं निसर्गतः अगदीं निरुपद्रवी !–पण मग प्रत्येक व्यक्ति विभिन्न व्यक्तित्वाची;...तेव्हां अर्थात्‌च...एकाच जगांत, एकाच जागेंत सामावून घ्यायचं म्हटल्यावर भांड्याला भांडं आटपतंच !–आणि एक घटकाही या प्रकाराला खंड पडत नाहीं !

कांहीं भांड्यांना लहानसान पोचे पडतात;...कांहींना खूप मोठे पडतात !–पण त्यांहून दुःखद प्रकार म्हणजे अनेक इतर लहानमोठ्या भांड्यांचा भार डोक्या-वर सहन करून, कांहीं भांडीं स्वतः मात्र साफ दडपून–चपटून जातात !–त्या-मुळेंच त्यांच्याकडे कोणाचं कधीं लक्षही वेधलं जात नाहीं.

अशीं दडपलेलीं भांडीं मानवी समाजांत संसारांत सांपडतात; तीं म्हणजे मुख्यतः स्त्रिया !...

खरंच !–स्त्रीजीवन मोठं उदात्त, गमतीचं !...पण मग तितकंच हृदय–विदारकही आहे !–पण तरीही तें अत्यंत दिव्यच आहे !...

: १०३१ :

पोरपणींही तिची किंमत 'घराबाहेर जाणारी' म्हणून नाक मुरडण्यासारखी ! फ्रॉक टाकून नुसती परकरी झाली कीं ती ' जाणती ';...तशी ती लौकर जीवन जाणूं–जगूं शकते !–पण म्हणूनच आमच्या समाजांत तिला मतें नसतात,...भावना नसतात !—

साडी नेसूं लागली, कीं, ती बापाच्या भावना व त्याची मतें, त्याचे बेत व त्याची अब्रू हींच सर्व आपलीं असं मानून चालते. भविष्याच्या उदरांत तिला आशेचे अंधुक किरण दिसतात. तिला त्यावेळीं मनांतल्या मनांत वाटतं, 'आपलं खरं आयुष्य अजून पुढेंच आहे; तें अजून सुरूं व्हावयाचं आहे !—आपला पति ...आपला संसार...आपलं घर...आपलीं मुलंबाळं !'...



खरंच !–या मानसिक आशापूर्ण गोंधळांतूनच, लग्नासारख्या बाबीची आयुष्यांतील एक लॉटरी करण्याचा तिचा बेत निर्माण होतो.

' आपला पति...आपलीं मुलं...आपलं घर...'

: १०३२ :

पण तिचीं तीं स्वप्नेंही हळूं हळूं विरल होतात;...लग्नानंतरच्या छोट्या काळां-तच तिला मनोमय अंजन मिळतं. विकारी...स्वार्थी, अप्पलपोटी, स्वयंकेंद्रित पुरुषी अरेरावी म्हणजेच स्त्रीच्या जीवनातील संसार–छत्र !...तिला तिचं असं घर नसतं. तिला फक्त नवऱ्याचं घर असतं !–आणि म्हणूनच...आपलीं मतं, आपल्या भावना,...यांचा तिला हळूंहळूं विसर पडतो. नवऱ्याची अब्रू, त्याच्या भावना, त्याच्या इच्छा, त्याचीं मतं,...यांनांच तीं आपलीं समजून त्यांना मान वाकवते. तें ओघानेंच तिच्या अगदीं अंगवळणीं पडून, शेवटीं त्यांतच ती रुळते !

पुन्हां पुढील...भवितव्याच्या उदरांतील मृगजळावर ती चालूं काळची आपली तहान भागवते !...मुलांच्या लीला...त्यांच्या क्षुल्लक लहरी...त्यांच्या खस्ता...यांतच ती अनुकंपायुक्त आनंदानें आपलं मन त्या वर्तमानकाळांत रमवते. तीं वाढतील...आपले कोडपांग पुरवतील फेडतील–हीच फक्त एक अत्यंत सूक्ष्म भावना आली तर तिच्या मनांत कधीं कधीं येते !

: १०३३ :

आपल्या वाढत्या मुलांचं वयाचं व योग्यतेचं मोठेपण तिनें अगदी पळा-पळानें मोजलेलं असतं. निरपेक्ष आनंदानें त्यांचं तिनें पुनः पुन्हां कौतुक केलेलं असतं;...पण तरी शेवटीं...मुलाचे हात ढुंगणाला पोहोंचण्यापासूनच त्यांची दृष्टी पुढें पाहूं लागते.

बापडी माता !–मुलगे हळूं हळूं तरुण होत गेलेले असतांना, त्यांनाच आपलं सत्व सर्व दृष्टीनें अर्पण करून झपाट्यानें म्हातारी होत गेलेली त्यांची ती माता !... ती त्यांच्यामागून मुग्ध आशेनें चालत येत आहे याचें त्यांना भानही नसतं !—

त्यांच्या बेदरकार तरुण मनाला ती किंचितहि कल्पना नसते ! अर्थातच तिनें वाढवलेल्या तरुणांच्याच, तारुण्यांतलि, 'मी–माझी–माझें' हें नैसर्गिक समी-करण तिला शेवटीं मुग्धपणेंच गिळावं लागतं; वर वर हसत आपल्या पोटांतलि

तो दुःखाचा डोंब आपल्याच अश्रूंनीं तिला शेवटीं विझवावा लागतो !–नव्हे... विझवण्याचा हतबल प्रयत्न करावा लागतो !

पण मग त्या दृश्याकडेही, आपल्या आयुष्याच्या उताराच्या वेळीं धीरानें व एका न्याऱ्या निरपेक्षतेनें पहाण्यास देखील शेवटीं ती डगमगत नाहीं !—

तिचं जीवन त्यांतच सामावलेलं आहे;...तिचं सुख त्या साऱ्यांच्या सुखांतच सामावलेलं आहे;...अशीच, हीच जणूं काय तिची नैसर्गिक भूमिका असते !–

: १०३४ :

कन्या...पत्नी...माता...सर्व भूमिकांतून जातांना...अभावितपणें ती एकच...मुख्यतः मातेच्याच...दयार्द्रवृत्तीनें वागत असते !...

नि तें खरेंच आहे !...स्त्री ही कोणत्याही वयांत माताच असते !...

माता ! हो माता म्हणजे निःस्वार्थी त्याग !–नि हेंच स्त्रीचं जीवन !...

ती सुशिक्षित–अशिक्षित कशीही असो,...कितीही विकारी...स्खलनशील असो !—स्त्री ही जगन्माता आहे !...

स्त्रियाच्या दुव्यादुव्यानेंच जग...वाढतं–जगतं...

—स्त्रीचा विकार जग निर्माण करतो !—

तिचा त्याग जगाचा प्रतिपाळ करतो !

तिचा विचार जगांतील दिव्यत्वाची वाढ करतो ! !—

गुढी पाडवा, १८६६.



# घरोघरच्या देवी

## [अंक १ ला]

## घरच्या गुंतागुंती

: १०३५ :

[ स्टेजचे मुख्यतः दोन भाग; डाव्या बाजूचा एक तृतीयांशपेक्षां कमी; उजव्या बाजूचा दोन तृतीयांशपेक्षां जास्त; दोहोंमध्यें तारेवर टाकलेला पुरुषभर उंच हिरव्या कापडाचा पडदा. डाव्या उजव्या बाजूस भिंती; अगदीं समोर स्टेजच्या पार्श्वभूमीलाही भिंत. या मधल्या आडव्या भिंतीला जेथें उभ्या ( डावी उजवी ) भिंती मिळतात, त्या कोंपऱ्यांजवळ एकएक खिडकी; उभ्या भिंतींमध्यें या काटकोन मिळणींच्या ठिकाणींच एक एक मोठा पडदा सोडलेला दरवाजा. डाव्या बाजूचा दरवाजा घरांत जातो; उजव्या बाजूचा दरवाजा हॉलमध्यें उघडतो. ( हॉलच्या अगर घरांतल्या देखाव्यांचा कथानकाशी संबंध नाहीं. ) डाव्या उजव्या दोन्ही भिंतींमध्यें मध्यभागीं एक एक खिडकी; समोरच्या भिंतीवर मध्यभागीं मामासाहेब नाईकांचें मोठें लाइफ साइज तैलचित्र; इतर तजबीरीही लटकल्या आहेत. डाव्या उजव्या भिंतींवरही तजबीरी लटकवल्या आहेत.

या तीन भिंतींत सामावलेली वासुदेवरावभाऊ नाईकांची खाजगी–अर्ध खाजगी–खोली; चांगली प्रशस्त आहे.

डाव्या बाजूच्या विंगकडील, तारेवरील हिरव्या कापडी पडद्याच्या डाव्या बाजूला–अगदी पिछाडीला, दाराअलीकडे भाऊसाहेबांचा मच्छरदाणी

सोडलेला मोठा पलंग; हिरवा पडदा व समोरील आडवी भिंत यांच्या काटकोनाच्या कोपऱ्यांत भाऊंचें खाजगी कपाट; त्याहून कमी उंचीची गोदरेज हिरवी सेफ, त्याच्या समोरच, हिरव्या पडद्याजवळ खोलींत मध्येंच ठेवलेली. डाव्या बाजूच्या भिंतींतील मधल्या खिडकीजवळ, भाऊंचा पलंग अर्धाअधिक झांकला जाईल अशीं (पार्टिशनवजा ठेवलेलीं) कमळामावशीचीं लहानमोठीं आरशाचीं कपाटें मागल्या भिंतीला समांतर ठेवलेलीं आहेत. मधला खिडकीचा भाग सोडून या कपाटांना (व त्यांच्या पलीकडील अर्धवट दिसणाऱ्या भाऊंच्या पलंगाला) समांतर असा कमळामावशीचा मच्छरदाणीविरहित मोठा पलंग स्टेजच्या दर्शनी भागाकडे दिसतो. या पलंगाजवळच डाव्या भिंतीवर भाऊंचा मोठा बस्ट भिंतीवर लटकत आहे. हा पलंग व खोलीला विभागणारा तो मधला हिरवा कापडी पडदा यांच्या दरम्यान, पलंगाच्या पायाशीं, लुगडीवगैरे कपडे ठेवलेला पुष्कळ खुंट्यांचा मोठा लांकडी घोडा.

हिरव्या पडद्याचा उजव्या बाजूचा खोलीचा मोठा भाग खाजगी व अगदीं परिचित माणसांशीं व्यवहार करण्यासाठीं, अशा दुहेरी पद्धतीनें भाऊ वापरतात; त्यामुळेंच त्याची व्यवस्था जरा मिश्र आहे.

स्टेजच्या अगदीं पिछाडीला येणाऱ्या खोलीच्या आडव्या भिंतीवर, खोलीच्या मध्यावर मामासाहेब नाईकांचा मोठा लाइफ साइज फोटो; त्याला लागून मध्यभागीं कांचेच्या तावदानाचें मुलांचें खेळ ठेवलेलें कपाट व भिंतीवर दोनतीन तजबिरी; उजव्या बाजूच्या कोंपऱ्यात विंगकडे असलेल्या हॉलमधून येणारा, ओटीकडचा पडदा सोडलेला दरवाजा. दाराजवळ पायवाट म्हणून सोडलेला स्टेज-समांतर चिंचोळा भाग. उजव्या बाजूचा पुढला सर्व भाग तांबड्या रंगाच्या मोठ्या जाजमानें आच्छादलेला आहे.

या स्टेजच्या उजव्या भागाच्या मध्यभागीं ओटीच्या दाराजवळच एक लहानसें राऊंडटेबल व भोंवती चार खुर्च्या आहेत. याच राउंडटेबलाच्या रेषेंत दाराच्या अलीकडे भिंतीला लागून मुलांचीं पुस्तकें वगैरे असलेलें मोठें टेबल असून त्याच्या जवळ दोन खुर्च्या पडल्या आहेत. उजव्या विंगला बंद करणाऱ्या उजव्या उभ्या भिंतींत जी मध्यभागीं खिडकी येते तेथें एक गादीचा कोच आहे.



त्याच्या अलीकडे खोलीच्या मध्यभागीं येतील अशा दोन (त्या कोचाच्याच सेट मधल्या) गादीच्या खुर्च्या आहेत. या खुर्च्यांना काटकोनांत व मधल्या हिरव्या पडद्याला समांतर पण अगदीं लागून असा दुसरा एक गादीचा पहिल्यासारखाच कोच आहे.

हे कोच व खुर्च्या यांनीं मर्यादा घातलेली स्टेजची अगदी उजव्या बाजूची दर्शनी जागा भाऊंच्या बैठकीनें व्यापलेली आहे. उजव्या बाजूच्या भिंतीला लागून मोठा लोड; त्याच भिंतीजवळच्या कोचासमोर कोचाला समांतर ठेवलेला दुसरा लोड; पडद्याजवळच्या कोचाला समांतर अशी गादीला लागून मोठी (लिहावयाची व पैसे ठेवायची) शिसवी पेटी. गादीवर खालीं पहाणारा माळ घातलेला देवाचा मोठा फोटो.

प्रत्येक खिडकी-दारावर पडदे सोडलेले आहेत. मुलांच्या खेळाच्या कपाटांतील कांचेच्या तावदानांतून गौरीच्या सजावटीचे वगैरे खेळ नीट ठेवलेले दिसत आहेत. मुलांच्या टेबलावर पुस्तकें अस्ताव्यस्त पडलेलीं आहेत. राउंड-टेबलावर दोन तीन मासिकें, वर्तमानपत्रें पडलेलीं आहेत; शिसवी पेटीवर जुन्या-पद्धतीचें कलमदान ठेवलेलें आहे.]

: १०३६ :

[पहिल्या अंकासाठीं पडदा वर उचलला जातो, त्यावेळीं मुख्यतः—भाऊंची बैठक, कोच-खुर्च्या, मागील टेबल, राऊंडटेबल, मामासाहेबांचें तैलचित्र असा उजव्या बाजूचा व (हिरवा पडदा सोडलेला असल्यामुळें) कमळामावशीचा पलंग, मागील आरशाचीं कपाटें, कपड्यांचा घोडा वगैरे डाव्या बाजूचा...असा लांबलचक निर्मनुष्य देखावा दिसतो !—

क्षणभरानें वासंती डाव्या बाजूच्या विंगमधून, भाऊंच्या पलंगापलीकडील दारानें घरांतून येते. इकडे तिकडे पहाते. व मग मधला हिरवा पडदा खर्कन् दोन्ही बाजूला ओढून ठुमकत, मुरडत पुढें बैठकीजवळ जाते.

गादीच्या उजव्या बाजूस असणाऱ्या समोरच्या आडव्या कोचावर हिरवी साडी नेसलेली मोठी बाहुली सुरवातीपासूनच ठेवलेली असते.

बाहुलीकडे पहात तिला उद्देशून वासंती बोलूं लागते—]

**वासंती०**—अगगऽबाईऽ! आपणच कां बसलाहांत नट्टाफट्टा करून कोचावर? खरंच,...साडी नेसूं लागल्यापासून केवढी मोठ्ठी दिसूं लागली माझी बाय्?... ओहो...एवढं नको कांहीं लाजायला!...कालच तर कुठें परकरपोलका सोडून टाकलास तूं?...(लाडानें) नि पोरी, मोठी झालीस तरी मी तुझी आईच! अगऽ..,नागडीसुद्धां पाहिली होती मी तुला!...अगदीं उपडी वळत होतीस नि... (हंसत) बरं बरं...राह्यलं्!...झालं?...नाहीं बोलत तुला एवढी लाज वाटते तर? (क्षणभर तिच्याकडे टक लावून पहात.) खरंच पण उषे, तूं आतां केवढी मोठी दिसूं लागलीस ग?...अगदीं आपल्या आईपेक्षांही मोठी!...नवरी झालीस खरी तूं आतां...(क्षणभरानें) तुझं किनई आतां लग्न करायला पाहिजे!... गंधांताई साडी नेसायला लागल्यावरच आईनें नाहीं कां तिचं लग्न करून दिलं? ...खरंच खरंच!—चला बाई...लागूं या कामाला!...नवरा शोधूंया पोरीला.

(चाल:—'या बाइ मुंबई शहरांत'...)

अतां, चला बाइ, लागूंऽया कामाला!
कुणि, नवरा ग शोधाऽया पोरीला! ध्रु०

वा! लहान का तूं आतां पोरी?
ही झाली म्हणतिल घोडी नवरी!
मज हंसतिल ना माझे शेजारी!
  चल करा बाई...घाऽई,
  आतां सुचत न...कांऽऽही...
या, नवरा शोधाऽग पोरीऽलाऽ!
आतां, चला बाइ लागाऽग् काऽमाऽला! ध्रु० १
  ती भिंवयांमधली टिकली सुंदर,
  अन् चमकी चमचमते नाकावर,
  किति लांबसडक शेंपटा पाठिवर!
    अन्...पायींऽ...बूट!
    अहा...मोऽठ्ठाऽग् थाऽट!



आतां नवरा शोधाऽग् पोरीऽला!
हं...चला बाई लागूंऽया कामाला! ध्रु० २

हं...आहेऽब्बुवा!...आऽत्तां काय?
किति मोऽऽठ्ठि झाली हि माझीऽबाय!
नवि साडीऽ नेसुन ठुमकत् जाय!
  झालि नवरी मोऽऽठ्ठी!
  अतां कां मग खोऽटी?
कुणि नवरा शोधाऽन् पोरीला!
अतां, चला बाइ लागाऽजा कामाला! ध्रु० ३

या भोऽळ्याऽ माझ्याऽग बाळेऽला!
कधिं कोऽणी येतिल पाऽहाऽयाला!
ही हळूंऽच लाजल्! खळि गालाला!
  अन् मुरकिल माऽऽन!
  मग भुलेऽल भाऽऽन!
किति नवरा ग् सुरेऽख पोरीला!
आतां चला बाईं लागाऽग् लग्नाऽला! ध्रु० ४

बघा! घटकाऽ भरली! वेळ न दवडा!
हं...साऽवधाऽन! वाजंत्री–चौघडा!
कुणि वरातिचा मग सजवाऽ घोऽडा!
  सारे साऽऽवधाऽऽन!
  पोरि, साऽऽवधाऽऽन!
अहा! नवराऽ मिळाला नवरीऽला!
तुम्हि याऽबाइ पोरीच्या लगनाऽला! ध्रु० ५

हा धरला आतांऽ अंतर–पाट!
अतां तुझि न् माऽझि जरि ताटातूऽट,
तूं सुखांऽत पडशिल!...होऽगऽ धीट!

हंऽ, लागेऽ लऽग्नऽ !
अतां साऽ वऽधाऽन !
किति सुरेऽख नवरा, पोरि, तुला !
चल्.. सासरिं जाऽ गऽ नांदाऽला ! ध्रु० ६

**:१०३७:**

[ कुंदा उजव्या बाजूनें हॉलमधून हळूच प्रवेश करते. गाणें म्हणत वासंती नाचत असलेली पाहून आपल्याशींच हसते. चोरपावलांनीं टेबलाजवळ जाऊन पुस्तकें ठेवते. इतक्यांत वासंतीचें गाणें संपतें. पातळाचा अंतरपाट करून ती बाहुलीचें 'शुभ लग्न' करूं लागते तेव्हां कुंदाला आपलें पातळ दिसतें...तिला राग येतो . पण तरी ती गप्प उभी रहाते ).

**वासंती०**—( बाहुलीला...) पण काय धांदरट तरी ग मी, उषे ?... तुझं लग्न कोणाशीं लावायचं तें राहिलंच !...तुला नवरा कुठे ठरवलाय् आम्ही अजून ? अंऽ ?...( लाडानें ) खरंच...पण तुला कसा ग नवरा पाहिजे, उषे ?...अंऽ ? ( पुन्हा विचार पालटून )—पण तुला तरी काय विचारतेय् वेडी, मी ? तुला पोरीला काय समजणार म्हणा त्यांत...

( उठते...घुटमळते...हाताच्या बेचकांत गाल ठेऊन विचारांत गढते; बाहुलीकडे पहात, बैठकीवर बसते. )

( कुंदा तिच्याकडे मध्येंच हंसत...मध्येच रागानें पहात मागें उभी असते.)

**वासंती०**—( सुस्कारा टाकून ) माहितीतला तर अगदीं एकहि तुला शोभण्यासारखा दिसत नाहीं बघ, बाई !...( जवळच्या खेळाच्या टोपलींतल्या तीनचार लांकडी नि कांचेच्या बाहुल्या वासकून बाहेर काढते—प्रत्येक वेळीं ना-पसंतीच्या माना हलवते... ) छे छे छे !...नाहीच बाई जमायचं !— कोणी तुझ्याहून फार लहान तर कोणी नकटा, नाहीतर बुटका, नाहीतर काळा !—( निश्वास टाकते ) काय ?—हा बंदूकवाला गोरा सोल्जर ?...इश्शंऽ !—ना जातीचा ना पातीचा !—नको ग बाईऽ !—गोरा असला म्हणून काय झालं ?... तुला भीतीच वाटेल त्याची !...अग त्याला सांग म्हणावं...'एकदम-चले जाव !'



( बाहुलीला जवळ घेऊन... ) होऽ...इतकी कांहीं वर नाही आलीय् माझी पोर म्हणावं !...त्यापेक्षां आज लग्नच नाही करणार तिचं जा !—( निश्वास टाकून दुःखी स्वरांत )—कित्ति कित्ति त्रास असतो तरी मेला...हा...आईच्या जिवाला ? खरंच उषे—तूं मात्र कध्धीं कध्धीं होऊं नकोस बरं का मुलीची आई !...( कुंदा फणकाऱ्यानें पुढें येते. )

**:१०३८:**

**कुंदा०**—( खेंकसून ) अहो तुम्ही म्हटलं...मुलीच्या आईऽ !...आणा तें आमचं पातळ !—कोणी सांगितलें तुम्हाला नाही ते धंदे करायला ? ( खसकन् बाहुलीचं पातळ ओढूं लागते...)

**वासंती०**—( विनवून ) अग अग, पण थांऽबनाऽजरा—( वासंती बाहुली संभाळायची धडपड करते. )

**कुंदा०**—( अंगाशीं झटत ) तुमची पोर वर नाहीं ना आलेली ?...मग बऱ्या बोलानं थांबवा तर तिचं लग्न आधीं...नाही तर तिला आदळतें जमिनीबर चांगली ! ( कुंदा व वासंती पातळासाठीं एकमेकांना झोंबतात )

**वासंती०**—( अजीजीनें-) अगऽअगऽ...कुंदा !...

**कुंदा०**—( वेडावत-) हें हें हें ! म्हणे—व्यऽर् न्याहीऽ आली म्यॅजीऽ पोर !...पण आमचं नवं पातळहि नाहीं कांहीं आलेलं . वर...म्हटलं, बाईसाहेब !

**वासंती०**—( पातळासाठीं शेवटची धडपड करीत... ) अग पण असं काय करतेस ग, कुंदा ? ( विनवणी करीत ) होऊं दे जरा माझ्या पोरीची हौस...पातळ नेसण्याची आजचा दिवस !

**कुंदा०**—( खसकन् ओरडून ) वाऽग तुझ्या पोरीची हौस ! तिची हौस होतेय्—पण माझे आई...माझा इकडे जीव जातोय्...त्या माझ्या जॉर्जेटच्या पातळाचा चोळामोळा पाहून ! चल् आण तें इकडे—

( कुंदानें आपलें पातळ सोडवून घेतलेलें असतें. त्या गडबडींत बाहुलीचा परकरही खालीं गळून पडतो—व ती पोलकाच फक्त घातलेली, नागडी, वासंतीच्या हातांत रहाते—)

**वासंती०**—( आंत पहात जागच्याजागीं रागानें मुसमुसत ) ए आई ऽ ग ऽऽ !–ही कुंदटली बघगऽऽ—

**कुंदा०**—( खोडसाळपणें नाटक करीत )...नि वासंती...चुकलं, आपलं, उषेच्या आईऽ, तुझी उषा बघ गऽ कशीऽऽ—( नागड्या बाहुलीकडे बोट दाखवून मोठ्यामोठ्यानें हसते. )

( चटकन् लक्षांत येऊन, वासंती आपल्या बाहुलीला परकर लपेटते. )

**वासंती०**—( रोषानें कुंदेकडे पहात, बाहुलीला जवळ घेऊन ) कुंदटली फुंदटली कुठली !–( बाहुलीला ) माझी बाय् ती !—आहेच तशी अगदीं वाईट, हं कुंदी !—तुझं पातळ सोडलंन् तिनें ?—चेष्टा केलीन् तुझी ? आपण नवं आणूं हं बाजारातनं ! ( कुंदा चेष्टेनें मोठ्यामोठ्यानें हंसते; वासंती बाहुलीला ) अग कुंदटली काय कुणाची आई आहे थोडीच ? ती बसणार उठल्या सुटल्या पुस्तक हातांत घेऊन...त्यांतच डोकं खुपसून...

**कुंदा०**—( फणकाऱ्यानें वासंतीला मारायला धांवत...) पुळ्ळेऽपुळ्ळेऽ बळ्ळे कां आईसाहेब, तुमचं आपल्या पोरीचं कौतुक !...( वासंती 'आई आई' करत पळते; कुंदा तोऱ्यानें तिच्या मागें जात--) जा जा सांग आईला ! ( मोठेपणाचा आव आणून ) मला तुझ्यासारखं आईही नाही व्हायचंय् कोणाची--नि लग्नही नाही लावायचंय् कोणाचं ! माझंसुद्धां लग्न नाही करणार मी !...समजलीस ?

( कमळा–मावशी ओचेपदर आंवरत डाव्या बाजूच्या दारानें प्रवेश करते. )

:१०३९:

**कमळा०**—( जवळ गेलेल्या वासंतीला जवळ घेत...सौम्य हंसत कुंदाला ) अग्गोऽबाईऽ...कुंदा...कुंदा, केवढी मोठी घोषणा ही ?—ऐकेल बियकेल हो कुणी ( हसत ) अग् पोऽरी !—लग्न नाही करणार तर काय, करणार तरी काय आहेस ग, कुंदा, तूं ?—

**कुंदा०**—( थोडें चपापून पण लागलीच )...मी ? मी ना...खूपखूप शिकणार आहें...अगदीं सगळ्या सगळ्या पदव्या मिळवणार आहें ! ( जरा ताठ्यांत ) नि मग देशाची सेवा करीत गांवोगांव फिरणार आहे !



**कमळा०**--( चेष्टेनें ) अस्सं ? पण मग, लग्न करून, आपल्या घरांतच एके ठिकाणीं कुठें तरी राहून नाही जमायची म्हणतेस देशाची सेवा ?

**कुंदा०**-- ( किंचित् हेटाळणीनें ) हो हो...जमतंय् तर ?...अग, लग्न म्हणजे लोखंडी बेडी !...विवाहित बायको म्हणजे पुरुषांची गुलाम ! !—मूल नि चूल...चूल नि मूल ! ! नुसतं मूलंच नाही आई...( हात लांब पसरून ) शेंबड्या पोरांचं हेंऽऽ भलं मोठं लेंढार.

**कमळा०**—( अर्धवट कौतुकानें हसून, पण वरवर डोळे वटारून दटावत–) तूं नव्हतीस वाटतं कधीं शेंबडी ?...कुंदे ?...कुठं शिकलीस बाई हें तत्त्वज्ञान सारंऽ ?—

**कुंदा०**—अग आमच्या गर्ल स्कूलच्या हेडबाई आहेत ना–मंदोदरीगिरी ?...त्या, आई, आम्हाला कित्तिकित्ति सांगतात ग नेहमीं ! त्या म्हणतात—

**कमळा०**—( किंचित् बेफिकीरीनें व चेष्टेनें ) अस्सं ?...काय म्हणतात ?

**कुंदा०**—त्या म्हणतात, आई, कीं...स्वार्थी पुरुषांनीं धूर्ततेनें जो खड्डा खणलेला असतो नि भोळ्याभाबड्या स्त्रिया ज्यांत साफ गाडल्या जातात...त्याला लोक लग्न म्हणतात !...

**कमळा०**—( स्मित करीत ) अस्संऽ ? बरीच आहे की तुझ्या बाईंची लग्नाची व्याख्या !

**कुंदा०**—( निश्वास टाकून ) गरीब बिचाऱ्या स्त्रिया ! मलबारांतल्या हत्तीप्रमाणें वरवरची हिरवळ तेवढी पहातात !...तिकडे आकर्षिल्या जातात–पण आंत ? तिथें तर त्यांचा जीव घेणारी–काळोखानें कोंदाटलेली क्रूर खांच असते ! अंधार–अंधार—अंधार–

**कमळा०**—( नाटकी सुस्कारा टाकून ) अरेरेऽ !—गरीब बिचाऱ्या !

**कुंदा०**—त्यांतच त्या प्रथम एकदांच्या भाबडेपणानें स्वतः पडतात–मग पडतात मंगळसूत्राच्या लोखंडी काळ्या सांखळ्या त्यांच्या गळ्यांत !...नि शेवटीं चार सुक्याकोरड्या तुकड्यावर जन्मभर फक्त दुसऱ्यांसाठींच खपखप खपत, त्यांच्या आयुष्याचा शेवट होतो !--

:१०४०:

कमळा०—( थोडें कौतुक करीत पण लटक्या रागानें )–पुरे–पुरे !––फारच चहाटळ होत चाललीस होऽहल्लीं, कुंदा, तूं !––

कुंदा०––( टाळी वाजवून मोठ्यानें हसत—) हंऽहं ?... अगदी बरोब्बर ग अगदीं बरोब्बर––

कमळा०—( किंचित् भांबावून ) काय बरोबर ग ?––

कुंदा०––( हसत हसत ) हेंच...आमच्या गिरीबाई म्हणाल्या होत्या, तुमच्या घरांतल्या जाणत्या स्त्रियांना सांगून पहा असं कधीं तरी एकदां ! तसं आहे सारं खरंच तें ! चांगलं पटेलहि त्यांना तें, आपल्या मनांतल्या मनांत ! पण वर वर मात्र त्या लागलीच तुमच्यावर रागवतील,...खसकन् अंगावर ओरडतील...नि तुम्हाला म्हणतील त्या–( नाटक करीत ) 'फारच फाज़ील, चहाटळ होत चाललांत हो तुम्ही हल्लींच्या मुली ? '––

कमळा०—( उठून कुंदाचा गालगुच्चा घेत ) ह्यँ हँ...आणखी नाहीं कां म्हणत कांहीं, तुझ्या मंदोदरी गिरी ?...

कुंदा०––( सहास्य ) हो, म्हणतात कीं ! अग त्या म्हणतात...पण किनई, त्याला आपला अगदीं कांहीं इलाज नाहीं !...आमच्या समाजांतल्या स्त्रियांच्या मनावर फक्त एका गोष्टीचाच सारखा संस्कार होतो जन्मभर !...

कमळा०––तो ग कशाचा ?

कुंदा०––अग, दुसरा कसला ?—(हेल काढून) संसार ..संसार...संसार !

कमळा०––( हसून ) अस्संऽ ?––

कुंदा०––हो, त्या लहान असतात तेव्हां बाहुल्याचा संसार मांडतात—तरुणपणीं स्वतःचा,...प्रौढपणीं आपल्या मुलाचा,...नि म्हातारपणीं त्याच्या मुलाचा–आपल्या नातवाचा ! एकूण काय ?...त्यांच्या जिवाला संसाराशिवाय विसांवा म्हणून मुळींच नाहीं दुसरा ! त्यांतच त्यांचं आयुष्य जायचं सारं.

:१०४१:

वासंती०––( हळूच आईला बिलगून, दोघांकडे पहात ) काय ग आई बडबडतेय् ही कुंदा आज आल्यापासून जोराजोरानें सारखं ? कुणास ठाऊक बाई !



पण ती नव्हती वाटतं बाहुलीचा संसार मांडून बसत मागें ? आज माझ्या मात्र बाहुलीची साडी हिसकावून घेतलीन् मघां. दुष्ट कुठली ! ( कुंदाकडे रागानें पहाते.)

कुंदा०—( हेटाळणीच्या स्वरांत ) अग होऽग ! माझ्या बाहुलीची साडी म्हणे ! माझं पातळ,–तूं मळवलंस तें मळवलंस ! नि पुन्हां वर तोंड करून बोलतेय् मधें मधें ! ( ताईगिरी करीत ) आपल्याला काय कळतंय् हो बोबड्या बाईसाहेब, आम्ही आतां बोलतोंय् त्यांत ? ( तोऱ्यानें ) हो, हो ! मग ? खेळत होतें बाहुली घेऊन मी मागें ! ( समर्थन करीत ) पण लहान होतें हो त्यावेळीं मी ! आतां चांगलं कळायला लागलंय् मला !

कमळा०—( चेष्टेच्या स्वरांत ) अग्याऽ ! खरंच ? कुंदा, कुंदा, काय कळायला लागलंय् चांगलं, आमच्या बाईंना आतां ? सांगा तरी ! सांगा ? ऐकूं–द्या ना गार्गी–मैत्रेयी ? होऊं द्या आपली वरतूनची आकाशवाणी...

कुंदा०—( एकदम थोडी ओशाळून, क्षणभरानें ) अग मला कळतं, आई ! पण सांगतां नाहीं मला नीट यायचं तुला, आमच्या बाईंसारखं ! ( तेवढ्यांत पटकन् कांहीं आठवल्यासारखा उत्तेजित चेहरा करून, अधीरपणें ) होगऽआई, आज किनई, पुन्हां शाळा उघडली ना आमची दिवाळीनंतर ?—तेव्हां आमच्या हेडबाईंनीं दुपारीं सुटी दिली ग आम्हांला ! नि साऱ्यांना हॉलमध्यें जमवलं आणि एक छानसं व्याख्यान दिलं !—कित्ती कित्तीऽ छान बोलतात त्या ! खरंच, मोठी मेजवानीच होती ती एक ! त्यांनीं किनई...

कमळा०—( हसून मध्येंच ) अस्सं...अस्संऽ ! तरीचं बरं कां !

कुंदा०—( न समजून ) काय ग, आई ? तरीच काय ?...

कमळा०—( हसून ) अग बाईंच्या त्या मेजवानींतलंच उष्टंखरकटं गोळा केलेलं दिसतंय्, आमच्या घरच्या या विदूषीबाईंनीं !

कुंदा०—( थोड्या रोषानें लाडिक स्वरांत ) ए, हें ग काय, आई ? आम्हीं नाहीं जा अशानें बोलत...

कमळा०—( पुन्हां मिळतं घेऊन, सहास्य ) बरं बरं, बाईऽ ! चल्—सांग हं !––काय सांगत होत्या त्या तुम्हाला ?

: १०४२ :

**कुंदा०**—( पुन्हां नवा उत्साह येऊन, कोचाजवळ जात ) अग, त्या अशा उभ्या राहिल्या ना, प्लॅटफॉर्मवर बोलायला...( नाटक करीत ) तेव्हां आम्ही सहावींतल्या मुलींनीं खूप टाळ्या वाजवल्या मोठ्यामोठ्यानें......

( कमळामावशी टाळ्या वाजवते; तिचें पाहून वासंतीही हंसत टाळ्या वाजवते. )

**कुंदा०**—( नाटक तसेंच पुढें चालवीत, हात वर करीत त्यांना थांबवते.) हं हं. थांबा ! माझ्या बालमैत्रिणींनों, थोडं थांबा. आपला सारा उत्साह असा टाळ्या वाजवण्यांतच घालवून टाकूं नका. शाळा सुरूं होतांच, इथें पहिल्याच दिवशीं आपण कां जमलों आहोंत ? अशा नुसत्या टाळ्या वाजवायला नव्हे !–नीट विचार करायला शिकायला...आतां लक्ष देऊन ऐका पाहूं !––( थोडा वेळ विचार करते; बाईंचा पवित्रा घेऊन ऐटींत उभी राहते व शेवटीं आविर्भाव आणून ) नवरात्र संपलें, दसरा उजाडला. दसऱ्यानंतर दिवाळीं आली नि गेली. तुमच्यांतल्या कोणाचे वडील व्यापारी असतील; ते नव्या वर्षी काय करतात पाहिलंच असेल तुम्ही !...ते व्यापारी लोक आपला गेल्या वर्षाचा आढावा घेतात; नि मग जुन्या जमाखर्चाच्या वह्या बंद करून नविन वह्या उघडतात ! तसंच आपणहि केलें पाहिजे ! आतांच मोठ्या उत्साहानें कांहींतरी नवा संकल्प केला पाहिजे !–गोड गोड मुलींनों, तुम्हीच समाजाच्या भावी पिढ्यांचे आधार आहां ! आज परकऱ्या पोरी असलांत, तरी उद्यांच्या स्त्रिया आहांत !... मोठं व्हायचंय् ना तुम्हांला ? मग आजपासून मोठं ध्येय धरा मनांत... ( कमळामावशीबरोबर वासंती कुजबुजते. )

**वासंती०**—( हळूंच ) काय ग आई सांगतेय् ती...

**कुंदा०**—( दटावून ) हं ! ती मागल्या बाकावरची मुलगी ! मी काय म्हणतेय् तिकडे नीट लक्ष दे !...( कमळामावशी हसते व स्वतः नीट बसण्याचा अभिनय करून, वासंतीलाहि नीट बसवते. )

**कुंदा०**—(व्याख्यानाचा अभिनय चालू– ) आज आमच्या स्त्रियांचं आयुष्य म्हणजे काय आहे ?...घरांत बाहेर सगळींकडे त्यांच्या कानींकपाळीं एकच ओरड ! एकाच गोष्टीचा संस्कार चालू असतो त्यांच्या मनावर सारखा !–आमच्यांतल्या वयानें जाणत्या पण वेड्या बायका लहानपणीं आपल्या मुलीच्या



हातीं ठकी बाहुली देतात नि तिला कौतुकानें म्हणतात––' तूं हिची आई !'... पुढें ती मुलगी मोठेपणीं स्वार्थी बेजबाबदार नवऱ्याबरोबर होणाऱ्या तिच्या एकांगी संसारांत पडते; नि तिच्या हातीं तिची स्वतःची इच्छा असो नसो, जिवंत बाहुलीं संभाळायला येऊन पडतात, एवढंच !...मिळून एकंदरींत काय––संसार...रांधा–वाढा नि उष्टी काढा !––हेंच आमच्या स्त्रियांचं अनादिअनंत चालत आलेलं आयुष्य !

**कमळा**––( मध्येंच तिला दटावीत ) कुंदेऽपोरीऽ...

**कुंदा०**—( त्याच हुकमी आविर्भावांत ) हं ! गप्प !...एकदम गप्प ! कोण कुजबुजतय् तिकडे मागल्या बाजूला मधें मधें उगीचच ?...मला खपायचं नाहीं कुणी मध्येंच बोललेलं !...( किंचित् काळ थांबून ) हं...तेव्हां म्हणूनच मी म्हणतें...कीं तुम्ही नव्या पिढींतल्या पोरींनी आतां बंड करायला शिकलं पाहिजे ! नुसती लग्नांतल्या बाजारांतली आपली किंमत वाढवण्यासाठीं यत्ता मागून यत्ता वर चढून चालणार नाहीं ! आपल्या बुद्धीची सर्वांगीण वाढ...वाचनानें...विचारानें करून घ्यायला लागलं पाहिजे !—आयुष्यभर स्वतंत्र वृत्तीनें...स्वतंत्रपणें रहाण्याचा बाणा मनांत कायम बाळगला पाहिजे ! देशाची...समाजाची अखंड सेवा करायचं ध्येय सदैव हृदयांत वागवलं पाहिजे...डोळ्यापुढें धरलं पाहिजे !...

**कमळा०**—( अभिमानानें कुंदाकडे पहात असते. पण मध्येंच नाटकीपणें उढून लहान मुलीसारखा आवाज करीतं ) पण मग बाई...अहो बाई ! ही जी देशाची सेवा करायची म्हणतां, ती हो कशी ?...प्रेमाच्या कादंबऱ्या वाचून...किं नाटकं सिनेमा पाहून ?...कि न्हाणीघरांत गाणीं म्हणत, आपल्या आईला जन्मभर सतावून... अंऽ ?

**कुंदा०**—( मध्येंच अडथळा झाल्यामुळें व आई चेष्टा करतेय् हें जाणून, थोडी रागावत ) ए, हें ग काय असं, आई ? व्याख्यान सगळं शेवटपर्यंत संपेपर्यंत बोलायचं असतं कां असं मध्येंच ?...आणि बोलणाऱ्याला असे मधेंच प्रश्न तर मुलींच विचारायचे नसतात हो ! ...

**कमळा०**—( हसून ) हो का ग ?—मला ग काय माहीत ?...मी काय तुझ्यासारखी इंग्रजी शाळेत गेले होतें ? जातीय् थोडीच ?...

: १०४३ :

**कुंदा०**--( अभिमानानें )...पण आमच्या मंदोदरीबाई नाहींतच हो मुळीं तशा !-त्यांना किनई, या सिनेमाबिनेमांचा फार राग आहे हो !-ते सिनेमे, त्यांतली गाणीं नि फोनोची रेकॉर्ड...यांच्यामुळें आमच्या पोरीचं.. नि साऱ्याच तरुणांचं फार फार नुकसान झालंय् असं म्हणतात हो त्या !...त्या खूप संतापल्या किं कसं करतात आहे माहीत ?--

**कमळा०**--( प्रश्नार्थक ) हंऽ ?-कसंऽ ?-

**कुंदा०**--( अभिनय करीत- ) हेऽहेऽ आमचे एक एक सिनेमे !...मला नांवंहि नीट आठवत नाहींत आतां ( आठवण्याचें नाटक करीत) काय म्हणे...'ब्रह्म-चारी' 'खजांची'...'पहिली मंगळागौर'...!-नांवं तेवढीं निराळीं !...बाकी इथून तिथून तेच तेच सारे प्रेमाचे पांचट चाळे !-साऱ्यांचा विषय आपला एकच-( हात हालवीत ) तो आणि ती...ती आणि तो !-जसं काय्-ती आणि तो एकमेकांना सोडून क्षणभरहि एकटं राहूंच नाहीं शकणार !...आणि ती गाणीं नि रेकार्ड तरी काय बाई मेलीं ( अभिनय करीत हिसक्यानें ) 'आयी...आयी...मला बोचसी ग सुइ बाई ऽऽ' ! ( थांबून हात हलवीत ) 'लोट् गईऽ लोट् गईऽऽ' ! आणि काय ?... 'जमुनाजळिं खेळूं खेळ कन्हैय्या !' म्हणे !-दुसरं काय बरंऽ ?...हो-'नजारे हाय्...नजारे हाय्'...( कमळामावशी गालांतल्या गालांत हसत असते. )

**वासंती०**—( 'कशी चुकली ?' या आवाजांत, एकदम ) अग... 'नजारे हाय्' नाय् कुंदा !—( एक सुंदर ललकारी मारून ) सावनके नझारे हैं... अहाऽह...अहाऽह...कालियोंकी आखोंमेऽ...ललाऽलऽलाऽलऽ लाऽ......असं आहे हो तें !—एवढं पण नाहीं येत नीट...

**कमळा०**—( मोठ्यानें हसून तिला दबकवीत ) अग गप्प ग वासंती !-ती कुंदा नाही काय बोलत ?—कुंदाच्या मंदोदरी गिरी बोलताहेत हो, त्या ! ( व्याख्यान एकदम थांबवून कुंदा रागानें वासंतीच्या मागें लागते...तीही दबदबा धावते, 'कुंदाऽ !...वासंतीऽ !--ऐका ग !-' करीत कमळामावशी त्यांच्यामागें धावते...त्यांना शेवटीं पकडते...)



: १०४४ :

**कमळा०**—( कुंदेकडे पाहून वत्सल रागानें )...कुंदा, पोरी तुला झालंय् काय ग आज ?--शाळेंतून जी आली आहेस ती आपली व्याख्यानं देत सुटलीयस् ! त्यांनींच कां पोट भरणार आहे तुझं ?...घरांत चुलीजवळ तुझी कॉफी नि शिरा दोन्हीं ठेवलीं होतीं मी येतांना झांकून; तीं थंडही होऊन गेली असतील एव्हांना !

**कुंदा०**—अग खरंच, आई ( जाऊं लागते...)

**कमळा०**--( अर्धवट खिन्नतेनें ) निदान मला तरी माझी संध्याकाळची चूल नि माझी मुलं संभाळायचीयत् अजून म्हटलं !--तुम्हाला नसेल करायचं लग्न...नि नुसतीच कसली ती देशसेवा करत फिरायचं असेल तें फिरा बापड्या,..

**कुंदा०**—( घराकडे मधल्या पडद्यांतून शिरत ) हो मग ?...नाहीच करणार मुळीं लग्न मी !—मी काय गंधाताई आहे थोडीच, आई ?—( हातवारे करीत ) भाऊंनी आणला आपला एक नवरा कोणसा,...सोडल्या शाळा...घातल्या आपल्या माळा !--

**कमळा०**—( हसून- ) पुरे ग तुझा चावटपणा !...( कुंदा हसते; आंतल्या डाव्या बाजूच्या विंगकडील भिंतीलल्या दरवाज्याकडे वळते. )...पण काय ग कुंदा ?--त्या तुझ्या हेडबाई मंदोदरी गिरी काय वयाच्या आहेत ग ?--नि दिसायला कशा आहेत ?

**कुंदा०**--( दारांतच थबकून- ) टापटीप रहातात चांगल्या बा ! पण... ( नाक मुरडून ) दिसयला अशाच आपल्या-साधारण !—असतील तीशी पुढल्या !-का ग, आई ?

**कमळा०**—( हसून ) त्यांना मुलं आहेत ना त्यांची ?

**कुंदा०**—( आंत शिरतां शिरतां- ) अग त्याचं लग्नच झालेलं नाहीं...तर मुलं ग कुठून असणार ? ( कुंदा जाते; वासंतीहि तिच्या मागून धावत जाते. )

**कमळा०**—( अर्धवट आपल्याशीं ) अस्संऽ !-तरचि बरं का त्यांचं ब्रह्मज्ञान एवढं...

: १०४१ :

**कमळा०**—( जातां जातां खाली पडलेला खेळ व बाहुली दिसतात...

बाहुली वर उचलून घेत )...दोन मिनिटांपूर्वी...मारे तावातावानें भांडत होत्या पोरट्या याच बाहुलीवरून !—आणि आतां कोणाला शुद्ध तरी आहे का पहा.. केरांत पायाखालीं पडलीय् तरी...( हसते—) 'आई' म्हणे आपण ?—गेली आपली पोरीला इथंच टाकून स्वतः भटकायला !— हा हा...या बाहुल्यांचा संसार !—

संसार बाहुल्यांचा !–हा आमुच्या मुलींचा !–
निर्जीव बाहुल्याशीं...त्या जोडतात नातीं !–१
मृदु–भाव अंतरींचा...आनंद निर्मि त्यांचा !–
स्वप्नांत दंग होती...गुंगून त्यांत रमती !–२
अदृश्य जेथ कांटे...संसार गोड वाटे !–
सलती जिवास तेच! ...स्त्री–जीवनांत जाच !–३
परि गोड बाहुल्या या...आम्हास याच छाया !–
संसार हाच आमुचा,...या गोड बाहुल्यांचा !–४
संसार तो मुलींचा...निर्जीव बाहुल्यांचा !–

( बाहुली खेळाच्या टोपलींत ठेवते...टेबलाजवळ सारं ठेवयला वळते. )

( इतक्यांत कुंदाची आंतून हांक...' आईऽ ! ए आईऽ '...वासंतीची कुरकुर...कुंदाचें हास्य ..कमळामावशी थबकून कानोसा घेते... )

**कमळा०**—( खेळ ठेऊन, आंत वळत ) नि हा आम्हा आयांचा खराखुरा संसार !–( पडद्यांतून आंत डाव्या बाजूच्या भागांत शिरत– ) अग लागलांत कां पुन्हा तिकडे इतक्यांत भांडायला ?...( कुंदाची पुन्हा हांक ) होऽ होऽहोऽ... आल्यें ग बाईऽ आल्यें !—जरा धीर तर धर पण...( थबकून ) हें वासंतीचं काम...

( दाराशींच घोड्यावरून पडलेले कपडे दिसतात; जातांना ते उचलून वर ठेवते )

**: १०४६ :**

( क्षणभरानें हातांत केरसुणी घेतलेला म्हातारा धर्मा प्रवेश करतो...तिजोरी जवळचा बिछाना वगैरे साफसूफ करूं लागतो.]

( कांहीं क्षणांनंतर कमळामावशी आंत शिरते व आपलें आरशाचें कपाट उघडू लागते...तेवढ्यांत तिला धर्मा दिसतो...)

**कमळा०**—अरे, बरा लौकरच आलास रे आज धर्माऽ, तूं डोंगरलीहून—



**धर्मा०**—( कमळामावशीच्या कपाटाजवळच्या पलंगाकडे येऊन तिथली साफसुफी करीत ) ह्ये लौकर, वैनी ?...अहो, काय सांगनार ?—आज डोंगरलीच्या खंडाची श्यवटची ख्येप व्हती !–दीस उजाडाय् आदी फाटलाच डोंगरलीला आमी गाड्या जोडल्या !–आन् धा साडेधाला चांगल सकाळच आनून गिरनीत सोडल्या ! !...तवा...

**कमळा०**—( आश्चर्यानें ) म्हणजे ?–गिरणींत सकाळी पोचलात नि शेवटीं पुढले घराकडले अडीच मैल यायला एवढी संध्याकाळ ?...( तेवढ्यांत आठवून ) पण काय रे धर्मा, आपलं घरचं खंडाचं भात नि तें गिरणीत रे कशाला परस्पर ?–जागा नाही इथल्या कोठारांत !– कणगे भरले सगळे ?...

**धर्मा०**—( कुरकुरत ) हाइत त् काय झालं !...अवो, . अजून बी शंबर मुडं येऊन पडले येकदम,.. तरी तरी बी मोप जागा व्हईल !...( बोलत बोलत बैठकीच्या बाजूस जातो )

**कमळा०**( कपाट बंद करून करून, धर्माच्या मागून येत ) मग ?

**धर्मा०**—( कुरकुऱ्या आवाजांत–)पन् भाऊश्येटच म्हणले ना परवां आमी डोंगरली जाताना, मला...

**कमळा०**—( त्रासिक चेहऱ्यानें ) काय म्हणाले ?...

**धर्मा०**—म्हनले आंता उरली ख्यप आनशील डोंगलीची, ती तश्यीच वळव गिरनीत...काय च्यारसा मुडं व्हतील त्ये घेव इंज्यनवाल्याचा ताब्यांत घे सडाया गिरनीत...आन् मग घरीं ये...

**कमळा०**—(तक्रारी स्वरांत) अरे पण, जुन्यातला बारका नि जाड्याचा तांदूळ पांचसहा मुडे पडलाय् नाहीं का घरांत अजून, धर्मा ?...मग नवं भात रे कशाला सडयला दिलं बाहरच्या बाहेर गिरणींत ?...तूं तरी सांगायचं होतंस नाहीं ?...

**धर्मा०**—( बैठक झाडत अगतिक स्वरांत ) अवो मी सांगलंऽ, वैनी ! म्हनलं, आपला घरचा तांदूळ सात आठ म्हैनं हसत पुरल घरच्या बेगमीला !... आन् गड्यांच्या खावटीला बी जाड्याचा चिकार हाय्...( बोटें मोडीत हिशेब करीत ) आतां तुमीच बगा हां, वैनी !...येऊन जाऊन आट गडी घरांत...नि

म्हैन्याला दीड मन खावटी येकेकाला...तवा ( हिशेब करून ) झालं का म्हैन्याला बारा मन !...आन्...

**कमळा०**—(अधीरपणें) होना !...मग ?...काय म्हणाले तुझे शेट ?...

**धर्मा०**—सांगलं म्यां...वैनीबी मला रागवतील म्हनून...पन श्येट माजं काय ऐकत्यात् ?...म्हनले...' तूं मी सांगतों तें ऐक, धर्मा !—त्या बायकांच्या काय नादी लागतोस ?...अरे...घर म्हनलं म्हजी जास्त कमी असायला पायजे तांदूळ घरांत...' तवा...

**कमळा०**—( किंचित् रागानें- ) हो हो तर !...मोठीच काळजी घराची.

**धर्मा०**—मी म्हनलं-' आपलीच हाय गिरन !...घेऊं पायजे तवा सडून येका दिसांत !-' पन माज्यावर अस्सा येकेक डोळा काडून भाऊश्येट म्हनले, " गप्प रे धर्मा !-'आपली गिरन ' 'आपली गिरन ' म्हनत जाव् नकोस पुना !"

**कमळा०**—( रोषानें ) काय तरी बाई !-तें रे का बाबा ?...

**धर्मा०**—त्ये म्हनले...'काळे बापू बगतायत् ना समदं ?-त्ये सांगतील तश्यी सवड काडून आपलं काम उरकून घ्येतलं पायजे !'-बापू म्हने म्हनत होते, भाईरच्या कामाची धांदल उडली उद्यां...की आपलं घरचं काम पडल मागं!... तवा श्येट म्हनले, ' गिरनीची सोय आदी !—'

**कमळा०**—( रागारागानें... ) तर तर तर !...ते काळेबापू म्हणत होते नि हे भोळेबापू ऐकत होते !...बरी न्यारी जोडी जमलीय् भागीदारांची !... गांवातल्या साऱ्यांच्या सोयी बघा म्हणावं !...घरांतल्या माणसांना त्यासाठीं गाडी-भर हाल सोसावे लागले तरी चालतील यांना !—विचारणं नाहीं सवरणं नाहीं घरांत !...( एक एक आठवण होऊन ) परवां त्या खांडवा गव्हाच्या चार गोणी आणून टाकल्या आहेत !...दिवाळीपूर्वी मारे तीन डबे तुपाचे आणलेयत् !... गुळाच्या ढेपी येऊन पडल्याच आहेत दोन परवां घरांत !...हरभरे, वाल, मूग, डाळी...कशाचा कशाला पत्ता नाहीं !-आमचं घर म्हणजे आपलं सदाचं लग्न घर !!...तुम्ही आपलं तिजोरीतल्या करकरीत नोटा मोजून गोणी भरभरून जिनसा भरा घरांत, म्हणावं !...तिजोरी भरलीच आहे ना तुमची !...तुमचे कोण हात धरणार ? पण मला, उन्हांत वाळवतां-निवडतां नि किडी-टोक्यांपासून



सारं संभाळतां संभाळतां एकेक दिवस दिखील पुरा पडत नाहीं म्हणावं !- ( किंचित् थांबून ) आणि यांचे हे गडी ! नुसते खायला काळ अशे एकाहून एक माजलेले ! मुलखाचे कामचुकार !...आमच्यासाठीं हे असायच्यापेक्षां यांच्याचसाठीं आहोंत आम्ही जणूं...( धर्मा कांहीं न बोलता कचरा काढूं लागतो. )

**: १०४७ :**

**धर्मा०**—( केर काढतांकाढतां, मागें वळून, क्षणभरानें, खिन्न चेहऱ्यानें ) खरं हाय् समदं, वैनी ! पन् मी तरी काय करनार सांगा ?...यकटा जीव कुटंकुटं म्हनून बगणार ?--घरांत् हाय्...दारांत हाय्...श्येतात् हाय्...गिरनीत् हाय्—

**कमळा०**--( एकदम सहानुभूतीनें ) तसं नाही रे म्हणत मी, धर्माऽ ! तुला नाही आहे बोलत मी !-मला ठाऊक का नाही ?...घरच्या गड्यांपैकीं जुन्या म्हाताऱ्यांला एक तूं-नि तरण्यांमधला तो दुसरा बिचारा-सदू ! दोघे तेवढे मरमर मरत असतां माझ्या घरांत नेहमीं !-(एकदम रागानें) पण आमच्या घराच्या छपराखालचा न्यायच मुळीं असा उरफटा आहे ना !-त्याला कोण काय करणार ?-जो प्रामाणिक म्हणून वेठीला धरला जाईल, त्याचा अगदीं कांटा निघणार ! आणि मेले सुटतील ते पोळासारखे सुटतील नि माजतील !-(निश्वास टाकते--मग सहानुभूतीनें) खरंच, सदू कुठे रे गेलाय् आज, धर्मा ?-दिसला नाही दोन दिवस घरांत !...

**धर्मा०**—तो गेला गाड्या घेऊन कापरीला खंड गोळा करायला...पर-भारीच. आज सकाळच भाऊशेट ग्येलेत् नाय् का? येवान् दिलान् मला त्यांचा निरोप आल्याबरोबर !...पन सारा दिस मोडला माजा असाच गिरनीत ! तवा च्यार गाड्यान् गडी दिले सदूच्या ताब्यांत,...त्याला म्हनलं, तूं जा परभारंच तिकडं ! सांग श्येटला, उद्याकडू येल् धर्मा, उरल्या गाड्यागडी घेऊन.

**कमळा०**—अस्सं होय ?...[ आठवून ] अरे पण खरंच धर्मा, ते राहिलंच बाकी मघासचं !- गिरणींत रे सारा दिवस कसा मोडला म्हणालास तुझा ?—

**धर्मा०**—[ निश्वास ] काय सांगूं वैनी तुमाला, कपाळ ?...ती येक राम-रावनाची कताच हाय् मोटी !—

**कमळा**०—[ गोंधळून ] म्हणजे?...दिलंस ना भात सडायला देवबाप्पांच्या ताब्यांत?—काय झालं रे ?

**धर्मा**०–दिलं किं!...पन बगा...लय् लटपटी...लय् लटपटी माज्या जिवाच्या ! [ हळूंच गंभीरपणें ] वैनीऽ...त्यो काळेबापू लय् लय् माजलाय् बगा आताशा!...पावला-पावलाला डाव खेळतोय् आपल्या भाऊश्येटशी—

**:१०४८:**

**कमळा**०—[ आश्चर्यानें ] आज आणखी काय केलं काळ्यांनीं, बाबा?–

**धर्मा**०—[ केरसुणीसकट कमरेवर मागें हात घेऊन,...मधूनमधून हातवारे करीत ] म्हनजी बगा...अकरापासून मी आपला धेव इंजनवल्याच्या पाटीं!.., म्हनलं...श्येटचा नि आपला बि इश्वास येकल्या त्याच्यावरच !...बाकी समदी समशानातली भुतावळच हाय् उटलेली त्या गिरनीमंदी !...अवो, कोन कोन, कवा कवा, काय काय घालमेल करतील...

**कमळा**०—( मध्येंच ) हो खरंच, बाबा ! मी पण सांगतें बघ, धर्मा ! आपण आपला नेहमी त्या बाप्पांबरोबरच सगळा संबंध ठेवावा !–उशीर झाला जरा तरी चालेल हो...तो पुरवला !—यांचा सारा व्यवहार हा असा ! तरी पण ते देव आहेत गिरणींत म्हणून तरी माझा जीव थोडा भांड्यांत पडलेला असतो!...

**धर्मा**०—हांऽ! त्येच ना !...पन बगा, काळेबापू मला काय म्हणतो... "‘ धर्मा, धेवाला गिरनीची कामं हाइत दुसरीं...त्या मुकादमाच्या ताब्यांत दे तुझं भात सारं, नि जा तूं !–’ ( टाळी वाजवून ) मी काय खुळा हाय् व्हय् ?...बारा गांवचं पानी प्यालोय् ! मी वळाखला त्याचा इंगा !...मी म्हनलं...‘ बापू श्येट, इंजीनवाल्याला फुरसत व्हईल तंवर आपला थांबतो...मला काय घाई नाय् ’... आन् बसलो दाराशीं ! त्यानें जाताना अश्शे डोळे वटारलेन् म्हनता माज्यावर, वैनी ! पन् करतो काय ?...येक चकार बि बोलला नाय्...निमूट ग्येला निगून आपल्या गवताच्या वकारकिड्...

**कमळा**०—पण मग देव कुठे होते ?...त्यांना नाही सांगितलास यांचा निरोप, स्वतःच ?

**धर्मा**०—अवो, सांगणार कवा, वैनी ? धेवाला ठ्येवला व्हतान् अडकवून



त्यानंच...हां काळेबापून् ! आदी काय चोपड्याच काढून बसला धेवाबरोबर हिसाब करीत...मंग काय...दुसऱ्याच कोनाच्या भाताचं माप घ्यायला त्याला सांगलंन् !...मंग पाटवलान् त्यानं धेवाला कुटं वसूलीला !...फट् फट् फट् करीत जो धेव ग्येला तो तासभर ! असं बगा...बारा...येक–दोन झालं जवळ जवळ !...

**कमळा**०—( आश्चर्यानें ) आणि तूं उपाशीच तोंपर्यंत ?...

**धर्मा**०—(खिन्न चेहऱ्यानें) अवो वैनी, मी उपाशी त्ये सोडा !–पन् माज्या बैलांच्या संबूर टाकायला च्यार काड्या बी न्हाईत् गवताच्या ! त्ये बगवना बगा माज्या डोळ्याला !...

**कमळा**०—( सहानुभूतीनें ) अरेरेऽ!...मुकीं जनावरं झालीं म्हणून काय झालं ?–त्यांना देखील जीव असतो !–पण कायरे, तुमच्या गाड्यांत नव्हतं गवत ?

**धर्मा**०—अवो, कपारची खिंड चडल्यावर इसाव्याला गाड्या उभ्या कयेल्या का, आमी ? तवा उरलेल्या दोन दोन गुंड्या घातल्या व्हत्या त्यांच्या पुडं !–आतां म्हनलं, गिरनींत अर्धा कलाक मोडला तरी घरचीच ओड हाय्...तितं पोचल्यावर पेंड बी चारूं त्यांना !...पन् आतां वैनी, मला काय सपन पडलं व्हतं, हा काळेबापू असा तरास देईल असं ?–मग ?...

**कमळा**०—काय रे केलंस मग ?—

**धर्मा**०—(अभिमानानें) मी वाट बगितली बगितली आन् ग्येलो काळेबापूच्याच वखारीत !–हां...तितल्या धावीस सुट्या गुंड्या आनल्या नि घातल्या सोडून आपल्या बैलाच्या जोड्यांपुडं !—

**कमळा**०—(समाधानी स्वरांत) छान ! बरं केलंस !...

**धर्मा**०—अवो पन् पुडं त् ऐका, वैनी ?—मी आनकी धा गुंड्या आनायला गेलों...तवां कुठून कसा काळेबापू सवताच आला धावत...आन् माझ्या हातांतल्या गुंड्या हिसकून येकदम उसळला माज्यावर...

**कमळा**०—( अर्धवट रागानें ) काय ?...बापूंनी हिसकून घेतल्या तुझ्या हातांतल्या गुंड्या ?...म्हणजे ?

**धर्मा**०—( रागानें आवाज चढवीत ) हां !—आन् म्हनला—‘ कोनाला

इच्यारून घेतल्यास त्यां गुंड्या माझ्या वकारीतल्या ?...अंऽ ?—हें गवत काय तुज्या बापाचं समजलास कि तुज्या श्येटच्या ?...'

**कमळा**०--( आश्चर्य व संताप यांनी थरथरत ) काय ?!...असं म्हणाले काळेबापू ?--मेल्यांना लाजा तरी कशा नाहींत ?...काय काळीज बिळीज आहे कीं नाही कसायांना ?...इतका माज चढलाय् ?

: १०४९ :

**धर्मा**०--( निश्वास टाकून, मान खाली घालीत )...मंग सांगतों काय मी, वैनी ? आतां डोबा झालोय् मीं...पन् मामाश्येटच्या राज्यातला हाय्-( अभिमानानें ) नाय् नाय् तरी चालीस वर्स नोकरी केलीय् मी तुमच्या या नायकांच्या घराची !...अशी इंगळी डसली मला...तो काळेबापू बोलला तवा ? ( संतापानें ) खाडकन् दोन हाननार व्हतों मी त्या बापूच्या कानशिलांत ! ( आवाज चढवून ) आमच्या मामाश्येटच्या दारचं खरकटं खाऊनच पोसला, तो हरामखोर काळेबापू !...आन् आतां भाऊश्येटच्या बैलांपुडं धावीस पेंड्या घातल्या गवताच्या, त् माजा न भाऊश्येटचा बाप काडतो ?...

( क्षणभर संताप होऊन गप्प होतो; कमळामावशीहि तशीच गप्प असते. )

**धर्मा**०—( पुन्हा खालीं मान घालून ) पन् हात आवरला आन् जिवाला गपचूप म्हटलं—' धीरानं घ्ये, बाबा, धीरानं घ्ये !—आपल्या भाऊश्येटचीच पावर समर्यांनी वळकलीय् ! सवताच्या दारांतले गडीबी आतां जर माजल्येत् त् त्या काळेबापूच परक्या चोराचं काय ?'

**कमळा**०—( दीर्घ निश्वास टाकून ) हं. आपली माणसं सिधीं नसलीं म्हणजे असेच मूग गिळावे लागतात, धर्मा !...

**धर्मा**०—( क्षणभरानें जरा आठवल्यासारखें करून ) पन् आतां जाऊन सांगलं, वयनी, त् हाशावारी उडवून श्येट म्हनल् आमचा मला, 'जाव येरे धर्मा, कामाच्या धांदली-घाईंत मानुस बोलतो असं. मनावर घ्यायचं नसतं आपन् त्ये !—बोलनं काय लागतं आपल्याला ? आपन आपलं काम करावं. जा, चल् येडा.'

**कमळा**०—( रागानें ) हो हो तर ! तूं वेडा. नि ते धनी म्हणून शहाणे. खरं आहे, धर्मा ! मूर्खाचं होऊं नये चाकर !—म्हणूनच तर चढले आहेत ना सारे !



**धर्मा**०—[ निःश्वास टाकतो, पुन्हां चिडत ] हाच काळ्याबापू, वहिनी, मामाश्येटच्या लाथा खात व्हता लाथा ! थरथर कापत कापत दाराआड तोंड लपवून उभा ऱ्हायचा !...मी, मी,...परतकश् या डोळ्यांनी पायलय् ! फार लांबची नाय् गोष्ट...धा न धा इस...बाइसत्येइस वर्सांपाटींच—

**कमळा**०—(निश्वास टाकून...खिन्न स्वरांत ) अरे, मामंजीच्या गोष्टी कशाला सांगतोस, तूं धर्मा ?...त्यांचं कुठे, बाबा ?... तें सारं निराळं होतं. !...तें सारं वैभव !...साऱ्यांना दरारा तितकाच, पण सुखंही तितकंच होतं !...(निश्वास टाकून ) हं...आतां म्हणजे काय ?...आंधळं दळतंय्—नि कुत्रं पीठ खातंय्—

: १०५० :

**धर्मा**०—(क्षणभरानें...) घेवाच्याच ताब्यांत दुपारून् श्येवटीं म्यां भात दिलं...तवा कुटं माजा जीव खालीं पडला, वैनी !...पन बगा...तो गिरनीच मुकादम माज्याकड् रागारागन् बगूं लागला; लय्लय्...चरपडला असल मनांत...

**कमळा**०—(आश्चर्यानें...) तें रे का धर्मा ? त्याचा काय संबंध त्यांत ?

**धर्मा**०—अवो वैनी, बापू काय...आन् त्याचा तो मुकादम काय...आपले घरचे...पळकीचेच चोर ह्ये !...कुटंबी जिवानिशी गळा कापाया बगणार भाऊश्येटचा......कुटं काय घालमेल करतील नेम नाय् त्येंचा...

**कमळा**०—(कुतूहलानें)...कुठला रे म्हणतोस हा मुकादम ?—गेल्या वर्षी नाडी पिऊन आपल्या सदूच्या कानफटांत मारली होती गिरणीच्या दारांत तो ?

**धर्मा**०—हांऽहांऽ...तोच वैनी !-आन् सदून् काय कमी ख्येचलान् का मग त्याला ?...श्याप धुंदी उतरून पाया पडूं लागला त्याच्या...

**कमळा**०—बरीं रे एकेक रत्नं गोळा केली आहेत काळेबापूंनीं ?...

**धर्मा**०—रत्नं ?...अवो तो मुकादम म्हजी खवीस हाय् येक खवीस !...अगदीं सैतानाचा उजवा हात !...(मान नापसंतीनें हलवून...) ती सारी गिरनच बगा वैनी, चोरांचा बाजार हाय् !...अगदीं अंदाधुंद...समदा काळा-कंपू...

**कमळा**०—( जरा खिन्न स्वरांत ) पण हें सारं समजायला पाहिजे ना यांना ?...यांनीं तर देऊन ठेवलीय् चोरांच्याच हातांत आपल्या तिजोरीची किल्ली...

**धर्मा**०—आतां देव इंजीनवाला भाऊश्येटला जपनार तेवडाच येकला...

**कमळा०**—( समाधानी स्वरांत ) खरंच !...ते बाप्पा आहेत एक देव माणूस गिरणींत...म्हणून थोडा आधार तरी वाटतो त्यांचा मला...

**धर्मा०**—त्या येवाचा, वैनी, त्या मुकादमावर लय् वचक !—हां...येळ पडली त् त्यो येव, खाडकन् त्याच्या थोतरींत बी लगावतो येक !...आन् नाय् म्हनलं...तरी बगा...काळेबापू येवापुढं नांगी टाकून असतो, हां ! त्यो गिरनीचा नोकर माणूस...पण त्याचा तसा वचक हाय् बापूवर बी थोडा...म्हनून त् उगड-उगड कारवाया करता नाय् येत गिरनीत...बापूला भाऊश्येटविरुद...

**कमळा०**—(निश्वास) असल्या, घरच्या माणसांपुढे, कोणी झालं तरी काय करणार, बाबा ?–सुस्कारे टाकण्यावाचून दुसरा इलाज कां आहे आपल्याला ? अरें, देव झाले तरी नोकरच, धर्मा...

**धर्मा०**—पन् मोठा ब्येरका हाय बरं का, वैनी, येव !...आपन सवता-हून काय बी बोलणार नाय् भाऊश्येटकड् किं बापूकड्—

**कमळा०**—दोघांचीही संभाळायची मर्जी...ना !—

**धर्मा०**—नाय् पन् वैनी, आपल्या भाऊश्येटवर अगदीं लय्च त्याचा जीव ! पन् त्याचं तोंड आपलं बंद...

**कमळा०**—अरे, असल्या न्याऱ्या भागीदारांची ती मुलखावेगळी जोड-गोळी ! त्यांची नोकरी म्हणजे सुळावरचीच पोळी ती, धर्मा !...देवांना खूप दिसत असेल रोजचं ! ..पण बोलणार कशाला ते ?...नि बोलणार तरी कोणाकडे ?—

**धर्मा०**—( एकदम आठवून ) हो वैनी, बरी याद आली !...बाप्पा दोन-पारी मला म्हनला...'तुज्या वैनींना दोन चार दिसांत मला सवड करून भेटाया यायचंय्'...

**कमळा०**—त्यांची बायको वारल्यापासून वर्ष सव्वावर्षांत ते या बाजूला फिरकलेच नाहीत !...मला भेटणार आहेत म्हणाले देव ?...कशाला रे ?—

**धर्मा०**—म्हनला पुष्कळ बोलायचंय् वैनींशी !...

**कमळा०**—( सचिंत ) माझ्याशी बोलायचंय् ? काय सांगणार असतील कोण जाणे ?...( घाईनें ) तुला रे केव्हां सांगितलं त्यांनीं ?...काळेबापू नव्हते तिथें ? त्यांच्या देखतच सांगितलं ?



**धर्मा०**—अवो, बापूच्या देकत बरं सांगल तो ? आपल्या घरीच म्हनूला...

**कमळा०**—( आश्चर्यानें ) घरीं गेला होतास देवांच्या तूं ?...

**धर्मा०**—हां...कामं आटपतां आटपतां...येवालाव् आज ज्येवायला वकत झाला व्हता...कुटली बा गिरनीची वसुली करून आला आपल्या फटकटी-वरन् श्येवटीं ! बापूबरोबर बोलला, बापू ग्येला घाईघाईन् मुंबईला दुपारच्या गाडीन्

**कमळा०**—अस्सं ?...बापू निघून गेल्यावरच सांगितलं होय् तुला देवांनी ?

**धर्मा०**—अवो...गतसाल पोरीचं लगीन झाल्यापासन् बाप्पा घरांत येकला हाय्, वैनी !...आमचं भाताचं माप झाल्यावर मला म्हनला...'चल् धर्मा, आतां माज्याकड्च ज्येवाला...सकळ तयार करून ठेवलीय् मी डाळ-भाजी ! जाऊन भात टाकूं आदनांत, आन् ज्वेवायला बसूं'—

**कमळा०**–तसे आहेतच ते मायाळू मनाचे ! कसलं लहान मोठं नाही त्यांना.

**धर्मा०**—तितं ज्येवतां ज्येवतां घरीं सांग्लं येवान् मला ...

**कमळा०**—अस्सं होय ?...काय विचारीत होते रे ?

**धर्मा०**—म्हनला...'धर्मा, तुज्या भाऊश्येटचा असा सगळा अगदीं थंडा कारबार—आन् विनूदादा त् लक्ष घालायला नाय् तयार...त्याच्या काय् कानावर घालून बी उपेग नाय् काय्...तवा आतां...तुज्या वैनीलि समदं सांगनार हाय्...त्यांनीं काय् क्येलं त् पायचं...'

**कमळा०**—( त्राग्यानें ) पण आतां सांगणार काय आहेत देव मला नवं ?...आणि मी काय करणार आहे ?—अरे तें नेहमीचंच आहे !—काळेबापूं-बद्दलचंच असणार !...दुसरं काय ?

**धर्मा०**—अवो वैनी, दिवालीला हिशेब झाले ना आपल्या गिरनीचे ?... त्यांत केल्या असतील...बापून् लटपटी.

**कमळा०**—आणि मला समजून काय उपयोग त्या ?— असल्या या घरच्या माणसांचा कां कोण हात धरणार आहे, बाबा ?

: १०५१ :

( लांबून फटफटी सायकल जवळ येत असल्याचा आवाज. )

**धर्मा०**( कानोसा घेऊन ) आँऽ !...दोन तीन दिसान् येईन म्हनला-नि आजच आला कीं काय देव ?...

**कमळा०**—( आश्चर्यानें ) कोणरे ? देव आले ?...

**धर्मा०**—( खिडकींतून पहात ) हां...येवच आला वैनी...त्याचीच फटफटी ह्यी ( फटफटी थांबल्याचा आवाज )

**देव०**—( पडद्यांतून ) धर्माऽ ए धर्माऽ, कोणी आहे कां ?

**कमळा०**—( हॉलच्या दाराकडे पहात, हसून...) या ना बाप्पा...( देव प्रवेश करतात ) अगदीं बऱ्याच दिवसांनीं वळलांत आज इकडे...बसा ना—

**देव०**-( जरा संकोचानें, बसत ) हो वैनी, बऱ्याच दिवसांनी तर खरंच ( घुटमळत) पण भाऊंना जरा टिपणं द्यायचीं होतीं गिरणीच्या हिशेबाच्या जमा-खर्चाचीं...तेव्हां म्हटलं—

**कमळा०**—अस्सं अस्सं...पण मग ते तर गेले आहेत कापरीला खंड वसुलीच्या कामाला,...शेतकऱ्यांच्या खळ्यावर...

**धर्मा०**—( हसून ) वा ! तुमाला जनु ठाऊकच नाय्, येवा, त्ये...

**देव०**—( थोडें सावरून घेत ) मला ठाऊक आहे ‘रे तें, म्हाताऱ्या ! पण दुपारीं तुझ्याकडे टिपणं द्यायला विसरलों गिरणींत...तेव्हां म्हटलं, तीं आजच्या आज घरीं तरी नेऊन ठेवलेलीं बरीं !—( कमळामावशीला– ) म्हटलं, आपल्या-कडून तरी दिरंगाई नको कसली ! अशीं आणून हातांत दिलीं नाहींत तर भाऊ आपणहून कधीं मागायचेही नाहींत;...आतां अशी घरीं आल्यावर अनायासें चालून आलेली समोर दिसलीं तर उघडून तरी पहातील निदान...

**धर्मा०**—उद्या दोनपारचे परततील कीं इयेट ! नाय् का वैनी ?...

**कमळा०**—हो...पण मग पाहिजे तर माझ्याकडे देऊन ठेवा, बाप्पा, तीं टिपणें !–मी देईन कीं आल्याबरोबर...

**देवा०**—( जरा चमकून ) तुमच्याकडे ?...नको वैनी,...तुमच्याकडे तीं न दिलेलींच बरीं !...( कमळामावशी जरा चमकते. )

**धर्मा०**—( साश्चर्य ) म्हंजी ?...बाप्पा, ह्ये काय ?

**देव०**—( कमळामावशीला ) रागावूं नका हं, वैनी !...आपल्या भाऊंचा स्वभाव पडला जरा तऱ्हेवाईक !...पटकन् म्हणतील...‘ व्यवहाराचीं टिपणं तुम्ही बायकांच्या हातांत कशाला टाकलींत ? ’...तसं नको...( धर्माला ) घे धर्मा, त्यापेक्षां तीं तुझ्याकडेच ठेव. नि आल्यावर एवढंच सांग भाऊंना,... म्हणावं, आल्याबरोबर द्यायला हे कागद दिले आहेत देवांनीं...



**धर्मा०**—( खंवचट हसून ) काय येवा, लपंडाव हा तुमचा ?...वा वा... अवो बाप्पा, असं कोंबडं ढाकून काय उजाडायचं ऱ्हाइल व्हय् ?—

**कमळा०**—( खिन्न हसून, धर्माला ) अरे, पण त्यांच्या शेटना कोंबडं ढाकण्याचंच तेवढं समाधान पाहिजे असेल तर मिळेना बापडं !...तूं का मधें बडबडतोय्स ?...( देवाना ) द्या...बाप्पा, तुम्ही आपलीं तीं टिपणं धर्माकडेच द्याहो, त्यांच्याकडे द्यायला !...मला बाई–माणसाला कशाला पाहिजे उगीच तो व्यवहाराचा जंजाळ आणखी ?

: १०५२ :

**देव०**—( सांवरीत, जरा संकोचानें ) तसं नाहीं, वैनी...माझ्याबद्दल उगीचच तुमचा जरा गैरसमज होतोय्—

**कमळा०**—( रंजीसपणें ) छे छे !–तुमच्याबद्दलच्या गैरसमजाचा प्रश्न नव्हे हा ! मी खरं तेंच सांगतेंय्—अहो, आपल्या आळवाची खाज आपल्यालाही माहीत नसतें का ?

**धर्मा०**—( खोंचून ) वैनींचं येक ऱ्हाउ द्या, बाप्पा ! पन् तुमच्या बापू-श्येटला समदी दुनिया बी वळकुन् हाय् !...आमच्या भाउश्येटकडेच कायती काळेबापूची मोठी पत आन् त्याचा हा असला मान्......

**देव०**—( जरा दटावून...) गप्प ‘रे धर्मा !...मूर्ख आहेस तूं !...आपण कांहीं तरी कुठें तरी असं बोलू नये, कळत नाहीं त्यांत—

**धर्मा०**—[ खंवचट हसून ] हाः हा !–काळ्याच्या अमदानींत तुमच्या माज्यासारकी शानी मानसं मूर्खच ठरनार, येवा !...तुमी मला म्हाताऱ्याला नका ह्ये शिकवूं बर का !—

**देव०**—[ जरा मिळतें घेत...] अरे, सारा दिवस गिरणींत ताटकळून घरीं पोचला नाहींस तों तुझं आपलं हातानें तें काम चाललंय् नि तोंडानें ही असली बडबड !...कायरे म्हाताऱ्या, तुझ्या अंगांत जोर तर बराच दिसतोय्...नि भांडायची खुमखुमीही खूप आहे अजून अंगांत !...अंऽ ?...[ हसून ] जा...जरा विसांवा घेतलास तर वैनी काय रागावणार नाहींत तुला.

**धर्मा०**—( हसून ) इसांवा ?...आतां इसावा, येवा, देव घ्यायला सांगल मला, तवा येकदमच घेईन मी एक दीस—

**कमळा०**—( हसून ) पुरे रे तुझं !...( देवांना ) आयुष्यभर कामं केलेलीं माणसं, बाप्पा, हीं !...नि एवढ्या अगदीं करड्या मामंजींपुढें देखील नेहमीं योग्य तेंच बोलायची, संवयच झालेलीं ना यांना, लहानपणापासून !...मग गप्प कशीं बरं बसतील म्हातारपण आलं म्हणून ?...अहो...या धर्मा म्हाताऱ्याची ही बडबड आहे म्हणून तरी मला थोडें थोडे व्यवहार कळतात, यांचे बाहेर चाललेले ! ...नाहींतर, घरांतल्या चुलीजवळ आहोरात्र राबतां राबतां, चुलींतल्या लाकडांसारख्याच नुसत्या जळून जायचों आम्ही !

**: १०५३ :**

**देव०**—( धर्माकडे बेरक्या नजरेनें पहात ) होय रे धर्मा ?...म्हणजे वहिनींकडे येऊन रोज चहाड्या करतोस आमच्या, अंऽ ?...आज काय सांगत होतास आणखी त्यांना ?——

**धर्मा०**—( हसत ) चाड्या ?–नाइबा...चाड्या नाइत आन् तुमच्या व नाईत !...सांगत व्हतो आपल्या गिरनीतल्या रोजच्याच उरफाट्या गमती, वैनींना !...त्या तुमच्या काळेबापूच्या आन् मुकादमाच्या—

**कमळा०**—(जरा कुतुहलानें) हो का हो, बाप्पा ?...हा सांगतो तें खरं ?

**देव०**—( धर्माकडे पहात ) आतां हा सांगत होता काय तुम्हाला, कोणास ठाऊक ?...( हसून ) पण नाहीं तरी हा तुमचा धर्मा म्हणजे फारच संशयी, वैनी !–आज बघा, संबंध दिवसभर गिरणींत उगीचच झगडत राहिला... म्हणे, आपलं भात देईन तर एकट्या देवाच्याच ताब्यांत देईन.

**धर्मा०**—( थोड्या रागानें ) देवा, उगीच नाटक नका बर का करुं असं !...हेरीच नाय् झगडलो मी आज...मला अनुभव हाय् रोजचा !...आन् बाप्पा, तुम्हाला बी मी वळकतो !...तुमचं धोरन काय मला म्हाइत नाय् ?—

**देव०**—( अर्धवट हसत ) वारे वा ? मी रे काय केलं ?

**धर्मा०**—( राग मावळून अर्धस्मित करीत ) तुमी नाय् काय् क्येलत् !– पन् बगा, तुमी आपले ठेवनार इकड् काळेबापू खूष...आन् तिकडे आपले भाऊश्येट बी खूष !...तुमी दुकवनार थोडेच कोनाला ?...

**देव०**—( प्रेमानें, पण जरा रागाचा आव आणून ) तें माझं राहूं दे रे, म्हाताऱ्या !—पण आतां मला सांग, सकाळीं भाताच्या गाड्या घेऊन तूं गिरणींत



आलास, तेव्हां बापू म्हणत होते तसं आपल्या मुकादमाच्याच ताब्यांत दिलं असतंस तुमचं भात, तर काय मोठं नुकसान होणार होतं रे ?——

**धर्मा०**—( मिस्कील स्मित करून ) मला म्हाताऱ्याला अगदी पोरागत शिकवता व्हयू, बाप्पा ?–या सालीं तुमचा गिरण कंपनीचा भाताचा धंदा झाला का दीड दोनशें मुड्याचा ? त्यांत काय केलं तुमच्या काळेबापून् त्येवढं सांगा वैनीना.

**कमळा०**—( न समजून ) कशाबद्दल म्हणतोयस रे, धर्मा ?

**देव०**—( शहाजोगपणें ) असं का ? काय केलं त्यांनी बाबा ?...ही एक नवीनच बातमी समजतेय् मला.

**धर्मा०**—[ कडवट हसून ] अस्सं अस्सं व्हयू ?—आतां मीच सांगतोय् जनू तुमाला बी, बाप्पा, नव्यान् ह्यें...अंऽ ?—[ कमळामावशीला– ] गिरनीचाच पैसा आग़ोटीला पेरला श्येतकऱ्यांमंदी बापूंनी, आन् त्यांच्याशी साट रुपयाला भाताचा मुडा बांधून घ्येतला, बरं का, वैनी ?—आन् भात तयार झाल्यावर दसऱ्याला गिरनकंपनीला सव्वाशें रुपयान् मुड्याला टाकलं...

**कमळा०**—[ आश्चर्यानें एकदम ] काय ? म्हणजे ?

**: १०५४ :**

**देव०**—[हसून] तूं काय आमच्या वह्या वाचायला गेला होतास होय ?

**धर्मा०**[ जरा अभिमानानें ] अवो लिवता नाय् येत आमाला म्हणून काय काळ्याचे पांडरे बी झाले नाइत व्हय् आमचे, देवा ?

**देव०**—[हसून...] झाले असतील रे काळ्याचे पांढरे !—पण मूर्खा, आंतला मेंदू बदलणार आहे थोडाच तुझ्यासारख्या माणसाचा ?...नाहीं त्या भानगडींत तुला नाक खुपसायची सवंयच बाकी, धर्मा !...

**धर्मा०**—[ हसत ] बरं, तसं का म्हना ना !...पन् मला समजत नाय् असें नका म्हनूं !—मला म्हाताऱ्याला बी डोळ हाइत, कान् हाइत...

**कमळा०**—तुला कसं रे हें सारं माहीत, धर्मा ?...

**धर्मा०**—[ डोळे मिचकवून ] त्ये भातवाले कपरच्येच श्येतकरी हैत नाय का, वैनी !...डोंगरलीच्या खंडाच्या अवंदाच्या ख्येपा क्येल्या, तवा येकदां कपारच्या मानसांना म्हनलं म्यां...' चोरानों, येक वखत तुमी आमच्या मामाश्येटचीं श्येतं लावलीं हैत...त्यांचीच आण हाय तुमाला बगा...खरं सांगा !–'

**देव०**--( हसून ) मग कोणी रे काय सांगीतलं तुला ?

**धर्मा०**—माझ्या बरोबरच्या एका डोक्यान् सांगलं मला समदं !...त्यो मुकादम कारबारी या कामांत काळेबापूचा !—भाऊश्येटला कळल बिळल म्हणून त्यानं समद्या श्येतकऱ्यांना धा धा वीस वीस रुपये इनाम बी दिल्यंत् !—

**देव०**—अरे चोरा !--तुला तर आमच्याहून बित्तंबातमी दिसतेय् ?

**कमळा०**--( गोंधळून ) काय तरी बाई !...

**धर्मा०**—[ रागानें ] पन् यवड्यानच काळी दानत थांबली नाय् त्येंची, वैनी !--त्या चोरांनीं खळ्यावरच चीम भ्येसळली भातामदी !...खरं ना, देवा ?

**कमळा०**--[ प्रश्नार्थक ] चीम ?...म्हणजे ?

**देव०**—अहो, वाऱ्यावर उडवतात नाही का बिनदाण्याचं पोलं भात ? तें म्हणत असेल तो !—

**कमळा०**--[आश्चर्यानें] काय ? तें ?-तें रे कशाला मिसळायचं त्यांत ?

**धर्मा०**--या आमच्या देवाबिवान् माप घ्येतलं भाताचं भाऊश्येटसाटी तर ? त्याला नि श्येटला माप वाढवून चकवायला !...

**कमळा०**--काय तरी मेले !...हें खरं काहो, देव ? गिरणीतल्या गिरणीतच एकमेकाला फसवण्याचे धंदे ?

**देव०**--( मुत्सद्दीपणें ) असेल बा खरं !

**धर्मा०**--आन् शेवटी मुकादमान् भाऊश्येटच्या देखत वरड करायची, वैनी, भाताच्या दर मुड्याला तांदळाचा उतार गोण दीड गोण कमी भरला, अशी ! म्हंजी परभारं...त्ये श्येतकरी चोर आन् ह्ये बेटे साव !.. ह्यी बुद्दी आमच्या भाऊश्येटच्या विरुध !...का, तर त्यांचा क्येसानी बी गळा कापाया मिळतोय् ना चारी बाजूला, म्हनून !--

**कमळा०**--(निश्वास...चिडून) असं डोकं तापतं हें असं कांहीं ऐकलं कीं !

**धर्मा०**--आट वर्सांपाटीं त्या गवताच्या भागीत भाऊश्येटचे दोन हजारच ग्येले...पन् गिरनीत...हे आपले बाप्पा नसते तर...

**कमळा०**—[ रागानें ] अगदीं वाटोळं झालं असतं वाटोळं...साफ !

**देव०**—( सहानुभूतीनें ) असं बोलूं नये वैनी !--

**कमळा०**--व्हायचं राहिलंय् काय ? झालंच आहे म्हणा जवळ जवळ....



:१०५५:

**धर्मा०**—[ मध्येंच ] नका वैनी नका...[ तोंडांत मारून घेऊन ] असं बोलूं नाय्...[ हात जोडून वर पहात ] आपल्याला परमेस्वराच्या न् मामाश्येटच्या कुरपेनं काय कमी हाय् अजून बी !-अजून हाय त्ये नीट संभाळलं तरी बी व्हईल !-

**कमळा०**--[ रागानें ] अरे पण संभाळणार कोण म्हणतोस तूं, धर्मा ? हे देव ? तूं ?...म्हातारा नोकर ?...कां मी ?...बायको माणूस ?...[ निश्वास-] तो माझा विनू !...तो तर आतां शिकलेला शहाणा !--शहरचा रहिवाशी झाला ना तो आतां !—मोठा नोकरीवाला झाला !...नि इथें हें सांबाचे अवतार गादीवर ! !-असं सारं पाहिलं म्हणजे जीव नुसता गुदमरतो, राग येतो,...नि बडबडते मग कांहीं तरी, मी, संताप झाला जिवाचा कीं, तोंडाला येईल तें--

**देव०**—[ गंभीरपणें-] तसा मला तुम्हाला बोलण्याचा कांहीं अधिकार नाही, वैनी !...पण आतां आज आलंय् ओघानें म्हणून सांगून टाकतों— जिवाचा केवळ संताप करून चालणार नाहीं असा, वैनी !...तुम्ही...नाहीं तर निदान विनूनें, कोणीतरी थोडं फार लक्ष नको कां घालायला आपल्या व्यवहारांत ? नुसती भाऊंच्याच चांगुलपणावर सारी भिस्त टाकून कसं निभेल ?

**कमळा०**—[ थोडी थंडावून ] खरं असेल तुम्ही म्हणतां तें, बाप्पा !— पण मी आपली एक चूल संभाळणारी सामान्य स्त्री ! माझ्यानें हो काय होणार ?

**धर्मा०**--[ हळूंच ] असं का म्हनता वैनी ?-मी तू काय, वैनी, तुमच्या दारचा एक मजूर गडी !-पन्...मला बी मोप दिसतं ...समजतं ...पावला पावलाला, बरं कां ?...

**देव०**—[ त्याची जरा चेष्टा करीत...] हं...आतां आणखी काय सांगणार आहेस तुझा शहाणपणा, म्हाताऱ्या ?

**धर्मा०**—[ बेडरपणें हसत...] माज्याकडे लय् शानपना हाय्...पन तो ऐकनार हो कोन, बाप्पा ?...तो चालत् नाय् ना...

**देव०**--[ त्याच स्वरांत ] कोणापुढे ?-बापूंपुढें म्हणत असशील...

**धर्मा०**--( बेफिकीरीनें ) बापूपुडं ? त्याच्यापुडं ब्येस बरा चालल !— मला आमच्या श्येटचा जरा जोर पायजे होता, बास...पन् आमच्या श्येटपुडच् नाय् ना चालत माजा शानपना !—

**देव**॰--( हसून ) तो रे का, बाबा ?—

**धर्मा**॰--तुमीच सांगा, धेवा !...माजा येड्या म्हाताऱ्याचा शानपना आमच्या भाऊटश्येटनी वापरला असता, त् त्या बापून् आपल्या गिरनीच्या गाड्या गडी नि बैल, बारा म्हैन सवताच्या गवताच्या वकारीकड् फुकट वापरले असते का राजरोस ?...( आव्हान देत ) आतां बोला ना तुमचा श्यानपना, बाप्पा !

**देव**॰—( किंचित् हसत, क्षणभरानें ) अरे, तुझ्या भाऊशेटना काय कमी आहे ?–बापूसारख्या त्यांच्याच भागीदारानें त्यांच्या वैभवाचा फायदा घ्यायचा नाही तर मग कोणी घ्यायचा ?...अं ?...

**कमळा**॰—(किंचित् रोषानें ) मला तुमचा टोमणा कळतो बरं का, बाप्पा !...कोणी झालं तरी अशीच चेष्टा करणार म्हणा !—कर्णाचे किं कुबेराचे कसले अवतार समजतात लोक, यांना ?...

**देव**॰—( मिळतें घेत ) चेष्टा नव्हे ही, वैनी ! अहो भाऊंची वागण्याची पद्धतच तशी आहे...तिथें काय करायचं ? सुरवातीसुरवातीला मीही त्यांच्याकडे याबद्दल माझ्या परीनें अनेकदां बोललों ! पण तेव्हां त्यांनीच सांगितलं मला...

**कमळा**॰--[ चमकून ] काय सांगितलं ?

**देव**॰—मला म्हणाले, 'आपण असल्या क्षुल्लक बाबींमध्ये लक्ष घालूं नये, देव !...गाड्याजोड्या निरुद्योगी पडून राहिल्या तर वापरेनात का काळेबापू !...ते आपलेच आहेत...'

**कमळा**॰—[ रागानें ] हो हो तर !—सगळं जगच याचं आहे !... अगदीं विश्वकुटुंब यांचं !—

**धर्मा**॰—[ पटकन् ] पन वैनी, काळेबापू नाय म्हनायचा हां तसं !...तो आपला पै–पैसा बि बचावनार आन भाऊश्येटचा मोफत मिळल तो रुपया बी गपचीप घश्यामंदी घालनार !—

**देव**॰—[ हसून ] हें रे कशावरून ठरवलंस तूं, म्हाताऱ्या ?

**धर्मा**॰—[ मान हलवून ] तुमच्या आदीपासन वळकतोय्, धेवा, मी तुमच्या बापूश्येटला आन् आमच्या भाऊश्येटला बी !–धा वर्सापाटी आमच्या श्येटनी जंगल कूप ठेवलं व्हतं...तवा बापूच व्हता समदा कारबारी...आन् मी नव्हतो की गाड्यांवर म्होरक्या ?...[ कमळामावशीला ] अवो वैनी, जंगलांतले



अस्सल अस्सल नग भाईरच्या भाईर पडावातून विकून बापून् पैसा केला ! आन् भाऊश्येट कश्याला बगायला जातात ? त्यांनीं दीड दोन हजाराचा तोटा तेवडा सोसला.

**कमळा**॰—[ खिन्नपणें ] हे कसले धंदे ?...त्यापेक्षां दोनवेळा जेवून स्वस्थ झोंपा तरी काढाव्यात निवांत—

: १०५६ :

**धर्मा**॰—[ तिरमिरीनें ] आन् मंग ती भागीतल्या गवताच्या वकारीला आग लागली ! भाऊश्येटनी येकदम कच खाल्ली...बापूबरोबरची भागी बंद केली... तवापासन् पुढं आमचे गवती नंबर समदे त्या बापूकडे कायमचे...

**देव**॰—[ हसत धोरणीपणें ] अरे मग वेड्या, झालं काय त्यांत ?...त्या नंबरांच्या मक्त्याचे पैसे देतात बापू दरसाल आगाऊ, तुझ्या भाऊशेटना, म्हाताऱ्या !

**धर्मा**॰—[ एकदम उसळून– ] हो हो हो––पैसे देतो तर बापू भाऊश्येटना !–धरमच करतो कीं नाय जनू ?...[थोडें थंड होऊन] अवो बाप्पा, तुमी वेड पांगरलं म्हनून मी फसायचा नाय् तसा !—आतां गवती नंबरांचे भाव चडले तिपटीला या लडाईला !––आन् तरी बी काळे बापू बोलत नाय् रकम वाडवायची गोष्ट बरं का वैनी,...त्यांत त्याचा सवताचा म्हामूर फायदा हाय् ना, म्हनून !– आन् आमचे भाऊश्येट बी मनांतल्या मनांत त्याची भीड राकून गप्प !...

**कमळा**॰—[ निश्वास...] सगळ्याच बाजूनें काळेबापू मजा मारताहेत यांच्या जिवावर... दुसरं काय ?

**धर्मा**॰--आतां तुमीच बगा कीं वैनी !...आन् तरी आज बापूच्या वकारीतल्या गवताच्या धावीस गुंड्या भाऊश्येटच्या बैलांपुडं म्यां सोडल्यात् तोच काळेबापू माजा नि माज्या श्येटचा बा काडतो !––

**कमळा**॰—खरं ना हें सारं, बाप्पा ? काय म्हणायचं अशा वेळीं ?

**देव**॰--( मान बाजूला फिरवून ) मी वहिनी नोकर माणूस !—त्यांत पुन्हा बापू नि भाऊ दोघांचाही ! मला त्यांत कांहींच बोलतां येत नाहीं ! ... दोघेही मला सारखेच मानले पाहिजेत नाहीं का ! खरं–खोटं मी काय करणार त्यात ? तुम्हीच सांगा.

**धर्मा**॰--(रागानें) त्ये धेवा तुमचं तसलं बोलनं नका सांगू मला !...बापून् गतसालीं सवताचं भात किती सडून घ्येतलं गिरनीत ? ते सांगा. बगू वैनीबायला...

**कमळा**०--स्वतःचं भात सडून घेतलं ? म्हणून काय झालं ?...त्याची सडणावळ देली असेल ना बापूंनी ?—( देवांना ) काय म्हणतोय् हो हा धर्मा, बाप्पा ? ( देव गप्प रहातात... )

**धर्मा**०-- ( आव्हानाच्या स्वरांत ) आतां सरळ सांगा ना देवा ! गप्प का व्हायला ?

**कमळा**०—( रंजीसपणें ) एवढं कांही गुप्तच असेल तुमचं तर राहूं या. नका सांगू मला...

**देव**०—( पटकन् ) माझं कसलं गुप्त असणार त्यांत, वैनी !...पण मोठा पेंच पडतो अशावेळीं...( क्षणभर घुटमळून ) खरं आहे धर्मा म्हणतो ते... सडणावळीचा भाव भाऊंना सांगून कमी करवून घेतला, त्या मुसलमानाच्या गिरणीशी कॅांपिटिशन करायला, गिऱ्हाइक ओढायला...नि बापूंनी मग त्या भावांत स्वतःचे दोनशे नि इतर कॉंट्रॅक्टचे दोनशे असे जवळजवळ चारशे मुढे भात सडवून घेतलं !...खरं आहे तें--

**कमळा**०—गिरणीला तोटा आला असेल नाहीं असल्या उलाढाल्यामुळें ?

**देव**०—हो ना ! मला डोळ्यांनी स्पष्ट दिसतं तें...मनाला मुळींच पटत नाही...पण असल्या गोष्टी सांगणार कोणाला, सांगा ? आणि सांगून त्याचा उपयोग आहे का ?--भाऊंची पद्धत बदलणार आहे थोडीच ? बापूंचा रोष मात्र व्हायचा माझ्यावर नाहक !--

**कमळा**०—( निश्वास टाकून ) हं...आकाशच फाटणार म्हणूं लागलं तर कुठंकुठं ठिगळं मारत बसणार दुबळं बाई-माणूस, बाप्पा ? --पै-पैसा करत घरांतलं यांचं वैभव संभाळायला पहायचं तेवढं कळतं आम्हाला !

**धर्मा**०—(पटकन् ) पन ह्ये...काळेबापू-गळेकापू हसत हसत भाऊश्येटच्या हजारांनीं माना कापणार भाईरच्या भाईर, वैनी ?...तरी आमच्या श्येटचा बापूवरच अजून बी लय् लय् इश्वास--

**देव**०—( संथपणें ) भाऊंना कोणाला कुठल्याही बाबतींत दुखवायचं जिवावर येतं ना !...सर्वांशीं गोड असावं-रहावं हें आपलं भाऊंचं साधं-सिधं तत्व !

**कमळा**० --( रागानें ) नका त्यांचं कौतुक सांगूं माझ्याकडे, बाप्पा !-- तुम्ही आमच्या घरांतल्या सारखे वाटतां म्हणून सांगतें...ही असलीं माणसं म्हणजे घरच्या बायकांचे कर्दनकाळ...



: १०५७ :

. **धर्मा**०—(पटकन्) पन् त्याला इलाज नाय् भाऊश्येटचाव् वैनी ! (छातीला हात लावून) आमच्या भाऊश्येटचं ह्ये लय् मऊ...अगदीं लोन्यागत !–पन् बगा... (डोक्याला हात लावून) धोरण कमी ! पोरांपुढं न् चोरांपुढं बी यकदम इरगळतील...

**देव**०—( हसून...) पक्का इरसाल म्हातारा आहे अगदीं...

**धर्मा**०--( एकदम आठवून ) तीं चिंचाळची नि दुष्काळची कुळं हैत ना आपली, वैनी ?...लय्...लय्...लबाड आन् नाटकीं ! श्येटसमोर डोळ्यांतून बळंच पानी काढु लागली की इरगळलेच भाऊश्येट !--

**देव**०--( हसून ) कायरे करतात भाऊ, धर्मा ?--

**धर्मा**०—अवो बाप्पा, मुडा मुडा खंडात सूट घेतात् त्यांना !...त्येंच्या ल्येकांच्यां खोपटांत येक येक हे कनगे भरलेले !...आमच्या भाऊश्येटचा भाइरच्या भाईर समदा व्यवहार !...(निश्वास) आपल्याला उगड्या डोळ्यान् बगावं लागतं समदं !...करणार काय ?

**देव**०—( सस्मित ) शेटना नाही सांगत तूं हें ?—

**धर्मा**०—( खोंचून ) तुमी, बाप्पा, कितीसं सांगतां श्येटना...तुमी बगतां त्ये ?...सांगा ?

**देव**०—(हसून) माझं सोडून देरे ! तूं काय करतोस ?—

**धर्मा**०—रंगात असलं श्येट कदी येताना, तू सांगतो मी हळूंच ! पण श्येट म्हणतात ' जावदेरे धर्मा !--ज्याचं खोटं कर्म त्याच्याकड् ! आपन सवता नाडूं नाय् कोनाला...'

**कमळा**०--( त्राग्यानें ) झालं !...आतां अशा माणसांपुढें काथ करणार कोण, बाप्पा ? कपाळ आपटणार ?...मऊ हृदयाचे आहेत म्हणे !...माणूस म्हणजे नुसता मासाचा गोळा असून उपयोगी नाही ! हाडाचा मधून मधून सांगाडाही पाहिजे !...( धर्माकडे वळून ) मला नकोरे शहाणपणा शिकवूं, डोक्र्या !--

**देव**—( कौतुकानें हसून ) ठकाला महाठकासारखा वागतो तुमचा धर्मा, मधून मधून, वैनी !...( धर्माला ) पण डोबा झालास तरी कांहीं अक्कल नाही तुला, धर्मा !...भाऊशेटचं नको सांगूस...ते सांब आहेत ! पण तूं मात्र त्यांच्या पुढचा नंदीच नुसता !...( धर्मा हसतो. कमळा हसते. )

**धर्मा॰**---(पटकन् खोंचक स्वरांत) ह्यो नंदी पायलात् तुमी, देवा...पन् अजून गिरनीतल्या लोकांनी या नंदीची लाथ नाय् पायली !...श्येटच्या घराच्या देवळांत गप्प बसलाय् तंवर ठीक...पण वकत आला त् म्हातारपनी बी ह्यो नंदी पुटकन् उठल ! आन् उलटून लाथ झाडल ! हां !–मंग फुटतील छाताडं साऱ्या चोरांचीं ! (देव हसतात)

**कमळा॰**—(हसून) हो हो तर !—मोठा आला सांगायला !...पण त्या सांबांनीं आपल्या नंदीच्या लाथा बांधून नाहीत ठेवल्या तरच ना ? (धर्माला प्रेमानें रागावून) बरं बरं जा आतां तूं...एका लिंबाचं चांगलं सरबत करायला सांग जा कुंदाला, बाप्पांसाठीं—नाही तर तूंच जा ना पटकन् करून आण...

**धर्मा**—(सहास्य) व्हय् वैनी ! (धर्मा जातो)

: १०५८ :

**कमळा॰**--(क्षणभरानें) हल्लीं फारच वाळलेले दिसतां हो, बाप्पा, तुम्ही !...जवळजवळ दीड वर्षांनी पाहतेय् मी, तुम्हाला !...त्यांत पुन्हां तुमची ही दाढी नव्यानेंच दिसतेय् मला !...(किंचित् थांबून) हिरुची आई गेल्यानंतर मलाही वेळ मिळाला नाही त्या बाजूला यायला !—

**देव॰**—(क्षणभर खालीं पहात गप्प राहून–) हं...

**कमळा**—(सहानुभूतीनें) हं ! झालं गेलं !...आपल्या हातचं का असतं तें ?...असा जिवाचा त्रागा करून घेणं मात्र बरं नव्हे, बाप्पा...

**देव॰**—(रुक्ष खिन्न हसून) त्रागा कसला, वैनी !...मलाही कळतं !–पण माझा इलाज नाही त्याला !–(निश्वास) हं...अगदीं ऐन संसारांत नलिनी मला एकदम सोडून उठून गेली...

**कमळा॰**--(दुःखी स्वरांत) सोन्यासारखं जोडपं म्हणून पहात असे मी तुमच्याकडे !...दृष्ट झाली आमची !

**देव॰**—(निश्वास...) हं, चाललंय्...हिरू गेल्या वर्षी कशी बशी मॅट्रिक-मधून सुटली दोनतीन वर्षांनी; . तेव्हां लागलीच खटपट करून तिचं लग्नही उरकून घेतलं ! म्हटलं, कसली जबाबदारी नको रहायला डोक्यावर माझ्या !... आतां उरला एकटा माझा जीव...ना कसला आगा ना पिछा !–हें असंच चालायचं आतां यापुढें माझं—



**कमळा॰**—(क्षणभरानें) हिरूचं लग्नही तुम्ही घाईघाईनें मुंबईलाच उरकलंत...इथं झालं असतं, म्हणजे त्या निमित्तानें तरी भेट झाली असती---

**देव**--पण तिच्या लग्नाचा तरी आतां कसला थाट करायचा होता, वैनी ? मनाशी नीट विचार केलान तिनेंच नि मी पाहिलेल्या मुलाशीं एकदां लग्नाला तयार झाली, हेंच पुष्कळ म्हणायचं !–तसा जावई चांगला सरकारी नोकर आहे मुंबईला...पण तरी त्यावेळीं हिरुला त्यांत खरं सुख कसं वाटणार होतं, वैनी ?--

**कमळा॰**--(अपराधी स्वरांत–) खरं आहे...माझ्या विनूला नि पर्यायानें आम्हालाही एक प्रकारें दोषच आहे त्यांत...

**देव॰**--(पटकन् समजावणीच्या स्वरांत) छे छे–वहिनी, तुमचा हो काय दोष त्यांत ?...विनय–हिरू या दोघां पोरांचाच प्रश्न होता तो ! आणखी कोणाला असलाच दोष त्यांत, तर आमच्या हिरूच्याच आईबापांना !...हो, आम्हालाच ! हिरू जी तीन साडेतीन वर्षे थांबली ती विनूच्याच शब्दावर विसंबून, ना ?...(निश्वास) आम्हाला वाटलं होतं तसं झालं असतं तें लग्न, तर बरं झालं असतं एवढंच... पण नव्हतं व्हायचं तसं...

: १०५९ :

**कमळा॰**--(हळूंच) पण तुमचा तरी दोष काय त्यांत ?...

**देव॰**—(शांतपणें) हो ना ! दोष तसा कोणाचाच नाहीं ! कारण, नीट विचारं केला तर त्यांत विनूचा तरी काय दोष ?...तो अधिकाधिक शिकत गेला... त्याला आमची हिरू मागून हळू हळू खेडवळ वाटली असेल, दृष्टी विस्फारल्यावर त्यानें वेळींच मनांतल्या मनांत बेत बदलला ! मनुष्य स्वभावच आहे हा म्हणायचा !

**कमळा**—(खिन्न स्वरांत) नुसता मनुष्यस्वभाव नव्हे...हा पुरुष स्वभाव आहे म्हणा, बाप्पा !--

**देव॰**—(खिन्न हसून) तसं म्हणा पाहिजे तर...पण पोरं वांकड्या मार्गानें तर गेलीं नाहींत ना ? हेंच त्यांतल्यात्यांत समाधान मानायचं—

**कमळा॰**—(आठवण होऊन...) हिरूच्या आईनें, स्वतः हिरूनेंही, माझ्याकडे केवढी वकीली केली होती या बाबतींत ?...आणि तुमची हिरु झाली असती माझी सून तर मला आनंदच झाला असता !...(निश्वास) पण एकूण आम्ही बायका दुबळ्याच म्हणायच्या !...हिरूचं मुंबईला लग्न झालं तेव्हां

नलिनीताई असत्या, तर त्यांना हें मागलं सारं आठवून किती वाईट वाटलं असतं ?...नाहीं ?

**देव०**—(निश्वास) हं ! नलिनीचा तुमच्या विनूवर लहानपणापासूनच जीव होता फार !...आणि खरं म्हणाल, वहिनी, तर तिच्या इच्छेमुळेंच मी हिरूला या बाबतींत कसली आडकाठी केली नाहीं !...त्यावेळीं मला आठवण होई हिरूच्या आईबापांना...आम्हाला, आमच्या लग्नवेळीं किती त्रास झाला होता... त्याची ! हिरूला तरी आपल्या मनचं सुख सहज लाभावं अशी माझी फार फार इच्छा होती...

**कमळा०**—हिरूला आई बाप फार समजुतदार लाभले...पण तिची प्रेमाची निवड मात्र चुकीच्या ठिकाणीं पडली. विनू माझा चांगला असला तरी दुबळ्या मनाचा !...आपल्या वडिलांना समजलं तर त्यांचा राग येईल या कल्पनेनेच शेवटीं घाबरला तो—

**देव०**—(निश्वास) असो...पण आतां काय वाईट आहे हिरुचं ?...

**कमळा०**—तरी पण कांहीं झालं तरी...बाप्पा, आम्हा स्त्रियांचं जिणं किती परावलंबी असतं पहा !—एकूण एकट्या पुरुषांनींच त्यांच्या आयुष्यांतलीं सारीं सुखदुःखं ठरवायचीं !—त्या जणूं त्यांच्या हातच्या बाहुल्याच !...नाहीत कां ? आम्ही आपलं सारं आयुष्य अगतिकपणें कोणाच्या तरी हातांत द्यायचं एकदांचं, नि मग जें जें होईल तें तें पहात जन्म काढायचा ?—

**देव०**—हं ! एका दृष्टीनें खरं आहे तुमचं म्हणणं...

**कमळा**—आतां तुमच्या सारख्यांचा एखादा संसार म्हणजे खरंच अपवादच !...पण तो कांहीं देवाला पाहवला नाहीं...नलिनीताईंना तुमच्याकडून ओढून नेलं त्यानें—

**देव०**—( निश्वास ) पण वहिनी, त्याला काय करणार ?...असेल त्या परिस्थितींत सुख मानून माणसानें कांहीं तरी चांगलं करीत हें राहिलंच पाहिजे !...

: १०६० :

**कमळा०**—तें खरं हो, बाप्पा ?...पण हिरुचं लग्न झाल्यापासून तर अगदींच एकटं एकटं वाटत असेल नाहीं तुम्हाला आतां घरांत ?...धर्मा सांगत होता...तुम्ही म्हणे हल्ली स्वतःच हातांनीं करतां जेवण घरीं...



**देव०**—( स्मित करीत ) हं...अहो, कांहीं तरी करमणूक पाहिजे ना मनाला, वहिनी ?...बरा असतो सकाळ संध्याकाळ उद्योग...

**कमळा०**—आणि उरला वेळ गिरणींत गुंतलेले असाल तुम्ही कामांत ?...

**देव०**—हं...( क्षणभरानें ) पण वहिनी, तिथले सारे व्यवहार तर मोठे चमत्कारिक नि गुंतागुंतीचे होत चालले आहेत दिवसेदिवस हल्लीं !...

**कमळा०**—( आश्चर्यानें ) म्हणजे काय, बाप्पा ?—

**देव०**—( हळूंच ) तिथें माझ्या मनाचा तर हल्लीं अगदींच कोंडमारा झाल्यासारखं झालंय् !

**कमळा०**—( सहानुभूतीनें ) कां बरं असं ?

**देव०**—( क्षणभरानें ) त्याचं असं आहे, वहिनी,...बोलून तसा उपयोग कांहींच नाहीं...नि असं गप्प बसून माझ्या मनाला समाधान नाहीं !...अशी काहीं चमत्कारिक स्थिती झाली आहे सध्यां गिरणींतली नि माझ्या मनांतली !...

**कमळा०**—म्हणजे ?—मला समजलं नाही, बाप्पा !—

**देव०**—( किंचित् थांबून ) माझं स्वतःचं सगळं ठीक चाललेलं असलं तरी अशा परिस्थितींत फार वेळ गिरणींत नोकरी करायला माझं तरी मन घेणार नाहीं ! शेवटीं मला ही नोकरी सोडावी लागेल स्वतःचा मनःस्ताप संपवण्यासाठीं.

**कमळा०**—(आश्चर्यानें व सहानुभूतीनें) म्हणजे ?...म्हणतांहां काय तुम्ही ?

**देव०**—( जरा शांतपणें, पण संकोचानें ) हें पहा वैनी, भाऊंबद्दल मला फार फार आदर आहे !...फार सिधे साधे माणूस आहेत ते !...पण नोकर पडलों दोघा भागीदारांचा !—त्यामुळें भाऊं विरुद्ध हरघडी होणारे कारभार मला स्पष्ट दिसूनहि कांहीं बोलतां येत नाहीं !—कधीं कधीं तर मला स्वतःच अप्रत्यक्षपणें भाऊंविरुद्ध कांहीं कांहीं गोष्टी कराव्या लागतात निमूट...

**कमळा०**—असं कसं होईल तुमच्या हातून ?—

**देव०**—होतं तर !...पण हें मी सांगणार कोणाला ?—माझं नीट ऐकून स्वतःच योग्य तें करण्याइतका आमच्या भाऊंच्यांत कठोरपणा नाहीं !...तेव्हां आपल्याला तें सारं किळसवाणं वाटतं, तर गपचूप आपणच नोकरी सोडावी... असा विचार येतो हल्लीं माझ्या मनांत !...

: १०६१ :

**कमळा०**--( जरा दुःखी कुतूहलानें ) असं काही विशेष नवीन झालंय् कीं काय, बाप्पा, अलीकडे ?

**देव०**—( सुस्कारा टाकून ) नवीन कसलं ?–हें चाललंय् " वर्षानुवर्षंच ! पण माझ्या या बदलेलल्या मनःस्थितीच्या वेळींच माझा त्यांत अधिक अधिक संबंध येऊं लागलाय्...आणि तो तर मला नकोय्...( क्षणभरानें हळूंच ) वैनी, टिपणाचं निमित्त करून तेवढ्याचसाठीं मी आज घरीं आलों तुमच्याकडे...

**कमळा०**--माझ्यानें कांही यांत होण्यासारखं आहे असं वाटतं तुम्हाला ?

**देव०**—तें मी कसं सांगूं, वहिनी ?...भाऊंना त्यांच्या स्वभावामुळें दिसत समजत नसलं आपल्या व्यवहारांतलं, तर तुमच्या विनूनें तिकडे थोडं पाहिलं नको का पाहिजे ?

**कमळा०**—( खिन्न हसून ) विनू ?...अहो तो आपल्या वडिलांच्या असल्या खेडवळ व्यवहारांत इतकं शिकण्यावर स्वता लक्ष घालील कां, बाप्पा ?—

**देव०**--( पटकन् ) तर मग तुम्ही स्वतःच नाइलाज म्हणून त्यांत लक्ष घातलं पाहिजे वेळींच !...नको ?...

**कमळा०**—अहो, मी एक अशिक्षित सामान्य स्त्री, बाप्पा !...पुरुषांच्या असल्या व्यवहारांत पडण्याइतकी अक्कल कुठली मला ?...

**कमळा०**--हं ! असं मात्र म्हणूं नका, वहिनी,...पहा ! नीट विचार करून पहा !–भाऊंचे व्यवहार अजूनहीं सावरणं शक्य झालं कोणाला तर ते आतांच !...तुम्हाला किंवा विनूला ! ( हळूच ) या दिवाळीला हिशेब झाला ! गेल्या तीन वर्षांतल्या गिरणीच्या भागीदारीव्यवहारांत सहा हजारांचा तोटा आलाय् वैनी,...पुढें व्यवहार तसाच चालूंही झालाय् !--

**कमळा०**—( आश्चर्यानें ) किती ?–सहा हजार ?...

**देव०**—हो...तीच खुलासेवार टिपणं भाऊंकडे द्यायला मी आलों होतों !... पण...त्याहून जरा निराळं एक काम होतं तुमच्याकडे माझं आणखी...

**कमळा०**—( गोंधळून ) तें कसलं, बाप्पा ?...

**देव०**—(क्षणभर घुटमळून) वहिनी, या घ्या. (खिशांतून नोटा काढून) तीनशे रुपयांच्या नोटा आहेत. ठेवा जरा तुमच्याकडे संभाळून कांहीं दिवसपर्यंत !–

**कमळा०**--(आश्चर्यानें) तीनशे रुपयाच्या नोटा ?...त्या कसल्या बाई ? ...नि माझ्याकडे कशाला ?...



**देव०**—( इकडे तिकडे पहात ) आधीं...ठेवा (कमळामावशी त्या घेऊन पदरांत ठेवते. ) कसल्या तें तुम्हाला योग्य वेळीं कळेलच !...आजच एकदम नाहीं सांगत मी !...पण एवढं मात्र सांगतों...त्या मला गिरणींतल्या हिशेबांतूनच मिळाल्या आहेत...नि त्या मी माझ्याकडे क्षणभरही ठेऊं इच्छित नाहीं !... ( आश्चर्यचकित झालेल्या कमळामावशीकडे पहात ) गोंधळण्यासारखं कांहीं नाहीं, वहिनी !...पण ही जरा फारच हळुवार बाब आहे...आणि तें पैसे जपून ठेवायला... तुमच्याहून दुसरं योग्य माणूस तर मला दिसत नाहीं कोणी !...

: १०६२ :

**कमळा०**--( जरा खोंचकपणें ) मघां गिरणीच्या व्यवहाराची टिपणं माझ्याकडे द्यायला देखील तयार नव्हतां तुम्ही, बाप्पा !...नि हे गिरणींतल्या हिशेबाचेंच पैसे माझ्याकडे ठेवायला देतां हां आतां !...यांतून मला कांहीं बोधच नाहीं आहे होत !...हें आहे काय प्रकरण ?--

**देव०**--तसंच सारं फार चमत्कारिक आहे तें !...पण अजूनहि सांगतो...मघांचीं हिशेबाचीं टिपणं मात्र तुम्ही स्वतः काळजीपूर्वक पहा नि शेवटीं भाऊंकडे द्या धर्माच्याच करवीं !...तेंच ठीक होईल !—

**कमळा०**—( कडवटपणें ) मी कशाला पाहूं ती टिपणं, बाप्पा ?...काय उपयोग त्याचा ?...

**देव०**--( आस्थेनें ) असं मात्र म्हणूं नका !...पुरुष पहात नाहीत तिथं बायकांनीं नको का व्यवहार पहायला ? तुम्हाला कसलं अधिक स्पष्टिकरण पाहिजे असलं तर मला निरोप पाठवा धर्माबरोबर...मी संधी पाहून येईन फिरून...पण एकच करा मात्र ! योग्य वेळ येईपर्यंत, हा व्यवहारी माणसांचा मोठेपणचा डोलारा त्यांच्या दृष्टीनें कायम ठेवा तसाच !

**कमळा०**--( क्षणभरानें ) समजलं मला थोडंसं...पण बाप्पा, माझ्यानें हें सारं जोखीम होईलसं नाही वाटत बाई मला !–विनूनेंच यांत नीट लक्ष घालायचं तर...(रागानें ) पण तो आतां स्वतः मुंबईला राहून उंटावरून इथल्या शेळ्या हाकीन म्हणेल तर तें कसं जमणार ?...

**देव०** –(हळहळत ) खरंच ! विनू इथं असता रहायला म्हणजे पुष्कळसं जमलं असतं सहजासहजीं !--( धर्मा प्रवेश करतो. )

: १०६३ :

धर्मा०--(सरबताचा ग्लास देवां पुढें करून) मी सांगूं वैनी, तुमाला ?—

कमळा०-(चमकून) काय तें ?...कशाबद्दल म्हणतोयस ?—(देवांना) घ्या ना बाप्पा, सरबत...

धर्मा०—(सरबत देवांच्या हातीं देत कमळामावशीकडे पाहून) आपल्या विनूदादाचं आतां लगीन करून टाका, वैनी !—

देव०—(सहास्य) तुला रे कां काळजी पडली त्याबद्दलची, धर्मा ?—

धर्मा०— नाय् म्हनलं—ही तरनी मानसं आतां, वैनी ! आन् त्यांत पुना शहरच्या हवला चटावलेली ! खरं की नाय्, बाप्पा ? त्यांना येळींच बिडी घातली पायजे. यकदा व्येसन पडली कीं आपसूक रस्त्यावर येतील ! आन् व्येस बरी चालींत चालू लागतील,...बगायला लागतील आपला घरचा सौंसार ! बापाला बी मदत व्हईल आपल्या तरन्या पोराची !

देव०—(निःश्वास-) हं...वेडा रे वेडा. अरे धर्मा, तीं तरणीं माणसं आतां आई-वडलांना विचारणारीं का राहिलीं आहेत ? नि त्याला खेड्यांत रहाणारी बायको बरी रे आवडेल !—नाहीं, वैनी ?

कमळा०—हं...खरंच आहे ते...

धर्मा०—(हसून) कां ? यसफ्यसवालीच बायको पायजे म्हंता त्याला ? (नापसंतीची मान हालवून) नाय् वैनी. विनूदादा आमचा नाय त्यांतला. लय मानूस-लोबी हाय् तो...

कमळा०—(निश्वास टाकून) आणि हे तरी काय कमी प्रेमळ आहेत, धर्मा ? पण उपयोग काय त्या नुसत्या प्रेमळपणाचा जगांत ?

धर्मा०--असं कां म्हंता, वैनी ? विनूदादा संबाळील कारबार !

देव०—मग समाधानच आहे त्यांत आम्हाला !

कमळा०—हं. एवढी एकच आशा आहे आतां. विनू काय करील तें बघायचं !—आणि माझ्या मनासारखं तेवढं झालं तरी देवच पावला म्हणायचा. तसं त्याला कांहीं कमी कां आहे इथें ?

देव०—मलाही वहिनी तेंच वाटतं !...नोकरी करायचीच तर काय घरच्या संसार-कारभाराची नाहीं करतां येणार त्याला ? खूप शिकलं म्हणजे काय शहरांतच



राहायला पाहिजे ? एवढं आहे तें संभाळण्याचं नि वाढवायचं हेंहि एक मोठं कामच आहे !—तें कोण करणार ?

धर्मा०—अवो पन् मी काय म्हंतो, देवा ? त्येच ! विनूदादाच्या लग्नाचा बार या उडवून आवंदा मार्गेशिराला, वैनी. एक छानशी लक्ष्मुमी आना घरांत ! तिला आन् त्याला धरून आपली घरची लक्ष्मुमी बी सुकानं आनंदानं नांदल, या मामाश्येट नायकाच्या घरांत ! (कंठ जड होऊन क्षणभर थांबतो.) त्येवढं येक पायलं म्यां, वैनी, कीं, माजे बी डोब्याचे डोळे मिटतील आनंदानं (धर्माचे डोळे पाण्यानें भरलेले असतात. तो आपल्या बंडीच्या बाहीनें डोळे पुसतो.)

देव०—म्हातारा झालास तरी आहेस तसाच वेडा भाबडा आहेस, धर्मा, तूं !

कमळा०—तुमच्यासारखे गडी म्हणजे सुद्धां मामंजींचं उरलं सुरलं वैभव आहे माझ्या घराचं ! (तिचा गळा दाटून येतो;...ती क्षणभर गप्प रहाते. धर्मा कामाला लागतो. निश्वास टाकून) हं. बघायचं आतां काय काय जमेल तें.

: १०६४ :

('आई, ए आई ग, त्या धर्माला जरा पाठव इकडे !'—कुंदाची हांक .)

कमळा०--(आंत पहात) काय ग कुंदा—(आठवल्यासारखें करून, जवळच्या धर्माला) जा रे जा, धर्मा. आतां पटकन् तिन्हीं सांजा होतील ! हल्लीच्या पोरी कसल्या काम करणार ?...त्यांना दर पावलाला गडी पाहिजे हाताशीं ना ! पंचवीस तीस कांदे सोलून ठेव नि दोन नारळ खवण ! जा मागील दारीं !—मी आलेंच इतक्यांत. (धर्मा जात असतांना) आणि ती वासंती बघ रे कुठें भटकत असेल ती, विहिरी बिहिरीजवळ. ('हां' म्हणून धर्मा जातो.)

देव०—(उठत-) बरं मग वैनी, मलाही आतां निघालें पाहिजे. उशीर झाला...अजून गिरणींतलीं थोडीं कामं आहेत...[बाहेरच्या दाराकडे वळत] आज मी घरीं आलों होतों म्हणून मुद्दाम भाऊंकडे बोलूं नका.

कमळा०—(सस्मित) छे छे...मला आहे कल्पना तुम्हांला काय सुचवायचंय् त्याची. मला आहे अनुभव...यांचे व्यवहार संभाळायला यांच्याचकडे असली चोरी नि असले हे लपंडाव...

देव०— (मागें वळत) तीं धर्माकडे दिलेलीं टिपणं मात्र पाहून ठेवा

बरं कां, वहिनी ?...माझं तोंड तसं बंद आहे ! पण...तुम्हांला सहज कल्पना येईल त्यांतल्या भानगडींची...

कमळा०—मला कुठलं जमायला तें, बाप्पा ?...पण 'पाहीन मी प्रयत्न करून माझ्या परीनें...

देव०—( जरा आग्रही स्वरांत ) पहाच...आतां आणखी नवीन व्यवहार सुरू व्हायचे दिवस...बापू-भाऊंची कांहीं नवीं बोलणीं व्हायचीं...करार व्हायचे

कमळा०—( आश्चर्यानें ) म्हणजे काय बाप्पा ?

देव०—( चालतां चालतां थबकून ) मला आजच अधिक बोलायला लावूं नका, वहिनी ! केलंय तेवढ्यानेंच जोखीम घेतलंय मी शिरावर माझ्या... ( किंचित् थांबून ) पण सारं ठीक होणार असेल तर...मला त्याबद्दलही नाहीं कांही भीती वाटायची ! आणि तुम्ही लक्ष घालणार असला तर अधिक तपशीलवार खुलासा करायलाही तयारी आहे माझी !

कमळा०—बरं बाप्पा...मला काय देव बुद्धी देईल तसं करीन. वाटलं तर धर्माबरोबर निरोप पाठवीन मी तुम्हाला...

देव०—बरं तर जातों मी —( देव उजव्या बाजूनें जातात ) ( कमळा कोचावर अगदीं गप्प बसते;...फटफटी रस्त्यानें. लांब निघून जाते. )

: १०६५ :

( 'ए आई, आई ' अशी कुंदाची जवळून हांक )

कमळा०-(तंद्रीतून जागी होत) काय कुंदा ? ( कुंदा घाईनें प्रवेश करते)

कुंदा०—अग, मघां मी साफ विसरलेंच कीं ग, आई ! दादाचं किनई पत्र आलंय् तुला. वरतीं मोठ्या अक्षरांत लिहिलंय 'खाजगी' म्हणून (कुंदा टेबलाकडे जाऊन आपलीं पुस्तकें शोधते.)

कमळा०—( अधीरपणें ) उघडलं होतंस ! बघूं कुठें आहे तें ? सुधीरची काय बातमी ? ती तरी समजेल...

कुंदा०—थांब हं ( पुस्तकें उघडून शोधत असते.)

कमळा०—धांदरटच आहेस मुलखाची ! बोलशील तेवढी चुरुचुरू ढीगभर.

कुंदा०—अग पण कुठें ठेवलं तें सांपडतच नाहीं, बाई ! शाळेंतल्या बाईंच्या व्याख्यानाबिख्यानांत विसरूनच गेलें मी तें सारं. उघडूनसुद्धां पाहिलं नाहीं मी ! ( शोधते )



कमळा०—अग पण आहे कुठें तें ? [ उठून तिच्याकडे जाऊं लागते ]

कुंदा०—हं. सांपडलं, हें बघ. [ टेबलाकडून पुढें येतां येतां तें फोडते ] थांब, मीच वाचून दाखवतें हं तुला, आई–[ पाकीट उघडून दोनतीन घड्या बाहेर काढतें त्यांतली एक वरची घडी उघडते व मध्येंच थबकून मोठ्यानें वाचूं लागतें ]

" प्रिय आई—काल परवांच मी गंधाकडे गेलों होतों.—सुधीर अगदीं मजेंत आहे. काळजी नसावी. त्याची शाळा घराच्या रस्त्यावर अगदीं जवळच आहे...गंधा त्याला स्वतःच शाळेंत पोचवते नि घरी आणते.—नाही तरी आपले नवरोजी ऑफिसला दहा वाजतां गेल्यावर तिला तरी आणखी दुसरा उद्योग काय आहे ?—तेवढ्याच साठीं तर तुझ्याकडे नि भाऊंकडे वशिले लावून, यंदा सुधीरला आपल्याबरोबर इकडे मुंबईला घेऊन आली आहे ती–

सुधीरची मात्र गंमत !–[कुंदाचा चेहरा उत्तेजित होतो.] इथल्या ट्रामटारी पाहून तो अगदीं खूष आहे—'म्हणतो गंधाताईकडेच खूप मजा !–आपल्या घरीं कांहीं नाही !–आई, कुंदा, वासंती, साऱ्यांनाच आतां आपण मुंबईला घेऊन येऊ या !–' ( कुंदा हसते. ) अशा मारे लांबलांब गप्पा मारत होता माझ्याकडे परवां !–एकंदरींत काय तो आतां खेडवळ राहिला नाहीं !–पक्का मुंबईकर झाला म्हणायचा !–आईची आठवण सुद्धां काढीत नाहीं –"

: १०६६ :

कमळा०—[ मध्येंच–थोड्या त्राग्यानें ] बरं रे बाबांनो !–नका काढूं खेडवळ आईची आठवण ! नि व्हा सारेच मुंबईकर !–पण जन्मलांत कुठे म्हणावं ? खेड्यांतच ना, या ?—[ पुन्हा उत्तेजित चेहऱ्यानें आपल्याशीच हसून ] पण मोठा लबाड हो माझा सुधीर !...मला वाटलं होतं...माझी आठवण काढून तो रडेल कधींमधीं—पण आम्हा बायकांना आपली उगीचच काळजी जिवाला नाही ती !–अग सुधीर लहान झाला तरी पुरुषच ना ?...जातीवरच जाणार ! जिकडे ओढा तिकडे मुलुख काय थोडा ?...

कुंदा०—[ वाचन थांबवून आईकडे पहात ] हो हो ! अगदीं रानांतच पडलाय् की नाहीं तो जसा काय ? गंधाताई...भावोजी...सारे मारे लाड करत असतील त्याचे ! पण बाकी पक्कं पात्र आहे बरं का आपला सुधीर म्हणजे, आई ! जाईल तिथं साऱ्यांना आपलसं करून घेईल !

**कमळा०**—हं ! पुढें काय म्हणताहेत आपले दादासाहेब ?

**कुंदा०**—ऐक हं [ वाचते– ] " आई,...आतां अगदीं तुझ्या कानांत सांगतों हं !" ( वाचन थांबवून ) कानांत...तें काय ग आई? बघूं या—हं !—[ वाचूं लागते ] " दिवाळीची सारी सुट्टी मी तिकडे घरीं काढलीं खरी ! तरी पण तुला सांगायचं सांगायचं म्हणत होतों तें मात्र सारं शेवटीं यायच्या क्षणापर्यंत राहूनच गेलं अगदीं ! तेंच सांगायच मला आज..."

**कमळा०**–[चुळबुळ करीत] म्हणजे ?...बघूं ग, कुंदा ! इकडे आण तें पत्र.

**कुंदा०**—थांब ग [ वाचते ] " या पत्रासोबतचं कुंदाला लिहिलेलं माझं पत्र तेवढं साऱ्यांसाठीं आहे;–हें तुझ्यासाठीं;...नि तिसरं आहे ना, तें तुला एक माणूस आपल्या आयुष्यांत अगदीं पहिल्यानेंच लिहीत आहे !—आई, त्यांतच माझं गुपितांतलं गुपित आहे ! तूं स्वतः शांतपणें वाच, विचार कर ! पण भाऊंना वगैरे कोणाला सांगायचं नाहीं हं यातलं कांहीं आधीं, मी तुला सांगेपर्यंत. ".

**कमळा०**—हं कुंदा...आण बघूं तें पत्र इकडे ! तुझ्यासाठी नाही आहे तें.

**कुंदा०**––ऐक ग, आई ! संपलंच आतां; आणखी एक दोन ओळी आहेत फक्त [ वाचूं लागते ] "तेव्हां आई, तें गोडगोड गुपित अगदीं माझ्याच संमतीनें असें तुझ्या हातीं पडत आहे, एवढं मी एकदां इथें सांगितल्यावर आणखी निराळं काय लिहूं ?...ते सोबतचं पत्रच सांगेल तुला सारं—तुझा विनू "

(कुंदा पत्राची दुसरी घडी उघडूं लागते)

: १०६७ :

**कमळा०**—( चेहरा बदलतो; कुंदाकडे जात ) हं, ऐक ग कुंदा !—आण तें पत्र इकडे !...तूं नकोस वाचूं तें !—( तिच्या हातून पत्र काढून घेते. )

**कुंदा०**—( जरा रागानें ) अग पण असं काय, आई ?–अगदीं आपल्या सख्ख्या बहिणीपासून लपवण्यासारखं असं कसलं गुपित असणार पण, विनूदादाचं ?–

**कमळा०**—( कोचावर बसून पत्र उघडीत, गंभीरपणें हसून ) हें हेंच तें !–तूं मोठ्या मोठ्या पोपटपंचीच्या गप्पा तेवढ्या मारशील, कुंदा !–पण अजून खरी तरुण नाहीस झालेली !...

**कुंदा०**—( रागानें ) हो हो ! ती कशी ग आई ?

**कमळा०** —अग, नाही तर तुला स्वतःच समजलं असतं, पोरी, कीं, मुलं



तरुण होत चाललीं...त्यांचीं वयं वाढूं लागलीं, कीं, त्यांची बहिणी–भावांपासून लपवून ठेवायचीं गुपितंहि वाढूं लागतात !–( पत्र देत ) हं, हें घे तुझं पत्र ...नि चल बस तिथें लांब जाऊन वाचत !...

[ कुंदा रागानें आईकडलें पत्र घेते...नाराज चेहरा करून खुर्चीवर वाचत बसते; कमळामावशी दुसरी घडी उघडून वाचूं लागते. वाचतां वाचतां तिचा चेहरा हळूं हळूं पालटत जातो. ]

**कुंदा०**––[ आपलें पत्र वाचून संपवीत ] अग आई, वेळ मिळाला तर दोन तीन दिवसांत विनूदादा इकडे येणार आहे ग, म्हणे ! [ कमळामावशी गंभीर चेहरा करून, निश्वास टाकते; हातांतलें पत्र आई अजून वाचीत आहेसें पाहून, कुंदा बोलतां बोलतां चपापते व आईकडे पहात पलीकडच्या कोचावर जाऊन गपचूप बसते. ]

[ कमळामावशी एकदां हातांतलें पत्र उलट सुलट फिरवते, त्याची पुन्हां घडी करते, एक दीर्घ निःश्वास टाकते व पत्र हाताच्या चिमटींत धरतें; दोन्ही हाताच्या बेचकांत आपली हनुवटी ठेवून, शून्य दृष्टीनें समोर पहाते. शेवटीं खिन्नपणें मांडीवर कोपरें ठेवून बसते. ]

: १०६८ :

**कुंदा०**––[ उठून आईजवळ जाते; जरा चाचरत ] असं काय ग आई ? सांग ना मला ! तूं बोलत कां नाहींस ? एवढं आहे तरी काय त्या पत्रांत ?

**कमळा०**––( चटकन् भानावर येते. स्वतःला सावरतें. कुंदाकडे पाहून बळेंच हसतें. ) अग, तें गुपित आहे म्हणतोय् ना तो, आपलं ? आणि माझ्याशिवाय तें कुणाला सांगायचं नाहीं आहे त्याला !...मग-?

**कुंदा०**—[ जरा लटक्या रागानें ] हो, हो !–गुपित म्हणे ! बरोबरीच्या बहिणीला नाहीं सांगायचं, नि आईला तेवढं सांगायचं ! असलं कसलं ग गुपित त्याचं ? [ हळूंच हंसत, नाकावर बोट ठेवून ] पण समजलं बरं कां मला थोडंसं, तूं सांगितलं नाहींस तरी !—मला एवढीसुद्धां अक्कल नाहीं जशी काय !

**कमळा०**—[ तिच्या गालावर चापट मारीत ] समजलं ना ?—झालं तर ! जा मग आतां–[ कुंदा रागावते उठून लांब जाऊं लागते. तिला हातानें ओढून कोचावर आपल्याजवळ बसवीत ] वेडी रे वेडी. अग, एखादा तरुण मुलगा

आपल्या आईलाच प्रथम कसलं तरी गुपित सांगूं लागला, कीं, नक्की समजावं माणसानें, त्याचा कांहीं तरी तिथें स्वार्थ आहे त्यांत. नि त्याला आपल्या आईलाच वकील नेमायचंय् आपल्या कसल्या तरी भानगडींत, म्हणून "[ हसून ] लहान आहेस कुंदा तूं अजून ! तुला नाहीं तें समजायचं.

**कुंदा०**—[ तिला बाजूला ढकलीत लटक्या रागानें ] बोलूं नको जा माझ्याशीं. ठाऊक आहे आम्हांला तें. [ पण पुन्हां मिळतं घेत, आईच्या गळ्यांत हात घालीत ] सांग ना ग आई ? तें पत्र कुणाचं, तेवढंच सांग. बस्स.

**कमळा०**—[ कुंदेच्या खांद्यावर हात ठेवून, तिला जवळ ओढत ] बघ हो ! अट ठाऊक आहे ना विनूदादाची तुला ? सांगायची नाहींस ना मात्र ? अंगदीं कुणाला सुद्धां ?...बऽघ ?.

( कुंदा सहास्य चेहऱ्यानें 'नाहीं' अशी मान हलवते. व उत्सुक चेहऱ्यानें कमळामावशीकडे पहात राहते. ]

**कमळा०**--अग, तें किनई. वनिता नांवाच्या एका खूप शिकलेल्या तरुण मुलीचं पत्र आहे मला आलेलं ! तिला मी सासू व्हायला पाहिजे आहे तिची ! तुझ्या विनूदादानें लग्न ठरवलंय् आपलं तिच्याशीं हो !--

**कुंदा०**--[ कुंदा उठून मोठ्या आनंदानें लौकर लौकर बोलत ] हो ?... खरंच ? आपल्या विनूदादाचं लग्न ठरलं, आई ?

**कमळा०**—[ गंभीर हंसून ] हं समजलं ना आतां !-जा तर घरांत ! जरा चुलींत चांगला विस्तव पेटव जा !-शिकलेल्या मुलींनीं आपल्या आईला तरी मधून मधून मदत करावी थोडी.-अगदींच कांहीं फुकट नाहीं जाणार !...

**कुंदा०**—[ स्वयंपाकघराकडे वळत, जातां जातां हसून ] आतां काय मज्जाऽच मजा ! आमच्या विनूदादाचं लग्न ठरलं !...विनूदादाचं लग्न ठरलं ! मला शिकलेली वहिनी मिळणार !

**कमळा०**—[ तिला दटावत ] हं, कुंदा ? चावट कुठची ! त्यांतलं कांहीं बोलायचं नाहीं म्हणून सांगितलंयना !

**कुंदा०**--[आंत शिरतां शिरतां हसून] नाहीं ग बाई आई, नाहीं ! अगदीं घाबरूं नकोस ! मला एवढं सांगितलेलंही कळत नाहीं वाटतं ! मी काय वासंती आहे? [ कुंदा हसत हसत घरांत जाते. ]



: १०६९ :

**कमळा०**—[ आंत पहात ] काय या शिकलेल्या भाबड्या पोरी ! मघा 'आपण लग्न करणार नाहीं' म्हणून सांगत होती मारे तावातावानें...आणि आतां ?- तिचं नव्हे, तिच्या विनूदादाचं लग्न ठरलं, एवढंच समजलं तिला !...तर कोण हुरळलीय् ! [ हातांतली पत्राची घडी पुन्हां एकदां उघडते. त्यावर पटकन् एकदां नजर फिरवते व ती बंद करीत ] आणि ही देखील एक शिकलेली भाबडी पोर ! [निश्वास टाकते.] एकूण, माझ्या विनूनें स्वतांच आपलं लग्न ठरवलं ! आणि आतां ? घरांत केवढा मोठा झगडा होईल ?-[निश्वास टाकतो] हं...झगडा ! झगडा !

हे नव्या...जुन्यांचे झगडे नच सरणार !

जर प्रेम-मंदिरें स्वार्थावर उठणार,---
हे नव्या-जुन्यांचे झगडे नच सरणार !... १
स्त्री-जीवन गाइल अखंड एकच गाणें,...
' भव भरला ग हा प्रेमानें प्रेमानें ! '... २
पर-सुखांत ज्यांचें होई सौख्य विलीन,...
तें जीवन निर्मल !...कधीं न होत मलीन ! ३
निःसीम प्रेम अन् त्याग, कधीं ना दोन !...
ही प्रेमाची ग पटे मनाला खूण !... ४
जो देई भारुनि अशाच प्रेमें दानें,...
भव भरला त्याला...प्रेमानें प्रेमानें ! ५

[ वासंती दबदबा धांवत प्रवेश करते ]

**वासंती०**—[ अधीरपणें, आईच्या पायाला बिलगून, लाडानें ] आई, ए आई, बघ तुला केवढी मदत केली मी आज !-[ आईच्या नाकाजवळ हात नेते.] कांद्याची भाजी करणार आहेस ना संध्याकाळीं ?...धर्माच्या गोष्टी ऐकत त्याच्या-जवळ बसलें...[ दोन्ही हात लांब करून ] नि हेऽ एवढे कांदे सोलले मी.

**कमळा०**—[ चेहरा लागलीच पालटवते. हंसते व तिला हातांत लोंब-कळवत चालत, कौतुकानें ] अगगऽबाई !...काय शाहाणी आहे माझी बाय् ! मोठी कामाची कसू नि बाहुलीची सासू !

**वासंती**०—[ आईला अधिकच बिलगून, कमरेला विळखा घालीत ] हं ! बाहुलीची सासू नाहीं कांहीं मी, आई ?–मी माझ्या उषेची आई !

**कमळा**०--[ वासंतीचे गाल कुस्करीत लाडानें ] अच्छंऽऽकां ? खऽऽरंच ? नि मी तुझी आई ! [ प्रेमानें तिच्या गालावर गाल घासून हंसते. वासंतीला थोपटते ] ही उषेची आई,...आज नुसते हातानेंच कांदे सोलतेय् !...पण उद्यां मात्र कुंदाताईसारखी नाकानें कांदे सोलायला लागणार !...[ कमळामावशी हसते; तिच्या संसर्गानें वासंतीही बलिशपणें हसते. ]

[ पडदा पडतो ]

## अंक १ ला

—' घरच्या गुंतागुंती '—

( स्वल्प–विराम )



# घरोघरच्या देवी

## [ अंक २ रा. ]

## काळें जाळें

: १०७० :

[ वासुदेवरावभाऊ नाईकांची तीच खाजगी खोली. भाऊ व काळेबापू बुद्धिबळाचा पट मध्यें ठेऊन बैठकीजवळपास खेळांत गढलेले आहेत. तळहातावर गाल टेकून भाऊ पटाकडे निरखून मांडी घालून बसले आहेत व मधून मधून चुळबुळ करीत आहेत. काळेबापू ऐटींत लोडाला टेंकून भाऊकडे, पटाकडे व त्यांच्या हालचालींकडे पहात आहेत—]

**काळेबापू**—( किंचित् हसून, आपल्या डोक्यावरून हात फिरवीत )... हं चला...किती वेळ विचार करीत बसलांहांत, भाऊ ?...का हो ?...झाली का काय ती तुमच्या बाजूची चाल ?...

**भाऊ**०—( प्यादी पुढें मागें करण्याच्या हावभावांसकट त्यांतच गढून ) हं...हं...जरा थांबा...

**काळे**०—हं बघा,...नीट विचार करा, भाऊसाहेब !...मग तुम्ही मागाहून कांहीं राहिलं असं आणखी म्हणायला नको !...( हळूंच हसत ) पाऊण एक कलाक आपला हा खेळ चाललाय् ; पण तेवढ्यांत आमच्या हिटलरनें खूपच धुमाकूळ माजवलाय् आज तुमच्या जगांत !...पोलंड...हॉलंड...बेल्जम,...करीत करीत फ्रान्सच्या अगदीं दारांत येऊन उभी राहिलीय् बघा, स्वारी !—

**भाऊ**०—( एक निर्णय घेऊन...प्यादें हलवीत...) हं...बरं चला !... तसा प्रसंग आहे थोडा अवघडच !—सरशीची तशी खात्री नाहीं चांगली मला ! पण तरी अजूनहि रंगवतों बघा निदान दोन तीन तास पुढें, हा आपला खेळ !...

**काळे॰**—( पटाकडे पहात... ) कराल बुवा ! नाहीं कोणी म्हणाव ! बरं बघूं या...हं, काय केलं आहेत ?...(धोरण घेऊन हसत) अस्सं अस्सं ! एवढंच ? ( हंसून ) हऽहऽ अहो भाऊसाहेब,...तुमचं फ्रान्स अजून गाफील राहिलेलं दिसतंय् एकंदरींत ?—असा आपल्या दोस्तांवर नेहमीं फार विश्वास टाकून उपयोगी नाहीं, भाऊ !—

**भाऊ॰**—( आव्हानानें ) पण मग कसं तें दाखवा ना सरळ !...

**काळे॰**--( हसून ) बरंऽबरं तर...दाखवतोंच आतां प्रत्यक्ष ! खेळूं ? पहा हं !—हा तुमचा काळा हत्ती ना ?--निकाम आहे तो अगदीं !--नुसता खायालाच काळ !...त्याच्या कचाट्यांतून...सोडवणूक करतो तुमची प्रथम ! हं घ्या !–झालं ?–मेला ?–

**भाऊ॰**—( नवें अवसान घेऊन ) बरं...पण तेवढ्यानें काय होतंय् ?–तर मग मी हें असं खेळलों...( प्यादी हलवतात; समाधानानें हसतात. )

**काळे॰**--अहो, त्यानें काय डाळ शिजणार तुमची ?...तुमच्या साऱ्या प्याद्यांचा तर बहुतेक खुर्दा...चक्काचूर झालाच आहे आधीं !...आणखी हें अस्सं घ्या आतां !...आधीं आमच्या रोमेलनें शह दिलाच आहे तुमच्या वेंगॉला !... आतां इकडून प्रत्यक्ष हिटलर येतोय् चाल करून !...साधव रहा, भाऊ ! सावध रहा !...बघा !

**भाऊ॰**—( प्यादें सरकवून– ) आणि मग...मी हें अस्सं खेळलों तर ?

**काळे॰**—( मोठ्यानें हसत—) झालं ? फसलांत ? भाऊ, सपशेल फसलांत आतां तर !...पडला तुमचा घोडा बळी ! घ्या ! पळवाट शोधायला आतां दुसराहि जवळ नाहीं !...आणि तुमचा उंटावरचा शहाणपणाहि नाही चालायचा या घरांत यापुढें...हा बघा, तुमच्या उंटालाच गारद केला मी...नि...हें असं झालें !...( हसत... ) कां शिरलों कीं नाही आम्ही थेट तुमच्या पॅरीसमधें ?... अगदीं तसूभर देखील जागा नाही तुम्हाला डाव्या–उजव्या...समोर...कुठल्याहि बाजूला हलायला !...काय कबूल ?...करा...कबूल करा...

**भाऊ॰**—( पटाकडे पाहून खिन्नपणें ) आहे खरं ! संपलाच खेळ म्हणायचं !

**काळे॰**--( तक्याला ओडगत ) हं, मग ?--बघा ! दोन तीन तास रंगेलसं वाटत होतं तुम्हाला तुमचा खेळ ! पण आतां उडाला का नाहीं चुटकी-



सारखा चार मिनिटांत ?...अहो, पहाणाऱ्याच्या नजरेवर नि डोक्यावर...अवलंबून असतं सारंऽ...खरं कीं नाहीं ?–( ताठ्यानें हसतात. )

**भाऊ॰**—( पटावरची मोहरी प्यादी गोळा करून पट बाजूला ठेवीत– ) बाकीं इतकीं वर्षं खेळतोय् आपण बरोबर, बापू !...( खिन्नपणें ) पण अगदीं एकाही डावांत मला तुमच्यावर सरशी करतां आल्याचं समाधान लाभलं नाही !– खरंच–बुद्धिबळांत तुमचा हात धरणारा कोणी सांपडणार नाहीं, मला तर वाटतं !–

**काळे॰**–(जरा सहानुभूतीनें पण अभिमानानें) अहो, आहे काय एवढं त्यांत, भाऊ ?...जरा चारी बाजूचं चांगलं धोरण संभाळांव लागतं, काळजीपूर्वक !...एवढंच काय तें...तुमच्यासारखं मध्येंच कच खाऊन मात्र नाही उपयोगी हो काळजानें !!

: १०७१ :

(बाहेर लांबूनची भिकाऱ्याची ललकारी...'माई, दादा, मूठभर भिक्षा वाढा')

**काळे॰**—( चंचींतली सुपारी घेऊन कातरत कातरत उठतात; टेबला-जवळच्या खिडकींतून बाहेर पहातात,...भिकाऱ्याची पुन्हा दीन हांक... ) अरे एऽ ! चल...जा ! हो पुढल्या दाराला...चल—

**भाऊ॰**—( तक्याला ओडगल्या ओडगल्या... ) अरे...तुमचा तो नेहमीचा सराव नाही जात ! नका नका ! बापूऽ ? कशाला बापड्याला रित्या हातीं पाठवतां उगीच ?...त्याला चार मुठी घालून आपलं काय कमी कां होणार आहे ? अगदीं मामांपासूनचा शिरस्ता आहे चालत आलेला तो आपला या घरचा...(आंत वळून)...धर्माऽ ! अरे धर्मा...

**काळे॰**—( सुपारीचा फांका तोंडात मारून बोबड्या शब्दांत ) बय् बुवा, त्यायचं आमचं !...तुमच्या पदतीनं होऊं द्या !—

**धर्मा॰**—( प्रवेश करून... ) हांक मारली, श्येट, मला...?

**भाऊ॰**—अरे धर्मा, तो दारांत आलाय् बघ...त्याला टिपरीभर तांदूळ घाल त्या पिंपातले—नि मूठभर डाळ घाल...

**धर्मा॰**--व्हय्...जातो ! ( धर्मा हॉलकडे जातो. )

: १०७२ :

(·काळे भाऊंजवळ गादीवर बसतात; थोडा वेळ गपचूप पानाच्या शिरा काढतात. मधून मधून भाऊंकडे पहातात. )

**काळे**--( क्षणभरानें ) हं, काय भाऊ ? खंडाची वसुली झाली का तुमची गांवोंगांवची ? दुसरी एकादशी झाली परवां !... कार्तिक संपत आला, म्हटलं !--

**भाऊ०**—हो ! चाललंय् कीं तेंच काम हल्लीं !...तसा जाऊन आलों मीं सगळ्या बाजूंना...तुळशीचीं लग्न झालीं त्या सुमाराला ! गेल्या आठवड्यांत कापरीलाही जाऊन आलों ! डोंगरलीची तर वसुली देखील झाली सगळी !—

**काळे०**—(काताचा खडा मोडून तोंडांत टाकीत) हं-हं...बरोबर, चार पांच दिवसांपूर्वी आपल्या गिरणींत तुमचं भात आणलंन् सडायला धर्मानें तें तिकडचंच नाही का ?...

**भाऊ०**—हो, सकाळी देवांनी पाठवले कीं तांदूळ घराकडे !...

**काळे०**—( तंबाखू हातावर मळत ) तेव्हा असं आहे म्हणतां ?-

**भाऊ०**—हं ? आतां गेले तीन चार दिवस कापरीच्या खंडाचं माप नि वाहतूक चाललीय्...संपलंच असेल बहुतेक तें काम आज !-चिंचाळ्या दुधाळ्याची वसुली तेवढी राहिलीय् शिल्लक...

**काळे०**--( प्रश्नार्थक ) कां ? तें बरं मागें राहिलं ?...( तंबाखूची फांकी तोंडांत टाकतात. )

**भाऊ०**—मागें नाहीं ! मी तसा स्वतः आलोंय् जाऊन एकदां तिथल्या शेतकऱ्यांच्या खळ्यावर...पण आहेत कुठे हो गाड्या नि गडी, एकदम सगळ्या गांवांना पाठवायला ? पुन्हा आमचा धर्मा रिकामा पाहिजे ना ? तो असला प्रत्येक ठिकाणीं म्हणजे बरं असतं आपलं ! बिनबोभट, निश्चिंत होतं सारं ! मला पहावं लागत नाहीं मुद्दाम !

**काळे०**—( खांकरून जागचे उठत ) हं हं...तेंही बरोबर...

**भाऊ०**—नि पुन्हां तीं शेतं ही त्यांत जरा मागासलींयृत् बघा—

**काळे०**—तीं हो कशीं ?—काय कारण ?--( उठून खिडकींतून पिचकारी टाकतात. येरझारा घालतात. )

**भाऊ०**—अहो, त्या तुमच्या पहिल्या फसव्या पावसानें त्यांचा घात केला ना ! पुन्हा पेरा करावा लागला बिचाऱ्यांना, म्हणे...

**काळे०**--असं असं ? हं...हं... ( क्षणभरानें )...कां, आहे कां, तुमच्या बाजूला रुपयांत बाराचौदा आणे पीक आहे कां यंदा, भाऊ ?...होतोय् ना सगळा खंड वसूल तुमचा ?—( बैठकीवर येऊन बसतात. )



**भाऊ०**--(समाधानी स्वरांत)...चौदा नाही,...पण दहाबारा आणे आहे, म्हणायला हरकत नाही !--तेव्हां थोडा कमी जास्त करून जसा सवडीनें देतात शेतकरी खंड, तसा घेतला पाहिजे !-कांहीं मागलं मिळतं, पुढलं ठेवावं लागतं !-तें चालायचंच !--पण तसा गोळा मात्र होतो...अहो, हल्लीचे सर्वांचेच दिवस हे असे ! नड कोणाला नाहीं ? आपल्याला आहे...त्यांनाही आहे ! पण मग कोणावर जोरा तर नाही ना करायचा आपल्याला ?

**काळे०**--( नापसंतीच्या स्वरांत पटकन्-) हं...हें हेंच चुकतं बघा तुमचं, भाऊसाहेब !-अहो, हे शेतकरी म्हणजे महाचोर शिंचे !-त्यांची एकेक रड ऐकायला लागलात तुम्ही तर कधीं म्हणून संपायची नाहीं बघा !...असंच म्हणत रहाल तर साऱ्या जन्मांत कधीं खंड वसूल व्हायला नको त्यांच्याकडून आपलां ! [ पिचकारी टाकून पुन्हां बैठकीवर बसतात ]

**भाऊ०**—( न पटून ) असं कां बरं म्हणतां, बापू ?—अहो, आपण सिधं असलं कीं तीं कुळंही सरळ असतात आपल्याशीं !-( अभिमानानें ) आतां हेंच बघा, यंदा डोंगरलीचा अगदीं सगळा खंड झाला आमचा वसूल, बाक्यांसकट !

**: १०७३ :**

[धर्मा हॉलकडून आंत शिरून, डाव्याबाजूच्या विंगकडे घरांत जाऊं लागतो.]

**भाऊ०**—( धर्माकडे पहात ) त्या कुसनाला चांगलं पोटभर जेवायला घातलंस् ना ?...एवढा घामाघूम होऊन चालत आला तो अठरा मैल--

**धर्मा०**--( थबकून ) व्हय्...ज्यवला बिवला आन् आतांच्च झुरुक् इसा. न्याला पडलाय् मागच्या दारीं...[ जाऊं लागतो. ]

**भाऊ०**—[ संकोचानें ] आणि कायरे धर्मा, त्याला काय तूं सांगितलं होतसं म्हणे, कीं त्याच्याकडे वळणाऱ्या आपल्या रकमेसाठीं मी लागलीच बोलावलंय् त्याला, म्हणून ?...

**धर्मा०**--(जरा ओशाळ्या चेहऱ्यानें) अवो, वाटत भ्येटला तो मला, डोंगरलीच्या खंडाची ख्येप केली तवा ! त् म्यां म्हनलं...'फार दीस झाले, कुसना, पोराचं लगीन कराया आमच्या श्येटकडून तूं पैसं घ्येतलेस, त्याला ! श्येट वरडलं आमचा ! दोनं चार दिशीं भेट आपला तूंच येऊन परतक्श्' ( भाऊ हसतात; धर्माहि हळूंच हसतो.) का ? दिलन् ना त्यानं तीस रुपये ?...(हसून) अवो, यांना

भाऊशेट, या दिवाळीच्या पिकाच्या येळेवरच असं जागं नको कराला ?...नाय त् मग कवा करनार ?...सांगा ?

**भाऊ०**—(जरा सलगीनें) तें खरं रे, धर्मा! पण दिले असतेन् त्यानें सवडीनें जरा चार आठ दिवसांनी आणखी! अशी आजच काय एवढी घाई होती ? तो तर म्हणत होता, बायका पोरं हिंवतापानें खूप आजारी आहेत आपलीं,... घरांत...नि खळ्यावर तर भातही अजून झोडायचं पडलंय्...

**धर्मा०**—(रागानें) हां हां! तुमच्याकड तसं तो म्हनल त् काय झालं ? यांचं हाय् त्ये समदं ठीक हाय, श्येट! आमी काय जानत असलीं हीं नाटकं यांची, व्हय् ?...चोर हाइत् त्ये साऱ्या मुलकाचे!

: १०७४ :

**काळे०**—(अगदीं सहजगत्या विचारल्यासारखें) कोण कुसना हो हा, भाऊ ? शेतकरी आहे तुमचा ?

**धर्मा०**—(जरा काव्यानें हसून) त्यो कपारचा कान्ह्या पाटलाचा पोरगा नाय् का ? तुमच्या बापू, म्हायतीतला असल की! –गतसाल् गिरनीला कपारचे भातवाले चोर भ्येटले,...त्यांचाच येक वराडी हाय् त्यो!–तुमच्या मुकादमाचा त् जिगर दोसत अगदीं!–(हळूच डोळे मिचकवून–)...पन् आपुन् कशाला बोला वुगीच!–आमचे श्येट जानत, ते जानत, आन् तुमी!—

**काळे०**—(रागानें अंगावर खेंकसून) धर्माऽ! जास्त फाजीलपणानें बोलूं नकोस बरं कां माझ्यासमोर ? मला नकोस तूं ज्ञान शिकवूं, लेका!–तुम्हीं साल्यांहो...सगळेच चोरांचे वऱ्हाडी इथून तिथून–शेतकऱ्यांची जात म्हटली की!

**धर्मा०**—(खंवचटपणें हसून) अवो पन् रागावताय् कशाला ? जांस्त कमी त्यातलं मी कुटं काय बोलतोय् का, बापू ?...

**भाऊ०**—(त्याला आवरून घेत) बरं, तें राहूं दे तुझं– हें बघ धर्मा, कापरीचं झालं ना तुमचं सारं काम ?...आतां काय करतां ?...

**धर्मा०**—(कांळेबापूकडे एक हळूच कटाक्ष टाकीत भाऊंना) हां! आतां चिंचाळं–दुधाळं–त्येवढीं ऱ्हायलीं!–आदीं कुटं जाऊ श्येट ? सांगा ?—

**भाऊ०**—चिंचाळलाच जा आधीं!–अंऽऽ ?–तुम्हाला काय शिधा–मीठ-मिरची लागतील दोन दिवसांसाठीं साऱ्या गड्यांना, ती काढून घे बरं कां ?



लोणचं पापड पण घे वैनीकडून मागून! आणि हें बघ धर्मा, थांब, (पैशाची शिसवी पेटी उघडून) हे पाच रुपये असूं देत तुझ्याजवळ, लागले बिगले कमी जास्त तर तुम्हाला!

**धर्मा०**—जी! (पैसे घेऊन काळेबापूकडे खवचटपणें पहात निघून जातो.)

: १०७५ :

**काळे०**—(धर्मा गेल्यावर, क्षणभरानें थोड्या कुर्ऱ्यांत) कांहीं कांहीं वेळां हें तुमचे गडी फारच चढेलपणें वागतात बरं कां, भाऊ! हा तुमचा धर्मा तर त्यांतल्या त्यांत फारच...

**भाऊ०**—[जरा साश्चर्य] काय ? आमचा धर्मा ?...

**काळे०**—हो, हो! [आठवल्यासारखें करून] अहो, परवां काय केलन् ? गिरणीजवळंच्या आपल्या त्या वखारींतमापलेल्या गुंड्या पडल्या होत्या! त्यांतल्या वीस पंचवीस घातल्यान् आपल्या बैलांपुढें...न विचारतां त्या धर्मानें!—चांगली खावड काढली मग मी त्याची, म्हणा...[अजमावण्यासाठीं भाऊंकडे बेरकेपणें हळूच पहात] सांगितलंच असेल त्यानें तुम्हाला!

**भाऊ०**—[साश्चर्य] तें काय बुवा ?...छे, नाहीं! असल्या गोष्टी गडी माझ्याकडे सांगणार नाहीत. नि मी ऐकणार नाहीं! ठाऊक आहे त्यांना तें! पण त्या मूर्खांच्या काय नादीं लागतां तुम्ही तरी, काळेबापू ? अहो, ही मामांपासून आपल्या घरांत असलेली माणसें! त्यांना वाटतं, आपणच खूप शहाणे आहोंत!–पण तिकडे दुर्लक्षच करावं लागत आपल्याला...

**काळे०**—[उपहासानें, रागांत] तें तुमचं काय असेल तें असो! तुम्ही नि ते हवं ते करा! तुम्हाला शहाणपणा शिकविणारे गडी मिळाले आहेत! मोठे भाग्याचे म्हणायचे तुम्ही––पण ते आमच्यापुढें असा कधीं वट करूं लागले, कीं, आम्ही लागलीच त्यांना जागच्या जागीं बडगा दाखविल्याशिवाय नि ठेंचल्याशिवाय रहाणार नाहीं!...(भाऊ रुकारार्थी मान हलवून स्मित करतात.)

: १०७६ :

**काळे०**—[मुत्सद्दीपणें विषय पालटून] पण खरंच बाकी, तो धर्मा म्हणतो त्यांत अगदींच तथ्य नाहीं, असं नाहीं. गेल्यावर्षी त्या कपारच्या शेतकऱ्यांनीं आपल्याला चांगलाच धोका दिला!

भाऊ०—[ साश्चर्य ] म्हणजे काय, बापू ?

काळे०—[ नाटकी आग्रहानें ] अहो, या हरामखोरांना पैसे लागले आगोठीच्या तोंडाला कीं, त्यावेळीं ते काय वाटेल तें करतील ! गयावया करतील, पाया पडतील !—घरीं दोन दोन दिवस अगदीं धरणं धरून बसतील ?

भाऊ०—[ जरा हसून ] हो, तसे पक्के चिकट असतात ते ! पण त्यांच्या नडीकडे पाहून कधीं कधीं द्यावंही लागतं, बापू ...

काळे०—( जरा रागांत ) अहो पण आपण देणार कशावर यांच्या हातांत पैसे ? बरं, पुढल्या वर्षांचं भात बांधून घ्यावं नि यांना पैसे द्यावेत म्हटलं, तर ते साले हटकून उलटे फिरणार ..अहो, शेतांतलं भात एकदां झोडलं कीं तेच राजे ना !• मग त्यांची पहिली दगलबाजी आपल्याशींच ! प्रथम सतरा बयादे सांगतील...नी मग भाताचं माप टाकतील हातांत, त्यांत पुन्हां चोरटा धंदा आहेच त्यांचा...

भाऊ०—[ शांतपणें ] करतील बुवा, करतील एखाद वेळ ! त्यांचा काय नेम सांगवत नाहीं !

काळे०—[ बेडरपणें ] करतील ? करतील कशाला ? केलंच कीं, गेल्या वर्षी त्यांनीं ! अहो, आपल्या गिरणीच्या दीडशें मुद्यांत त्या चोरांनीं हजार दीड-हजाराच्या खड्ड्यांत आणलं आपल्याला, असल्या चोरट्या धंद्यांनीं ! ठाऊक नाहीं कां भाऊ तुम्हाला ?

• भाऊ०—[ संकोचानें ] हो, तुम्ही म्हणत होता खरं चार सहा महिन्या-पूर्वीं !...नि आपला मुकादमही सांगत होता परवां मला—

काळे०—( आवेशानें ) त्यांतल्या दोघाचौघांच्या पदरांत त्यांची बरोबर चोरी घातलीन् नि गेल्या महिन्यांत आपल्या मुकादमानें असें फोडून काढलेन् चाबकानें त्यांना म्हणतां, भाऊ ?...

भाऊ०—(पट्कन् कळवळून) छेः छेः छेः ! अहो, अशी मारझोड करून कां सुधारणार आहेत ते, बापू, मुळचेच चोर असले तर ?.. आपल्याला आला एकदां अनुभव वाईट, सोडून द्यावं ! पुन्हां संबंध ठेवूं नये त्यांच्याशीं !...

काळे०—( मानभावीपणें ) ते झालंच हो ! पण तरी हा आतां आपल्यां-तलाच खाजगी प्रश्न आहे म्हणून सोडा...नाहीं तर शिंचा नाहक गैरसमज



होण्याचाच प्रसंग तुमच्या-माझ्यांत ! नाहीं ? अहो येणार त्या चोरांचा प्रत्यक्ष संबंध नेहमीं माझ्याशीं ! तुम्हीं त्यांच्याकडे जाणार थोडेच उठून घडी घडी ?... पण मग वेळ आली उद्यां तर ठपका ठेवणार तुम्ही माझ्यावरच ! नि तसं पाहिलं तर तें रास्तच होईल !—काय ?...

भाऊ०—( आपुलकीनें ) छेः छेः ! ठपका ठेवण्याचा हो कसला प्रश्न त्यांत, बापू ! तुम्ही काय आपल्या गिरणीच्या वाईटासाठीं का केला होतात तो धंदा ? कधीं मिळायचं कधीं थोडं जायचं ! चाललंय् !—धंदा म्हटला म्हणजे हें असंच चालणार !

: १०७७ :

[ धर्मा हिरव्या पडद्यापलीकडे प्रवेश करतो; आंतल्या दाराजवळ उभा रहातो; जरा बाहेरील बोलण्याचा कानोसा घेतो. ]

काळे०—( जरा काव्यानें ) हें खरंच ! थोडी अशी वृत्ति ठेवली तरच धंद्यांत यश यायचं—पण तुम्ही पटकन् मध्येंच धीर सोडतां कधिं कधिं ना, भाऊसाहेब ! ( भाऊंचा चेहरा न्याहाळत ) म्हणून जरा भीती वाटते तुमची !...

भाऊ०—( हंसून ) बरं तसं म्हणा ! पण तुम्हाला तर ते आतां जमून गेलय् ना बापू ?...काय गेलीं दोन तीन वर्षं आहे कीं नाहीं, तुमच्या गवताच्या धंद्याला एकदम तेजी ?

काळे०—( आत्मविश्वासानें ) होऽ! ...पण एकट माझं गवतंच कां म्हणतां ?

भाऊ०—( सस्मित ) असं नाहीं ?...

काळे०—तर ? अहो लोकांच्या जंगलाच्या धंद्यांची तीच गोष्ट... आतां बघा. तो आपण जंगलकूप ठेवला होता ना मागें ?—तेव्हां कारकून होता आपल्याकडे तो बिठोबा,—विठोबा ? आठवतं ? ( तोऱ्यांत ) त्यानें किती पैसे कमावले असतील गेल्या तीन वर्षांत तुम्हाला वाटतं, भाऊ ? ( आवाज बदलून ) त्याच्या नशिबानें बघा, तीन्ही वेळां...तीन्ही जंगलांत बराचसा नंबरी मालच लागला...तिन्हीं सालीं ! नि लढाईचे दर हे असे ! वाढतायत् आपले दिवसादिवसाला;—अहो, भाऊ ! गेला बाजार पंचविसतीस हजाराला तरी मरण नाहीं त्याला, मी म्हणतो ! बोला आतां !...आहांत कुठे ?...

भाऊ०—( अस्पष्ट निश्वास टाकून ) हं...आपणही केला होता नाहीं कां

तोच धंदा ? पण आपल्याला मात्र दीड दोन हजारांचा उलट फटका खावा लागला वर्षाअखेर त्यांत...

**काळे०**—( धोरणी आवाजांत ) अहो, तसं नव्हे तें, भाऊ !...कुठचाही धंदा घ्या, त्यांत थोडी चिकाटी ही पाहिजेच ! धाडस पण पाहिजे ! ( किंचित् थांबून ) आतां हा माझा गवताचा चालू धंदा !...असा काय हो मोठा धोक्याचा आहे ? पण एकदां आठ दहा वर्षांपूर्वी आपल्या वखारीला एकाएकी आग लागली; तेव्हांपासून बोलायला देखील तयार नाहीं तुम्ही त्या बाबतींत—(आवाज बदलून, समजावणीच्या स्वरांत ) अहो, सुरवातीला नवीन धंदेवाल्याला हे हेवेदावे नि आगी. ( मोठ्या अभिमानानें ) आतां पहा कसे दमांत घेतले आहेत सगळे मुसांडे, भंडारी नी वाडवळ ? कोणाची माय नाहीं व्यालीय् माझ्या एका गवताच्या काडीलाही हात लावायची आतां ! तंगडच मोडून टाकीन एकेकाचं !

**भाऊ०**—( कौतुकानें स्मित करीत ) तुम्हाला बुवा ते सारं जमतं, काळेबापू ! मनांत आणलंत तुम्ही तर बसल्या बसल्या आणखीसुद्धां चार धंदे उभे कराल, हां हां म्हणतां !

**: १०७८ :**

**काळे०**—( नव्या काव्यानें, हळूच ) नवे धंदे सोडा म्हणा—पण हा गवताचा धंदा मात्र चांगला वाढवतां येईल ! ( क्षणभरानें, संथपणें ) माझ्याकडे थोडी सुटी रक्कम पाहिजे होती होऽ ! मग दाखवला असता गवताचा धंदा तुम्हाला ! पण माझे हात हे असे बांधलेले आहेत ना ! त्याच्यावर कांहीं इलाज सुचत नाहीं बघा मला !...(क्षणभर थांबून, भाऊंकडे वळत, हळूच) बोला भाऊसाहेब, करतां धंदा सुरूं पुन्हां, गवताचा ?...(चुटकी वाजवीत) एक सहा सात हजार रुपये पाहिजेत हातांत घोळवायला !...बस्सं ! मग आतां पैसे अंगावर फेंकून, बांधून टाकूं आपण, ह्या एवढ्या एवढ्या भागांतले सगळे गवती नंबर नि शेतकऱ्यांचा पेंढा बिंढा, आगाऊच !

**भाऊ०**—( मान हलवित ) छे ! नांव नका घेऊं त्याचं, बापू ! आतां आपला गिरणीचा आहे धंदा एकटा तेवढाच पुरे--आणि पुन्हां आहेत कुणा लेकाकडे धंद्यांत टाकायला पैसे एवढे ?

**काळे०**—पाहिलंत ? हें तुमचं असं असतं ! (क्षणभर थांबून) आपाप-



सांतलं म्हणून आजपर्यंत मी बोललों नव्हतों, भाऊ ? पण आज नाइलाज झालाय् अगदीं माझा ! बोलतोंच शेवटीं—( अगदीं हळूं हळूं बोलत ) भाऊसाहेब, स्वतः तुम्हाला नसेलच जर करायचा हा धंदा, तर...( घुटमळून ) मला देता कां व्याजी कांहीं रक्कम ? मामासाहेबासूनचं पिढीजाद सावकारी घराणं तुमचं !

[ धर्माची पडद्यापलीकडील चुळबुळ शेवटीं वाढते. थोड्या रागीट चेहऱ्यानें क्षणभर बाहेरच्या बोलण्याचा कानोसा घेऊन, तो कसल्या तरी विचारानें घरांत निघून जातो. ]

**: १०७९ :**

**भाऊ०**—(गोंधळून) म्हणजे ? म्हणतां हां काय तुम्ही ?

**काळे०**—म्हणजे असं—काय असेल ते व्याज घ्या तुमचं बारा-पंधरा टक्केपर्यंत, माझ्याकडून ! ( भाऊंच्या बोलण्याची क्षणभर वाट पाहून, मग हसत हसत पुढें) त्याचं असं आहे भाऊसाहेब, या धंद्यांत हें एवढं व्याज देखील मारणार नाहीं आपल्याला ! अहो, होऊन होऊन त्या साऱ्या रकमेचं होईल किती व्याज वर्षाचं ? हजार ? एवढंच ना ! तरी वर्षांत दोन तीन हजार फायद्याला एक पै देखील कमी भरणार नाहीं ! बघा बुवा ! आतां तुम्ही सांगाल त्या पद्धतीनें लिहून देतां येईल;...प्रॉमिसरी म्हणाल तर प्रॉमिसरी; घर आहे माझं दहा बारा हजारांचं; ठाऊकच आहे म्हणा तुम्हांला; तें पाहिजे तर गहाण ठेवतां येईल तुमच्याकडे.

**भाऊ०**—( संकोची सहानुभुतीनें ) छेः छेः छेः ! तुमच्याशी व्यवहार करायचा तर या असल्या गोष्टींचा विचार कशाला करायला पाहिजे, बापू ?

**काळे०**—( उत्तेजित स्वरांत ) मग ?—काय करतां, बोला ?

**भाऊ०**—पऽण...खरं म्हणजे एवढी मोठी रक्कम हातांतच नाहीं आहे सध्यां, माझ्या [ अपराधी स्वरांत ] मुंबईच्या दोघातिघांकडे पांच सहा हजार पडले आहेत;...पण त्यांतली तर नुकतीच थोडी वसुली झाली नि या दिवाळींच व्यवहार-खातं मिटलं !...आतां पुढल्या दिवाळीपर्यंत ते आपणहून कसे बोलतील ? तेही धंदेवाले लोक...! बरं, आपल्यालाही घडीघडी त्यांना दुखवतां यायचं नाहीं;...काय भुरटे लोक आहेत ते थोडेच ?...आमच्या मामांपासूनचा संबंध आहे त्यांचा, आमच्या घराशीं !—

**काळे०**—[ शांतपणें ] हो...तेंही खरंच ?...( निश्वास टाकून खिन्न

स्वरांत ]...पण मीही मोठ्या पेचांत पडलोंय् हो भाऊ, सध्यां !...[ क्षणभरानें ] काय करावं ?...सांगा ? कधीं कधीं असं वाटतं बघा, कीं, आपण दोन तीन धंदे उगीच ठेवले !...अहो, एकाच धंद्यांत लक्ष असलं म्हणजे प्रसंगानुसार धीरानें मोठ्ठी उडी घ्यायला वांव तरी असतो चांगला, माणसाला...

**भाऊ०**—[ न समजून, पण सहानुभूतीनें ] असं कां बरं म्हणतां, बापू ? असे धंदे काय आहेत तुमचे जास्ती ?...एक तुमचा गवतांचा स्वतंत्र नि एक आपला हा भागींतला, गिरणीचा !...दोन्ही धंदे तर सुरळीत चालले आहेत ना ?

**काळे०**—[अर्धवट हसून] अहो, मग तेंच तर म्हणतोय् ना मी, भाऊ... दोन्ही धंदे चांगले आहेत !...पण दुशीबाजूला पुरे पडायची आपली स्वतःची ताकद नको का तितकी ?

**भाऊ०**—[ त्यांच्याकडे पहात गोंधळून...] म्हणजे ? म्हणतांहां काय ? मला नाहीं समजलं...

**काळे०**—[स्पष्टीकरणाच्या स्वरांत] अहो, कुठलाही धंदा म्हटला की त्यांत आधीं कमजास्त पैसा पेरावा लागतो !...नाहीं ?...मग दोन्हीकडे पेरायला तसा पैसा नको का गडगंज, गांठीला ?

: १०८० ;

[ पडद्याच्या आंतल्या बाजूला प्रथम धर्मा व त्याच्या मागून कमळामावशी प्रवेश करते. धर्मा खुणेनें बाहेरच्या बोलण्याकडे कमळामावशीचें लक्ष वेधतो; कमळामावशी क्षणभर चाहूल घेऊन, हातांतलें विणकाम चालवीत पलंगावर बसते. धर्मा आंत निघून जाते.]

**भाऊ०**—हो...तें खरं आहे...पण—

**काळे०**--(खुषामतीच्या स्वरांत) आतां तुमच्यासारख्यानें आपल्या मनांत आणलं-तर आजही दोन्ही धंदे चालवूं शकाल तुम्हीं !...पण हल्लीं माझ्या मात्र नाकीं नव् येताहेत बघा, अगदीं !

**भाऊ०**--(गोंधळून ) असं कां बरं म्हणतां तुम्हीं ?

**काळे०**--(निश्वास ) माझा गवताचा धंदा मला पुढें पुढें ओढतोय्...तर गिरण तशी एकूण पुष्कळ फायद्याची असली, तरी आज मात्र माझे हातपाय बांधून ती मागेंच ओढतेय् मला !...अशी आहे सारी गंमत !...काय सांगणार



तुम्हाला, भाऊ ?...( भाऊकडे रोखून पहात ) म्हणूनंच तर तुमच्याकडे व्याजी रकमेची गोष्ट काढली मी...

**भाऊ०**--(जरा ओशाळेपणें, खिन्न स्वरांत ) तुम्ही म्हणतां खरं, बापू ! पण असली तर पाहिजे ना हातांत रक्कम तुम्हाला देण्यासारखी;...उगीच हो हो म्हणून तुम्हाला झुलवायचं तर नाहीं ना ?

**काळे०**--( जाणीव दाखवून ) हो, तेंही खरंच !...तो तुमचा सिधा स्वभाव मला ठाऊक का नाही ?.. शक्य नसलं तर नाही म्हणाल लागलीच !... म्हणजे त्यानें होतं काय,...दुसरा कांहीं विचार करायला बरं पडतं माणसाला !...

**भाऊ०**--( अपराधी स्वरांत ) तें जमणं शक्य नाही, बापू !--

: १०८१ :

**काळे०**--(एकदम निश्वास टाकून ) हं चला...आहे खरं असं सारं-भ्रांगडं !—( हळूंच ) तुम्ही कांही तेरी सोडवणूक केली असती माझी यावेळीं, भाऊ, म्हणजे मला किती हायसं वाटलं असतं जिवाला म्हणतां ?...

**भाऊ०**—[ सहानुभूतीनें ] कसं काय करूं म्हणतां मी ?—सांगा !... होण्यासारखं असेल माझ्या हातून, तें करायची ना कां असते कधीं माझी, बापू ? स्पष्टच बोला की...आडपडदा कशाला उगीच...

**काळे०**—[मोकळया स्पष्टीकरणाचा आव आणून] तुम्हीच बघा हं, भाऊ ! माझ्यापुढें आज हे दोन धंदे !...आतां गवताच्या धंद्यांत तूट नाहीं !...म्हटलं तर वाढतोय्च;–पण खरा धंदा करायचा तो,...तर सहा सात हजार तरी नवीन घालावे लागणार त्यांत !...तो खूप वाढवला तरच त्यांत अर्थ !...कारण हे लढाईचे दिवस...भाव केव्हां दुपटी तिपटीला उडतील...सांगतां येत नाहीं !... म्हणूनच तर सारी घाई माझी !—

**भाऊ०**—तुम्हाला तसं वाटणं साहजिक आहे अगदीं—

**काळे०**—[ विषय बदलून, हळूच ] आतां उरला आपला गिरणीचा भागीचा धंदा !—तुम्हाला माहीतच आहे त्याची आजची परिस्थिती !... [ किंचित् थांबून–भाऊंकडे न पहातां ] तुम्हाला मिळाली असतील टिपणं आपल्या जमाखर्चाची, गिरणींतल्या ?

**भाऊ०**—हो, ठोकळ गोळाबेरजेची मिळालीं कीं !...बघूं आतां वह्या

केव्हां तरी सवडीनें !—देवांना म्हणालोंय् मी गेल्या आठवड्यांत...तपशील टांचणं तयार करा म्हणून...

**: १०८२ :**

**काळे०**—[बेफिकीरीनें] तीं पहाच तुम्ही, पाहिजेत तेव्हां;...पण माझ्याही सारा तोंडावरच आहे कीं हिशेब !...

**भाऊ०** –( जरा भांबावल्या आवाजांत ) सहा हजारांवर तोटा गेला ना गिरणीच्या व्यवहारांत, शेवटीं ?

**काळे०**—(मुत्सद्दीपणें) असं आहे, भाऊ, त्याचं ! वरवर पाहिलं, तर आपल्याला वाटतं–तोटा झालाय् बराच,...गिरणीच्या गेल्या तीन वर्षांत, हा सहा हजार म्हणजे !...पण त्यावेळीं आपण हें पहात नाही की आज त्या गिरणीची किंमत गेला बाजार पस्तीस चाळीस हजार आहे !...यावेळीं थोडी कारणंही झालीं तोट्याला ! पण गाडं सुरळीत चांगलं चालतंच आहे ना तें !

**भाऊ०**—(आठवून) आपल्या गिरणीच्या इंजननें दगा दिला नाही कां गेल्या वर्षी, एकाएकीं...

**काळे०**—अहो, तीं यंत्रांचीं धूडं म्हणजे अशींच ! चालतायत् तंवर ठीक वाटतात ! पण एकदां थांबलीं की थांबलीं...रेंसभर हलणार नाहीत मग !...

**भाऊ०**—हं ! आपल्याला काय कळणार त्यांत ?...तरी बरं देवांसारखे इंजिनिअर आपल्याला लाभलेयत् !...

**काळे०**—हो ना ! अहो म्हणून तर सारं दीड हजारांत तरी निभावलं !

**भाऊ०**—त्याला मात्र मशीनची अगदीं खडान्‌खडा चांगलीच माहिती दिसते !

**काळे०**—तर हो ! अहो भाऊ !...एकदां तेलकट खाकी विजार चढवून, तो इंजनखालीं नि जवळ, हातोड्याबितोड्यांसकट आडवा–उताणा पडला, कीं त्याला जेवणाची सुद्धां शुद्ध नसते, बघा !...आपलं ते काळं तोंड नि काळे हात घेऊन, दिवस दिवस इंजनभोंवतीं घिरट्या घालत राहील, भुतासारखा !—त्यानें अगदीं जरूर तेवढेच नवे भाग आणवलेन् मुंबईहून !—कांहीं तर लेकानें स्वतःच ठाकठूक करून नीट केलेन्...नि कांहीं स्वतःच मोजमाप् घेऊन तयार करून घेतलेन् ओतवून !...बोला आतां ?



**भाऊ०**—[ अभिमानानें ] घ्या !...अशीं आपलंच समजून काम करणारीं माणसं पाहिजेत देवांसारखीं !...म्हणजे स्वतःला पहावं लागत नाहीं कांहीं एक, घडीघडी प्रत्येक लहानसान बाबतींत !...

**: १०८३ :**

**काळे०**—( क्षणभरानें हळूच ) तरी पण एक एक यायला लागलं आंगलटीं, म्हणजे विचारूं नका, भाऊ !...हे असे मशीन दुरुस्तींत दीड हजार गेले ! .. मघा सांगितलं तसं त्या कपारच्या चोरांनी भात दिलं ! देवालाच विचारा कीं, काय त्या हरामखोरांच्या एकेक लीला !—नि कसा गोंधळ झाला तो...( निश्वास ) त्यांत बघा जवळ जवळ पावणेदोन हजारांचा फटका आला !...आणि...

**भाऊ०**—पण, त्याला काय करणार आपण ?...झालं खरं तसं !

**काळे०**—(ओघ चालू ठेऊन) बरं, गेल्यावर्षी त्या हुसेनशेटच्या गिरणीबरोबर कॉंपिटिशन करायला आपण आपले भाव कमी केले नाहीं कां, सडणावळीचे ? तर तें शिंचं गळ्यांत आलं !—तें धोरण चुकलं आपलं, बरं का, भाऊ !—

**भाऊ०**—तें हो कसं, बापू ?

**काळे०**—अहो सगळं वर्षच अगदीं मंदींत गेलं...

**भाऊ०**—आणि त्या हुसेनशेटला नाहीं पडली पचाहित ?

**काळे०**—त्या मुसलमानाला हो काय ? तो लाख्यासावकार आहे...चार सहा महिने बसून राहिला तरी ! सत्रा धंदे त्याचे ! पण आपला खर्च भागायची मारामार पडूं लागली शेवटीं शेवटीं...

**भाऊ०**—( शांतपणें ) असं नाहीं ?...

**काळे०**—हं ! तरी साडेचारशें मुड्यांचं काम आणलं मी मेटाकुटीनें इकडून तिकडून...म्हटलं भाव कमी तर कमी ! काम मिळूं द्या आधीं !

**भाऊ०**—मग खर्च भागायला जडच पडलं असेल म्हणायचं...

**काळे०**—( शहाजोगपणें– ) हो ना ! आतां तुम्हीच बघा कीं !–इतकी नोकरमाणसं.. आपल्या देवाचा शंभर रुपये पगार...मोड आहे तोड आहे...वीज आहे !...जवळ–जवळ सत्तर ऐंशीची सरासरी खूट पडत गेली दरमहा मुदलांतच.!...कसं बसं तगवून धरलं झालं !–गिरणीचं गेलं वर्ष कसं काढलं मी, तें माझं मलाच ठाऊक एकट्याला—

**भाऊ॰**—हं...आहे खरं असं !–तुम्ही काय कीं मी काय,...काय करणार त्याला ?

**काळे॰**—(सांवरासांवरीनें) पण मग...हें, तें नि तें करतां करतां गाडं असं सहा हजारपर्यंत गेलं ना...भाऊ !–(स्वर बदलून) आतां नुकसानींत हिशेबानें माझेही तीन हजार गेले म्हणा;...पण तरी मनांत वाटलं–आतां भाऊंना काय सांगूं मी ?...(चेहरा गंभीर व अपराधी करुन, भाऊंकडे हळूंच पहात—) नि आपलाच हा पराजय...भाऊंना सांगायला आतां कुठलं तोंड आणूं, म्हटलं...

**भाऊ॰**—(सहानुभूतीनें कळवळून) वा वा...असं कसं म्हणतां बरं, बापू ?...तुम्ही मला नाही तर आणखी कोणाला सांगणार ?...सरळ जिथें या घडलेल्या गोष्टी दिसताहेत, तिथें तोटा झाला म्हणून रागावण्या कुरकुरण्याचा प्रश्न कुठे आला ?...तो अविचारच होईल—

**काळे॰**—(नाटकी सुस्कारा) हा आपला भाऊ, तुमचा मोठेपणा !...पण तेवढ्यानें माझ्या मनाचं कसं समाधान होईल ?—

**: १०८४ :**

(लांबून फटफटीचा आवाज...जवळ जवळ येत असते...)

**काळे॰**—(चाहूल घेत...) कोण ?...देव आला कीं काय ?—

**भाऊ॰**—(आश्चर्यानें) देव ? कांहो बापू ? आज मधेंच मुद्दाम घराकडे ?

**काळे॰**—(बेडरपणें पण गूढ हसून) एक तसंच नाजुक काम सोंपवलं होतं मी त्याच्याकडे !...झालं तर मुद्दाम कळवायला ये दुपारपर्यंत म्हणूनहि मी म्हणालों होतों...त्याला—

(फटफटी जवळ येते...अंगणांत थांबते...क्षणभरानें देव प्रवेश करतात.)

**भाऊ॰**—(सहास्य) या ! देव या !—उन्हाचेच कुठे भटकतांहां ?...

**देव॰**—(काळ्या चष्म्यांतून पहात, रुमालानें कपाळ पुसत हंसून...) कामानिमित्तच...भाऊ ! (बापूकडे नजर टाकतात.)

**काळे॰**—(देवाकडे अर्धवट हसून, गूढपणें) काय ?—झालं कां ?

**देव॰**—(खिशांतून लखोटा काढीत) हं...झालंच असणार बहुतेक... हा पहा नुकताच लखोटा आलाय् कचेरीकडून...

**काळे॰**—(सस्मित) हो कां ?—पाहूं—पाहूं...(लखोटा घेतात.)



**भाऊ॰**—(भांबावून) काय आहे काय ही भानगड, बापू ?—

**काळे॰**—(लखोटा फोडून कागदाची घडी उघडत) थांबा हं, भाऊ, क्षणभर !...अंमळ धीर धरा !...जमलं तर आतांच आनंदाची बातमी सांगतां येईल मला तुमच्याकडे !—(चाळिशी लावून लखोटा वाचतात; चाळिशी कपाळावर चढवून कागदाची घडी करतात; मग स्वतःशीच जरा ताठ्यांत हसतात) ठीक झालं चला !...

**भाऊ॰**—[गोंधळून...] काय हो झालं, बापू ?...

**काळे॰**—[हातांतला कागद पुढें करीत हसून...] पहा ना, भाऊसाहेब ! तुम्ही स्वतःच पहा वाचून !...मिलिटरीसाठीं सुमारें हजार मुढे भात सडून द्यायचंय् सहा महिन्यांच्या आंत...हें पहिलं सरकारी कॉंट्रॅक्ट ठरलं, भाऊ !

**: १०८५ :**

**भाऊ॰**—[आपली चाळशी चढवून, कागद उघडून पहात...] काय ?

**काळे॰**—[कागदांतील एका ओळीवरून हात फिरवीत] आणि हा दर मुढ्याला भाव काय ठरलाय् सडणीचा तो पाहिलात कां, भाऊ ?—

**भाऊ॰**—[पाहून–आश्चर्यानें] काय ? चौदा रुपये मुढ्याला ?...म्हणतां काय, बापू ?...[हसून] आणि हें जमलं कसं तुम्हाला ?—

**काळे॰**—(बेरकेपणें हसत...) जमलं कसं ??...अहो भाऊ,...जेनूं काम तेनूं थाय् !...बिजा करे तो गोता खाय् !...तें येरा गबाळाचं काम नव्हे !–(किंचित् घमेंडींत...) हा बापू काळे आहे, म्हटलं, बापू काळे !...

**भाऊ॰**—(हसून, हातांतला लखोटा काळ्याकडे परत करीत, काळ्यांना) काय, केलंत् काय ?...कसली कळ दाबली ?

**काळे॰**—(लखोटा जरा तोऱ्यानें बेफिकीरीनें देवाकडे पुढे करून, हावभावांसह, भाऊंना–) हॅः हॅः...या देवांना विचारा...कोण सायास पडले ते...(देव हसतात...व डोळ्याचे उन्हाचे गॉगल्स हातांत काढून घेतात...) अहो...फिरवली की मामलेदार रावसाहेबांकडे किल्ली...दुसरं काय ?...(डोळे मिचकवून, हळूंच...) रुपेरी किल्ली !...हं...आहे काय त्यांत ? (देवांकडे वळून) काय ?...सारं ठीक झालं ना आतां, देव ?—

देव०—( आदबीनें ) हो, तर काय !...चार पांच महिने हेंच काम पुरेल आपल्या गिरणीला !...नि भावही जवळ जवळ चांगला दुप्पट...

काळे०—( चुरशीनें, अभिमानी स्वरांत, भाऊंना... ) मग ?-मिळायचाच ! हें तर कांहींच नाहीं, भाऊ !-आतां या वर्षी आणखी किती काम काढतों आपल्या गिरणीला बघा !-( गुपित सांगितल्याप्रमाणें ) दुसरं असं भाऊ, हे आहेत दिवस लढाईचे !—सगळेच भाव वधारताहेत् !...तेव्हां तशी वेळ आली तर असल्या जमान्यांत आपण सडणावळ मुद्याला पंधरा सोळापर्यंतही घ्यायला कमी करणार नाहीं !...( देवांकडे वळून ) खरं की नाहीं, देव ?...

देव०—(चष्म्याशी खेळत...मध्येंच डोळ्यावर काळा चष्मा चढवीत...) हं...गिऱ्हाइकाच्या कामाच्या निकडीप्रमाणें भावही वाढणार कामाचा !—

[ पडद्यामागें पलंगावर बसलेली कमळामावशी उठून घरांत जाते. ]

: १०८६ :

काळे०—( मखलाशी करून एकदम कुजबुजत्या आवाजांत...) आणि भाऊ...कंट्रोल बिन्ट्रोल आलं भातावर तर चोरट्या भाताच्या सडणावळीचा भाव काय येईल, तें विचारूंच नका—

भाऊ०—( सरळपणें ) छे छे !...अहो, आपल्याला काय करायचेत् तसले चोरटे धंदे, बापू ?—काय आपला राजरोस सरळ मार्गानें मिळेल पैसा, तेवढा आपला म्हणावा आपण !—या दिवाळीच्या हिशेबाला जेवढी तूट येतेय्, तेवढी भरून निघाली पुढल्या दिवाळीपर्यंत, तरी पुष्कळ म्हणतों मी—

काळे०—( नव्या जोमाच्या आवाजांत-) अहो भरून ?-(भिंवया उडवीत ) आतां भाऊ, पुढलीं तीन वर्षे तुम्ही नुसतं बघतच रहा !...काय देव ?

देव०—( पुन्हा चष्मा काढीत—)असं काम येत राहिलं तर रात्रं दिवस गिरण चालूं ठेऊनच काम उरकावं लागेल आपल्याला, भाऊ !—

भाऊ०—(थोड्या साशंकपणे) पण यंत्रांना झेपेल कां तेवढा बोजा, बाप्पा ?

काळे०—(पटकन्...) तें का बरं ?...आपण सारी इंजनं वगैरेंची दुरुस्ती करून घेतलीच आहे गेल्या वर्षभरांत ?...मग इतके पैसे खर्च केले, ते यंत्रानी असा वेळेवर अवसानघात करायला ? का हो, देव ?

देव०—( डोळ्यावर पटकन् काळा चष्मा चढवीत ) हो हो !-लहान



मोठी सारी दुरुस्ती करून घेतलीच आहे आपण !—आतां कशाला येतेय् यंत्रांची तक्रार !...मिळेल तेवढं काम पाहिजेच आहे !—( पटकन् काळ्यांकडे पहात...) मी जाऊं आतां, बापू ? गिरणींत कामं तुंबून राहिलीं असतील अजून—

काळे०—( मान हलवीत...) हो हो...चला तुम्हीं !...मी संध्याकाळीं आलों तर येतोच !—( देव जाण्यासाठीं वळतात...) हें पहा...कोणा मजुरा-बिजुराला काय अंगावर पैसे पाहिजे असतील तर थोडथोडे देऊन टाका !—( देव दाराकडे होतात-)...आणि जास्तकमी लागले तर माझी वाट पहात बसूं नका !...आमच्या वखारीच्या कारकुनाकडून घ्या !—म्हणावं मी सांगितले आहेत द्यायला !—अं ?

देव०—( जातां जातां ) हो हो...करतों सारं !...( भाऊंकडे वळून काळ्या चष्म्यांतूनच पहात ) बरं-भाऊ...

( देव उजव्या बाजूनें जातात-क्षणभरानें फटफटी सुरूं झाल्याचा व गेल्याचा आवाज ).

: १०८७ :

काळे०—( क्षणभराची शांतता मोडून ) पाहिलंत, भाऊ ! असं असतं धंद्याचं !...जायचं-यायचं चालायचंच !—( किंचित् थांबून ) म्हणून म्हटलं आज जरा तोट्यांत दिसली आपली गिरणी तरी तें चांगलं चालूं गाडं आहे !...

भाऊ०—[ समाधानानें-] हं ! तसं सरळच दिसतंय् कीं—

काळे०—[ घुटमळत पण खिन्नपणें...] तरी पण...

भाऊ०—[साशंक होऊन] आतां 'तरी पण' काय म्हणतां आणखी, बापू ?

बापू०—[ जरा खिन्न चेहरा करून ] अहो, हें सारं असं आहे, म्हणूनच तर मी आणखी जास्त जास्त गोंधळांत पडतोय् दिवसेंदिवस, भाऊ—

भाऊ०—[ गोंधळून-] तें कसं काय बुवा ?—

काळे०—[ बेरकें हसून ] तुमचं आपलं ठीक आहे, भाऊ !—एकट्या गिरणीशींच संबंध तुमचा ! पण माझा जीव मात्र प्रत्येक मिनिटाला दोन बाजूला ओढला जातो...अगदीं टांगला जातो ! एकीकडे ती गवताची वखार-एकीकडे हा गिरणीचा व्यवहार !...कुठं नि कसं पुरं पडावं दुबळ्या जीवानें, सांगा ?—

भाऊ०—[ समजुतीच्या स्वरांत...] तुमची रक्कम अडकून राहते या

दृष्टीनें कां म्हणतां हां ? तसं असेल, तर बापू, माझे नाहींत कां सहासात वर्षं अडकून राहिलेले पंधरावीस हजार, त्या गिरणींत ?--

**काळे०**--पण पहिल्या चारी वर्षांत दरसाल हजार हजार करून, तुमच्या एकट्याच्याच वांट्याला चार हजाराचा फायदा आला...त्या मुदतींत व्यवस्था पहाण्याचे काय मिळाले असतील मला तेवढेच ! बाकी मला मिळाले कां कांहीं ? त्या फायद्यांत माझा संबंधही नव्हता कांहीं !

**भाऊ०**--पण मग, बापू, त्यानंतरच तर आपलं हें भागीचं बोलणं झालं नि तीन वर्षांची मुदत ठरली !...नाहीं का ?...

**काळे०**—पण मी नाही म्हणतोय् कां कुठे ? तेंच तर सांगायचंय् मला—तीन वर्षांची आपण मुदत ठरवली—तेवढ्या काळांत तुमच्याकडे नवी रक्कम मी मागायची नव्हती ! लागली तर मीच एकट्यानें गुंतवायची—नि मुदतीअखेर फायदातोटा काय होईल त्याची जबाबदारी आपण निम्मेनिम सोसायची—हें सारं आपलं त्यावेळीं ठरलं होतं ! कबूल आहे ना मला !—( किंचित् थांबून ) पण आतां भाऊ ती मुदत संपली ! म्हणून तर हें बोलण्याची पाळी आली आज !—

: १०८८ :

**भाऊ०**—( क्षणभरानें ) मग ? आतां यापुढे कसं करावं आपण, बापू ?

**काळे०**--( धोरणीपणें ) कसं करतां ?--तुम्हीच सांगा—

**भाऊ०**—तुमचं साहाय्य मला तर पाहिजेच, आहे, बापू ! तेव्हां, असं बघा, सुरवातीपासून अडकलेले माझे पैसे नि गेल्या तीन वर्षांत वेळोवेळीं गिरणीसाठीं तुम्हाला अडकवावे लागलेले हे सहा हजार !...राहील एवढी रक्कम गुंतून !

**काळे०**--( शहाजोगपणें ) म्हणजे पुढे काय होईल म्हणतां, ?

**भाऊ०**—आतां तीन वर्षांची नवी मुदत ठरवूं पुन्हां ?

**काळे०**—आणि व्यवहार कसा चालायचा म्हणता भाऊ ?

**भाऊ०**—यापुढें फायदा होईल असं म्हणतांच आहां तुम्ही. तेव्हां...पुढल्या हिशेबाच्या वेळीं...आजच्या जमाखर्चांतले माझ्या वांट्याचे तीन हजार तोट्याचे पैसे तुम्ही वजा करून घ्यावेत, त्या फायद्यांतून; एवढं झालं म्हणजे झालं की नाहीं ?

**काळे०**—( क्षणभर थांबून ) बर ! आलं माझ्या ध्यानांत ! पण अशा व्यवहारानें माझा काय फायदा होईल ?



**भाऊ०**--कां बरं ? गुंतवलेल्या रकमा लक्षांत न घेतां, निम्मे निम मालकी दोघांची, अशी पाहिजे तर आजच बोली करून टाकूं !—मग कसली कुरकुर करायला जागा रहाणार तुम्हाला ?--

: १०८९ :

[कमळमावशी पुन्हां घरांतून बाहेर येते. विणकाम करीत पलंगावर बसते.]

**काळे०**—( विचार केल्यासारखें दाखवून, क्षणभरानें ) तुमचं बोलणं फारच सोयीचं दिसतंय्, भाऊ !—आणि पैशानें तुमच्या तोडीचा असतो मी, तर यांत प्रश्नच उरला नसतां, तुम्ही एवढं सांगितल्यावर !...( किंचित घुटमळत ) पण...माझी खरी अडचण आहे आज...रोख नाण्यांची !—

**भाऊ०**—[ आश्चर्यानें ] म्हणजे ? अजूनही काय राहिलंच आहे कां...

**काळे०**--[ हळूंच ] हें पहा भाऊ, स्पष्टच सांगतों ! एवढी रक्कम एकाच धंद्यांत हल्लींच्या काळांत अडकवून ठेवण्यापेक्षां कुठला तरी एक धंदा आंवरता घ्यावा लागला तरी पत्करेल मला !--आणि गवतांत नवे पैसे टाकायला मिळत नसले तर...[ किंचित् थांबून] या गिरणीच्या चांगल्या चालत्या धंद्यातूनहि मध्येंच अंग काढून घ्यायला देखील मी एक वेळ चटकन् तयार होईन !

**भाऊ०**—[ आश्चर्यानें व अजीजीनें ] वा वा ! बापू, हें असं काय एकदम म्हणतां आहां तुम्ही ? त्रागा आहे हा तुमचा !

**काळे०**—[ सहज बोलल्यासारखें ] त्रागा कसला ? म्हणजे सरळच बघा हं आतां...माझ्या गवताच्या धंद्यासाठीं लागणारी माझी नड बाहेरच्या बाहेर भागत नाहींच आहे आतां !...उलट, आणखी तीन वर्षं माझे सहा हजार गिरणींत अडकून रहाण्याची ही पाळी !—बरं चालू राहिला तो धंदा भागींत, तर सहा हजार तोट्यांतले फार तर तीन हजार तेवढे हिशेबानें मला तुमच्या कडून तुमच्या सवडीनें केव्हां तरी मिळायचे...आणखीही थोडे मलाच अडकण्याची पाळी यायची ! हो, कीं नाहीं ?—

**भाऊ०**—हो, मग ?...त्यांत एवढं बिथरण्यासारखं काय आहे ?—

**काळे०**—बिथरायचं काय त्यांत ?--पण मिळाले तरी ते तीन हजार कांहीं मला पुरायचे नाहींत !

**भाऊ०**--( गोंधळून ) मग आतां काय करणार ?

**काळे०**--( हळूंच ) तेव्हां, मी असं समजतों...गेल्या तीन वर्षांतली अंगमेहनत गेली माझी फुकट !...घटकाभर असंच म्हणूं यांना, कीं, स्नेहाखातरच मी तुमचा व्यवहार पाहिला तीन वर्षें;...त्यासाठीं तुमच्याकडूनं कांहीं घेतलं नाहीं;...उलट वेळोवेळीं तुमच्यासाठीं सहा हजार मीच पदरचे गुंतवले !

**भाऊ०** –[ मध्येंच...]...आणि एका दृष्टीनें पाहिलं तर जवळ जवळ तसंच झालंय्...म्हणायला पाहिजे.

**काळे०**--[क्षणभरानें हळूच] तेव्हां म्हणूनच मला वाटतं, भाऊ, फार तर मामुली ३-३॥ टक्के व्याज धरून मला सातहजार आजच देऊन टाका !—नि ही भागीदारीच्या कल्पनेची बाब इथेंच संपवून टाका !--

**भाऊ०**--[ घुटमळत...] पण मग...

**काळे०**--[ शांतपणें ] का ? हें सगळं आपल्या स्नेहाला, हिशेबाला,... सगळ्याला धरूनच होईल...पुन्हा माझी रकमेची नडही परस्पर भागेल !

**भाऊ०**--[ नापसंतीनें ] छे छे...तुम्ही या भागींतून असं एकदम उठून जाऊन चालायचं नाहीं, बापू ! सुरवातीपासून माझी एकट्याची गिरणही तुमच्या हातीं होती ! त्याच दृष्टीनें भागीदारी सुरू केली तीन वर्षांपूर्वीं ! ती काय शेवटीं असला वेडा व्यवहार करण्यासाठीं ?--

**काळे०**--[ एकदम ] हं हं...तसं मात्र मनांत मुळींच आणूं नका... आजपर्यंत पाहिलं तसंच पुढे ही गिरणीच्या व्यवस्थेचं काम पाहीनच कीं मी !... पाहिजे तर त्याबद्दल देऊं नका मला कांहीं !--मग तर झालं कीं नाहीं ? ( प्रेमळ स्वरांत ) भाऊ, मी आपण होऊन गिरणीच्या बाबतींत शेवटपर्यंत अंतर देणार नाहीं तुम्हाला ? मी तुम्हाला सोडून जातोय्...बाजूला होतोय्--असं बिलकूल समजूं नका !--आपल्या एकमेकांच्या व्यवहाराची सोय म्हणून असं करायचं एवढंच !

: १०९० :

**भाऊ०**—( त्राग्यानें ) पण इतका उतावळेपणा कां ?–व्यवहाराच्या दृष्टीनें तुमचं कांही नुकसान दिसतंय् कां ?–असले तर तसं स्पष्ट सांगा—

**काळे०**--( प्रामाणिकपणा दाखवीत पटकन् ) छे छे छे...भाऊ असं माझ्या स्वप्नात सुद्धां येण्याचं कारण नाहीं !–अहो आज गिरणीची किंमत, यंत्रे जमीन, इमारत, नांव...मिळून चाळीस हजारांवर आहे ! ती दिवसेंदिवस वाढणार;



आणि माझी, तसं पाहिलं तर, एवढीशीच रक्कम त्यांत अडकलेली ! तरी गिरणींत तुम्हीं आजही अर्धी मालकी देण्याइतका मनाचा मोठेपणा—इतकी मजबद्दल आपुलकी दाखवलीत, पटकन् ! ती काय नको कां आहे मला ?--

**भाऊ०**—(कोडें पडून ) मग ? आतां प्रश्न कुठं उरला ?--

**काळे०**--पण तरी मी फक्त सात हजारांत या भागीदारीची तोड काढायला निघतोय् ! मला नुसता माझा स्वार्थच पाहिजे असतां तर कोणाहीकडे सत्राअठरा हजारांच्या खालीं एक शेकडा उतरलों नसतो मी !

**भाऊ०**—( गोंधळून ) अशी विचाराची घाई घाई कां, बापू ?

**काळे०**--(खिन्नपणें) छे हो ! त्याला तशींच कारणं आहेत !–माझी गवताच्या धंद्याची आजची नडच तशी भयंकर गळचेपी करणारी आहे !–नाहक कोंड़मारा होतोय् चारीं बाजूंनीं !...(क्षणभर भाऊंकडे साभिप्राय पहात) मग ?

**भाऊ०**—( जरा खिन्नपणें ) आतां हा व्यवहार असा भागीदारी तोडून संपवायचा म्हटलंत तुम्ही, तरी भागीदारी एकट्याकडे घेण्याचा तो सौदा करायला माझ्याकडे मोकळी रक्कमच नाही ना या घटकेला !—त्याला काय करूं ?

**काळे०**—( खिन्नपणें निश्वास टाकून... ) दुसरा कोणी विश्वासच ठेवणार नाहीं याच्यावर ! पण भाऊ, आतां तुमच्यासारखाच मनुष्य असं म्हणायला लागला म्हणजे आम्हाला रहायलाच नको जगांत !

**भाऊ०**—( अपराधी स्वरांत ) पण नाइलाज आहे माझा !—

**काळे०**--( क्षणभर डोक्यावर हात घेऊन गप्प राहत–) तर मग असं करा, भाऊसाहेब,...आहे तें तसंच पुढें चालूं द्या पाहिजे तर—पण...या गेल्या दिवाळींतल्या हिशेबाच्या तोंडमिळवणींत निघतात ना तुमच्या वाट्याला तोट्याचे तीन हजार ? तेवढे नि निदान एक हजार जास्त असे मला एकूण चार हजार तरी द्या सध्यां...स्नेहाखातर, चार आठ दिवसांत !—घेईन भागवून मी माझी नड, तेवढ्यांत कशी तरी !—( भाऊ थोडा वेळ कांहींच बोलत नाहींत. )

**काळे०**—( शेवटी शांतता मोडून... ) कां बोलत कां नाहीं भाऊ, तुम्ही ?...हें तरी ठरलं ना मग ?

**भाऊ०**—( ओशाळेपणें एक निश्वास टाकून ) आतां काय सांगूं, बापू, तुम्हाला ?...चार हजार नि तीन हजारांच्या गोष्टी कशाला ? हजार दीड हजार द्या म्हणालेत मला तरी तुम्हाला चार सहा महिने थांबावं लागेल !—

**काळे॰**—( एकदम रागानें, करड्या स्वरांत ) म्हणजे ?-हें असं कसं गैरहिशेबी बोलतां तुम्ही, भाऊ ?...हें-हो कसं जमणार ?...मी तुमच्या भरंवशावर लोकांना वायदेहि देऊन बसलोंय् ना ?—मला द्याल अशानें सरळ तोफेच्या तोंडीं !...इतकं करून पुन्हा आम्हीच लटकायचे कीं फांसावर ! !—

**भाऊ॰**—( मान खालीं घालून ) पण मी तरी काय करूं ?

: १०९१ :

**काळे॰**--( सुस्कारा टाकून ) मोठ्या पेंचांतच टाकताय् म्हणायचं तुम्ही मला !-(थोडा वेळ विचार करून) मग असं करा ना, भाऊ ? चार दोन महिन्यांचाच प्रश्न असेल,...तर मला करतां येईल व्यवस्था कोणाकडे तरी;...तुमची बोरगांवची आंबराई नि तिच्याजवळच्या दोन जमिनी—

**भाऊ॰**--( एकदम रागानें ) गहाण टाका म्हणणार असाल. तुम्ही ? खाशी ! तुमच्या पैशाच्या नडीनें वेडे झाला आहांत बापू, तुम्ही आज !

**काळे॰**--(त्या गांवचेच नसल्यासारखं) कां बरं ? धंदा आहे हा !-माझं असतं तर मी तें केलं असतं, बुवा !-अहो त्यांत कसली चोरी ?-धंदा म्हटला कीं कुबेराला देखील तशी वेळ येते !-सरळ व्यवहार आहे हा...निदान शब्द तरी टाका कोणाकडे तरी !...तुमच्या शब्दावर पांच मिनिटांत...

**भाऊ॰**—( अधिक रागावून पण सौम्य स्वरांत) वाः वाः !—लोक लाख देतील आपल्याला !-पण तसला कर्ज काढण्याचा व्यवहार आमच्या आजपर्यंतच्या सावकारी घराण्याला शोभेल कसा, बापू ?...(कठोरपणें) तुमच्या दृष्टीनें सरळ व्यवहार असेल तो !--पण मला नाही करायचाय् तसला व्यवहार !-आतां म्हातारपण आलं तरी हातून तसं झालं नाहीं अजून. पुढेंही होणं शक्य नाहीं ! समजलांत...

**काळे॰**--(मिळतें घेऊन) मग आतां मी काय करावं, भाऊ ? मला तरी बुवा कांहींच सुचत नाही ! तुम्हीच असे हात पाय गाळल्यावर आम्ही हो काय करायचं ?-अं? ? कांहीं तरी तुम्हालाच नको कां मार्ग काढला पाहिजे त्यांतून ? काय ?

**भाऊ॰**—( हतबलपणें त्राग्यानें व रागानें ) आजच्या तुमच्या पद्धतीनें आतां आणखी विचार करायला फक्त माझ्या बायकोच्या अंगावरचे दागिने तेवढे राहिले आहेत घराबाहेर काढायचे !--तेंहि एकदां सांगून टाका ना, बापू !--

**काळे॰**—( एकदम पड घेत ) हें हें काय, भाऊ ?--मी असं कसं म्हणेन ?--मी काय वेडा आहे ?--



**भाऊ॰**—( त्या रागाच्याच ओघांत ) आणि सांगितलंत तरी त्याला मी तयार व्हायला पाहिजे ना ? ( अगतिक स्वरांत ) दुसरा काय वाटेल तो गाढवपणा करूं आम्ही !--पण आपल्या बायकोचं स्त्रीधन ?...स्वतःचा जीव बचावण्यासाठींही तें बाहेर काढण्याइतका नामर्दपणा करणार नाहीं कोणता मनुष्य ! निदान मी करणार नाही !—समजलांत बापू ?—(दोघेहि गप्प रहातात. )

: १०९२ :

**काळे॰**--( क्षणभरानें हळूंच ) रागावलांत, भाऊ, तुम्ही माझ्यावर ?...

**भाऊ॰**—(क्षीण स्मित करून) रागावण्याचा प्रश्न नव्हे हा !...पण मला जें जमणार नाही तें तुम्ही सांगून काय उपयोग ?—तें मी कबूल कसं करीन ?

**काळे॰**—( हसून मिळतं घेत ) तें खरं हो !—पण धंद्यांत असं अलीकडे पलीकडे करायला नको का ?—म्हणून सुचवलं आपलं मी, मला वाटलं तें !... तुमच्यावरच तर माझे सारे बेत अवलंबून ना ! ( समजावणीच्या स्वरांत ) आतां नाहीं पटत तुम्हांला तें, तर राहिलं आमचं !...

**भाऊ॰**—( थंड होत ) नाइलाज आहे माझा...यांतूनच कांही तरी जमवावं लागणार मला !...नव्या भाताची विक्री...किरकोळ येण्यांचे वायदे, यावरच सारं जमणार तें, जमेल तसं !—पण एकरकमी तीन हजार द्यायचे तुम्हाला म्हटलं तरी तीन चार महिने थांबावं लागेल तुम्हाला !—

**काळे॰**—( पूर्ण पडतं घेत ) बरं बुवा ! मग काय करणार ?—सोडा आमचं बोलणं... झालं आतां ?

**भाऊ॰**--( हसून ) अहो बापू, तुमच्या मुलासारखा आमचा विनू काय मिळवतोय् थोडाच ?—शिकला ढीगभर !-पण काल कुठं नुकतीच नोकरी करूं लागलाय्...त्याचं त्याला एकट्यालाच पुरं पडत नाही !—अहो उलट त्यानेंच कधीं मागितलं तर मला पुरं करावं लागतं त्याचं ! मग सांगा ? एकट्या हातानें कुठंकुठं पुरं पडायचं मी ?—

**काळे॰**--(हसून, चलाखीनें विषय बदलत) हँ...तें खरं असेल तुमचं ! पण भाऊ...हें आपलं आमचं व्यवहाराचं बोलणं सोडून दिलं, तरी एक रहातंच...

**भाऊ॰**—( कुतूहलानें ) तें काय बुवा ?—

**काळे॰**--अहो, तुमचा विनू मिळवतो तें त्याला एकट्यालाहि पुरं पडतं नाहीं हें कबूल !...पण एवढ्या सबबीवरच त्याला तुम्ही अजून लग्नाचा ठेवला

आहेत, असं तर नाहीं ना सुचवायचं आहे तुम्हाला ?...हॅ...हॅ...हॅ... ( हसूं वाढवतात. )

**भाऊ०**—(संसर्गानें किंचित् रंगांत येऊन, हसत) हें आपलं तुमचं कांहीं तरीच ?...शेवटी, आलांत का तुम्ही तुमच्या रोजच्या प्रश्नाला ?...(क्षणभर थांबून) त्याचं हो कशाला लग्न मागें ठेवायचं आपण आतां ?...पण तें मनासारखं सुरळीत जमून तर आलं पाहिजे ना सारं ?...

**: १०९३ :**

**काळे०**—( धूर्तपणें हसत ) मनासारखं ? कोणाच्या मनासारखं ?–विनूच्या, तुमच्या किं वहिनींच्या ?—अंऽ ?–( भाऊ स्मित करतात. ) त्याच्या मनासारखं म्हणत असाल, तर बघा, भाऊ, तो एक दिवस स्वतः परस्पर लग्न करील नि बायकोसह पायां पडायला येईल तुमच्या ! तोंपर्यंत तुम्हाला समजणारही नाहीं ! ( भाऊ हळूच हसतात. ) आणि तुमच्या नि वहिनींच्या मनासारखं म्हणत असाल, तर तें प्रथम तुम्हींच नको का मनावर घ्यायला ?—

**भाऊ०**—( हसत... ) हो, तें खरं आहे तुमचं म्हणणं !—

**काळे०**—( पाहिजे तशी कलाटणी देऊन ) मग ?...पण तुम्हींच पहा हो आतां, भाऊ ! त्या मुंबईच्या रावबहादुरांच्या मुलींचं तें स्थळ ! मी गेला महिना दीडमहिना सांगत आलोंय् की नाहीं तुमच्या कानीं कपाळी ओरडून ? ...काय केलंत का त्या बाबतींत ?

**भाऊ०**—( घुटमळून, टाळाटाळ करीत ) पण त्याचं असं...

**काळे०**—( त्यांना बोलूं न देतां ) ते रावबहादुर माझ्या ना जातीचे ना पातीचे !...तरी तीन चार पत्रें आलीं मला त्यांचीं, त्या बाबतींत आतांपर्यंत ! परिचय घरोबा आहेच तसा त्यांचा आमचा !—पण मग कळवणार काय मी त्यांना, तुम्हीच मला आपला मनोदय कळवत नाहीं मुळींच तर ? सांगा ?—

**भाऊ०**—(वेळ मारून नेण्यासाठीं खालीं पहात हळूंच) बघूं या कीं आतां.

**काळे०**—(एकदम) आतां बघूं या बिघूं या कांहीं नाहीं !...भाऊ, मध्यें आपण मुंबईला गेलों, तेव्हां नुसती मुलगी पाहून ठेवायला देखील तुम्हाला कोण आग्रह करावा लागला ?...त्यावेळीं, सून म्हणून स्वतःला ती पसंत असल्याचं माझ्याकडे म्हणालांच होतां कीं नाहीं, तुम्हीं ?

**भाऊ०**—( घुटमळत ) हो...म्हणालों होतों मी ! पण...



**काळे०**—( पटकन् ) अहो, कोणाच्याही डोळ्यांत भरण्यासारखी निर्व्यंग नि नक्षत्रासारखी मुलगी !...मॅट्रिकच्या वर्गांत शिकणारी !...( हसून ) आणि कां नाही पसंत पडणार तें स्थळ ? बरं, रावबहादुर सगळा खर्च करून चार पांच हजारांपर्यंत वरदक्षणाहि द्यायला तयार आहेत !...दाखवलंच होतं मी तुम्हाला त्यांचं पत्र, पंधरवड्यापूर्वींच !—

**भाऊ०**—( हसून ) हो !...पण वाः बापू ! तुम्ही तरी बरीच कल्पना करतांहा !–अहो,—हुंड्यासाठीं का मुलाचं लग्न करायचंय् ?...तो प्रश्नच नाही मुळीं !...आपल्याला आपलंच काय कमी आहे तसं, ईश्वर कृपेनें !—

**बापू०**—( शहाजोगपणें ) पण मी कुठं म्हणतोय् तुमचा हुंड्याचा प्रश्न आहे म्हणून ?...तुम्ही अडून बसताहांत थोडेच त्याच्यासाठीं ? तेच तर मोठ्या आनंदानें देताहेत...झालंच तर दागिनेही घालणार आहेत आपल्या मुलीला ?

**भाऊ०**—( संकोचानें ) असेल हो...पण...

( कमलामावशी आतां विचलित होते; उठून चुळबुळ करते. )

**: १०९४ :**

**काळे०**—कां ? ते तुम्ही नको कां म्हणणार ?...अहो, त्यांना तरी काय कमी आहे ?...सर्व गोष्टींना तयार होतील रावबहादुर !.. बरं जातीचा–गोतांचा म्हणावा, तर कसला कसलाच प्रश्न अडत नाहीं !...मग ही तुमची दिरंगाई कां ?...नडतंय् कुठें रुकार द्यायला ?...अंऽ !...बोला ना मनांतलं काय तें ?... असा आमच्याकडेही परक्यासारखा आडपडदा ?—

**भाऊ०**—(हसून) सगळं कबूल आहे तुमचं म्हणणं मला...पण...

**काळे०**—( मुत्सद्दीपणें ) कां ?...विनूला विचारायचंय् अजून...असंच ना म्हणायचंय् तुम्हाला ?...(थोड्या सलगीच्या रागानें) हें हेंच तें !...तुमची सगळ्याच बाबतींत असली चालढकल, भाऊ ! आतां तो दिवाळीला आला होता घरीं वीसपंचवीस दिवस !...तेव्हां...नाहीं विचारून घ्यायचं ?...

**भाऊ०**—(हसत)...पण बोलण्या बोलण्यांत तो विषय तर आला पाहिजे ना ?...मुलं मोठीं झालीं आतां...

**काळे०**—( हसून ) पण तो काय नको का म्हणणार आहे अशी सुंदर बायको ?...तें कांहीं नाही, भाऊ, (हक्कानें) अशी दिरंगाई मुळींच चालूं देणार नाहीं आतां मी तुमची, या बाबतींत तरी...

भाऊ०—असं काय करतां, पण ?—विनूला कसं विचारणार सवरणार आतां, मध्येंच ?—तो आतां नाताळांत येईल घरीं, तेव्हांऽ...

काळे०—( आश्चर्यपूर्ण ) वा वा...भाऊ, इतका वेळ गोंधळांत ठेवणार होय तुम्ही रावबहादुरांना ? छे छे !...तें कांहीं नाहीं !...अगदीं शुभस्य शीघ्रम् !...

भाऊ०—( हसत ) बरं बरं...लागूंया त्या कामाला...

काळे०—दाखवायची असेल मुलगी विनूला, तर आतां संध्याकाळीं पांचाच्या गाडीनें सरळ मुंबईलाच जाऊं या !—बरं मुलगा मोठा झाला त्याला हें एकदम विचारायची भीड वाटत असेल तुम्हाला...तर मी येतों बरोबर ! मग तर झालं की नाही ?—रावबहादुर नि त्यांची मुलगीहि तिथेंच आहे !...होऊं द्या काय तें एकदां !...हा सूर्य हा जयद्रथ !...ठरून जाईल एकाच बैठकींत...

: १०९५ :

भाऊ०—(रदबदलीच्या स्वरांत) अहो पण बापू, अगदीं आजच काय त्याची एवढी घाई ?...जाऊं निवांतपणें उद्यां सकाळीं—

काळे०—नाही भाऊ !...हें बघा पत्र रावबहादुरांचं...आजच आलंय् सकाळीं...(खिशांतून पत्र काढून पुढें करतात —) आजच्या आज मुंबईला जाऊं...उद्यां सकाळीं विनूला घेऊन तिकडे जाऊं त्यांच्याकडे—

भाऊ०—( कुरकुरत )...अहो पण एवढं उतावीळपणें नको—

काळे०—कां ? म्हणजे आतां विनूनें एकदां पहायचं तेवढंच काय तें राहिलंय् ना ?...तेवढं झालं कीं आपलंही काय तें होय-नाही एकदां ठरून जाईल ! बरं...रावबहादुरांच्या आजच्या या पत्रालाहि अशी आस्था दाखवल्यासारखं होईल ?...कसं ? नाही म्हणून ठरलं तरीही ते आपले लागलीच मोकळे होतील पुढल्या दुसऱ्या खटपटीला !-(जरा डोळे मिचकवून) बरं, ठरलं तर आपलीं सगळींच कामं जमून येतील सुरळीत लौकरच !...

भाऊ०—म्हणजे ?—विचार काय आहे तुमचा ?

काळे०—(डोळे मिचकवीत) हो, मी बुवा एक धंदेवाईक मनुष्य आहे ! चारी बाजूंनीं पहाणार एखाद्या प्रसंगाकडे !—चला ! करा पाहूं तयारी निघण्याची—उठा !...

भाऊ०—( थोडा विचार करून ) बरं बरं...जाऊं या आजच...चला ! तुमच्या मनासारखं होऊं द्या ! (कोट टोपी घालावयास खुंटीकडे वळतात. ) ए धर्मा, धर्मा—



धर्मा०—( हॉलकडून प्रवेश करीत ) काय इयेट ?—

भाऊ०—( कोट चढवून टोपी घालत ) अरे ? माझं धोतर बितर घालून बॅग तयार करून आण माझी !—नि सदूला गाडी जोडायला सांग ? मुंबईची गाडी गाठायचीय् म्हणावं...लौकर...

धर्मा०—( आश्चर्य व्यक्त करून आंत वळत व काळेबापूंकडे जरा संशोधक दृष्टीनें पहात ) व्हय्—

भाऊ०—( आठवून ) नि हें बघ, उद्यां पहांटे गाड्या घेऊन जा तुम्ही...बरं का चिंचाळच्या खंडासाठीं !...परवां संध्याकाळीं तुम्ही परताल...त्याच्या आधीं सकाळीं येतों आहेच मी परत...

धर्मा०—( जातां जातां–) व्हय् इयेट...( डाव्या बाजूनें घरांत जातो... )

( भाऊ व काळेबापू बाहेर जाण्यासाठीं हॉलच्या बाजूस वळतात )

: १०९६ :

( धर्मा पलंगावर बसलेल्या कमळामावशीकडे अर्थपूर्ण दृष्टीनें पहातो... ती उठून कापडी पडदा ओढून बाहेर येते...भाऊ व काळेबापू पाठमोरे होऊन बाहेर जात असतात.)

कमळा०—( पडद्याजवळ उभी राहून...हळूच ) कुठं ?...मुंबईला वाटतं ?

भाऊ०—( थबकून मागे वळून, किंचित् बेफिकीरीनें ) हं...( पुन्हा चालूं लागतात;...काळे थबकतात.)

काळे०—( एकदम वळून पहात, हसून ) अहो वहिनी, तुम्हाला सून येणार आतां हाताखालीं लौकरच !...थाट आहे बा तुमचा !—तुमच्या विनयचं लग्न ठरतंय्, वहिनी !...

कमळा०—( आश्चर्य दाखवीत ) काय ? विनूचं लग्न ठरलं माझ्या ?...

काळे०—हो तर ! अगदीं नक्षत्रासारखी आहे मुलगी !...चांगली शिकलेली ! ( भाऊ जरा मागें वळून दोघांकडे पहात एकदां सौम्य हसतात ) अहो, बड्या बापाची बेटी...नि बड्यांचीच सून !—काय विचारूं नका ! ! हुंडाही घेऊन येणार आहे बरोबर !—( हसतात. )

भाऊ०—( लगबगीनें ) चला बापू,...गाडीला एक तास उरलाय्...

(भाऊ व त्यांच्या मागून काळेबापूही 'चला' म्हणत बाहेर उजव्याबाजूस जातात.)

( गाडी गेल्याचा घुंगुरांचा आवाज. )

: १०९७ :

( कमळा मावशी खिडकींतून एकदां बाहेर पहाते. मागें वळून निश्वास टाकते)

**कमळा०**—( गंभीरपणें ) माझ्या विनूचं लग्न ठरलं !...आज आतां ही दुसऱ्यांदां बातमी ऐकतेयू...त्याबद्दल !

( धर्मा आंतल्या बाजूनें येतो...पडद्यामागें उभा रहातो. )

**कमळा०**—( भांबावून...मोठ्यानें ) पण आतां कोणाला सांगूं मी ही माझ्या मनांतील खळबळ ?...माझं ऐकायला कोणीच नाहीं कां इथें ?...(एकदम मागल्या मामासाहेबांच्या तैलचित्राकडे दृष्टी जाते...क्षणभर तिकडे वेड्यासारखी टक लावून पहाते...व तिकडे लगबगीनें चालत जात मोठ्यानें बोलते–) मामंजी ! मामंजी ! ऐकलंत ?—ऐकलंत का ?—माझ्या विनयचं लग्न ठरलं म्हणे !...(अश्रूंनीं डोळे भरतात) एकदां माझ्याऽ मुलानें माझ्या नकळत ठरवलं !...एकदां तुमच्याऽ मुलानें मला नकळत ठरवलं !!...( एक दीर्घ निश्वास टाकून )...पण मग मी हो कोण या घरांत ?...मी कोण ? कोणीच नाही कां मी, मामंजी ?...( एकदम गप्प होऊन डोळ्यांना पदर लावते...)

( धर्मा डोकावून पहातो–चपापतो, परत घरांत जातो. कमळामावशीं कोचावर कोपरांत मान लपवून बसते...हळूच एक दोन सूक्ष्म हुंदके देते. )

### अंक २ रा
—' काळें जाळें '—
( स्वल्प-विराम )



# घरोघरच्या देवी

## [ अंक ३ रा. ]

## देवीला कौल !

: १०९८ :

[ वासुदेवरावभाऊंची तीच खाजगी खोली; बैठकीजवळच्या कोचीवर वासंती आपल्या बाहुलीला घेऊन बसली आहे ]

**वासंती०**—( बाहुलीला ) कुण्णीऽनाही बाई, मिळत !—काय ग करावं आतां, उषे ?...

[ घरांतल्या दारांतून धर्मा हळूंच प्रवेश करतो; आपल्याच नादांत गुंगलेल्या वासंतीकडे पाहून हसतो. मागें उभा रहातो. ]

**वासंती०**—( निश्वास टाकून, बाहुलीला ) आतां आणायचा कुठला तुला नवरा ?...( क्षणभर सचिंत, मग एकदम सुचून ) खरंच !...आमच्या विनूदादाबरोबर करूं या का ग तुझं लग्न ?...तो बाकी बरा आहे तुला नवरा !...

[ धर्मा हसत हसत पुढे येतो; वासंती चमकते. ]

**धर्मा०**—( वासंतीजवळ जाऊन ) वा वा !...वासंतीबायू, आगदींच येडी हाइस बग, तूं !—आपला विनूदादा नाय करनार लगीन तिच्या संगत, बग !

**वासंती०**—( साश्चर्य ) नाहीं ? कां रे धर्मा ?

**धर्मा०**—( हसत ) अगऽ त्याचं त्‌ लगीन बी जमलंय्‌ आदीच दुसऱ्या एका बायशी...

**वासंती०**—( आश्चर्यानें ) हो ? खरंच ? अय्याऽ...

**धर्मा०**—हां त्‌ ? आतां तुला वैनी येणार हाय्‌ पोरी–आमची वैनीबाय्‌ म्हनत व्हती बा काल माज्याकड्‌...

: १०९९ :

**वासंती०**-(कुतुहलानें) माझी वहिनी ? आणि केवढी रे मोठी आहे ती, धर्मा ?

**धर्मा०**—आतां माला ग काय माइत ?

**वासंती०**-(बालिशपणें) मग आईला असेल कारे माहीत ? (धर्मा हसतो.) ए हें रे काय ? हंसतोस कां ? मी नाहीं कां माझ्या उषेला नवरा ठरवतेय् ?... तशी आईनेंच ना विनूदादाची बायको ठरवली असेल ?...

**धर्मा०**—(तरीहि हंसतच) अग पोरी, उषा एक हाय् आपली तुजी बावली ! तसा विनूदादा काय वैनीबायचा बावला हाय्, होय ?...( मोठ्यानें हसत ) हा हा ग, येडे !...अग, बायको आन् नवरा काय आपल्या आईसाठीं करतात ?

**वासंती०**—( गोंधळून ) नाहीं ?...मग रे कोणासाठीं करतात ?

**धर्मा०**—आग आपल्या सवतासाटीच !—

**वासंती०**—होऽ ? ( घुटमळून ) आपला विनूदादा बायको कशाला करणार आहे ?

**धर्मा०**—( डोळे मोठे करून ) आं ? काय म्हनलीस ? ( हसून मिस्कील-पणें ) त्यालाच इच्यार कीं...

**वासंती०**—( आग्रही स्वरांत ) पण तूंऽसांग ना...

**धर्मा०**—( हसत, मान हलवून ) माला नाय बाय् ठाव तुज्या दादाचं !

: ११०० :

**वासंती०**—( क्षणभर विचार करून मग ) ए, तूंऽबायको केली आहेस कीं नाहीं रे, धर्मा ?

**धर्मा०**—( मोठ्यानें हसतो. ) हो. अग, माजी डोक्री हाय नाय् कां, पोरी ? रोज येते हिते ती दळा-कांडायला !...

**वासंती०**—कोण ? हां,...आपली भागी ? अशी अशी मान हलवते नि बोबडं बोबडं बोलते दांतपडकी ती ?

**धर्मा०**—( हसतो. ) हां तीच ! पन् तरनी व्हती तवां नवती काय हालवत मान, न् ब्यस बरं बोलत बी व्हती.

**वासंती०**—( किंचित् काळ थांबून कुतूहलानें. ) ए पण तूंऽ कशाला रे बायको केलीस, धर्मा ?



**धर्मा०**—( हसतो. आपल्याशींच किंचित् लाजतो. ) चल्. तूं चावट हाइस, पोरी !...

**वासंती०**—(त्याला लाडानें बिलगून) एऽसांग ना रे धर्मा ! एऽअसं काय ?

**धर्मा०**—( प्रेमानें तिच्या पाटीवर थोपटत ) अग पोरी, बायको करतात ती आपल्या घरांत रांदायला......पोरं संबालायला...घरांत कोनाला दुकलं खुपलं त् सेवा करायला !—हां, घरकारबारीन आसते ती आपली.

**वासंती०**—( आश्चर्यानें ) मग त्यासाठीं खूप बोलावं लागतं ? खूप शिकावं लागतं ?—

**धर्मा०**—( हंसून ) तें कशाला ? मी कुटं म्हनलं ?

**वासंती०**—मग विनूदादाला रे कशाला शिकलेली, बोलणारी बायको पायजे ?..:( निष्पापपणें ) माझी उषा कां नाहीं चालणार त्याला ?

**धर्मा०**—(हसून) आग पन् त्याला त् बोलकी बावलीच पायजे. यस्फ्यस् करनारी बाय पायजे. सवता सोधून काडलेली पायजे—

**वासंती०**—( थोडा वेळ विचार करून मग. ) तुझी भागी तूंच शोधलीस कां रे, धर्मा ? हो ??

**धर्मा०**—त्ये कां ? माजा बाप नि आइस होती न्हवं कां माज्या डोईवर ? त्यांनीं पायलं...पोर चांगली धडधाकट हाय्, चांगल्या घरची हाय्,...चांगली रांदते ढिपते, मजुरी करते...

**वासंती०**-(न आवरतां येऊन, पटकन्) मग त्यांनींच ना ठरवलं तुझं लग्न ?

**धर्मा०**—हां. चांगल्या दोन इसा पैस दिलं माज्या बापान् तिच्या बापाला, आन् घरांत आनली.

: ११०१ :

**वासंती०**—( आश्चर्यानें ) अय्या, मग आमच्या विनूदादालाहि पैसे द्यावे लागतील नाहीं रे आपल्या बायकोसाठीं ?—

**धर्मा०**—(मोठमोठ्यानें हसतो.) येडी रे येडी अगदीं. अग पोरी, तुमच्या बामनाचं समदं निरालं, आमचं निरालं (डोळे विस्फारित) पोरी, आपल्या विनू-दादालाच पैसे येतील थैल्या भरून. ( हातवारे करीत ) भाऊशेट म्हनतील तेतक्या थैल्या ! हां !

**वासंती०**—( आनंदून ) हो ? तर मज्जा आहे रे विनूदादाची आपल्या !

**धर्मा०**—हां......पन् बग, भाऊश्येटनी नि वैनीबायनी सोधली त्याची नवरी तरच हो, पोरी—आन् त्यानच बगितली त् ती येनार नार्य् काय् न विनू-दादा घ्येनार बी नाय् काय ! ( हातवारे करीत हसतो. )

**वासंती०**—(आश्चर्यानें) वेडाच आहे तर आपला विनूदादा—(क्षणभर विचार करून) मग तो कां नाहीं रे सांगत आईला नि भाऊंनाच बायको शोधायला ?

**धर्मा०**—( हंसून डोळे मिचकवून ) त्यालाच इच्यार ना तूं, पोरी.

**वासंती०**—( कुरकुरत ) पण आहे कुठें तो ? असतां तर विचारलं असतं.

**धर्मा०**—येनार हाय् म्हनं दोन च्यार दिसांत.

**वासंती०**—( पटकन् उठते ) आधीं आपली मी आईलाच विचारतें कशी जाऊन ( कोचावरच्या बाहुलीला उचलत. ) चल ग उषे !...

**धर्मा०**—( हसत ) आगऽऽ !...थांब, थांब......पोरी, ( वासंती धावत धावत निघून जाते. )

**धर्मा०**—( आपल्याशींच ) सोनं हाय् सोनं. सारीं पोरं......सारीं मानसंच सोन्यासारखी हाइत या घरांतलीं ! पन्......( निःश्वास टाकतो. )

: ११०२ :

( मामासाहेबांचें तैलचित्र पुसूं लागतो. पुसतां पुसतां भांबावल्यासारखें इकडे तिकडे पहात असतो.—इतक्यांत दरारा उत्पन्न करणारा, खणखणीत असा एक अज्ञात आवाज ऐकूं येतो. )

**अज्ञात आवाज०**—काय धर्माऽ ? अरे लेका, विचार कसला करतो आहेस एवढा ? ठीक चाललं आहे ना तुझं सारं ?...

( धर्मा दचकून चौफेर पहातो. मग पुसतां पुसतां चमकतो. तैलचित्रांतील मामांच्या चेहऱ्याकडे पहात थबकून त्याला उद्देशून बोलतो. )

**धर्मा०**—कोन ? मामाश्येट बोलले, जनू ? ( अर्धवट वेड्यासारखें तसेंच तैलचित्राकडे पहातो.) आपल्या कुरपेन् माजं तरी समदं ब्येस् बरं हाय्, मामाश्येट ! पन् ( निश्वास टाकून ) आमचा भाऊश्येट ? तो भाबडा, शिदा, मायाळू मनाचा हाय्—तरी जरा ढिला हाय् तो, मामाश्येट ! त्याच्या कारबारांत मोप गोंदळ माजलाय् ( पुन्हां निःश्वास टाकतो ) आन् मामाश्येट, तुमच्या घरांत ही तुमची



सून...परतक्श् लक्ष्मीच नांदतेय्-फिरतेय् ! पन् बगा ( उसासून ) तिच्या बी काळजांत लय् गोंदळ चाललाय् ? अगदीं आग लागलीय् बगा !...तशी धीराची हाय् ती मावली...पन् तिला धीर द्यायला घरांत त् कोन् बी नाय्...

: ११०३ :

( पडद्यांत फटफटी सायकलचा आवाज...धर्मा दचकून खिडकीतून बाहेर पहातो-फटफटी घराला वळसा घालून एकाबाजूला जाऊन थांबल्याचा आवाज. )

**धर्मा०**—आँ ?-द्येवबाप्पा ? ( गॉगल्स घातलेले देव प्रवेश करतात. )

**देव०**—( चष्मा काढून कोचावर बसत ) वैनी रे कुठं आहेत, धर्मा ?

**धर्मा०**—वैनी ? त्या त् निंगुत जेऊन उटल्यात् ! असतील घरांत काम आवरत ! बोलावतो हं...

**देव०**—बोलावतोस रे कशाला ?-येतील सावकाश ! मला घाई नाहीं कांहीं ! ( धर्माला हळूंच ) कायरे ?—दिल्यास कालच्या मी दिलेल्या वह्या त्यांच्याकडे...

**धर्मा०**—हां ! काल सांजचा आलों आन् तशाच दिल्या त्यांच्याकड्—रातच्या बसल्या होत्या बा वह्या घेऊन—

**देव०**—( समाधानी स्वरांत ) हो कां ?—ठीक झालं तर मग !...

**धर्मा०**—( किंचित् घुटमळून ) पन बाप्पा, ह्ये आतां असं किती दिस या घरांत चालायचं ?-माज्या जिवात त् बगा लय् लय् कालवतंय् !

**देव०**—कायरे झालं, धर्मा ?

**धर्मा०**—( थोड्या रागानें ) आतां तीं ढोंगंऽ पुरे झाली, बाप्पा !-तो बापू त् डावामागून डाव खेळतोय् भाऊशेटला बुडवायला-आन् तुमी समदं म्हाइत असून असं गप्प येड् पांगरून.

**देव०**—मला-तुला काय करता येणार त्यांत, धर्मा ?-त्यांचं त्यांच्याच नको का लक्षांत यायला ?

**धर्मा०**—( कळवळून ) असं नका म्हनूं, द्येवा !—मला व् कळतं ! पन् बगा मी हाय् येक दगड मानूस ! आतां तुमीच येकले काय ते बापूला उलथून पाडाल...आन् आमच्या श्येटला संबाळाल, बाप्पा !—

**देव०**—( गंभीरपणें ) वेडा आहेस झालं, धर्मा !—अरे, हा आपल्या गिरणीतला भाऊ-बापूंचा भागीचा व्यवहार म्हणजे मोठं त्रांगडं आहे त्रांगडं !-

आपण त्यांत एकदम हात घालूं म्हटलं तर आणखी कांहीं होणार नाहीं !–आपलाच हात तेवढा तुटून पडेल !–समजलं तुला ?—

धर्मा०—(दुःखी स्वरांत) त्ये खरं हो, बाप्पा !–पन् मग तुमाला काल सांगलं नाय् का मी, काळेबापू काय काय बोलत व्हता, आन् कशे कशे काळये डाव ख्येळत व्हता नवे नवे, भाऊश्येटकड्, त्ये ?—

देव०—पण त्याला रे कोणाचा इलाज ?

धर्मा०—( कळवळून ) नका बाप्पा ! तुमीच अशे आपल्या कानावर हात ठेवाल त्, आतां धडगतच नाय् या आमच्या मामाश्येटच्या घराची !

देव०—( सहानुभूतीनें ) ऐक ! असं उतावीळपणें उगीच बरळूं नकोस कांहीं तरी !—मला सुचवतां येईल तेवढं मी सुचवतोंच आहे वहिनींना !—पाहूं या आतां त्या काय काय करतात तें !

धर्मा०—ती मावली बिचारी येकली हो काय करनार, बाप्पा ?

: ११०४ :

("धर्माऽए धर्मा !—कोणरे ?–बाप्पा का आले आहेत ?...येतेंच हं बाहेर !" असे आंतून कमळामावशीचे शब्द ).

धर्मा०—हां हां, वैनी ! सांगतों—(क्षणभरानें कमळामावशी प्रवेश करते.)

कमळा०—( प्रवेशून—) हें आमचं अस्सं असतं ! पाहिलंत ना बाप्पा ? चुलीभोंवतींच आम्हा बायकांचा जीव घुटमळत रहायचा सदाचा ! ( देव समजुतदारपणें हसतात. ) आमचा व्यवहार चुलींतच जळायचा !

देव०—( क्षणभरानें सस्मित ) नवी बातमी आहे, वैनी !—

कमळा०—( आश्चर्यानें ) ती आणखी कसली बाई ?...

देव०—तुमचे मोठे चिरंजीव येतील आतां इतक्यांतच घरीं !—

कमळा०—( चमकून, आधीरपणें ) काय ? विनू ? मुंबईहून आलाय् ? केव्हां ? कुठें आहे तो ?

धर्मा०—( आश्चर्यानें ) आँ ? तुमाला कुटं भ्येटला विनूदादा, बाप्पा ?

देव०—तुम्हाला येईन असं म्हणालों होतों !...तेव्हां जेवल्याबरोबर निघालों मी माझ्या सायकलीवरून ! एक टांगा पुढें चालला होता;...तेवढ्यांत तो मामलेदारसाहेबांच्या दाराशीं उभा राहिला ! पहातों तों आंत विनू बसलेला दिसला. नि त्याच्याबरोबर एक तरुण मुलगी होती कोणी !



कमळा०—( आश्चर्य दाखवीत ) म्हणजे ?

देव०—मी सायकल थांबवली, तसा का कोण जाणें, विनू मला पाहून चपापला ! ( किंचित् थांबून ) येणार होता तो आज इथें ?

कमळा०—छे ! नक्की कांहींच नव्हतं ! तुमच्याकडे काय म्हणाला तो ?

देव०—आपणहून कांहींच नाहीं म्हणाला !...आश्चर्य नाही वाटलं मला त्याचं !...पण मग मीच आपले माझ्या परीनें चार दोन प्रश्न विचारले !—तुटक तुटकच दिलीन् उत्तरं !

कमळा०—( कुतूहलानें ) मग आतां आहे कुठे तो ?

देव०—आपल्या मामलेदारसाहेबांची सून आहे ना ?...ती मला वाटतं, विनूबरोबरच्या त्या मुंबईच्या मुलीची शाळसोबतीण !—तिलाच आपण आल्याचं कळवायला येतां येतां ती रस्त्यांत पांच मिनिटं थांबली तिथें !...टांग्यातून घरींच येताहेत वाटतं तीं दोघें इकडे !—

कमळा०—( चेहरा पालटतो ) अस्सं होय ?

देव०—( जरा गोंधळून ) म्हणजे बापू नि भाऊ काल घाईघाईने गेले मुंबईला, तें जमलं वाटतं विनूचं लग्न ?...पण मग भाऊ–बापू मागेंच कसे राहिले ?

कमळा०—नाहीं, बाप्पा ! ते ठरवणार आहेत तें हें लग्न नव्हे !...

देव०—म्हणजे ? तुम्हाला काय ठाऊक हें ?

कमळा०—हें लग्न विनूनें स्वतःच ठरवलंय्...तो तेवढ्यासाठीं घरींही येणार होता केव्हां तरी या चार दोन दिवसांत—

देव०—(जरा गोंधळून) पण म्हणजे भाऊ आतां ठरवून येतील कदाचित् तें ?

कमळा०—( सुस्कारा टाकून ) तेंच ना ! बघायचं आतां काय काय होतंय् तें...( मान खालीं घालते. स्तब्ध रहाते. )

: ११०५ :

देव०—बरं मग वैनी, आतां आज अनायासें घरीं येतोच आहे विनू, तर त्याच्या कानावर मात्र घाला बरं का,...या इथल्या व्यवहाराबद्दल सारं...

कमळा०—पण मी सांगितलं तरी या त्याच्या गडबडींत त्याला व्यवहार कसा सुचणार आहे, बाप्पा ? तुम्हीच करा तेवढं संधि साधून !—मला तर आतां थाक्षणीं अगदीं भांबावल्यासारखंच झालंय्...

**देव०**--बरं, वैनी ! तुम्ही तरी पाहिल्यात कां त्या पाठवलेल्या कच्च्या टिपणांच्या वह्या ?

**कमळा०**—तुमच्या शब्दाला मान दिला नि पाहिल्या खऱ्या ! पण मला काय बाई समजणार त्यांतले सगळे छक्के पंजे ?...

**देव०**--बरं बरं !-तर मग त्या चोपड्या द्या बरं माझ्याकडे आतां ! मी सारं तुम्हाला एका कागदावरच थोडक्यांत उतरवून दाखवतों बघा ! दीडदोन तास मोडतील फार तर !...मला आहे आज तेवढा मोकळा वेळ--

**कमळा०**—( आपल्या पलंगाच्या उशाखालून चोपड्या काढून देत ) घ्या—बसा ना तिथें बैठकीवर.

**देव०**—इथं ? अहंक् !-इथं नको, वैनी ! ती तरणी माणसं आतां मागोमाग येतील ! तेव्हां तिथें ही माझी आणखी उगीच आंकडेमोड कशाला ?—मी आपला बसतो जाऊन माडीवर ! त्यांच्या संकोचाला उगीच कारण नको आमचं !-(कमळामावशी गंभीर स्मित करते. देव आंतल्या दारानें माडीवर निघून जातात.)

: ११०६ :

( धर्मा गपचूप कमळामावशीकडे पहात रहातो...)

**कमळा०**—( क्षणभरानें, विचार करीत ) खरंच धर्मा, मी देखील आतां इथं थोडा वेळ नसलें तरच बरं !

**धर्मा०**—( साश्चर्य ) म्हंजी, वैनी ?

**कमळा०**--अरे विनू असा एकाएकी घरीं येतोय्, आपल्या बायकोला घेऊन ! अगदीं घरीं आल्याबरोबरच त्या दोघांना जुन्या माणसांशीं रुक्ष बोलायची पाळी कशाला आणायची ? त्यांची त्यांना मिळूं द्या जरा मोकळीक !

**धर्मा०**--मग काय करतां, वैनी ?--

**कमळा०**--( हसून ) वासंती बसलीय् खेळत आंत...तिला तशीच घेऊन जातें मी शेजारीं माल्लूच्या आईकडे--

**धर्मा०**--( कुरकुरत ) वा वैनी ! आन् मग मी म्हातारा येकलाच इथं र्‍हाऊं ? ( मानेनें 'हो' म्हणून, कमळामावशी हसत घरांत निघून जाते ).

**धर्मा०**--( आपल्याशींच ) आतां काय करावं बा या बायना ?--वैनी, पण मग --( कमळामावशीमागून धर्मा आंत जातो. )



( क्षणभरानें टांगा वाजतो-धर्मा लगबगीनें आंतून प्रवेश करतो. तैलचित्राजवळच्या खिडकींतून बाहेर पाहतो-'विनूदादा आला'-असें स्वतःशींच म्हणून उजव्या बाजूच्या दारानें बाहेर जातो. )

( पडद्यांत कुजबुज; क्षणभरानें हॉलच्या दारांतून, विनय मागें पहात पहात आंत प्रवेश करतो. )

**विनय०**--( हॉलच्या दाराकडे पहात ) ये ये वनिता, ( वनिता दारांतून प्रवेश करते. ) पहिला गृहप्रवेश तुझा हा, वनूऽ !...मी स्वतःच करतों तुझं स्वागत !--( पुढें होऊन ) यावं बाईसाहेब !--( वनिता पुढें येतांच तिला कोचाकडे हाताला धरून नेत) बसा इथें ! (हसून-) हं,...ही आमच्या भाऊंची खोली बरं कां ?...[ चौफेर पहात-] इथेंच...त्या तिथल्या टेबलाजवळ मी अभ्यासाला बसायचों !-इथल्या शाळेंत होतों ना, तेव्हां...[ मधल्या कापडी पडद्याजवळ जाऊन तो एकदम बाजूला करीत...] आणि लहान असतांना इथें आईच्या कुशींत त्या पलंगावर झोंपायचों !--

**वनिता**--[ कौतुकानें हसते...] अस्संऽ !...

**विनय०**--[ आंतल्या दाराकडे पहात ] खरंच पण...आई असेल आमची आंत चुलीजवळ...नेहमीं कांहीं तरी काम करीत असणार घरांतलं सारखी ती ! आपण आजच येणार याची कल्पना नाहीं तिला ! [ आंत वळत- ] थांब हं-आईला सांगून येतों....अगदीं तुला समक्ष घेऊनच आलोंय् मी, म्हणून--

**वनिता**--[ भांबावल्या स्वरांत, लगबगीनें ] ए, हें रे काय विनय,...मला एकटीलाच इथं टाकून जाणार तूं ?...[ लाडीक आवाजांत ] थांऽब ना रे विनाऽ ! एवढी घाई कशाला ?...

**विनय०**—[ स्मित करून ] वा ग वा, आईलाच तर भेटायला आलोंय् इथं आज आपण !-आणि इथं...म्हणजे कांहीं रानांत तर नाहीं ना पडणार आहेस तूं एकटी ?...आमच्या घरांत [ आवाज बदलून ] अगदीं तुझ्या घरांतच आहेस तूं !...अंऽ ? [ हसून ] थांब...आत्तां येतों बघ आईला घेऊन—

: ११०७ :

**वनिता०**—[ अजीजीनें ] अरे पण थांब रे जरा विनय !...इथें बस माझ्याजवळ !...मला बाई भीती वाटतेय्...

**विनय**०—[ मागें वळत ] कसली ?...माझी तर नाहीं ना भीती वाटत ?

**वनिता**०—[ लाडानें ] इश्शंऽ !—तुझी कशाला भीती वाटणार मला ? तुझ्या हातीं आतां माझं सारं तनमन द्यायचं ठरवलंय् मी, तें तुझी मला भीती वाटते म्हणून कारे ?—

**विनय**०—[ प्रेमानें तिच्या जवळ बसत ] मग कोणाची भीती वाटते तुम्हाला बाईसाहेब ?...स्वतःची ?

**वनिता**०—[ त्याच्या खांद्यावर मारून ] चल रे चावटा !

**विनय**०—[ थोड्या गांभीर्यानें ] हो, आतांच आपला काय तो नीट विचार कर हो, वनिता !

**वनिता**०—कसला करायचा विचार, आणखी ?

**विनय**०--अग तुझ्यासारखी ब्राइट करीअरची मुलगी...चांगली डबल ग्रॅज्युएट !...बघ...अजून विचार कर ! नाहीं तर मग पुढें म्हणशील...उगीच लग्नाची बेडी घालून घेतली मी पायांत ही !--

**वनिता**०--[ लाडीक स्वरांत ] बघ हं अशानें ?--कशाला हिणवतोयस् रे मला तूं ?--[ त्याचा हात लाडानें आपल्या हातांत घेऊन ] तुझी मला खात्री नसती तर मी येथपर्यंत तरी कशाला मजल मारली असती, विना ? [ त्याच्या अंगाकडे कलून-] विनू-विना...मी...मी अगदीं निश्चितपणें तुझ्यावर विसंबून आहे !--[ त्याच्या खांद्यावर शेंपटा टेकून-तक्तपोशीकडे डोळे लावून पहात बसते. ] अगदीं मनापासून वाटतंय बघ त्याक्षणीं मला तसं...मला पुन्हा असले प्रश्न विचारून ओशाळे करूं नकोस नारे !--

**विनय**०—( गांभीर्य न सोडतां...) हा ओशाळे करण्या-होण्याचा प्रश्न नव्हे ग, वनू !...स्त्री म्हणजे कांहीं पुरुषाची गुलाम नाही !-स्वतःला नेहमीं सुख लागेल अशा प्रकारें जगण्याचा हक्कच आहे तिला !--म्हणूनच लग्नापूर्वीच्या अगदीं शेवटच्या घटकेपर्यंत--नि लग्नानंतरही हें मी तुला विचारलं पाहिजे ! तें माझं कर्तव्यच नव्हे का ?--

**वनिता**०--( त्याच्याकडे अभिमानानें लाडानें पहाते ) विनय, विनय,... माझा विनय !--किती गोड बोलतोस रे तूं ?--तुझं हें गोडगोड बोलणं--तुझं असलं नेहमीचं माझ्याबरोबरचं सहानुभूतीचं वागणं...तुझं असलं जिवाचा अगदीं



ठाव घेणारं पहाणं...तुझा हा आतांचा रुबाबदार चेहरा--विनय...विना,...मी याक्षणीं तुझ्या संगतींत अगदीं सुखी आहे...साऱ्यां आयुष्यांतही अगदीं सुखीच होणार, बघ !--

**विनय**०--( तिचा हात प्रेमानें दाबीत ) खरं म्हणतेयस् हें ना ?--

**वनिता**०--( त्याच्याकडे डोळे लावून ) खरंच खरंच !--माझा चेहरा नाही कां सांगत माझ्या मनातलं सारं ?...

( विनय वनितेला किंचित् जवळ ओढून खांद्यावर थोपटतो.)

: ११०८ :

**विनय**०--(क्षणभरानें हळूंच ) वनू, पण तूंच मागें एकदां म्हणाली होतीस !

**वनिता**०--( चमकून ) काय म्हणाले होते रे मी ?--

**विनय**०--नाही ना आठवत ? कीं—'स्त्रिया विवाहबद्ध झाल्या कीं संपलं त्यांचं आयुष्य !--पुरुषांच्या सहवासांत मेलं त्याचं व्यक्तित्व नि भवितव्य'...

**वनिता**०--( लडीक रागांत ) कशाला रे त्याची आठण करून देतोयस् मला पुन्हा ?--

**विनय**०--[ हसून ] म्हणाली नव्हतीस ?

**वनिता**०--[ थोडें ओशाळून ] हो, म्हणालें होते ! पण खरं नाही तें !

**विनय**०--मग का सांगीतलं होतंस मला तसं ?

**वनिता**०--आपल्या परिचयाच्या सुरुवातीला सांगीतलं होतं मी तें, विना ! अनोळखी पुरुषापुढें आम्ही स्त्रिया अशाच वागणार !--तूं भेटण्यापूर्वीचं माझं मत होतं तें !...समजलं ?

**विनय**०--[ सस्मितं ] मग आतां काय वाटतं ?

**वनिता**०--[ हसून ] काय वाटतं तें लग्नापूर्वीच सागूं तुला ?

**विनय**०- हो !-अगदीं आतांच सांग...

**वनिता**०—आतां वाटतं [ हसून ] तो नियम दुसऱ्या स्त्रियांना लागू ! दुसऱ्या पुरुषांच्या सहवासांत दुसऱ्या स्त्रियाचं व्यक्तित्व मरेल !—तुझ्या सहवासांत माझं व्यक्तित्व नाहीं मरणार कधीं !—

**विनय**०—( प्रेमानें तिजकडे पहात ) कशावरून ग इतकी खात्री झाली तुझी ?

**वनिता॰**—( त्याच्याकडे पहात पहात ) फक्त तुझ्या या आतांच्या डोळ्यांवरून—

**विनय॰**—( हंसत ) म्हणजे हल्लीच्या तुम्ही शिकलेल्या बायका काय पुरुषांच्या फक्त डोळ्यांकडेच पहाता वाटतं ?

**वनिता॰**—हो तसंच का म्हणेनास !—

**विनय॰**—( तिच्याकडे पहात चेष्टेनें ) आणि मग आम्ही पुरुष ग ?

**वनिता॰**—मला रे काय माहीत पुरुषांचं ? ( मोठ्यानें हसून ) पहात असाल आमच्या चेहऱ्याकडे पातळाकडे नि पदव्यांकडे...( दोघेही हसतात. )

: ११०९ :

**विनय॰**—( पटकन् भानावर येऊन ) अरे पण खरंच, आई कशी नाहीं आली आमची अजून बाहेर ? ( जाऊं लागतो. )

**वनिता॰**—( दचकून ) ए थांबरे विना, मला जरा केसबीस तरी नीट करूं दे !—प्रवासांत अगदी भूत झालं असेल मेलं माझं !—( भोंवतीं पाहून ) अय्या, पण माझी बॅग कुठं आहे ? ( विनय हसूं लागतो. )

**वनिता॰**—( गोंधळून ) कारे हसतोस ?

**विनय॰**—( हसून ) काय ही तुझी गडबड, वनू ?–अग बायका देखील नाहींत पुरुषांसारख्या बायकांच्या चेहऱ्याकडे पहात ! !—माझी आई तर अगदीं साधीसुधी आहे बिचारी !

**वनिता॰**—( लाजून ) अंसू देत आमचं आपलं...

**विनय॰**—( हसून ) बरं बरं...( एकदम जाणीव होऊन चमकत ) अरे...पण खरंच धर्मानें बॅगा आणल्याच नाहींत वाटतं अजून आंत ?...कुठें गेला तो ?—( बाहेर पहात ) धर्मा–

**धर्मा॰**—(बॅगांसह हॉलच्या दाराशीं प्रवेशून) जी विनूदादा, मी हितचं उभा हाय् भाइर नाय् का कवापासून ?...आतां येऊ का आंत ?—

: १११० :

( धर्मा बॅगा घेऊन पुढें येतो; विनय व वनिता चपापतात. )

**विनय॰**—(चपापून हसत) म्हणजे तूं इथेच उभा होतास इतका वेळ ?–

**वनिता॰**—अय्याऽ !—( वनिता लाजते. )



**धर्मा॰**—(तोंड मधूनच चुकवून; अपराधी मनानें) हां...विनूदादा !—मी कवापासन् घुटमळतोय् ताटकळतोय्–दारांतच !...(स्पष्टीकरणाच्या स्वरांत–) आतां तुमी दोघी तरनी मानसं ! आंत बोलताय् अगदीं आल्यापास्‌न...तवा म्हनलं...आतां आंत जावं का नाय म्हाताऱ्यानं ? आन् दुसऱ्या कामाला निगून जाईन त् म्हनलं बॅग बिग कवा लागल तुमाला कोणास ठाव् ?...( बॅगा पुढें आणतो...वनिता त्याच्याकडे पाहून हसते...नि विनयकडे लाजून पहाते. धर्मा दोघांची दृष्टी चुकवतो–मग हळूंच तोंडांतल्या तोंडात हसतो. )

**विनय॰**—अरे, आई रे कुठे धर्मा ?

**धर्मा॰**—बाय् गेल्यात् दादा, ज्येवल्या तशाच मालूबायच्या आईकडे शेजारी बसायला—

**वनिता॰**—( हायसें वाटून ) घरांत नाहीं आहेत त्या ? हो ना ?

**विनय॰**—अग फार लांब नाहीं ग गेलेली ती...सात आठ घरं टाकून पलीकडे एवढंच...

**धर्मा॰**—( दाराकडे वळत ) आनू का बोलावून, विनूदादा ?

**वनिता॰**—(पटकन्) नको रे ! मुद्दाम कशाला ?–येतील इतक्यांत !...

**धर्मा॰**—वासंती बाय् बी गेलीय् बगा वैनीबायच्या बरोबर—

**विनय॰**—हं हं...तिची आज शनिवारची सकाळची शाळा नाही कां ?–आणि मग कुंदा रे कुठें आहे, धर्मा ?

**धर्मा॰**—त्यांची आज अर्धी शाळा ! त्यांना दुपारून दोनला सुटी व्हनार ! येतील इतक्यांतच अर्ध्या कलाकांत ! गाडी गेलीय् कीं सवारीची... टेशनावर तुमाला दिसली नाय्, दादा ?—

**विनय॰**—( शहाजोगपणें ) नाय् बा !—

**धर्मा॰**—( हसून ) बराबर ! नाइच दिसायची...( विनय चमकतो. )

**विनय॰**—( समर्थनात्मक ) अरे त्याचं असं झालं, धर्मा...आईला मी पाठवलं होतं की पत्र, येणार म्हणून;...पण दिवस नव्हता नक्की, एवढंच !—

**धर्मा॰**—पन् दादा, भाऊशेट कालच गेलेत् मुंबईला आन् तुमी आज इकडे ?

**विनय॰**—( त्याच्याकडे न पहातां ) अंऽ ? असं झालं का ?–मला नाहीं हें माहीत !

**धर्मा**०--(मिस्किलपणें आव आणून) हां ! मग बरोबर-शेट गेले तुमाला बगायला तिकडे-आन् तुमी आला त्यांना भेटायला इकडे.

**विनय**०—( भांबावून ) हो ना !...( धर्माला खूष करण्यासाठीं ) पण धर्मा, तुलाही भेटायला आलोंय् की मी !...

**धर्मा**०—( डोळे मिचकवीत ) अस्सं अस्सं !...गरीब म्हाताऱ्याची आटवन् ठेवलीत् त्, दादा, तुमी !--

: ११११ :

**विनय**०—( वनितेला ) हा आमचा धर्मा बरं का, वनिता ?...अगदीं आमचे भाऊ शाळेंत जात होते ना, तेव्हांपासून आहे हो आमच्याकडे हा !... मी ही खूप नाचलोंय् याच्या खांद्यावर लहानपणीं—नाही रे धर्मा ?

**धर्मा**०--( बॅग कमळावशीच्या पलंगाखालीं ठेवून ) ते का विनूदादा ?-- डोक्यावर नि पोटावर बी लय् नाचलाहांत की माज्या तुमी !-( वनितेला, हातवारे करीत ) बरं का बाय्,...ह्ये इकते लहान व्हते तवा रडाया लागले, कीं, मलाच उचलून घ्यायला सांगायच्या बैनीबाय् —आन् बगा, मी घ्येतले खांद्यावर उचलून नि नाचूं लागलों की ह्ये येकदम गप्प होत ! आन् हसायला लागत— ( विनय, वनिता, धर्मा सर्व एकमेकांकडे पहात हसतात. )

**वनिता**०—(घुटमळत) अरे धर्मा, मला जरा पाणी बिणी पाहिजे होतं रे !

**धर्मा**०—( पटकन् घराकडे वळत ) आनून देऊं घागरभर ?–का हिरीकडेच चलता ?—नळ नाय् आमच्याकडं—

**वनिता**०—( हसून ) ते ठाऊक आहे रे मला–चल तिकडेच—

**विनय**०—( वनितेला ) जा...तंवर मी ही कपडे बदलतो !

**धर्मा**०—चला बाय् ( वनिता धर्मामागून जाते. )

[ ‘तूं माझी अन् तुझा मीच ही खातर ना जोंवरी। प्रीतिची हूल फुकट ना तरी ।’ हे गाणें गुणगुणत विनय पँट वगैरें काढून, धोतर नेसतो;...तेवढ्यांतच धर्मा हसत हसत आंतून प्रवेश करतो. ]

**विनय**०—( सस्मित व साश्चर्य ) कारे हसतो आहेस ?...वेड लागलंय् कीं काय...

**धर्मा**०—(मोठ्यानें हसतो.) मला नाय् बा येड लागलं !—म्हाताऱ्याला



येड नाय लागत, दादा !—तरनीं मानस व्हतात. आपल्याच इचारान् येडी !—

**विनय**०—अरे, पण तूं एकटाच परतलास नि ती कुठे आहे ?

**धर्मा**०—( आश्चर्य दाखवून ) ती ? ती कोन, विनूदादा ?

**विनय**०—( सावरीत ) अरे ती मुंबईची पाहुणी...?

**धर्मा**०—( मिस्कीलपणें मान हलवीत ) पावनी ?...असं व्हय ? पन् दादा, मला नका बनवूं...मी सारं जानलंय ! आज पावनी हाय ती !...पन दादा, पावनीचीच घर मालकीन व्हनार हाय ती उद्यां !—( हसूं लागतो. )

**विनय**०—[ गोंधळून ] लागलास आपला पुन्हा हसायला ! काय रे झालं ?

**धर्मा**०--हसूं नको त् काय करूं ?—पावन्याबाय हिरीवर ग्येल्या, तवा मी म्हनलं, तुमच्या मुंबयच्या नवक्या मानसाना नाय जमायच ! त् मला म्हनल्यात् ‘का म्हनून ?...बग दाकवते घागरभर प़ानी काढून !’ आत ऱ्हाट सोडला, आन् गाड ग्राड गाड ग्येली घागर येकदम खालीं—

**विनय**०—[ चमकून ] अरे मूर्खा, तिला कशाला काढायला दिलंस पाणी ?

**धर्मा**०—( हसून ) हां हां ! असं घाबरूं नका, दादा !...बायची आमाला बी हाय् काळजी ! दिलं ना त्यांना दोन घागऱ्या पाणी काढून, आन् मगच मी इकडे आलों–( हळूच पुटपुटत ) दादा आतां असल्या शहरच्या नव्या मानसांना आपला हा खेडवळ घरचा संसार कसा जमायचा ?–

: ११२ :

**विनय**०—( समर्थनात्मक हसून ) अरे एवढ्यावरच काय संसार असतो अवलंबून, धर्मा ?–खूप ज्ञान मिळवतात या शिकलेल्या बायका...पैसा मिळवतात. एक प्रकारे देशाची सेवा करतात.

**धर्मा**०–(हसून) तुमी म्हना दादा, पन मला शिकलेल्या बायांचं हसूंच येतं !...

**विनय**०--कारे ?–त्यांनी काय केलं तुझं ?--

**धर्मा**०--माजं केलं नाय् काय् !–पन् दादा, असं बगा ! आमच्या बिन–शिकलेल्या बायका पन् मोलमजुरी करतात...पैसा मिळवतात !--पन्...देशाची सेवा नाय् करत बा त्या !—

**विनय**०—( जरा चेष्टा करण्याच्या उद्देशानें ) मग रे काय करतात त्या, म्हाताऱ्या ?--

**धर्मा**०—त्या आपला संसार करातात निसता !...(वनिता हळूच पुढे येते.)

**वनिता**०—अस्सं ?–मग आम्ही शिकलेल्या बायका नाहीं का रे संसार करणार आमचा ?–

**धर्मा**०—अवो...मी कुट म्हनतुय नाय म्हनून् ?...पन...( जरा वेळ घुटमळून–) रागावूं नका बाय्...तुमी माज्या नातीसारक्या...पन...तुमाला सैपाक करता येतो ?...

**वनिता**०—(जरा हसते; न रागावतां–) हो ! कां नाही येणार सैपाक ?

**धर्मा**०—बरं पन बाय, सैपाक येतो तो चांगला करता येतो ?...येकदम पंधरा मानसांचा येईल करतां ?—

**वनिता**०—( हसून ) अरे सैपाक चांगला का वाईट तें वेड्या खाणाऱ्यानें ठरवायचं !—

**धर्मा**०—( हसून ) हां...हां !...म्हंजी बायच्या घरधन्यान् ठरवायचं ( विनयकडे पाहून डोळे मिचकावते...)

**विनय**०—( हसत ) आणि पंधरा माणसांच्या सैपाकांची कशाला रे नेहमी जरुरी पडणार ?

**वनिता**०—कधीं काळी पडलं कारण तर आचारी बोलवायचा...आपल्या दोघांचा सैपाक मात्र करतां आला पाहिजे नेहमी, एवढंच !—

**धर्मा**०—( नाराज होऊन मान हलवीत ) च्च्...असं का म्हनताय् बाय् ?...घरधन्याच आईबाप असनार...घरांत नंदाभावोजी बी असनार...आन् तुम्ही बी काय सदाची दोगचं ऱ्हानार ?...( हसतो ) तुमचा संसार नाय् वाडणार ?...अवो बाय्, बाग म्हनला की फुलाचा भार हा यायचाच !...येवाचं गोड येन त्यें ! त्ये का आपल्या हातचं असतं ?...

**वनिता**०—( हसून–चेष्टेखोरपणें ) हं...हाच तर तुमच्या आमच्यातला फरक, धर्मा !...

**विनय**०—अरे, माणसाला आपलं अंथरूण पाहून पाय पसरता येतात हल्लीच्या काळांत,–समजलं ?...देवाचं देणं नि बिणं असं दुबळ्या माणसांनी म्हणावं !...( टॉवेल घेऊन आंत वळत )...चल्...कोण बडबडत बसेल तुझ्या-बरोबर ?...( वनितेला ) आलोंच हं इतक्यांत मी !...( विनय घरांत जातो. )



:१११३:

**धर्मा**०—( जरा चुकल्यासारखं वाटून– ) मला गावढळ म्हाताऱ्याला व् काय कळतंय् तुमचं लिवाय्–वाचायला शिकलेल्या लोकाचं ? रागावूं नका हं, बाय्, काय येड्यावानी चुकून बोललों असन मी जास्त कमी त्...

**वनिता**०—( पुन्हा मिळतं घेऊन, शिकवल्यासारखं ) तसं नाही रे, धर्मा !...पण हल्लीच्या बायका शिकतात, नोकऱ्या करतात...पैसे मिळवतात... आतां काळ बदलला...तेव्हां संसाराची पद्धत बदलली !

**धर्मा**०—( हसून ) अवो त्ये मात्र सांगुं नका बाय् तुमी !...मला त् बा काळ काय् बदललेलासा नाय् दिसत !...

**वनिता**०—म्हणजे रे कसं ?...

**धर्मा**०—अवो, परतकश् माजीच गोष्ट बगा, बाय् !...माज्या डोकीन्... माज तिचं लगीन झालं तवापासन् हाडाची काडं करून मोप मजुरी केलीन् !... पन् तिनं माजा घरसंसार काय दुसऱ्या कोनाच्या डोईवर नाय् ना टाकलात् ?...

**वनिता**०—असेल बाबा !...

**धर्मा**०—( आठवत ) आन् आमाला त्...बाय् येवान् चांगली धा मुलं दिली...ती तिनंच वाडवली !...आतांबी धडधाकट हाइत ती ! आन् संसार बी करत्यात आपला ! पन तरी पुना आमी दोगं डोबी झालों,...आन् अजून बी नोकरी करतुच हाइ !...

**वनिता**०—( अगतिक होऊन ) अरे पण तुमच्या आमच्या परिस्थितींत फार फरक आहे, धर्मा...

**धर्मा**०—( हसून ) हांऽ !–त्ये बरीक खरं !–आमी आपली बिनशिक-लेली उनातानांत खपून काळीं पडलेलीं गडी मानसं ! तुमाला नाय् बाय् आमची कामं झेपायची !...

**वनिता**०—( चुळबुळ करीत इकडे तिकडे पहात ) हं...

**धर्मा**०—( जरा नम्रपणें ) राग मानू नका हां बाय्, म्हाताऱ्याच्या बोलन्याचा !...विनूदादा बोलतो माज्याकड म्हनून बोललों मी !—

**वनिता**०—छे छे ! राग कसला त्यांत ?

( टॉवेलनें तोंड पुसत विनय प्रवेश करतो ).

**विनय**०--अरे तूं अजून इथंच ? जा पळ !—आईला आण जा आधीं बोलावून—

**धर्मा**०—व्हय्...जातो ना...( धर्मा जातो—)

**: १११४ :**

( कमळामावशीच्या पलंगाजवळच्या आरशासमोर उभा राहून विनय केस विंचरतो; हळूंच वनितेकडे पाहतो. )

**विनय**०—काय वनू...पात्र आहे कीं नाहीं आमचा धर्मा म्हणजे ?

**वनिता**०—( त्याच्या जवळ जात ) हं...पक्का बेरका नि बडबड्या आहे म्हातारा—

**विनय**०—आणि आमचं घर ?—

**वनिता**०—केवढं मोठं लांबलचक आहे रे पसरलेलं...

**विनय**०—( सहास्य ) मग काय मुंबईचे काड्याच्या पेटीसारखे ब्लॉकस् सांपडणार वाटतं तुला इथं खेड्यांत ?—कां ?–आवडलं नाहीं ?—

**वनिता**०—वा वा ? आवडलं का नाहीं ?...छान आहे कीं !...इथं मुंबईसारखी गडबड सडबड नाहीं !—सगळं अगदीं शांत शांत ! पण खेड्यांतलं घर असलं तरी तुमची इथली टापटीप व्यवस्था छान आहे अगदीं !...नेहमी नसलं तरी पण मधून मधून चारआठ दिवस तुझ्याबरोबर औटिंगला यायला किती मैजा वाटेल इथं ? नाहीं ?

**: १११५ :**

**विनय**०--( वनितेसह कोचावर बसत ) हो ना ?–मग वनू, आतां भीती कसली वाटते तुला ?—

**वनिता**०--( जरा भांबावल्या स्वरांत ) तसं नाहीं रे, विना ! पण... ( किंचित् थांबून )...पण बघ, इथे आल्यापासून्...तरीही थोडी भीतीच वाटतेय माझ्या मनाला...

**विनय**०--म्हणजे ?–ती आणखी कोणाची ?—

**वनिता**०--तुझ्या आई वडिलांची...

**विनय**०—( हसून ) ती कां ?—तींही माणसंच आहेत ना माझ्या-तुझ्यासारखीं...



**वनिता**०—खरं रे, विना ! आणि तसं म्हटलं तर मला तरी...लग्न ही बाब अगदीं व्यक्तिगत वाटते !–वडिलधाऱ्या माणसांनीं त्यांत ढवळाढवळ करायाची नि तरुणांच्या सुखांत व्यत्यय आणायचा हा शुद्ध रानटीपणाच होईल त्यांचा !–तरी पण—

**विनय**०--तरी पण काय ?—

**वनिता**०--वाटतं ती दोघं काय म्हणतील ?–काय विचारतील तुला-मला ?...आपल्याला शेवटीं काय उत्तर देतील ?–( क्षणभर थाबून ) त्यांना दुखवायचीच तर शेवटीं पाळी नाहीं ना येणार आपल्या दोघांवर, विना ?...

**: १११६ :**

**विनय**०—( तिला धीर देत–) वेडी रे वेडी...आमचे भाऊ तर इथं आज नाहींच आहेत मुळीं !—ते गेले आहेत मुंबईला काल...

**वनिता**०—( अस्वस्थपणें ) पण आई येतील ना आतां तुझ्या !—

**विनय**०—हो, पण ती तुझ्या विनयचीच आई ना ?

**वनिता**—पण कशी झालें तरी मी आज तरी परकीच !

**विनय**०--( तिला उत्तेजित करण्यासाठीं ) वनू, काळजी नको तुला अगदी त्यांची !—माझी आई खेड्यांतली असली नि फार शिकलेली नसली तरी फार समंजस नि विचारी आहे !

**वनिता**०--( उत्तेजित स्वरांत ) हो ? खरंच ?—

**विनय**०—हो ना ! भाऊंना नाहीं मोठीशी आवड...पण आमची आई बसल्या बसल्या वाचते किती पुस्तकं ?—मराठीच हं,...पण सगळ्या प्रकारचीं ! लहानपणीं तर तिनेंच मला पुष्कळ गोष्टी सांगितल्या आहेत !

**वनिता**०—( आनंदून–) खरंच का रे ? माझ्याशी आज देखील प्रेमानें बोलतील त्या ?...

**विनय**०—( सहास्य ) नक्की !—त्याबद्दल मला पुरी खात्री होती म्हणूनच तर मी तुला त्या दिवशीं तिला पत्र पाठवायला सांगितलं !...

**वनिता**०—(कुरकुरत) होरे ! पण पत्र लिहिणं सोपं असतं...नि असं प्रथमच त्यांना आतां समक्ष भेटायचं...त्यांना आवडेल असं वागायचं म्हणजे...

**विनय**-(चेष्टा करीत) अहाहा हो विदूषी ! नेहमीं बंधनें झुगारून देणारी...

**वनिता॰**—( जरा रागानें ) तुला काय चेष्टा करायला ?—

**विनय॰**—पण घाबरूं नकोस, वनू !—आमची आई फार गोड स्वभावाची आहे—

**वनिता॰**—त्यांनीं माझं सारं म्हणणं ऐकून घेतलं म्हणजे झालं...

**विनय॰**—अगदीं सगळं सगळं ऐकून घेईल तुझं ! हं ! एकदां आमच्या आईला तूं प्रेमानें जिंकलंस कीं आपण भाऊंनाहि जिकलंच म्हणून समज !

: १११७ :

( धर्मा प्रवेश करतो;...विनय उठून आंतल्या दाराकडे जातो. )

**विनय॰**—( उत्सुकतेनें ) आली आई ?...नि वासंती कुठं आहे ?-.-

**धर्मा॰**—येतायेत् ना दोगी-( वासंती धांवत धांवत प्रवेश करते. )

**वासंती॰**—( आंतल्या दाराजवळच असलेल्या विनयला पहात नाचते; त्याला बिलगून...) अय्या, विनूदादा आला...विनूदादा आला !-[ तेवढ्यांत वनितेकडे पाहून लाजते; सगळे हसतात. ]

**विनय॰**---( हसत- ) का ग लाजलीस कां ?—

**वासंती॰**—( हळूच वनितेकडे पाहून एकदां स्मित करीत-) कोण रे या, दादा ?

**विनय॰**—( हसतो; वासंतीला हाताला धरून वनिकडे नेत ) या ?... चल, ओळख करून देतों हं तुझी त्यांच्याशीं !...( वासंतीला ) या मुंबईच्या वनितातांई !-खूप खूप शिकल्या आहेत हो या !-

**वासंती॰**—(विनयकडे पहात बेडरपणें) हो ?...अगदीं आपल्या गंधा-ताई-कुंदाताईसारख्या ? ( वनिता विनय हसतात. )

**विनय॰**—(हसून) अग नाहीं !...खूप खूप...अगदीं माझ्या इतक्या ! आपल्याकडे त्या दोन दिवस पाहुण्या आल्या आहेत हो ! (धर्मा हसतो) त्यांच्या-बरोबर खेळशील...गप्पा मारशील ना ?...कां लाजशील ?-

**वासंती॰**--( वनितेकडे वळत ) हो !...अगदीं नाहीं लाजणार मी !-

: १११८ :

( वनितेजवळ जाऊन वासंती घुटमळते...हसते... )

**वनिता॰**—ये ना ग वासंती !...बस माझ्याजवळ !...घाबरतेस मला ?



**वासंती॰**—( तिच्या जवळ हसत बसून ) नाहीं बा !—तुम्हाला कशाला घाबरेंन मी, ताई ?

**धर्मा॰**—( हसून मध्येंच ) अवो बाय्...आमी खेड्यांतलीं मानसं मुंबयच्या मानसांना तशीं नाय् घाबरत ! ( मिस्कीलपणें डोळे मिचकवीत ) मुंबईच्या मानसांना बरीक खेडवळ मानसांची लय् भीती वाटते...( वनिता जरा चमकते. धर्माकडे रागानें पहाते. )

**वासंती॰**—( कुतूहलानें ) तुमचं लग्न झालंय् कां हो, वनिताताई ?

**वनिता॰**—( पुन्हा चमकून ) नाही !...का ग ?

**वासंती॰**—तसं नाहीं ! दादा म्हणाला ना आतां,...तुमी खूपखूप शिकल्याहांत ?...म्हणून विचारलं आपलं !—

**विनय॰**—( हसून ) म्हणजे ?...शिकलं म्हणून कांय झालं ?...

**वासंती॰**--वा: ! पण आपली कुंदाताई म्हणते;...दादा, शिकलेल्या बायका शहाण्या असतात !

**वनिता॰**—( साश्चर्य ) म्हणजे काय ग-करतात, त्या ?

**वासंती॰**—अहो त्या किनई लग्न नाहीं करत !...

( वनिता विनयकडे पाहून हसते; विनयही हसतो. )

**विनय॰**—( वासंतीला ) खरंच की काय ?-का ग ?

**वासंती॰**—अरे...त्याऽ नाऽ, मास्तरणी होतात, पैसे मिळवतात, नि देशाची सेवा करतात हो !...( सगळे हसतात; वासंती किंचित् गोंधळते;... वासंती पुढें आधारासाठीं ) कुंदा सांगत होती बा असं त्या दिवशीं आईला ?—

**विनय॰**—बरीच शहाणी झालीय् म्हणायची कुंदा !

**वासंती॰**—पण दादा, आई पण म्हणते की रे तसं...(धर्मा हसतो.)

**वनिता॰**—( साश्चर्य ) तुझ्या आई ? काय म्हणतात त्या ?...

**वासंती॰**—मी विचारलं तर आई म्हणाली-त्यांना आमच्यासारखं चुली-जवळ बसायला आवडत नाहीं...मुलांची शी धुवायला नको असते...म्हणून लग्न करत नाहींत हो शिकलेल्या बायका...( पुन्हा सगळे हसतात. )

: १११९ :

( कमळामावशी प्रवेश करते. )

**कमळा०**—आल्याबरोबर लागली का बडबडायला ही चिरमुडी ?

( सगळे हसतात. वासंती ओशाळते. )

**विनय०**—तुला वेळ झाला आई यायला...

( कमळामावशी कोचावर जाऊन बसते. विनय खुर्चीवर बसतो. )

**कमळा०**—( सहास्य ) अरे, मालूच्या आई पापड घालताहेत ना !—जरा मदत करायला गेलें होतें त्यांना !...तेवढ्यांत धर्मा आला !...( क्षणभरानें, वनितेला उद्देशून) आमचा हा खेडवळी बोवाळ !...हा असाच सकाळ-संध्याकाळ चालू असायचा...( वनिता अजून उभी असलेली पाहून ) हें काय ? तुम्ही उभ्या का अशा ? बसा ना इथं, खुर्चीवर !—

**वनिता०**—( जरा चुकल्यासारखं वाटून ) बसतें कीं !—पण असं काय तें, आई ?—मला तुम्ही ' अहो जाहो ' कां म्हणतां ?—( वनिता बसते. )

**कमळा०**—तें खरं तुमचं ! पण ओळखीच्या पहिल्याच भेटींत 'अगजाग' ' अरे जारे ' नाहीं करतां येत, आम्हाला !—परिचय वाढला कीं आपोआप माणसाच्या हांका जिव्हाळ्याप्रमाणें बदलतात.

**वनिता०**—तरी पण तुम्ही मला अगच म्हणा आपलं—

**कमळा०**—( हसून )—पण असं पहा ! समारभांतल्या उखाण्यां-शिवाय पतींच नांवही तोंडानें न काढणाऱ्या पिढीतली माणसं आम्ही ! आमच्या या जित्याच्या खोडीच नाहींत का ? त्या सुधारणार कशा एकदम—( विनय-वनिता चपापतात. )

**विनय०**—(विषय बदलण्यासाठीं, जवळच लडबुडत असलेल्या वासंतीला) काय हो बाई ? आपला कसला विचार चाललाय्—

**वासंती०**—( गंभीरपणें ) आई, आपल्या दादाला नि या मुंबईच्या पाहुण्याताईनां चहा बी कांहीं नको का ग द्यायला ?

**कमळा०**—( हसत पटकन् उठून ) खरंच की हो आजीबाई ! खरंच ! विसरलेंच मी सारं ! ( वासंतीचा लाडानें गालगुचा घेते. )

**: ११२० :**

**वनिता०**—( हसून ) बराच पाहुणचार करणारी दिसतेय्...

**धर्मा०**—आनं बायना सांगतीय्स ती तूंच कर जा ना, च्या, वासंतीबाय्



**कमळा०**—( वात्सल्यानें तिला जवळ ओढत घराकडे वळून- ) मी लहान आहे म्हणावं अजून...मोठी झाल्यावर करीन !...नाहीं ग ?...(वनितेकडे) आलं हं, मी ! आतां...चहा...फराळाचं करून येतें पटकन्...

**विनय०**—( उठून ) चल् आई ! मी करतों तुला मदत !

**कमळा०**—पुरे रे नाटक्या...तूं नकोस मला मदत करायला ! नुसता हुकूम तर ये आपला बोलायला—( कमळा आंत जाते. )

**धर्मा०**—( आश्चर्यानें डोळे मिचकवीत ) आन् दादा, आजच काय हो झालंय् असं ?—सूर्य जनू पश्चिमेला उगवला—

**विनय०**—( हसतो ) वासंती, तूं बस हं, या ताईबरोबर गप्पा मारत, इथं !—( विनय आंत जातो. )

**वनिता०**—आपणही जाऊं या का ग वासंती, घरांत ?—

**धर्मा०**—नको बाय्...समदा पसारा दिसल घरामंदी चुलीजवळ...मुंबयच्या मानसांना नाय् बरं वाटायचं !—

**वनिता०**—( खोंचून किंचित् रागानें ) अस्सं ?...मग तूं जा ना जरा आवरायला तो पसारा !—

**धर्मा०**—( हसत ) अरे ! खरंच की बाय्...मला अजून ढोरापुढं गवत सोडायचंय ! ( धर्मा घरांत जातो. )

**: ११२१ :**

[ आपल्या बाहुलीचे लाड करीत वासंती वनितेजवळ बसते. ]

**वनिता०**—( तिची बाहुली हातांत घेऊन, क्षणभरानें ) हं...ही काय तुझी बेबी वाटतं ?—वा, सुंदर आहे हं...छान पातळ नेसलीय् कीं पोरगी...

**वासंती०**—( चूक सुधारून ) अहो, बेबी नाहीं तीऽ, ताई !...तिचं नांव आहे उषा...

**वनिता०**—वाः !—नांव पण छान आहे कीं;...तूंच ठेवलंस वाटतं ?...

**वासंती०**—हं !...आहेच तशी माझी उषा गोड...( बाहुलीचा पापा घेते; नवी बातमी सांगण्याच्या स्वरांत... ) अहो ताई, उषा आतां साडी नेसू लागलीऽ—मोठी झाली ना ती ?...म्हणून मी किनई तिचं लग्न करून टाकणार होतें !

**वनिता०**—( हसून ) होतीस ?...मग ग माझी कुठं शिंकली ?

**वासंती**०—( जरा तक्रारी स्वरांत–गाल फुगवून ) अहो, चांगला नवरा मिळायला पाहिजे ना तिला ?...अजून कोऽण्णी तिच्या नि माझ्या पसंतीलाच येत नाहीं, बघा...

**वनिता**०—( तिच्याशी मिस्कीलपणें समरस होऊन ) बऱ्याच चोखंदळ आहांत ग दोघी...तूं नि तुझी उषा ?...

**वासंती**०—अहो, आईला काल सांगितलं तर ती हसली नि म्हणाली:.. 'विनूदादाचंच आधीं होऊं द्या लग्न, होत असेल तर'...

**वनिता**०—( चमकते; कुतूहल उत्पन्न होऊन घाईघाईनें पटकन् ) खरंच? असं म्हणाली तुझी आई ?...नि हसली सुद्धां ?

**वासंती**०—( वनितेची घाई नि कुतूहल न समजून–निष्पापपणें ) हो ? का हो ताई ?...असं का विचारतां ?

**वनिता**०—( आपली चूक लक्षांत येऊन किंचित् लाजत ) तसं कांहीं नाहीं !...आपलं उगीच !...

: ११२२ :

**वासंती**०–(पुन्हा मूळपदावर येत, भाबडेपणें) आणि नाऽ, आमच्या कुंदाला विचारलं मी तर ती म्हणते कशीऽ–तिला खूपखूप शिकव...तिचं लग्नच नको करूं.

**वनिता**०—तें ग कशाला, वासंती ?

**वासंती**०—तिच्या कोणी मंदोदरी गिरीबाई आहेत ना ताई, त्या पण म्हणें खूप शिकल्यात...त्यांनी लग्नच नाही केलं...

**वनिता**०—( सहास्य ) अस्सं अस्सं होय ?—

**वासंती**०—( नव्या मुद्यावर झडप घालीत–) तुम्ही करणार आहांत काहो लग्न,...ताई ?

**वनिता**०—( दचकून ) होऽ ! कां ग ?...

**वासंती**०—( जणूं कींव येऊन सल्ला देण्याच्या स्वरांत, तोंड वेडवांकडें करून ) नका करूं बाई तुम्ही लग्न, ताई !

**वनिता**०—( पुन्हा दचकून–) काय ? कां ग वासंती ?...

**वासंती**०—( निष्पापपणें–) अहो, ती आमची कुंदटलीं आहे ना ?...ती खूप हसेल होऽतुम्हाला–तुम्ही लग्न केलंत तर !



**वनिता**०—( हायसं वाटून ) एवढंऽच !...

**वासंती**०—खरंच पण, नका करूं लग्न तुम्ही, ताई–

**वनिता**०—बरं बरं ! तें माझ्या लग्नाचं राहूं दे...तुझ्या उषेच्या लग्नाचं ग पुढें काय झालं ?...तें नाहीं सांगितलंस तूं मला !—

**वासंती**०—( निश्वास टाकून...कुरकुरत, ओठ दुमडून– ) अहो ताई, उषेची कोण्णीऽच काळजी घेत नाहीं हो !–मग कसं होणार ?...मी आपली एकटी काय काय म्हणून करणार ?...

**वनिता**०–( जरा गंमत वाटून मुद्दाम सहानुभूतीचें नाटक करीत) अरेरेऽ...

**वासंती**०––( आठवल्यासारखें करीत ) मी मला आवडेल असा उषेसाठीं शोधून काढला होता एक नवरा मुलगा !...

**वनिता**०––(नव्या कुतूहलानें) अग्गाऽ...खरंच ?...कोणं ग बाई तो ?

**वासंती**०—( सहजतेनें ) अहो आमचा विनूदादा...

: ११२३ :

**वनिता**०—( एकदम दचकून ) कोण म्हणालीस ?—

**वासंती**०—( निष्पापपणें ) आमचा दादाऽ !...छान आहे कीं नाहीं हो,...आमचा दादा ?

**वनिता**०—( राग,...पुन्हा हास्य...यांचें मिश्रण;–शेवटीं प्रयासानें हसूं दाबीत जरा गंभीर स्वरांत...) हो खरंच !...पण मग काय झालं ग ? तुझा विनूदादा तिच्याशीं लग्न करणार नाही, म्हणतो ?

**वासंती**०––( किंचित घुटमळून ) तसं नाही ! ( क्षणभर थांबून, निर्णयात्मक )...पण नाहीच तें जमायचं !––

**वनिता**०—[ न समजून कुतूहलानें ] असं ग कां ?

**वासंती**०—अहो माझी उषा बावली आहे !—पण ती बोलते कुठे, ताई ?

**वनिता**०—म्हणजे ? म्हणून काय झालं ?

**वासंती**०—( समर्थनात्मक )...पण मग ताई, आमचा धर्मा तर म्हणतो कीं, विनूदादाला बोलकी बाहुलीच पाहिजे बायको !—

**वनिता**०––( दचकून ) काय ?...असं म्हणतो ? बावटच अहे कीं ग तुझा धर्मा !...

**वासंती०**—( आपल्याच तंद्रीत ) खरंच, कुठें हो ताई असतात त्या बोलक्या बावल्या ?

**वनिता०**—(राग दडपण्याचा प्रयासानें प्रयत्न करून) बाजारांत मिळतात कीं !—नाहींतर त्या तुझ्या म्हाताऱ्या धर्मालाच विचार ना कुठें मिळतात तें !

**वासंती०**—( जरा बेफिकीरीनें मान हलवून ) जाऊं दे. मला काय करायचंय ? विनूदादालाच पाहिजे आहे ती !...तोच काढील शोधून पाहिजे तर बोलकी बावली !

**वनिता०**—( लटक्या गांभीर्यानें ) हो ! तेंही खरंच कीं बाकी !

**वासंती०**—( नवी माहिती सुचल्याच्या स्वरांत, अधीरपणें ) आणि हें बघा ताई, आमच्या आईनें नि भाऊंनींच दादाची बायको शोधली ना, तर म्हणे, त्याला थैल्या मिळतील पैशाच्या !...नि त्यानें स्वतःच शोधून काढली ना...कोणती बोलकी बाहुली ( हात हलवीत ) की म्हणे...ती त्याला कांहीं देणार नाहीं नि तो घेणारहि नाहीं !

**वनिता०**—( पुन्हां थोडें रागावून ) हें आणखी कोणी धर्मानेंच सांगितलं कां ग, तुला, वासंती ?

**वासंती०**—हो !...( आपल्याच ओघांत ) पण असं काय हो वेड्यासारखं करतो आमचा विनूदादा ? चांलगी बरी खूप पैसे देणारी बायकोच बरी कीं नाही हो, ताई ?

**वनिता०**—(थोड्या घुश्यांतच) मला ग काय माहीत तुझ्या विनू दादाचं ? (पुन्हां स्वतःला सांवरत) तूंच विचार ना त्याला—कीं, 'तूं असा वेडा रे कसा ?'

: ११२४ :

**वासंती०**—( नव्या तोऱ्यांत ) पण मला आहे ठाऊक कां तें !

**वनिता०**—( साश्चर्य, उत्सुकतेनें ) म्हणजे ? तेंहि तुला ठाऊक आहे ? तें ग कां ?...

**वासंती०**—( समजावीत ) अहो, त्याला खेडवळ बायको कशी चालेल ? त्याला पाहिजे फाडफाड बोलणारी !...शिकलेली,...शहरांतील बायको !

**वनिता०**—हें ग आणखी कसं कळलं तुला ?...

**वासंती०**—( सरळपणें ) धर्मानेंच सांगितलंन् बा मला !



**वनिता०**—( चरफडत ) म्हातारा फारच हिरवट, चावट आहे हो !

**वासंती०**—( आश्चर्यानें ) कोण ? धर्मा ?...काय हो केलंन् त्यानें तुमचं, ताई ?...धर्मा आमचा फार चांगला आहे !...

**वनिता०**—( भानावर येऊन, वरमत ) अं ?—कांहीं नाही ? (विषय पुन्हां वळवीत ) तेव्हां असं आहे म्हणतेस होय ?...शेवटीं तुझ्या उषेचं लग्न नाहींच जमत तर !...तरी बरी आहे कीं दिसायला तुझी उषा !

**वासंती०**—( उसासा टाकून ) जाऊं द्या ! मी आपली आतां गंमतच करणार आहे एक !...आजच ठरवून टाकलंय् !...

**वनिता०**—( पुन्हां कुतूहल ) ती आणखी कसली बुवा ?

**वासंती०**—(विचारांत गढून ) मी किनई, ताई, तिला खूप खूप शिकवणार आहे आतां ! खूप—अगदी तुमच्या इतकं !—

**वनिता०**—( गोंधळून ) म्हणजे काय होईल, वासंती ?

**वासंती०**—( उत्तेजित चेहऱ्यानें ) मग नाऽ, फक्कडसा नवरा मिळेल तिला !...नाहीं ?

**वनिता०**—हें कशावरून ठरवलंस ?

**वासंती०**—अहो, माझी उषा मग शिकलेली बावली होईल !--नाही का ? दादा नाही का आमचा लग्न करणार आहे शिकलेल्या बावलीशीं !--तसंच माझ्या उषेचं होईल लग्न !--

**वनिता०**—(चपापते; पण हसण्याचा आव आणून) वेडे पोरी, तूं उषेला शिकवलंस, तरी तिला बोलतां कुठं येणार आहे ?

**वासंती०**—( गोंधळून ) खरंच बाई ! मग हो काय करायचं ?—

**वनिता०**—( लटका निश्वास टाकून ) खरंच मोठा प्रश्नच आहे ! नाहीं ?

: ११२५ :

**वासंती०**—( क्षणभर घुटमळून ) एक गंमत सांगूं का तुम्हाला, ताई ?

**वनिता०**—हो ! सांग कीं !...कसली ?—

**वासंती०**—तुम्ही लग्न करणार असला तर विचारतें—

**वनिता०**—( जरा लाजून ) फार चांभारचौकशा बाई तुला माझ्या लग्नाच्या !—चाबट कुठली !—

**वासंती०**--( अजीजीनें ) पण सांगा ना--

**वनिता०**—हो करणार आहे मी लग्न !—

**वासंती०**—( क्षणभर विचार करून, घुटमळत ) मग ताई, तुम्ही आमच्या दादाशींच करा ना लग्न !...तो छान आहे तुम्हाला नवरा ! तुमचं जमेल लग्न आमच्या दादाशीं !—

: ११२६ :

**वनिता०**—( आश्चर्यानें, हसत हसत ) कशावरून ग ठरवलंस तूं हें ?

**वासंती०**—( पटकन् ) उषेइतक्या सुंदर नाहींत तुम्ही; तरी तुम्ही शिकलाहांत ना पुष्कळ ! तुम्हाला खूपखूप बोलता पण येतं !...आमच्या दादाला फार आवडाल तुम्ही !

**वनिता०**—चावट पोरीऽ !...मी इतकी का ग वाईट आहे दिसायला ?... नि मी काय बोलकी बावली आहे वाटतं ?–( वासंतीचा गालगुच्चा घेते )

**वासंती०**—( अधिकच गोंधळून ) असं कुठें म्हणालें मी ?—

**वनिता०**—हद्द झाली हं आतां ! कमाल बाई तुझ्या बडबडीची !... आपल्या उषेचं लग्न जमवतां जमवतां तूं शेवटीं माझंच लग्न जमवूं लागलीस ?—

**वासंती०**—मग आमचा दादा काय वाईट आहे कां हो, ताई ?—

**वनिता०**--आजीबाई, तुम्हाला नको बरं माझ्या लग्नाची काळजी !— माझं मी ठरवलंय् लग्न ! —

**वासंती०**--( उत्सुकतेनें ) अग्या ! खरंऽच ? कसा आहे हो तुमचा नवरा, ताई ?

**वनिता०**—(जेरीला येऊन) माझे आई, आतां जा घरांत !–शहाणी बाय ती—आधीं तुझ्या विनूदादाला बोलावून आण जा बाहेर ! म्हणावं...मुंबईच्या पाहुण्याताई बोलावताहेत् तुला लौकर !–जा—

: ११२७ :

**वासंती०**--( उठते ) हो...जाते हं !–(जातां जातां मध्येंच घुटमळते.)

**वनिता०**—आतां आणखी काय राहिलं तुझ्या उषेच्या लग्नाचं ?--

**वसंती०**—( थबकून मागें वळून ) माझ्या उषेचं नाही; ताई–तुमचं !– ( घुटमळत ) ताई, तुमचा नवरा कसा दिसतो हो ? सांगा ना !—



**वनिता०**--( जरा दटावत ) वासंती, आतां जातेस कीं नाही घरांत तूं ?

**वासंती०**—( लाडीक लोंचटपणें ) हो !–पण सांगा ना ? छान आहे ?--

**वनिता०**—हो ! छान छान आहे हो–आतां जा पाहूं—

**वासंती०**—अगदीं आमच्या विनूदादासारखा ?—

**वनिता०**—होऽ होऽ हो !—बाई जा ना आतां !—

**वासंती०**—( अर्धवट गेलेली मागें वळून ) आमच्या विनूदादानें पाहिला आहे कां हो त्याला, ताई ?--

**वनिता०**—( हार खाऊन तिच्याजवळ जाते...तिचे गालगुच्चे घेते. ) हात जोडले ग बाई तुझ्यापुढें, पोरी !—( वासंतीच्या कानाजवळ तोंड करून ) आतां तुला गुपित सांगतें हं कानांत...मग करशील ना माझं काम ?—( वासंती 'हो' अशी मान हलवते; वनिता तिच्या कानांत कुजबुजते.)...झालं आतां ?—

**वासंती०**—(आश्चर्यानें) काय ?–खरंच ? आमचा दादाच तुमचा नवरा ? (हसत नाचत) अग्याऽ ! तूं माझी वहिनी !—ओऽऽऽ...मग आतां बघ जातें, बैनी, मी धावत धावत !...नि विनूदादाला अस्सा फरफटत घेऊन येतें तुझ्याकडे !

: ११२८ :

( वासंती आंत धांवत जाऊं लागते;...इतक्यांत, विनय व त्याच्यामागून चहाफराळाचें ट्रे घेतलेली कमळामावशी बाहेर येतात. 'अग अग ! संभाळ!' असें कमळामावशी म्हणते. धक्का लागून ट्रे पडण्याचें थोडक्यांत कसेंबसें टळतें. सगळे हसतात. )

**विनय०**—काय लटपट काय चाललीय् तुझी, पोरी–अंऽ ?—

**वनिता०**—( हसत ) आपल्या उषेचं लग्न जमेना,...तेव्हां ती शेवटीं माझंच लग्न जमवतेय् !—

**वासंती०**—( तोंडापुढें बोट नाचवीत ) दादाऽ ?...अरे लबाडा ! ! मला तूं फसवलंस काय ?—मला समजलं पण आतांऽ, ही पाहुणी कोण ती ?–ही माझी वैनी आहे हो !

**विनय०**--( हसून ) गप्प गऽ ! बडबडी कुठली !–

[ वासंती हसते. कमळामावशी कौतुकानें तिच्याकडे पहाते; चहाचा ट्रे मध्यें टेबलावर ठेवते...]

**वासंती०**—( पुढें होत ) मी देतें आई सगळ्यांना–

**विनय०**—प्रत्येक गोष्टींतच तुझी लुडबुड हं बाकी, वासंती...

**वनिता०**--( हसत ) बडबडही खूप हो पोरीची ( सगळे बसतात. ) आपल्या उषेच्या लग्नाच्या फाऽर चिंत्तेंत आहे, बिचारी सध्यां...( वासंती खुर्चीवर गप्प बसते नि पोह्यावर हात मारते. )

**विनय०**--(खात खात हसून) हो का ग ? बोलत नाहींस ती, वासंती ?

**वासंती०**—( क्षणभरानें ) आईऽ !–मला काळजी पडलीय् आतां कुंदा ताई शाळेंतून येईल त्याची !–( वनितेकडे पहाते. )

**विनय०**--( कुतूहलानें ) म्हणजे ? ती तुझ्या उषेचं लग्न उधळून लावील कीं काय एकदम, म्हणतेस ?

**कमळा०**—( जरा कौतुकी स्वरांत ) खरंच ! अशा आहेत या दोघीही पोरट्या, विनू ! सदा त्या बाहुलीच्या लग्नावरून भांडत असतात, घरांत असल्या कीं—

**वासंती०**—पण आज नाहीं कांहीं उषेवरून भांडणार आम्ही, आई !...

**वनिता०**--मग कसली ग काळजी वाटतेय् तुला ?

**वासंती०**—( वनितेकडे पहात ) तुमची !—

**वनिता०**—( साश्चर्य ) माझी ?—

**कमळा०** —( कुतूहलानें ) असं असं ! वहिनी कोणाची म्हणून भांडणार असाल तुम्हीं !—

**वासंती०**—अग नाहीं आई, वहिनींच्या लग्नावरूनच होईल भांडण–कुंदाचं नि यांचं ! ती म्हणेल–[ हातांतली बशी खालीं ठेऊन नाटक करीत ] ‘ काय हो ?–एवढ्या शिकलेल्या नि दादाबरोबर लग्न हो कशा करतां ?’–(सगळे हसतात )

**कमळा०**—( हसून ) होईल खरंच बाकी भांडण ! ती कुंदा शाळेंत असं कांहीं तरी ऐकते नि इकडे येऊन माझ्याकडे बडबडते आपली सारखं ! तिच्या त्या बाई आहेत ना कुणी–मंदोदरी गिरी ? त्या...( तेवढ्यांत बाहेर स्वारीची गाडी वाजते. वाक्य अर्धवट टाकून चाहूल घेत ) आलीच वाटतं बया !...[ कुंदा घाईनें पुस्तकें घेऊन आंत प्रवेश करते. ]



: ११२९ :

**कुंदा०**--(उतावीळपणें) आईऽआईऽ, आमच्या मंदोदरी गिरीबाईनीं नऽ ( सगळे एकदम हसतात; विनय वनिता वगैरे सर्वांना बसलेलें पाहून, कुंदा बोलतां बोलतां अर्धवटच थांबते व लाजते. पण पुन्हां अवसान आणून ) अय्या; दादा, तूं रे केव्हां आलास ? ( वनितेकडे अर्धवट अनोळखी स्मित करून, निमूट मान फिरवते. )

**विनय०**--( हसत– ) अग, आई आतां सांगत होती. नि तूंही आलीस शाळेंतून, ती तेंच सांगत !...काय सांगत होतीस, कुंदा, तुझ्या बाईंचं...

**कमळा०**—( हसून ) खरंच कुंदा,...आज आणखी काय ?...कसलं त्यांचं नव व्याख्यान वाटतं ?—

**कुंदा०**—(मोठ्यानें हसत सुटते) नाही ग नाही, आई...( पुन्हा हसते.)

**विनय०**—( न समजून ) लागली आपली हसायला—[ वनिता गोंधळते.]

**कमळा०**—[ पुन्हा हसत ] मग ग काय, पोरी ? तुमच्या बाईंनीं तुम्हा मुलींना शपथा,...तर घ्यायला नाही ना लावल्या आज ‘ आम्हीं कधीं लग्न करणार नाही जन्मांत ’ म्हणून ?–[ कुंदा पुन्हा हसते. ]

**वनिता०**--[ जरा भांबावून, पण कुंदेच्या संसर्गानें हसत–] काय बाई एवढी गंमत...?

**कुंदा०**—[ एकदां वनितेकडे हळूच पाहून ...मग हसतच ] अग आई... आमच्या मंदोदरी गिरी बाईंचं ना...लग्न ठरलं म्हणे !

: ११३० :

**कमळा०**--[ आश्चर्यानें ] काय ? म्हणतेस काय ?...[ सौम्य हसते. ]

**कुंदा०**--[ हसत ] अग, अगदीं कालपर्यंत आम्हाला नव्हतं माहीत... आजपासून त्या रजेवर गेल्यात् महिनाभर...पुन्हा येणारही नाहीत कदाचित् शाळेंत, म्हणतात मुली--

**कमळा०**--[ आश्चर्यानें ] काय तरी बाई !...

**वासंती०**--[ मध्येंच कुतूहलानें ] हो का ग कुंदा ?...खरंऽच ?—

**कुंदा०**—( हेटाळणीनें ) गप्प ग वासंती,...तुला काय कळतंय् त्यांत लुडबुडायला ?...तें काय तुझ्या उषेचं लग्न आहे वाटतं ?...

**कमळा०**—( वासंतीची जरा बाजू घेऊन ) असं ग काय कुंदा ?... तिला का हिरमुसली करतेस ?–

**कुंदा०**—( जाब विचारण्याच्या स्वरांत )...पण असं ग काय केलं आई आमच्या बाईंनीं ?...पांच सहा दिवसांपूर्वींच त्यांनी मारे आम्हाला व्याख्यान दिलं!...पण चारच दिवसांत आपल्या बदलल्या स्वतःच!...आपलं स्वतःचंच लग्न ठरवलं...नि शाळाही सोडून गेल्या !...अशा कशा ग या एम. ए. नि बी. टी. शिकलेल्या बायका ?...

**कमळा०**—( हसून ) वाः ! मलाच विचारते आहेस कां तेंही पुन्हां, कुंदा ?...तुम्हालाच माहीत बाई तें...तुम्ही शिकलेल्या पोरी...( वनितेकडे पहात ) या पण शिकलेल्या आहेत हो खूप...यांना विचार !...(सस्मित) यांना ओळखतेस तूं, कुंदा ?

**कुंदा०**—(वनितेकडे हसून पहात) पूर्वीं कधींच पाहिलेलं नाहीं तर ओळखणार कशी ?–( विनय–वनितेकडे आळीपाळीनें पहाते. ) पण आतां विनूदादा एकाएकी आलाय्, त्यानें पत्रांत लिहिण्याप्रमाणें...या पण आल्या आहेत त्याच्याच बरोबर...( हसून ) साधारण कल्पना आलीय्...[ डोळे मिचकवते. ]

**कमळा०**—[ हसून ] बरोबर आहे तुझी कल्पना ! जा तर...यांना आंत घेऊन जा !...वासंती, तूं पण जा !...सगळं घर–वाडा...दाखव त्यांना !...आणि त्यांनाच विचार शिकलेल्या बायकांचं तें कोडं !

**वनिता०**—( जातां जातां ) कोणाचं कसलं कोडं ग, कुंदा ?...

**कुंदा०**—[ जातां जातां ] तुम्ही घरांत चला वैनी !...मी सांगतें सारं तुम्हाला ( जातात ).

: ११३१ :

( विनय व कमळामावशी क्षणभर गप्प बसतात. )

**विनय०**—( थोड्या वेळानें, घुटमळत–चांचरत ) मग आई...एकंदरीत काय वाटतं ग तुला ?

**कमळा०**–( त्याच्याकडे प्रेमानें पहात...गंभीर स्वरांत ) मला रे काय वाटायचं विनू ?...तुझं ठरलं ना काय तें नक्की ?...मग झालं तर...माझ्या वाटण्याचा त्यांत प्रश्न नाहीं !... तुला त्यांत सुख मिळालं म्हणजे झालं !...



**विनय०**--(जरा हिरमुसल्या स्वरांत) असं अगदीं परक्यासारखं ग काय बोलतेस तूं, आई ?––माझ्या लग्नाच्या बाबतींत आपल्याला काय वाटतं तें माझ्या प्रत्यक्ष आईनें नीट सांगायला नको मला योग्यवेळींच ?...

**कमळा०**--(किंचित् खिन्न हसून) म्हणजे रे कोणत्या वेळीं, विनू ?...

**विनय०**-–आत्तांच...या क्षणीं...माझ्या लग्नापूर्वींच म्हणतोंय् मी !...

**कमळा०**—[जरा करारी स्वरांत] हो ना ? मग झालं तर !...ही योग्य वेळ आहे असं मला मुळींच नाहीं वाटत !

: ११३२ :

**विनय०**—[ आश्चर्यानें ] म्हणजे ? तूं आज असं अगदीं कोड्यांत काय बोलते आहेस माझ्याशीं, आई ?...

**कमळा०**—[ गांभीर्यानें ] हं ! कोडं तर खरंच, विनू !...मलाहि अगदीं न सुटणारं कोडंच वाटतंय् हें !...आणि तुझी आई म्हणून मला एकटीलाच तें कोडं सोडवणंही शक्य नाहीं !...मी घरांतली एक स्त्री आहे !–आपल्यांत स्त्रीच्या शब्दाची–मतांची किंमत असते शून्य !–

**विनय०**--असं कां म्हणतेस तूं, आई ?

**कमळा०**—[ समजावीत ] असं आहे विनू...तुझ्या लग्नानें तुला जी बायको मिळेल, ती माझी कोण होईल रे ?

**विनय०**--[जमतें घेत] तुझी सून, आई !–(अभिमानानें) मी ठरवलेली तुझी सून कशी चांगली पदवीधर आहे, हुशार आहे !...किती गोड स्वभावाची आहे !––

**कमळा०**--हो, असेल ना !...मला त्यांत आनंदच आहे !...तूं तुला पाहिजे तशी बायको शोधून काढलीस...चांगलंच झालं ! ..तरी पण मग, माझ्या आवडी-निवडीची सून, मला, तुझ्या लग्नापूर्वींच नको का शोधायला–पहायला पाहिजे होती ?

**विनय०**—( जरा आनंदून–) मग ?...माझं अजून लग्न ग झालंय् कुठें ? म्हणूनच म्हणतों...

**कमळा०**—( जरा रागांत–) विनू, निदान जरा खरं तरी बोलावं रे माणसानें !...

**विनय०**—( न समजून ) म्हणजे ?...मी, आई, हें खोटं बोलतोंय् आतां ?

**कमळा०**—( हसून-) तसं नाहीं !...पण मग मला सांग...समज... आतां तुला मी अगदीं सरळ सांगितलं, कीं–' विनू...हें लग्न तूं करूं नकोस, बाबा ! '...तर माझं ऐकशील तूं ?

**विनय०**—अंऽ? (अनपेक्षित प्रश्नानें घुटमळून) पण आई, तसं तूं सांगशीलच कशाला मुळीं मला ?...माझ्या सुखाच्या लग्नाआड तूं येशील थोडीच ?...

**कमळा०**—( खिन्न हसून ) नाहींच येणार !...तें मी तुला मघांच सांगितलं !—

**विनय०**—( समाधानानें ) आतां तुझ्या मनांत कांहीं शंकाकुंशका मात्र असणं शक्य आहे !—त्यांचं तरी निरसन करतां येईल कीं नाही आपल्याला अजूनही ?...

**कमळा०**—हो हो !...तें तेवढं शक्य आहे कीं !...पण—मला बाबा कसल्या शंका नाहींत नि कुशंकाही नाहींत !—काय होणार त्याची चांगली खात्री मात्र आहे !

**: ११३३ :**

( विनू गोंधळल्या चेहऱ्यानें तिच्याकडे पहातो ).

**विनय०**—असं तुटक तुटक काय बोलतेस तूं आई ?...

**कमळा०**—मग रे काय करूं विनू ?...तुझी बायको ठरली...तुझं लग्न ठरलं; आणि सारं ठरलेलं अगदीं न बदलण्याचा तुझ्या विचारही ठरला ! आपल्या बायकोला समक्ष घेऊनच आईकडे आलास आज ! एकदां मुहूर्त ठरला, कीं, झालं सगळं !...आणि यावेळीं आईच्या कांहीं शंकाकुशंका असल्या तर त्यांचं म्हणे निरसन करायचंय् तुला !...झालं तिचं समाधान–तर बरंच !–नाहीं झालं तरी तें झालं असंच समजायचं म्हणजे झालं !...बरं तिनें विरोध केलाच मूर्खासारखा तर तिलाच हट्टी नि वाईट ठरवलं कीं पुन्हां आपला आपल्याला आपला मार्ग मोकळा !

**विनय०**—( घुटमळून ) असं कधींच माझ्या मनांत आलं नाहीं !—

**कमळा०**—( खिन्नपणें ) पण मला मात्र दिसतंय् तें एवढंच !-एवढ्या नाटकालाच तूं आपल्या आईची ' सुनेची निवड ' असं म्हणून, स्वतःच्या मनांत समाधान मानणार आहेस ! म्हणून म्हटलं मी, निदान दांभिक खोटं तरी बोलूं नकोस !



**विनय०**—( अगतिकपणें...कांहीं तरी बोलायचें म्हणून-)...पण आई...

**कमळा०**—( शांतपणें ) थांब !—माझं बोलणं तुला एखाद्या परक्यासारखं वाटत असलं तरी चालेल एकवेळ !...पण मी तुला आधींच सांगितलं ना मघां ?...तुझ्या लग्नाला माझा कसला विरोध नाहीं...आशीर्वादच आहे !...मग सांग बरं...आतां बोलण्याचा नि वादाचा प्रश्न कुठें उरला ?...[कांहीं वेळ शांतता ]

**: ११३४ :**

**विनय०**—( क्षणभरानें...पुन्हां समजावणीच्या स्वरांत ) पण आई, तूंच बघ हं...लग्न ही एकदांच होणारी गोष्ट !...अमक्या मुलीबद्दल आपल्याला आकर्षण वाटणार...वाटतंय्...किंवा तिच्याशीं होणाऱ्या लग्नामुळें आपण सुखी होऊं...असं मनांत येणं न येणं,...हें काय आपल्याला आधीं ठरवतां येतं थोडंच ? आपल्या आईवडिलांकडे काय नि कसं स्पष्ट करणार ग तें आधींच ?...मनाचे अगदीं हळुवार खेळ असतात ग ते, आई !—

**कमळा०**—( किंचित् हसून पण गांभीर्यानें ) लावलंसच ना मला बोलायला तूं, शेवटीं ?—किती स्वार्थी रे तुम्ही मुलं, विनू ?...

**विनय०**—( भांबावून ) काय ग केलं आम्ही, आई ?

**कमळा०**—लग्न म्हणजे एकट्याच्याच सुखाचा प्रश्न असतो का रे ?... मनाचे हळुवार खेळ म्हणे !...दुसऱ्या कोणाच्या मनांचा त्यांत प्रश्नच नसतो ना ? ?—अगदीं मुलमुलींच्या आईबापांचाही ?

**विनय०**-( समर्थनात्मक ) कुठं म्हणतो आहे मी, असं ?...तूं जरा रागावलीस...

**कमळा०**—( हसून ) पाहिलंस ना ? ..मी देखील खरं तेंच बोलले स्पष्टपणें...तरी तुला मात्र तो राग वाटला माझा !—तसं कां होईना ! पण विनू, आपल्या मायेच्या माणसांनी...प्रत्यक्ष आपल्या आईनेंच राग व्यक्त केला...तर तेवढंही तुम्हांला खपूं नये ना ?

**: ११३५ :**

**विनय०**—( भांबावून- ) तसं नाहीं ग आई...पण मग—

**कमळा०**—( आर्ततेने ) हो विनू...तुम्ही आतां तरुण झालां आहांत–शिकलेलीं आहांत...स्वतःचें सुखदुःख ठरवायला तर आतां अगदीं पूर्ण स्वतंत्रच

आहांत !—पण आतां आहांत तशीच तर कांहीं आकाशांतून पडलेलीं नाहीं ना ?

**विनय०**—असं कसं म्हणेन ग मी आई ?—

**कमळा०**—( आवेगानें ) मग ज्यांनीं अगदीं डोळ्यांत तेल घालून तुम्हांला वाढवलं...तुमच्या खस्ता खाल्ल्या...त्या तुमच्या साध्यासुध्या खेडवळ आईबापांना...माझ्यासारख्या अशिक्षित आईला,...तुमच्या निदान मोठ्यामोठ्या सुखांत तरी भागीदार असावं, असं वाटूंच नये ?

**विनय०**—आई...लग्नासारख्या बाबतींत स्वतःच ठरवलं तर काय ग चुकलं त्यांत—

**कमळा०**—( मध्येंच ) हो हो, तुमच्या सुखांचीं साधनें......तुमचीं आवडती नवीं माणसं...खुशाल निवडा ठरवा ना बाबांनों, तुम्हीच !...पण तीं ठरवतांना, आमच्या आवडीनिवडींना मतांना, त्यांत अगदींच कां वाव नाहीं ?... असली साधीसुधी अपेक्षाही आमच्या मनांत असूं नये ?

**विनय०**—( आपली बाजू पटवण्याच्या स्वरांत ) चुकतंय् तुझं, आई ! एवढे कां कृतघ्न असतों आम्ही ?...आमच्या सुखांत आमच्या आईबापांनी वाटेकरी होऊं नये असं आमचं म्हणणं तरी कसं ग असेल आई ?—

**कमळा०**—( करड्या स्वरांत ) म्हणणं नसेल...पण करणं तरी असतं ! ...आणि विनू , तुमचं आपल्या आईबापांवर प्रेम असेल...पण तें जरूरी पुरतं ! आतां जुनं झालं ना, तें !–त्यासाठीं त्याग कशाला कराल तुम्ही, बाबांनों, लहानसाही ? पण आश्चर्य नाहीं वाटत मला त्यांत ! आतां केवळ तरण्या प्रेमानेंच तुझ्या सारख्यांचं मन व्यापलेलं असणार !

: ११३६ :

**विनय०**—( रंजीस स्वरांत ) आज तूं माझ्यावर रागवायचंच ठरवलं आहेस !–पण मला सांग, आजपर्यंत मी कधीं तुला दुखावलं आहे कां ग आई ?... कधीं तरी कांहीं चोरून ठेवलंय् कां मी तुझ्यापासून ?

**कमळा०**—( किंचित् रोष व्यक्त करून ) मग काय रे विनू,...ही वनिता तुला अगदीं आजच भेटली सकाळीं...नि आजच्या आजच इथं येण्यापूर्वी दुपारीं लग्न ठरवलंत तुम्ही आपलं...असं कां सांगायचं आहे, माझ्याकडे तुला ? इतकं का सोपं, चुटकीसरसं ठरणारं असतं तुमचं आलिकडच्या मुलांचं प्रेम नि लग्न ?



**विनय०**—( किंचित् वरमून ) तसं ग कसं म्हणेन मी, आई ? ( जरा मोकळेपणा दाखवणाऱ्या स्वरांत ) आतां खरं सांगतों हं तुला अगदीं...

**कमळा०**—( तुटकपणें ) सांग असा माझा आग्रह मुळींच नाही तुला...

**विनय०**—अशी रागावूं नकोस, आई ! मी कॉलेजांत फेलो असल्यापासूनचीच ओळख आहे माझी वनितेची !

**कमळा०**—पण आज तरी कशाला सांगतों आहेस हें तूं मला ?

**विनय०**—अग पण लग्नाचं नक्की ठरलं आमचं महिन्यापूर्वींच !...आई, नक्की कांहीं ठरलं-ठरवलं नव्हतं...म्हणून एवढ्या एका बाबतींतच मी गेलीं दोन-अडीच वर्षं तुझ्याशीं थोडा लपंडाव खेळलों !

**कमळा०**—( सरोष ) नुसता लपंडावच नाही...नाटक केलंस हजारदां, लग्नाबद्दलचं बोलणं निघून देखील—

**विनय०**—पण...बाकीच्या गोष्टी निराळ्या नि ही लग्नाची गोष्ट निराळी, आई !—

**कमळा०**—मग आपणच ठरवावं कारावं सारं !—बोलूं तरी नये उगीच...

**विनय०**—( अजीजीनें ) पण आज लग्नापूर्वीच माझं सारं गुपित सांगायला तरी मी प्रथम तुझ्याचकडे आलों ना धांवत ?...

**कमळा०**—( थोड्या घुश्श्याच्या स्वरांत उपरोधिकपणें–) हो हो ! आपल्या आईबापांना लग्नाला आमंत्रण द्यायला आलास लग्नाअधीं, हें खरंच कीं ! फार आभारी आहोंत बरं आम्ही तुझे, विनू,...त्याबद्दल !

: ११३७ :

**विनय०**—( हिरमुसून– ) असं मला खोंचून नको ग बोलूंस, आई, सारखं !

**कमळा०**—( पटकन् गहिंवरते...त्याच्याकडे प्रेमानें पहाते...नि त्याच्या खांद्यावर हात ठेऊन...) ऐक ऐक...वाईट नको वाटून घेऊंस...मी मुद्दाम का बोलतें आहे हें !...मला तूंच बोलायला लावलंस आज असं !...

( क्षणभर दोघेहि शांत असतात; कमळा विनयकडे प्रेमानें पहाते. )

**कमळा०**—( न राहवून एकदम ) तुम्हां तरुण मंडळींना असं वाटतं कां रे, विनू...कीं जगांत प्रथम लग्नं काय तीं आपलींच होताहेत ?... आमच्या लग्नाच्या वेळीं आम्हालाही नाहीं कां करावा लागला असेल विचार ?

विनय०--आई, तीं पूर्वीचीं लग्नं निराळीं होतीं...आतांची निराळीं !

कमळा०--( रागानें एकदम उसळून ) काय म्हणालास ?–अस्सं ?... म्हणजे पूर्वीचीं पोरसवदा अशिक्षितांचीं...आतांचीं मोठ्या वाढलेल्या तुम्हां सुशिक्षितांचीं !...पूर्वीचीं आईबापांनीं पत्रिका पाहून ठरवलेलीं...आत्तांचीं फक्त स्वतःच चेहरे पाहून ठरलेलीं !...सहवासानंतर स्वतःच वधुवरांनीं ठरवलेलीं !–पूर्वीचीं लग्नं प्रेमाशिवाय नि हुंड्यासाठींच फक्त होत असत. आतांची तुमचीं लग्नं हुंड्याशिवाय नि प्रेमासाठींच फक्त होतात—असंच का मोठ्या तोऱ्यांत म्हणायचंय तुला ? ( विनय अगतिक होऊन थोडावेळ गप्प रहातो. )

: ११३८ :

विनय०—तूं अशी फाड्फाड् बोलूं लागल्यावर मला तुझी समजूत तरी कशी करतां येईल ग आई ?

कमळा०—( पूर्वीच्याच रागानें व ओघांत ) खरंच ! कशी करतां येईल ? नि नकोच करूंस प्रयत्न माझी समजूत काढण्याचा !—मी अगदीं तुझी आई खरी ! पण शेवटी एक अशिक्षित स्त्रीच, कशी झालें तरी ! तुम्ही वाचलेल्या मोठमोठ्या इंग्रजी पुस्तकांमधले विचार मला सांगूं लागलास तर कसे समजणार रे ते मला ?...माझी धांव काय आपली मराठी पुस्तकांपुरती, नि तुमच्या या घराच्या कोनवाड्याच्या आवारापुरती ! घाण्याला जुंपलेलं जनावरच एक मी !...

विनय०—( अजीजीनें ) आई. आई ! थांब ! मी सांगतों तें ऐक !–

कमळा०--कांहीं सांगूं नकोस तूं, विनू ! मीच सांगतें तें ऐक आधीं ! तुम्हां आजच्या सुशिक्षितांना आमची समजूत करण्याची ताकदच नाहीं !... सर्वांची समजूत करूं शकणारी, नि सर्वांना सुखी करणारी, ती सुशिक्षितांची पिढी कधीं भावी काळांत येईल ती येवो बिचारी !...आजच्या काळांतल्या सुशिक्षितांना तर आपल्यासारख्या सुशिक्षितांची देखील समजूत करतां येत असेल कीं काय, शंकाच आहे मला ! –

: ११३९ :

विनय०—( दीन स्वरांत ) आई, आई, फारच रागावली आहेस तूं आज ! माझ्या प्रत्येक वाक्याचाच जर तूं असा विपर्यास करूं लागलीस...



कमळा०—( कटु हसून एकदम ) विपर्यास नाहीं नि रागहि नाहीं ! विनू हृदयाला पीळ पडला म्हणजे अगदीं अशिक्षित माणसाच्या तोंडूनहि असे शब्द येतात ! आजच मी थोडी रागावलेली दिसलें असेन तुला...पण माझे आजपर्यंतचे हजार राग नि तुमचे बापलेकांचे हजार अपराध मी निमूटपणें गिळले आहेत पोटांतल्या पोटांत ?

विनय०—मग माझा आजचा एवढा शेवटचा आणखी एक अपराध कां ग गिळत नाहीस तूं, आई ?

कमळा०—कसा गिळावासा वाटेल, तूंच सांग ! आज माझ्या लाडक्या विनूचं लग्न ठरतंय् ! त्याच्या...नि माझ्याहि सुखाचं शिखर दिसतंय् मला ! कोणत्या आईला आपल्या मुलाच्या सुखानें सुख होणार नाहीं ?

विनय०—( जरा अधीरपणें ) खरंच वाटतं ना तुला सुख ?

कमळा०--( प्रेमानें ) हो, वाटतं तर ! पण त्याचवेळीं आतांपर्यंत आंतल्या आंत चोहोबाजूंनीं दडपून पडलेलं, अगदीं मेल्याप्रमाणें नुसतं जीव धरून राहिलेलं माझं माणसाचं मनही एकदम जागृत झालंय् ना आज !

विनय०--( भांबावून ) म्हणजे ?

कमळा०--तुला मधांच निमूटपणें संमति दिली तुझ्या आईनें ! पण विनू, तेवढ्यानें समाधान नाहीं तुला !...तूं केवळ सुशिक्षित म्हणून आपल्या अशिक्षित आईची समजुत काढण्याचा वरवरचा खोटा दांभिक प्रयत्न करतो आहेस ! तेवढं केलं नसतस तर तुझ्या सुखानेंच मी सुखी होणार होतें !...आम्हां बायकांच्या तर ते चांगलं अंगवळणींच पडलेलं असतं !

: ११४० :

विनय०—(मिळतं घेत, विनंतीवजा) क्षमा कर मला त्याबद्दल आई !

कमळा०--( कळवळा येऊन जिव्हाळ्यानें ) क्षमा ? आईच्या मनाला रागच नाहीं येत कधीं ! [अंतर्मुख होऊन, क्षणभरानें] पाळण्यांतल्या पाळण्यांत, हात पाय हलवून पूर्वी माझा छबडा विनय एखादा बोबडा अर्थहीन शब्द बोले ! त्यावेळींही मी गाढ झोंपेंतून लाख वेळां खडबडून जागी झालें आहे, बाळ ! त्या वेळचा माझा अशिक्षित विनय, माझ्याकडे दीन असहाय दृष्टीनें पाहूं लागे; नि मग मला नको त्यावेळींहि पान्हा फुटून त्याच्या इच्छेप्रमाणें त्याला मी हजारदां पाजत असे.

**विनय०**--( गोंधळल्या स्वरांत ) आई...आई...मग आज तरी कां ग माझ्यावर राग करतेस ?

**कमळा०**--( शांतपणें ) रागावूं कशाला ?...आणि कशी ? तूं खूप मोठा झालास आतां तरी मला पूर्वीसारखाच लहान वाटतोस, विनू ! ( निश्वास टाकून ) हं. पण बाळ निदान आपल्या अशिक्षित आईकडे तरी तूं सुशिक्षिताच्या कृत्रिम भाषेंत बोलूं नकोस रे ! आपल्या आईला नुसती 'आई' अशी हाक मार ! तिच्या बाळाच्या साध्या भाबड्या नजरेनें पहा ! ( ती विनयच्या खांद्यावर हात ठेवते.) तूं आतां चांगला करता सवरता स्वतंत्र झाला असलास, तरी अजूनहि... आजहि...तिला पान्हा फुटल्यावांचून कसा राहील ? ( विनयला जवळ ओढते. )

**विनय०**—( कापऱ्या स्वरांत ) आईऽ...

**कमळा०**--( क्षणभरानें सहास्य ) आशीर्वादच आहे माझा तुला, विनू! झालं ना समाधान आतां ? हास पाहूं मग ! ( एकमेकाकडे पाहून दोघेहि सौम्य हसतात. )

: ११४१ :

**विनय०**—( आईच्या कुशींत मान घालून ) किती किती चांगली नि मोठ्या मनाची आहेस ग आई तूं ? ( क्षणभर शांतता )

**कमळा०**--[ निश्वास टाकून ] हं...मोठ्या मनाची !...तसलीं माणसं दुर्दैवी नि दुःखीच असतात जगांतलीं, विनू !...

**विनय०**--काय ग झालं आतां ?

**कमळा०**--[ विचाराच्या तंद्रीत ] कांहीं नाहीं ! या तुझ्या लग्नावरून मला एक फार फार जुनी आठवण झाली !...

**विनय०**--कोणाची आठवण ?-

**कमळा०**--माझ्या बरोबरीच्या अशाच दोघा तरुण मुलांची प्रेमाची गोष्ट आहे ती !...

**विनय०**—[ कुतूहलानें ] म्हणजे ?...

**कमळा०**--[ किंचित् थांबून, आठवत ] तो मुलगा होता एक, तेजस्वी डोळ्याचा उगवता चित्रकार. ती मुलगी होती पोरकी नि गरीबाची ! फार नाहीं तरी त्या वेळच्या मानानें बरं लिहा-वाचायला शिकली होती ! त्या दोघांना एक-



मेकांबद्दलचा फार ओढा होता...आपलं लग्न व्हावं असं खूपखूप होतं त्यांच्या मनांत.

**विनय०**—( कुतूहल वाटून ) मग ग काय झालं ?—

**कमळा०**—( सुस्कारा टाकून ) तें लग्न शेवटीं झालं नाहीं, विनू !

**विनय०**—( आश्चर्यानें ) लग्न झालं नाही त्यांचं ?

**कमळा०**—(गंभीरपणें) हो ! कारण कांहीं तसं विशेष नव्हतंच कसलं !... तुमच्यासारखीं तीं दोघें निरनिराळ्या जातीचीं नव्हतीं...अगदीं एका जातीचीं नि जुळणाऱ्या गोत्रांचीं !—शिकलेली मुलगी—खेडवळ घर...असली चिंताही वाटण्याचा प्रसंग नव्हता तो !—

**विनय०**—( अधिक आश्चर्य वाटून ) आणि मग ?...इतकं होतं तरीही तें लग्न झालं नाहीं शेवटीं ?

**कमळा०**—( निश्वास-) अंहंक्...नाहीं झालं रे...( गप्प रहाते. )

**विनय०**—( हळहळून ) काय लोक तरी !...असं कसं झालं ?

**कमळा०**—अरे, तें जुन्या चालीचं एकत्र कुटुंब होतं ?—त्याच घरांत त्या मुलीची मोठी बहीण दिली होती !...तो चित्रकार मुलगा म्हणजे त्या बहिणीचाच धाकटा दीर...ही पोरकी मुलगी ! आपल्या बहिणीच्या आश्रयाला राहिलेली !...शेवटीं त्या एकत्र कुटुंबांतील वडीलधाऱ्या मंडळींनी एकदम निर्णय दिला...[ क्षणभर थांबते. ] 'पैसा नसलेली पोरकी पोर ती ! नि पुन्हां सख्ख्या बहिणी सख्ख्या जावा होणार !...लग्न होणं शक्य नाहीं हें !'—

: ११४२ :

**विनय०**—काय एवढ्यावरूनच मोडलं तें लग्न ?...काय मूर्ख माणसं ( क्षणभरानें ) आणि तीं दोघें ?...

**कमळा०**--( निश्वासून ) दुसरं रे काय होणार त्यांचं ?—त्या बिचाऱ्या मुलीनें मनांत म्हटलं...आपल्यामुळें, आपल्याला आश्रय करणाऱ्या त्या कुटुंबांत, धरणीकंप व्हायला नको !—त्या बिचाऱ्या मुलानें पाहिलं...आपल्या एकट्याच्या सुखासाठीं साऱ्यांचं सुख घालवण्यांत अर्थ नाहीं ! ( किंचित् थांबून ) शेवटीं वडील मंडळींच्या इच्छेप्रमाणेंच तो दुसऱ्या एका मुलीबरोबर लग्नाला उभा राहिला !

**विनय०**—( खिन्न स्वरांत-) आणि ती मुलगी ?

**कमळा०**—(कडवट हसून) आपल्या नाटक-कादंबऱ्यांत आपण नेहमीं वाचतों तसं नाहीं झालं कांहीं !...

विनय०—म्हणजे ?...

कमळा०—तिचंही कांहीं दिवसांनी बहिणीच्या खटपटीनें दुसऱ्या एका तरुणाशीं लग्न झालं !—तिच्या सुदैवानें ती श्रीमंतांची सून झाली !—मग तिचा संसार सुरूं झाला—वाढला...ती तें मागलं सारं विसरली...

विनय०—( पटकन् ) छे ! कसं विसरूं शकेल ती !...मनांतल्या मनांत सारखी धुमसली असेल ती !—

कमळा०—पण तिला सोन्यासारखीं मुलं झालीं, बाळ ! त्यांना तिनें वाढवलं !...हो, तिच्या घरच्या चमत्कारिक वातावरणांत तिचा कोंडमारा नि घडीघडी पुष्कळ अपमानही होई...( विनय जरा कावराबावरा होऊन संशयित नजरेनें पहातो. ) पण तीं आपलीं मुलें वाढतील ..पुढें तींच आपल्याला सुख देतील, या भावी आशेवरच ती जगत राहिली !...मग तिचा मुलगा शिकला पदवीधर झाला—आणि शेवटीं त्यानें स्वतःच आपलं लग्न जमवलं...

विनय०—( मध्यें चुळबुळ करीत ) आईऽ... ?

कमळा०—थांब !...(नेटानें पुढें सांगत) पण त्यावेळींही आपल्या मनांतील खळबळ, विरलेल्या आशा आंत दडपून तिनें त्याला आपली संमती दिली !... ( निश्वास—) आणि विनू, तरी तो तिचा शिकलेला मुलगा त्यावेळीं तिला मोठ्या तोऱ्यांत म्हणाला—"आई, तुमच्या काळचीं पूर्वीचीं लग्नं निराळीं होतीं !—आतांचीं आमचीं निराळीं असतात !"

: ११४३ :

विनय०—( संशय खरा झाल्यामुळें गोष्टीची शृंखळा तुटून, एकदम ) काय ?—आई, तुझीच ही गोष्ट !...तिच्या मुलाचें नांव विनू !...होना ? ( क्षणभर सुन्न होऊन ) असं झालं होतं तुझ्या आयुष्यांत ?—

कमळा०—( हळूच डोळे पुसते—) होय विनू,...तें आमचं लग्न त्यावेळीं घडवून आणायला, आज तुम्हाला आहे इतकाच आम्हालाही पूर्ण हक्क होता !— पण तसा अट्टाहास म्हण—धीर म्हण—त्यावेळीं आमच्यानें झाला नाहीं !—नाहीं तर पदोपदीं जिवाला जन्मभर जाळणारी, या माझ्या दुबळ्या अवमानित आयुष्याची हुरहुर माझ्या हृदयाला कशाला जाचली असती ? (निश्वास—)—पण मग,...आतां पुन्हा वाटतें,...तसं असतं तर माझा गोड विनय बाळ तरी कोठून येणार होता



जगांत नि माझ्या आयुष्यांत ?—आणि मग...त्याच्या लग्नाचा आजचा हा प्रसंग.तरी कसा उभा रहाणार होता माझ्यापुढें ?—

विनय०—(खिन्न स्वरांत) असं ग कां बोलतेस आई ?—( उत्तेजनाच्या स्वरांत) अजून नाही का सुखी करूं शकणार आम्ही तुला ?—

( आंतल्या दाराशीं देव प्रवेश करतात. )

देव०—येऊं कां वैनी मी आंत ?...

कमळा०—या ना बाप्पा...एवढं विचारायला कशाला पाहिजे त्यांत ?

देव०—नाहीं म्हटलं मायलेकांचं कसलं हितगुज चाललं असेल... तेव्हां त्यांत...

विनय०—( जरा संकोचानें ) छे छे...हितगुज कसलं ?

कमळा०—आतां रे का लपंडाव, विनू ?...बाप्पा असे मागल्या गोष्टी मनांत ठेवणारे नाहींत ! बाप्पा, यानें आपलं लग्न ठरवलंय् एका चांगल्या सुशिक्षित पदवीधर मुलीशीं !...नि परवानगी मागायला आलाय् आज आमची !—

देव०—( सहास्य ) छान छान !—माझा तरी मनापासून आशीर्वाद आहे तुला, विनू !...(कमळामावशीला) पण म्हणजे आतां आंत वासंती कुंदा—बरोबर वाड्यांत फिरतेय्...

कमळा०—हो तीच माझी भावी सून !...

देव०—( हसून ) अस्सं अस्सं ! बरं मग सांगितलंत काय त्याला तुम्ही, वैनी ?—

कमळा०—अहो मला त्याचं सुख नको का आहे ?—पण हा माझ्या एकटीच्या विचाराचा प्रश्न नव्हे !...त्याच्या या लग्नानें घरांत खूपच फरक पडणार आहे आतां, बाप्पा !...

: ११४४ :

विनय०—तुझं आपलं कांहीं तरीच, आई !—मी एकदम ग कसा बदलेन...

देव०—हो, खरं आहे तुझं, विनू...!—तूं...तुझी बायको, भाऊ, तुझी आई...कोणीच एकदम बदलणार नाहीं !—आणि म्हणूनच हळूं हळूं परिस्थिती तेवढी बदलेल !...नाहीं ?...

विनय०—अगदीं माझ्या मनांतलंच बोललें, बाप्पा !...(किंचित् थांबून)

माझ्या स्वार्थी विचाराची झळ तुझ्या सुखाला लागायला नको !...पण विनू, बाळ, मला मनांत राहून राहून वाटतंय् आज...माझा बाळ आतां यापुढें माझ्यापासून ...या घरापासून,...दूर...दूर होणार !--

**विनय०**—( कुरकुरत ) पण मला हें समजत नाही,...असं तुला कां वाटावं ?...माझं सुख, माझं वैभव...तें तुझंही नाहीं का ? आई, तूं असशील तिथं मला नि मी असेन तिथं तुला असतां येणार नाहीं का ?--

**कमळा०**—( खिन्न हसून ) येईल कां हो, बाप्पा ?...तुम्हीच सांगा ! ( बाप्पा हसतात. )

**देव०**—विनू....तूं, तुझी बायको, दोघें चांगलीं शिकलेलीं आहांत...पण तुमच्या व वहिनींच्या दृष्टिकोणांतलं...परिस्थितींतलं...एवढं मोठं खरंखुरं अंतर एकदम कसं रे नाहींसं होणार ?...तूं स्वतःची नि यांची अशी शाद्बिक फसवणूक तरी करूं नकोस !-

**विनय०**--( भांबावून ) म्हणजे काय, बाप्पा ?...

**कमळा०**--तूं, घरांतलीं इतर सारीं,...साऱ्यांचंच सुख मला हवं आहे ! तुमचं सर्वांचं सुख तेंच माझं सुख !--

**देव०**—पण, विनू ! तरी देखील वहिनींच सुख तें तुझं सुखं होऊंच शकणार नाही !--

**विनय०**--( अस्वस्थ होऊन ) तुमच्या दोघांच्या असल्या बोलल्यानें माझा अधिकच गोंधळ होतोय्--

**कमळा०**—(सरोष) शब्दांचा पसारा सोडून तूं स्वतःच विचार केलांसतर तुलाही समजेल, विनू !

**देव०**---तूं मला परवानगी देत असशील तर मी सांगतों तुला, विनू !--

**कमळा०**---वा बाप्पा ! तुम्ही त्याला नि या घराला परके कां आहांत ?

**देव०**---( क्षणभरानें ) त्याचं असं आहे विनू...तूं आतां शिकलेला, शहरवासी, नोकरीदार ! तुझी बायको सुद्धां शिकलेली...नोकरी करणारी असेल ! तुमच्या नैसर्गिक आवडीनिवडी...नोकरी--सगळं लक्षांत घेतलं तर तुम्ही आतां यापुढें नक्कीच शहरांत रहाणार, हें नाहीं का स्पष्ट होत ?



**विनय०**—(घुटमळून) पण मग त्याला काय इलाज ?–असलेली चांगली नोकरी तर नाही ना सोडायची मी, बाप्पा ?...

**देव०**—(गंभीर हसून) हा तुझ्या विचाराचा प्रश्न आहे !...'नोकरी सोड' असं तुला आपणहूनच सांगण्याइतका मूर्खपणा कसा रे करतील वहिनी ? त्यांना एवढाही पोंच नाहीं असं समजतोस तूं ?...नि पुन्हां...आपल्या घरांतले—सारे व्यवहार न समजण्याइतका कां तूं लहान आहेस आतां ?...अजून ? —

**कमळा०**—( निश्वास टाकून ) खरं आहे बाप्पा तुमचं !—साऱ्या आयुष्यभर प्रयत्न करूनही, याच्या वडिलांचे विचारआचार मला बदलतां आले नाहींत !—मग आतां याचे तरी विचार बदलण्याचा हो मी कसा प्रयत्न करणार ?

**विनय०**--( जरा खिन्न स्वरांत, पण आईला समजावित ) मला समजलं आई, तुला काय म्हणायचंय् तें—मी नोकरी करण्यापेक्षां इथेंच राहिलों असतों कायमचा, तर तुला बरं वाटलं असतं !—असंच ना ?...

**देव०**—हो, विनू !—त्यामुळें निदान वहिनींच्या जिवाची तळमळ तरी खूप कमी झाली असती !...त्यांना पुढेंमागें केव्हांतरी आयुष्यांत यश मिळाल्याचं निदान समाधान लाभलं असतं !—

: ११४५ :

**विनय०**—( सहानुभूतीच्या स्वरांत ) खरंच !...मलाही बरं वाटलं असतं, बाप्पा !...आई, हें आपलं खेडंसुद्धां मला किती सुखाचं वाटायचं पूर्वीं !... केव्हां एकदां सुट्टी पडते नि केव्हां इकडे घरीं येतों असं व्हायचं मला मी कॉलेजांत असतांना--

**देव०**—( जरा खोंचून ) पण आतां तूं शिकलास; हुशार, पदवीधर झालास !—शहरवासी नि मोठा झालास—आपल्या भोंवतालच्या परिस्थितीकडे, माणसांकडे पहाण्याची दृष्टी खूपच बदलली तुझी !—आतां कशाला तुला या खेड्याबद्दल नि त्यांतल्या खेडवळ माणसांबद्दल पूर्वींसारखं आकर्षण वाटणार !—(निश्वास) साहजीकच आहे ! तुला दोष नाही त्यांत !—

**विनय०**—(वरमून) तसं नाही तें, बाप्पा !—

**देव०**—(स्पष्ट आव्हानाच्या स्वरांत) मग रे कसं म्हणतोस ?

**विनय०**—(क्षणभर घुटमळून) बाकीचं राहूं द्या ! पण तुम्ही पहातांच

आहां ना भाऊंचा स्वभाव, नि सारा व्यवहार, बप्पा ? त्यांच्या चांगुलपणाचाच पुष्कळ गैरफायदा घेतात लोक—

**कमळा०**—(जरा रागानें) पुरे पुरे !—दुसऱ्यांना दोष तेवढा दिला म्हणजे झालं !--तेवढ्यानें आपल्याला आपल्या जबाबदारीतनं नामानिराळं नाही होतां येत, विनू ?—

: ११४६ :

**देव०**--खरंच, विनू ! तुला जर एवढं सारं कळतंय् तर...त्या बाबतींत तूं रे काय हातपाय हालवतो आहेस ?—

**विनय०**--(हतबलपणें) मी ? मी काय करणार, बाप्पा !—भाऊंच्या कारभारांत मी ढवळाढवळ केली तर त्यांना आवडेल का तें ?--

**देव०**—नाही आवडणार कदाचित्...पण !...

**विनय०**—(मध्येंच) भाऊ जितके थंड आहेत, तितकेच तापट आहेत ! म्हणतील 'हा कालचा पोर ! लागला शिकून शहाणपणा शिकवायला आपल्याला आपल्याच व्यवहारांत !'—

**देव०**—पण मग तो शहाणपणाच असेल तर कोणीही कोणाला शिकवावा !

**विनय०**—(टाळाटाळी करीत) वाः !—म्हणजे उगीच घडीघडी घरांत खटके तेवढे व्हायचे ! त्यांत फायदा कांहींच नाही !—त्यापेक्षां समजत असूनही आहे तसंच पुढें चालूं द्यावं, चालतंय् तंवर, असा विचार येतो माझ्या मनांत--

**देव०**--(खोंचक हंसून) हा आपला तुम्हा नवीन शिकलेल्या...नेहमी सुख तेवढंच शोधणाऱ्या माणसांचा विचार दिसतो !...मी नाही म्हणणार याला विचारीपणा !

**कमळा०**--(रागानें) नुसती पोपटपंची नको रे करूंस, विनू ! कधीं पाहिला होतास बाबा, या बाबतींत प्रयत्न करून ?—

**विनय०**--(समर्थन करण्यासाठीं) अग, तुझ्यासारखीलाही जें जमलं नाही साऱ्या आयुष्यांत तें आतां आम्हाला कसं जमेल, आई ?

: ११४७ :

**देव०**--(जरा करड्या स्वरांत) विनू,...स्पष्ट बोलतों, रागावूं नकोस ! तुझ्यासारख्या पुरुषांच्या तोंडीं नाही शोभत हें बोलणं !—वहिनींशी आपली बरोबरी करून स्वतःसाठीं दुबळं समाधान तेवढं, मिळवतो आहेस !—



**कमळा०**—(रागानें) विचार येतात...नि समजतं, म्हणे !...

**देव०**--(गंभीरपणे) असं आहे विनू...तुम्हाला प्रत्येकाला समजतं !... उमजत मात्र कोणालाच नाही !—कांहीं करतांही येत नाही ! यालाच नाही का परिस्थितीचा खेळ म्हणायचं ?

**विनय०**--तुम्ही म्हणतां खरं, बाप्पा !...पण पुढल्या मागल्या परिणामाचा विचार नको का करायला ?

**कमळा०**--(एकदम रागानें) आला तुझा विचार पुन्हां ?—तुम्ही नुसते विचार तेवढे करायला शिकला आहांत, शाळा कॉलेजांत जाऊन !...चांगल्या गोष्टी करतांना सुद्धां नुसता विचारच करीत बसणाऱ्यांच्या हातूंन आचार रे कसला घडणार ?--

**देव०**--(गंभीरपणें) आणि विनू, आपल्याला जें योग्य वाटतं तें करतांना कधींच विचार करूं नये ! चांगलं करीत असतांना पदरीं येणाऱ्या वाईटपणाला तर कधींच घाबरूं नये !--

**विनय०**--(आव आणून) हा भीतीचा प्रश्न नव्हे, बाप्पा ! पण भाऊंना दुखवायचं जिवावर येईल माझ्या ?

**कमळा०**---(निश्वास) हं !--तूं तुझ्या वडिलांचाच मुलगा, बाबा, ना !—वरवरचा खोटा बेगडी गोडपणा तेवढाच आवडणार तुला देखील !--

: ११४८ :

**देव०**--(चुळबुळत) बरं वैनी ! मला आतां फारच उशीर झाला ! तुम्हाला समजेल असा पुरा उतारा करून ठेवलाय् मी हिशेबाचा !...त्या मघाच्या चोपड्यांमध्येंच ठेवलाय् माडीवर...

**कमळा०**—मला समजेल का पण तें ?--

**देव०**--आतां आणखी तुम्हाला न समजायला काय झालंय ?—(विनयकडे वळत) पाहिजे तर सारीं कामं संपवून रात्रींचा येतों मी परत इथें...अनायासें विनू आलाय्–याला नि तुम्हाला दहापंधरा मिनिटांत सांगेन मी सारं !...

**विनय०**--(न समजून) काय तें ?--काय ग आई ?—

**कमळा०**--(थोड्या घुश्शांत) मला नको विचारूंस !--

**देव०**--[सहानुभूतीनें] अरे, गिरणीच्या व्यवहारांतले गोंधळ आहेत

बरेच !--तूं मन घालणार असशील त्यांत, तर अर्ध्या तासांत लक्षांत येईल तुझ्या !

**विनय०**--[ गोंधळून ] पण तें पाहून मी काय करणार त्यांत ?--

**देव०**--हेंच तें ! अरे कांही करायचंच असलं तर फक्त ही एकच वेळ आहे !...कोणी तुला जागं केलं नाहीं असं मागून म्हणायला नको !

**विनय०**—( घुटमळून ) पण बाप्पा, मी आलेय् दोन दिवसांसाठीं...नि या साऱ्या गडबडींत मला हो कसं काय करतां येणार यांतलं कांहीं ?—

**कमळा०**—( एकदम रागानें ) सगळेच कसे रे तुम्ही अगदीं एका-माळेंतले मणी ?...देवानं चांगलं वैभव दिलंय् अनायसें तुम्हाला, तर तें नीट भोगण्याची देखील अक्कल नाहीं !—

**देव०**--( क्षणभर विनयकडे पाहून मग रागारागानें ) बरं, मी जातों आतां !–( कमळामावशीला सहानुभूतीनें ) वहिनी, मी रात्रीं येतोंच पुन्हां काळजी नको !–त्यावेळीं सांगतोंच मी तुम्हाला समजावून सारं !–( देव जावयास पुढल्या दाराकडे वळतात ) ( कमळामावशी उठून दारापर्यंत जाते; विनय गप्प; क्षणभरानें फटफटी गेल्याचा आवाज ).

: ११४९ :

[ कमळामावशी परत येऊन निमूट कोचावर बसते. ]

**कमळा०**—( निश्वास ) हीं आमचीं नोकर माणसं !–( विनूकडे रागानें पाहून ) नि हीं घरचीं माणसं !...

**विनय०**–( अपराधी मनानें पण वेळ मारून नेण्यासाठी हंसून ) म्हण बाई तसं !

**कमळा०**—( रागानें ) असा हसूं नकोस !–खोट्या गोडपणासाठीं स्वतःच्या पायावर कुऱ्हाड देखील मारून घेणारीं माणसं तुम्ही !...( अधिक रागावून ) जरा बांगड्या तरी भरायच्या होत्यात रे हातांत...आमच्यासारख्या !--

**विनय०**--( हसत, हात पुढें करून ) घे ना ! हा–

**कमळा०**--निर्लज्ज नाहीं तर !...गाढव–( प्रथम राग; पण शेवटीं त्यांतूनच तिला हसूं फुटतें ).

**विनय०**--( हंसून ) हं आत्तां बरं वाटलं मला जरा !–म्हटलं, आई, माझ्याशीं आज शेवटपर्यंत रागारागानेंच बोलत रहाणार आहेस कीं काय ?



**कमळा०**—( राग एकदम मावळून प्रेमानें, सस्मित– ) असा लघळपणा केवढा केला म्हणजे झालं !--

**विनय०**--( तिच्या जवळ सरकून ) आई ती आईच शेवटीं !--

**कमळा०**--( वात्सल्यानें ) हो, असं बोललं कीं आई फसते बिचारी !

**विनय०**--( कोचावर ऐसपैस पसरून, डोकें आईच्या मांडीवर ठेवतो; लाडीकपणें ) बोलली बोलली तरी शेवटीं आपल्याला पदरांतच घेणार आपली आई !

**कमळा०**--( वात्सल्यानें त्याच्या केसावरून हात फिरवीत ) अरे ती परक्यांची पोर सुद्धां पदरांत घेतलीच आतां शेवटीं...मग तूं तर पोटचा गोळा !

**विनय०**—खरंच ना आई ?...अगदीं खरं ?...घेतलीस ना तुझ्या सुनेला पदरांत !

**कमळा०**—[ गंभीरपणें ] माझं आपलं मी सांगितलं ! बाकी तुमचं बापलेकांचं तुम्हाला ठाऊक काय तें !

: ११५० :

[ आंत वासंती, वनिता वगैरेंचा हसण्याखिदळण्याचा आवाज ]

**कमळा०**—[ कानोसा घेऊन ] कुंदा, वासंती [ विनय उठून बसतो. ]

**वासंती०**—[ दबदबा धावत प्रवेशून ]...काय ग आई ?...

**कमळा०**—[ हसून तिला जवळ घेत ] अग पोरींनों, तुमचं चाललंय काय आंत ?

**वासंती०**—[ हात नाचवीत ] मी नाऽ, आईऽ, वैनींना दोनदां गाढव केलं !

[ कुंदा–वनिता दारांत उभ्या राहून दडावण्यासाठीं हसतहसत खांकरतात. ]

**कुंदा०**—[ दबकत पुढें येऊन ] अगऽ खोटारडे !—ऐकतोंय् आम्ही ! नाहीं ग आईऽ...ही वासंतीच झाली चारी डावांत चार वेळां गाढव !

**वासंती०**—[ कुंदाला तोंड वेडेंवांकडें करून दाखवते; आणि पटकन् विनयचा लाडीकपणें हात धरून त्याला ओढत ] चल् रे दादा, तूं...आपण आपलं खेळूं या...नि यांनाच सारखं गाढव करूं या आतां !—

**कमळा०**—( हसून ) हं, जा ! घेऊन जा त्याला !...जा विनू, आतां आली तुझी पाळी गाढव होण्याची—

**विनय०**—[ सहास्य ] नाहीं तरी आतांच तूं मला गाढव म्हणून टाकलं आहेस, आई ! [ कमळामावशी हंसते ]

[ विनयचा हात धरून वासंती व त्यांच्या मागून कुंदा जाते; त्या तिघांच्या मागून भांबावल्या मनानें वनिता आंत जाऊं लागते—]

: ११५१ :

**कमळा०**—[ वनितेला—] तुम्ही या ना इकडे माझ्याजवळ बसायला; [ वनिता घुटमळून मागें वळते ] खरंच एकेरी हांक पाहिजे नाहीं का तुला ?—( प्रेमानें ] बरं बरं ! ये ना ! बस इथें कोचावर...माझ्याजवळ [ वनिता गपचूप येऊन बसते ] असं बघ माझी सून माझ्यापेक्षां गुणांनी, शिक्षणानें मोठ्या योग्यतेची असली तर तिला मी 'अहो' म्हणण्यांत कांहीं चुकणार आहे ?...नि 'अग' म्हणूनही आहे ती परिस्थिति एकदम बदलणार आहे थोडीच ?——

**वनिता०**—(गोंधळून) तसं नाहीं म्हणणं माझं—

**कमळा०**—मला आपलं वाटलं तें उघड बोललें हो मी !—

(कांहीं वेळ दोघी गप्प बसतात; शेवटीं कमळामावशी वनितेकडे पहाते.)

**कमळा०**—(हसून...) पाहिलीस ना सारी वाडी...घर ?...फिरलीस सगळीकडे ?—

**वनिता०**—(आपली परीक्षा सुरू झाल्याची जाणीव होऊन सावधगिरीनें) हो !—छान आहे कीं—

**कमळा०**—आवडले ना इथं नेहमी रहायला तुला ?——

**वनिता०**—( थोडी घुटमळून ) हो आवडेल कीं...पण—

**कमळा०**—कां ग ?—करमणार नाही इथं, खेडगांव म्हणून ?——

**वनिता०**—(चांचरत) तसं नाही—पण विनयची नोकरी मुंबईला ! पुन्हा माझाही नोकरीचाच विचार आहे—तेव्हां...

**कमळा०**—तें बाकी खरंच !—पण वेळेवर हेंही जमलं पाहिजे ! नाहीं ?—(निश्वसून) आमचा काय—सारा जन्मच संपला इथं—आंगवळणींच पडलंय् आमच्या आतां हें इथलं आयुष्य...म्हणायचं !——( क्षणभर थांबून ) असं आहे बाळ,...खेडवळ घरांतल्याच माणसाशीं एकदां संबंध जोडला आपण, कीं, या आयुष्यांतही सुख मानून रुळण्याची संवय,...तयारी ठेवायला पाहिजे आपल्याला !



: ११५२ :

**वनिता०**—(आदबीनें, पण आव आणून) हो ना ! येईल त्या परिस्थितींत सामावून—जमवून घ्यायला शिकलंच पाहिजे माणसानें !

**कमळा०**—(विषय बदलून, सहास्य ) काय ग वनिता, माझा विनू तर तुला आवडलाच !...पण माझीं इतर मुलं आवडलीं का तुला ?...

**वनिता०**—( सहजगत्या ) हो...वासंती तर अशी चलाख नि चाणाक्ष पोर आहे म्हणतां ?...त्या गमत्या पोरीनें भंडावून सोडलंन् मघां मला ?...आणि कुंदा देखील माझ्यासारखीच खूप बडबडी आहे हो, आई !

**कमळा०**—( हसून ) हं...आमच्या धर्मानें शहाळींबिहाळीं दिलीं कीं नाहीत काढून नारळाची वाडींतल्या ?...

**वनिता०**—हो, विहिरीजवळच्या त्या मोहाच्या नारळाची दिली ! तोहि प्रेमळ आहे; पण पक्का मिस्कील आहे हो अगदीं म्हातारा !—बरीच वर्षें असेल नाही तो तुमच्याकडे ?...

**कमळा०**—खूप वर्षें ! ( आठवण होऊन, एकदम मागल्या तैलचित्राकडे बोट दाखवून ) हे पाहिलेस माझे मामंजी ! यांना गेल्यालाच आतां पंचवीस वर्षें होतील...त्यांच्याही हाताखालीं धर्मा बारापंधरा वर्षें होता...

: ११५३ :

**वनिता०**—( बोलणें मार्गावर आणण्यासाठीं...) भाऊ मुंबईला गेलेत् वाटतं ?——

**कमळा०**—हं...अग चुकामूकच झाली त्यांची-तुमची ! चुकामूक तरी कसली म्हणा ?...विनूचीच लबाडी ! त्यानेंच काढलान् असेल पळ मुंबईहून इथं...

**वनिता०**—हो...माझ्याकडे आला सकाळीं नि जवळ जवळ गाडींत कोंबलीन् एकदम मला ! म्हणाला 'नाहींतर भाऊंबरोबर रावबहादुरांकडे जावं लागेल वधुपरीक्षेला !'...

**कमळा०**—( हंसून ) हो ना ?...मुलं मोठीं झाल्यावर अशाच लबाड्या करायला शिकतात !...पण एका अर्थी बरंच झालं म्हणा...तुम्हीं दोघें आज इकडे आलांत तें !——बोलतां आलं...थोडं समजलं तुमचं मत...आतां ते उद्यां आल्यावर—

**वनिता०**—( अधिरपणें ) काय हो होईल, आई ? माझी तर बाई छाती धडधडतेय् !...काय म्हणतील कोणास ठाऊक ?

**कमळा०**—( हंसून ) काय म्हणतील ते...तुला वाटतं ?

**वनिता०**—( किंचित घुटमळत ) प्रथम खूप रागावतील ! नाहीं !...( हळूंच ) पण आई, सून म्हणून मी भाऊंना अगदींच आवडणार नाहीं कां हो ?

**कमळा०**—( सौम्य हंसत ) आतां मी काय सांगूं ?—तूं एवढी शिकलेली...माणसांच्या भावना कशा दुखावतात...कशामुळं दुखावतात हें तुलाही समजत असेलच कीं !—.

**: ११५४ :**

**वनिता०**—( थोडा वेळ विचार करून ) विनूनें माझ्याशीं परस्पर नकळत जमवलं...पुन्हा मी परजातीची,...थोडी जास्त शिकलेली...म्हणून आधीं रागच येईल त्यांना फार !...नाही ?...

**कमळा०**—( गंभीरपणें हळूच ) हं ! खोटं कशाला सांगूं तुला ? ' विनूचं गुपित ' नि तुझं पत्र आलं ना त्या दिवशीं ? त्यावेळीं सुरवातीला मलाही थोडं वाईटच वाटलं !...( निश्वास...) पण मग आपणच नको का मन आंवरून विचार करायला ?—( क्षणभर थांबून...) तुमच्या घरांतल्या मंडळींना नाही वाटलं असेल कांही...आपला जावई परजातीतला म्हणून ?—

**वनिता०**—(पटकन्) नाही बा ? माझी किनई, आईच आहे एकटी...दोन वर्षांची होतें मी, तेव्हां थोडे पैसे ठेऊन माझे वडील एकाएकी वारले...

**कमळा०**—अरेरे !—काय झाली असेल तिच्या मनाची स्थिति त्यावेळीं !—

**वनिता०**—हंऽ ! त्यानंतरच सेवासदनांत शिकूनबिकून माझी आई नर्स झाली ! तिनेच मला वाढवलं...इतकं शिकवलं !...तिचा माझ्यावर फार जीव आहे...

**कमळा०**—हं ! मग विनू येत जात होता असेल नाहीं तुमच्याकडे ?... तुझ्या आईनें पाहिलाच असेल त्याला...,

**वनिता०**—होऽ ! पुष्कळदां ! गेलीं दीडदोन वर्षे तर तो कितींदा तरी जेवायलाही येत असे आमच्याकडे !—त्याला समक्ष पाहिल्यावर नि माझं मन समजल्यावर...मग माझ्या आईनें हा जातीबितीचा प्रश्नच काढला नाही !—

**कमळा०**—( प्रशांत चेहऱ्यानें ) खरंच तें...आपल्या मुलांना सुख



लाभतंयसं दिसल्यावर, आम्ही आपल्याच कल्पनांना मोकाट सोडण्यांत तरीं काय अर्थ ?...तसल्या वेडाचाराचे दिवस नाहीत राहिलेले आतां हे !—

**वनिता०**—( आनंदून ) माझी आई ना...अगदी हेंच...असंच म्हणाली आम्हाला, आई —

**कमळा०**—( प्रशांत हंसून ) अग पोरी, जगांतल्या सगळ्याच आया इथून तेथून सारख्या !...विलायतेतली गोरी काय...नि आपल्या हिंदुस्थानांतली काळी काय ? ती तुझी शहरांतली कांय, नि ही मी खेड्यांतली काय ( वनिता सौम्य हंसते. )

**: ११५५ :**

**कमळा०**—तुझ्या आईला बिचारीला एकटंच रहावं लागेल आतां ? नाहीं...तुमचं लग्न झाल्यावर ?—

**वनिता०**—( अधीरपणें ) तें का ?...ती माझ्याचकडे राहील कीं !...तिला आतां माझ्या शिवाय कोण आहे बरं दुसरं ?

**कमळा०**—( किंचित् अप्रिय वाटल्याप्रमाणें पण लागलीच सांवरून ) हो...तेंही खरंच !—म्हणजे आतां माझा विनूच तेवढा तुम्हां दोघांबरोबर तुमच्या घरीं राहूं लागल्यासारखं होणार आहे म्हणायचं ?...( वनिता गप्प रहाते...थोडी गोंधळते... ) पण नेहमी कसं जमणार ग तें ?...

**वनिता०**—( साश्चर्य ) कां बरं ?

**कमळा०**—( गंभीर हसून ) वनिता...कधीं तुझ्या विनूचीं भावंडें, आई-वडील-आपल्या भावभावजयीकडे किंवा मुलाकडे जाऊन रहाण्याची इच्छा करतील !...कधीं तुलाच इथलं खेड्यांतलं घर संभाळण्याची पाळी येईल!...कधीं विनूला स्वतःच आपल्या बायकोला घेऊन एकटंच कुठं तरी रहावंसं वाटेल ! नाहीं ?...

**वनिता०**—( सावधगिरीनें ) हो ना...पण मग सगळ्यांची त्यां त्या वेळची सोय बघून वेळेनुसार वागावं लागणार ! नाही कां ?...

**कमळा०**—( हळूच हसून ) विनूनें सांगितलं, नि तूं मला पत्र लिहिलंस ! त्यांतही तूं असंच कांहीसं लिहिलं होतंस ! पण मग असल्या गोष्टी काय शब्दांतल्या करारानें चालतात ?

**वनिता०**—( साश्चर्य ) म्हणजे ?

**कमळा०**—(जरा आडून बोलत) अग, सगळ्यांची सुखं नि आपलंही सुख...सारं कांही एकाच वेळीं एका माणसाला एकदम साधणं शक्य होईल असं वाटतं तुला ?...

**वनिता०**--( धीर करून पण चांचरत ) कां नाही होणार शक्य ?

**कमळा०**—( क्षणभर थांबून...गंभीरपणें...) मला तर बाई नाही वाटत शक्य !...निदान माझ्या अनुभवावरून हो !—एक तर आपलं सुख दडपून इतर सर्वांचीं सुखं साधतां येतात माणसाला !...किंवा एकतर सर्वांचीं सुखं दुर्लक्षून आपलंच सुख मिळवतां येत आपल्याला !—

**वनिता०**—( गोंधळून )...पण मग,...

**कमळा०**—( वनितेकडे पहात ) ही तुमच्या लग्नाची आजची बाबच पहा ना ?...तुम्ही सर्वांच्या मतांकडे...नि सर्वांच्या सुखाकडे आज पहायचं ठरवलंत...तर तुम्हा दोघांना लग्न तरी करतां येईल कां ग ? या वेळीं वेळेनुसार कांहीं बदल करतां येईल कां तुम्हा दोघांना ?...

**वनिता०**—(गोंधळून घुटमळून...) तें खरं...नाही येणार...पण आई–

**कमळा०**--( किंचित् हसून ) अहंक्...घाबरूं नकोस, बाळ !–निदान माझी तरी संमती मी विनूला मघांच दिली आहे !—

**वनिता०**--( हायसें वाटून, आनंदानें ) तुम्ही फारच प्रेमानें वागतांहा आमच्याबरोबर !...आई, इथें येईपर्यंत...मला खात्री नव्हती,...माझ्या सासूबाई इतक्या चांगल्या असतील–वागतील माझ्याशीं, अशी !...पण...विनयच्या आईच ना तुम्ही ?—

**कमळा०**--( गंभीर स्वरांत ) हं विनयची आई !–स्त्रियांना आई होण्यासारखं दुसरं मोठं भूषणच नाही, बाळ ! (क्षणभर शांतता.)

**: ११५६ :**

**कमळा०**--(थोड्या वेळानें) काय ग, सध्यां विनूला तर नव्वद–शंभरच मिळत असतील दरमहा !...तेवढ्यांत लग्नानंतर कसं ग भागणार तुमचं ?—

**वनित.०**--नीट नाही भागणार आमचं !...म्हणूनच तर मलाही नोकरी करावी लागणार !...



**कमळा०**--[ बेचैनपणें गंभीर स्वरांत ] पण दोघं नोकरी करणार म्हटल्यावर घरातलं कसं जमायचं ?—

**वनिता०**--( सहास्य ) पण त्याला काय इलाज ?...पैसा नि घर दोन्ही एकदम कशीं जमायचीं ?...नाहीं कां ?—

**कमळा०**—पण म्हणजे एकूण...माझ्या विनूचं हल्लीं चाललंय् तसंच लग्नानंतरही चालणार !...( निश्वास ) तुम्हालाच तें सुखाचं वाटलं म्हणजे झालं ! ( क्षणभर थांबून ) पण मग हें असं किती दिवस चालणार ? घरांत तुम्ही दोघंच असाल तोंपर्यंत...( वनिता लाजते हंसते ) कां ? हंसतेस ग कां ?

**वनिता०**--( अधिकच लाजून ) इश्शंऽऽ !...

**: ११५७ :**

**कमळा०**—[ हंसून ] म्हणजे ? लग्न झालं म्हणजे तरुण माणसं कायम दोघीच कशीं राहूं शकतील घरांत ?...संसार म्हणजे वाढता वेलच्च म्हणायचा तो !...( वनिता पुन्हां हंसते ) हंसलीस पुन्हा !...कां ग ?...

**वनिता०**--[ समर्थनात्मक ] नाहीं...तसं नाहीं—पण अशा वेळीं आपली कुवत काय तें आपण पाहिलं म्हणजे झालं !

**कमळा०**—म्हणजे ग कसं म्हणतेस ?

**वनिता०**--( हळूंच हंसत ) तुम्ही म्हणतां त्या वेलीला फुलं किती यायचीं, केव्हां यायचीं, हें आपल्यालाच नाहीं कां ठरवतां येणार ?

**कमळा०**--हं हं ! असेल बाई...इतकं तुमचं हल्लींचं शास्त्र पुढें गेलंय् कीं काय,...कोणास ठाऊक !—

**वनिता०**--( हसून ) हो तर ! हें आतां शास्त्रीय युग आहे, आई !—माणसांनें निसर्गला बरंच जिंकत आणलंय् !...

**कमळा०**--(गंभीरपणें) असेल; पण तें नेहमींच सुखाचं होईल संसारांत ? त्या कृत्रिम आयुष्याचा केव्हां ना केव्हां तरी तिटकारा नाही कां यायचा ?

**वनिता०**—( तें खोडून काढण्यासाठीं कुरघोडी करीत ) आणि पोरांच्या लेंढारांनीं भरलेला संसार तेवढा नैसर्गिक वाटतं ?

**कमळा०**—( जरा चमकून...) काय म्हणालीस ?--पोरांचं लेंढार ( दुःखानें ) खरंच तें !...

: ११५८ :

**वनिता०**--( किंचित् गोंधळून ) कां ? चुकलं माझं ??...

**कमळा०**—( थोडें अतर्मुख होऊन ) चुकलं कशाला म्हणूं मी ?... कुंदाची ती शिकलेली मास्तरीण तसंच म्हणली होती...आतां तूंही तसंच म्हणते आहेस !—पण अशी दुसऱ्या टोंकाला जाऊं नकोस, बाळ !...त्या गोड जीवांच्या फुलबागाला लेंढार कां ग म्हणायचं ?...

**वनिता०**—( रदबदली करीत ) तशा अर्थानें नाही म्हटलं मी !

**कमळा०**— बरं, दुसरा असेल अर्थ तुझा !...पण हें पोरांचं लेंढार संसारांत नसावंच म्हणतेस, तर मग जगांत तरुणांचा काय पाऊस पडणार आहे कां ग एकदम तरुणींसाठीं ? ( किंचित् थांबून ) मी माझ्या पोरांच्या लेंढाराला कंटाळलें असतें, तर तुला आज अगदीं गोड रुबाबदार वाटणारा तुझा बिनय कसा ग मिळाला असता तुला ?...

**वनिता०**—( घुटमळून ) तसं नाही म्हणत मी...

**कमळा०**--तें असूं दे...पण मला खरं खरं सांग हं !...आज तूं तरुण आहेस...पुढें हळूहळू काळ जाईल...तुझं तारुण्य ओसरेल !...तेव्हां मग... तुझ्या आजच्या विनय सारखाच लोकांचीं मन पळवून नेणारा, उमदा, रुबाबदार, कर्तृत्ववान्...असा अगदीं स्वतःचा एक विनय असावा असं तुलाही नाहीं कां वाटणार ?---[ वनिता बोलत नाहीं...किंचित् हसते...खालीं पहाते. ] तूं बोलली नाहींस तरी मी सांगतें ..तसं न वाटणारी स्त्रीच नसेल ! !

**वनिता०**--[ लाजत ] मला स्वतःचा अनुभव कसा असणार ? पण कल्पना करतां येतेंय् मला !...

: ११५९ :

**कमळा०**--[ क्षणभर थांबून गंभीरपणें ] पोरी, त्यासाठीं तुला तुझ्या तारुण्यांतच तशा बाळाला जन्म द्यावा लागेल ! त्याचं जागरुकतेनं नि जाग्रण करून पालनपोषण करावं लागेल !...प्रत्येक मिनिटाला तुझं स्वतःचं लहानमोठं सुख तुला त्यासाठीं विसरावं लागेल ?...सुखदुःखाच्या अनेक चढउतारांतलीच ती वाटचाल आहे, बाळ !...त्या पोटांतल्या मूठभर मांसाच्या गोळ्याचा असा



रुबाबदार विनय होईपर्यंतच्या काळांतील मधलं एक एक पळ म्हणजे एकेक युग असतं !...त्यांत आईचं एकेक जग असतं ! पटतं कां तुला माझं ?

**वनिता०**—[ हळूंच ] तुम्हाला मनापासून वाटतंय् तेंच बोलतांहा तुम्हीं !

**कमळा०**—[थोडं थांबून] आणि हें सारं...नोकरीचं आयुष्य संभाळून कसं ग मिळवितां येणार तुला, वनिता ?...शास्त्रावर नि शोधांवर उभारलेलं आयुष्य... जग,...पुरुषांचं ! आपणा स्त्रियांचं नव्हे !...मग त्या किती का शिकलेल्या असेनात ! [वनिता गप्प;...लज्जित,...दिङ्मूढ होते.] कां ग बोलतच नाहींस ती अगदीं ?...

**वनिता०**--[ गोंधळल्या आवाजांत ] काय बोलणार मी ?...मला जरा भांबावल्यासारखं झालं आहे...

**कमळा**--(सहानुभूतीनें) साहजिक आहे !...तुला तो अनुभव नाहीं ! मी सांगूं कां ? लग्नाच्या आधीं वाटणारी व्यक्तिगत सुखाची कल्पना नि तारुण्यसुलभ विलासाचा मोह, हीं नुसतीं आमिषें असतात स्त्रियांना भविष्यकाळानें लावलेलीं !... पण आपणा स्त्रियांचं सारंच्या सारं आयुष्यच, मला तरी वाटतं–त्याग नि दुसऱ्याचं सुख यासाठींच फक्त असतं ! त्यांत शिक्षणानें कसलाच बदल पडणार नाहीं !...

**वनिता०**--( किंचित् चमकून ) अगदीं शिकल्यावरही, स्वतंत्र व्यक्तित्वाची कल्पना–विचार मनांत वागवूं नयेत आपण ?

**कमळा०**--( न डगमगतां ) नाहीं बाळ ! विचार हा पुरुषांचा ! भावना आपल्या !...( वनिता गप्प रहाते. ) कदाचित् माझे हे वेडे विचार तुम्हा स्वतंत्र बाण्याच्या मुलींना पटणार नाहींत !—पण मला तरी वाटतं माझ्या अनुभवानें... जगाला पुढें नेण्याचं काम पुरुषाचं असेल; तर जगाला वाढवणं, जगवणं,...हें फक्त आपणा बायकांचंच काम आहे !...

**वनिता०**--(न पटून) पुरुषांना साधतं का जगाला पुढें नेल्याचं त्यांचं काम ?

**कमळा०**--( गंभीर हसून ) त्यांचं काम त्यांना साधत असेल नसेल... साधो न साधो...तो आपला प्रश्न नव्हे—पण आपलं काम मात्र आपल्याला खात्रीपूर्वक साधतां येतं...हो. तें साधूनच आपल्याला अगदीं मोठ्या मानानें जगांतून शेवटीं निघून जातां येतं ! केवढं भाग्य आहे आपलं ! (क्षणभर थांबते व जरा संकोची स्वरांत ) मी आपली खेडवळ, अशिक्षित हो. तुम्हां शिकलेल्या मुलीं-सारखं मला काय समजावून सांगतां येणार म्हणा ?

**वनिता०**--[ आदरपूर्वक पाहून ] तुमचं हें सारं बोलणं ऐकलं म्हणजे तुम्हांला खेडवळ नि अशिक्षित असं कोणता मूर्ख म्हणेल, आई ?...किती खोल सर्वांगीण विचार करतां तुम्हीं ? आमच्या लग्नाला मिळालेल्या तुमच्या संमतीचं आश्चर्य नाहीं वाटत आतां मला !

: ११६० :

**कमळा०**--[ तंद्री लागल्यासारखें अंतर्मुख होऊन ] विनूचं लग्न !... माझा विनू !...तुझ्या आजच्या विनयकडे तूं एकाच दृष्टींनें पहाते आहेस, पोरी ! पण माझ्या दृष्टीला हजारों रूपें दिसताहेत त्याचीं !...त्याच्या भोंवतालचीं हजारों दृश्यें माझ्या दृष्टीसमोर उभीं रहात आहेत...

**वनिता०**—(सहानुभूतीनें) सगळ्याच आयांची स्थिति होत असेल अशी नाहीं, आई ?...

**कमळा०**--हं ! [ क्षणभर स्वतःशींच विचार करून ] सगळीकडे शांत शांत आहे. जग सारं झोपलं आहे. अशा वेळीं माझा छबडा--बोबडा विनू दांतानें आजारी आहे. मलूल चेहऱ्यानें पाळण्यांत सुन्न पडला आहे;...त्याची नि त्याला झोंपवण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाळण्याची, ती छाती धडधडवणारी भयानक किरकिर ! ...मी एकटीच रात्रींमागून रात्री ऐकतें आहे...अजून अजून...कानावर पडताहेत ते सारे आवाज !...[थोडंसं थांबून] आणि तो चार पांच वर्षांचा विनू आकडीनें आजारी आहे !...चिमुकल्या कोवळ्या अंगाचं तासातासानं धनुष्य होतं आहे ! प्रत्येक मिनिटाला 'जातो-रहातो' अशी तो आम्हाला हुलकावणी दाखवतो आहे; गादीवर निपचित अगदीं निश्चल पडलेला माझा तो विनू, नि त्याच्या शेजारीं भिंतीला ओडगून बसलेली मी ! दहा दहा दिवसांच्या आलोचन जागरणामुळें निरुपाय होऊन, मला बसल्या बसल्या चुकून येणाऱ्या डुलक्या ! धडधडत्या छातीनें झोंप झाडून टाकण्याचा प्रयत्न करणारी मी...

**वनिता०**--( एकदम गहिंवरून येऊन, तिची तंद्री मोडीत ) आई, आई...

**कमळा०**--( थोडें भानावर येत ) खरंच, पण तें सारं कशाला तुला सांगत बसूं मी ?--माझ्या विनयची तीं सारीं वेडींविद्रीं भयानक रूपं आणि ते हजारों भयानक प्रसंग माझ्या मनांत नि माझ्याबरोबरच विरून जातील !

**वनिता०**—( सहानुभूतीनें ) असं का बरं म्हणतां तुम्ही, आई ?



**कमळा०**--( हसून ) आज तुला मात्र मिळत आहे तो माझा गोड रुबाबदार विनय !...केवढं तुझं भाग्य, पोरी ! ( कमळामावशी पुन्हां संमिश्र हसते; वनिता गहिंवरते; कमळामावशीचा हात आपल्या हातीं घेऊन तिच्याकडे पहात थोडावेळ गप्प रहाते. )

**वनिता०**—( सस्मित; मनापासून;...स्वतःशींच गुणगुणल्यासारखं ) थोर तुझे उपकार, आई...

**कमळा०**--( सहास्य ) आईऽ !...हो म्हणूनच म्हटलं, सूनबाई, तूं पण दुसऱ्याला असं फक्त सुखी करणाऱ्या गोड बाळाची आई हो. शेवटीं आपण स्त्रिया म्हणजे आयाच आहोंत !...साऱ्या जगाच्याच आया आहोंत ! पण हें आपण आपल्या तारुण्यांतच समजलं पाहिजे !...

: ११६१ :

( वासंती धावत प्रवेश करते; एकदम हांक मारते ' आई, ए आई ' )

**कमळा०**—ये, ये आंत, काय ग सांगते आहेस आईला ?

**वासंती०**--आई...आम्ही फिरायला जाऊं का ग वहिनीला घेऊन ?... ( आईच्या उत्तराची वाट पहातां ) चला हो वहिनी...

( वनितेचा हात धरून तिला उठवते;...कमळामावशी वासंतीकडे वत्सल कौतुकानें पहात हसते. कुंदा व विनय प्रवेश करतात...)

**विनय०**—( हळूच...) काय ग बोलत होतां इतका वेळ तुम्ही, आई ?

**कमळा०**—( हसून ) आणखी कसल्या असतात बायकांच्या गोष्टी ? लग्न...संसार-मुलंबाळं ! ( वनिता गंभीरपणें हसते. ) आधींच उशीर झालाय् ! गेलं पाहिजे मला चुलीकडे !-( कमळामावशी उठते. )

**विनय०**—( वनितेकडे पाहून...) फिरायला जाऊं आपण चल, वनू ! तुला आमच्या घराभोंवतालचे लांबच लांब लँडस्केप्स दाखवतों खूप...

**वासंती०**--( उत्साहानें त्यांच्यांत मिसळून ) चल दादा, मी पण येतें.

**कुंदा०**--( त्यांच्या बाजूस जाऊं लागत ) आपण वहिनींना आपला समुद्रकिनाराच दाखवूं या रे, दादा !--

: ११६२ :

**विनय०**-( चालतां चालतां थबकून, प्रथम आईकडे व मग दोघी

बहिणींकडे पहात. ) तुम्हीं येताहां आमच्याबरोबर फिरायला ? ( वनिता भांबावून सर्वांकडे आळीपाळीनें पहाते. )

**कमळा०**—( पटकन् घोरण लक्षांत घेऊन ) नाहीं हंऽ, वासंती-कुंदा ! मला घरांत मदत करायची आहे कामांत तुम्ही ! दिवसभर बागडलांत तें पुरें !

**वासंती०**—( कमळामावशीला, जरा रागानें ) आपल्या सुनेला कां ग नाहीं सांगत कामांत मदत करायला ?

**कमळा०**—( हसत ) लागली पुन्हां हुज्जत घालायला ! (समजावीत) अग, तिला पण सांगितलं असतं हो मी !...पण आज प्रथमच घरांत आली आहे ती, वेडे !—आज तरी पाहुणी आहे ना ती आपल्याकडे ?...माझा हक्क नाहीं आज तिच्यावर, हो !—( विनय-वनितेकडे पाहून ) जा रे तुम्ही दोघें...या नाहींत येणार !...

**विनय०**—( हायसें वाटून, वनितेला ) चल, वनू...( चालतां चालतां मागें वळून, कमळामावशीला ) आम्ही लौकरच येतो हं, आई; ( विनयमागून वनिता चालूं लागते. )

**कमळा०**—( शांतपणें ) अरे, सावकाश या अगदीं ! घाई कसली आहे ? नाहींतरी माझ्या स्वयंपाकाला आतां यापुढेंच सुरवात;...तेव्हां आज थोडा उशीरच होणार आहे. ( विनय-वनिता दाराबाहेर जातात. त्यांना उद्देशून ) हातांत काठीबिठी घेऊन जा हों मात्र-एकादं किडंबिडं पायाखालीं यायचं एखाद वेळ... नि सरळ रस्त्यानेंच जा !—

: ११६३ :

( विनय-वनिता बाहेर निघून गेल्यावर कमळामावशी आपल्या मुलींकडे हळूंच अपराधी दृष्टीनें पहाते. वासंती फुगटून खुर्चीवर बसलेली. कुंदा दारांतच गाल फुगवून गप्प उभी राहिलेली. )

**कमळा०**—( वासंतीजवळ जाऊन, तिची समजूत करीत ) चल ! वासंती, बाळ घरांत चल ! तुझ्या वहिनीनें सांगितलेल्या गमतीजमती सांगतें तुला आतां, काम करतां करतां. अंऽ ?—चल्...

**वासंती०**—( रागानें मान फिरवून ) आमी नाय् जा. बोलूं नकोस माझ्याशीं जाऽ...



**कमळा०**--( तिचें तोंड फिरवीत, लाडानें ) असं काय तें ?...शहाणी ना माझी बाय् ?...आईचं नाहीं ऐकणार तूं, वासंती ? ( वासंती वर मान करुन हसते. हळूंच तिच्याकडे पहाते. ) जा चल्, धर्माला बोलाव स्वयंपाक-घरांत !...बघ हं, आतां डोळे मिटतें मी ! तीन म्हणायच्या आंत घरांत जायचं एका माणसानें ! ( डोळे मिटून ) एक, दोन...( मोठ्यानें हसत वासंती उठते; धांवत धांवत घरांत निघून जाते. )

**कुंदा०**—( दाराजवळ उभ्या उभ्या, थोड्या घुश्शांतच ) अस्सं ग काय केलंन दादानें, आई ?...आम्ही जायला निघालों होतों ! तरी उलट एकदम असं काय विचारलंन् आम्हाला, त्यानें ?

**कमळा०**--(जरा कष्टु हसून) गप्पा मारते मोठ्ठ्याऽ ! तुला कळत कसं ग नाहीं, कुंदा ?...( संथपणें ) अग, आतां दादा तुझ्या एकटीचा नाहीं, पोरी !... यापुढें हें असंच होणार पुष्कळदां !...जा बघूं घरांत ! कामाला उशीर झाले ! ( कुंदा जरा घुश्श्यांतच घरांत निघून जाते. )

: ११६४ :

**कमळा०**-[आपल्याशींच, प्रशांत चेहऱ्यानें] वेडीं भाबडीं मुलं ! [निःश्वास] हं, चला !-माझ्या विनयचं लग्न ठरतंय् ! त्यानें स्वतः ठरवलंच ! हेंही ठरवायला गेले आहेत मुंबईला !-पण शेवटीं आतां होणार आहे काय ?-[ निश्वास ] प्रत्ये-काला प्रत्येकाचं सुख समजतं !...सगळ्यांना आपापली काळजी आहे !...पण मग ही आईची वेडी माया ?...तिला नाहींना गप्प राहवत !...[ निश्वास... ] हं...आईची माया...[ चेहरा प्रशांत होतो. ]

माया !...ही आईची ग माया !—

क्षणक्षणास हांसत गिळते भीषण दुःखांच्याही खाया !—
ही माया !...हो, ही आईची ग साधीभोळी माया !—
किति न्यारें सारें जीवन वेड्या आईच्या मायेचें...
तें चलन...वलन...चैतन्य, आमुच्या दुबळ्या या कायेचें !...
कटु-घांस पचवुनी अगणित,...त्यांतुन दुग्धामृत बनवाया...
बालकां पाजण्या...सदैव झटते, आईची ग माया !—

रोंविलें रोप जे वाढवि, घालुन जीवन रक्ताश्रूंचें...
त्यां फुलें लागतां, निस्पृह माया मोदभरानें नाचे !
तीं फुलें विखुरतिल वाऱ्यावरती ! पडतिल जाउन दूर !...
दरवळेल जगतीं गंध तयांचा !—आई त्यांतच चूर !—
ना भावीं स्वप्नें !...माया अमुची चालू क्षण मापील !
कटु गतस्मृती, आइची कूस ही खोलखोल दडवील !—

× × × ×

जें केलें...गेलें तें जरि सगळें वाऱ्यावरती वायां !—
आसवें पुसुन हांसुनी उसासत उरेल जग व्यापाया !...
माया—ही आईची ग माया !

अंक ३ रा

—'देवीला कौल'—

( स्वल्प-विराम )


—उपकारी माणसें—

१. प्रवासातील सोबती.
२. अभ्रपटल.
३. आकाश-गङ्गा.

हे पहिले तीन खंड तुम्ही वाचले आहेत कां ?

— नसल्यास चौकशी करा —

'पारिजात प्रकाशन': १४ बी, हरजीवनदास एस्टेट
व्हिन्सेन्ट रोड, दादर मुंबई १४.




# घरोघरच्या देवी

## [ अंक ४ था. ]

## — शाप–उःशाप —

: ११६५ :

[ वासुदेवरावभाऊंची खाजगी खोली...जवळच्या शीसवी पेटीवर पाय टाकून भाऊ ऐसपैस पडले आहेत; जवळ दोनतीन वर्तमानपत्रें अस्ताव्यस्त पडलीं आहेत;...चाळशी कपाळावर सारलेले भाऊ वामकुक्षींत तल्लीन आहेत...

इतक्यांत, कापडी पडदा बाजूला सारून कमळामावशी प्रवेश करते. तिच्या हातांत लहानसें पितळी ट्रे; त्यांत चहाचा कप, चकल्यांची बशी;...दुसऱ्या हातांत पाण्याची लहानशी लोटी.

बांगड्यांची चाहूल ऐकून भाऊ जागे होतात...आळस देऊन उठून बसतात...कमळामावशी शिसवी पेटीवर ट्रे; ठेवते...व पाण्याची लोटी हातांत घेऊन, भाऊंकडे पहात गप्प उभी रहाते...

भाऊ उठतात; लोटी घेऊन समोरच्या खिडकीजवळ जातात; दोन चूळा भरून टाकतात; डोळ्याला पाणी लावतात; बैठकीवर येऊन बसतात...

कमळामावशी आंतल्या बाजूस कपड्याच्या लांकडी घोड्याजवळ कांहीं काम करीत उभी रहाते;...तेवढ्यांत, भाऊ ट्रेमधील चहा तेवढाच घेऊन कप बाजूला ठेवतात...]

**भाऊ०**—हं...जा हें घेऊन...( कमळामावशी पुढे येते...)

**कमळा०**—(रिकामा कप व ट्रे उचलून...) हें काय ?...खाल्ले नाहीं ?... ताज्या आहेत चकल्या...

**भाऊ०**—( लोडाशीं टेंकत ) अहंक्...कांहीं नको मला...

**कमळा०**—[ आस्थेनें ] असं काय तें ?...सकाळीं जेवणावरूही तसंच अर्धवट उठलांत !—( जरा काळजीनें— ) बरं कां नाहीं जिवाला ?...'

**भाऊ०**—( किंचित् सहास्य...पण तुटक ) कांहीं नाहीं !...छेऽ !... मला काय होतंय् ? आतां यावेळीं भूक नाहीं पोटाला एवढंच...

**कमळा०**—( हातांतले ठेऊन परतत... ) तुम्हीं नाहींतरी कधीं काय सांगणार आहां म्हणा, मनांतलं नीट !...'

**भाऊ०**—( आंतल्या दारापर्यंत पोहोंचलेल्या कमळामावशीला,...जरा चांचरत...) तें...सकाळीं मुंबईहून आणलेलं...तुपाचे डबे वगैरे सामान ठेवलं ना नीट उचलून जागेवर ?...

**कमळा०**—( जाता जातां दारांत थबकून...मागें वळत खरंच बाई... कशाला आणलं आहे तें इतकं सारं सामान घरांत एकदम ?

**भाऊ०**—( किंचित् हसून... ) तें तुझं हातांतलं ठेऊन ये आधीं !... मग सांगतों सारं तुला...

**कमळा०**—( दारांतून... ) काय आपल्याच बसल्या बसल्या कल्पना कराल तेवढ्या थोड्याच आहेत ?......( जातां जातां ) आलें हं सांगून कुंदाला ? ती बसलीय् चुलीवरच्या कढईजवळ चकल्या तळत...( कमळामावशी जाते. )

: ११६६ :

[ भाऊ पेटीजवळची आपली बॅग उघडतात...आंतून प्रथम पुष्टिपत्रांत गुंडाळलेलें फोटोसारखें पुडकें व एका रंगीत कागदांतली मध्यम आकाराची लहानशी पुडी काढून पेटीवर ठेवतात. मग इतर लहान मोठ्या पुड्या बॅगमधून काढून जमीनीवर ठेवत असतात...तेवढ्यांत कमळामावशी प्रवेश करते...]

**भाऊ०**—[ सामानाकडे बोट दाखवीत...] हं...घे...ठेव सारं उचलून कपाटांत...[ कमळामावशी आश्चर्यानें पुड्या उचलूं लागते...तेवढ्यांत भाऊ रंगीत कागदांतली पुडी उघडून ] नि हा केशर...सात रुपये तोळा पडला... आठ एक तोळे आहे. [ चिमटीचा वास घेत पुन्हां पुडीत टाकून ] उत्तम आहे, नाही ?...पहा—[ पुडी तिच्यापुढें धरतात. ]

**कमळा०**—[ पुड्या उचलून ठेऊन...केशराची पुडी हातांत घेते;...वास



घेते...] हं...चांगला आहे...[ आश्चर्यानें ] पण इतका कशाला आणला एकदम ?

**भाऊ०**—[ तिचा प्रश्न दुर्लक्षिल्यासारखं... ] बरं...घरांत चण्याची डाळ वगैरे इतर सर्व सामान ? आहे ना सारं भरपूर ?

**कमळा०**—[ किंचित् रोषानें व एकदम—] पण हें चाललंय् काय तुम्हीं आज ?...कशाला ऐवढे तुपाचे डबे नि केशर नि चण्याची डाळ ?...मला समजतच नाहीं काय चाललंय् तुमच्या मनांत तें !...

**भाऊ०**—[ शेवटीं, तिच्याकडे न पहातां...हळूच—] आपल्या विनूचं लग्न होण्याचा संभव आहे कदाचित् लौकरच...पंचवीस दिवसांत...

**कमळा०**—[ अपेक्षितपणें...पण मुद्दाम धरलेल्या शांततेनें ] अस्संऽ ? तरीच !...[ क्षणभरानें ] पण मग पूर्वीच ऐकलंय् कीं मी तें...

**भाऊ०**—[ चमकून... ] काय ?...केव्हां ?...

**कमळा०**—[ शांतपणें...पण टोमण्यानें ] तुम्हीं कशाला मला सांगणार म्हणा ?...पण त्या दिवशीं...तुमच्या देखतच काळेबापू म्हणाले नाहींत का मुंबईला जातांना ?...

**भाऊ०**—[ किंचित् बेफिकीरीनें ] हं हं...तें होय ?...पण त्या दिवशीं नक्की नव्हतं कांहीं !...आतां जवळजवळ ठरवूनच आलोंय्...

: ११६७ :

[ कमळामावशी कांहीं बोलत नाहीं. भाऊही गप्प रहातात: क्षणभरानें पेटीवरचें पुडकें उचलून भाऊ तें सोडूं लागतात...]

**भाऊ०**—( सोडतां सोडतां, हळूच )...विनू कुठें आहे ?...

**कमळा०**—(बेफिकीरीनें कोरड्या स्वरांत...) असेल कदाचित् माडीवर;... नाही तर गेला असेल बाहेर कुठें !...

**भाऊ०**—असं कां ?...[फोटो बाहेर काढून तिच्यापुढें करीत...] हं... ही पाहिलीस ?...मुंबईच्या रावबहादुरांची मुलगी—आहे मॅट्रिकमध्यें सध्यां... बरी आहे हाडपेरानें नि दिसायला सुद्धां;...मी पाहून आलोंय् स्वतः...

[ कमळामावशी फोटो हातांत घेते, व पहात गप्प उभी रहाते. ]

**भाऊ०**—( क्षणभर घुटमळून पुन्हां ) तसं त्यांचं घराणं चांगलं नि सुखी आहे !—म्हणताहेत—दोन्ही मांडवाचा खर्च करूं आपण—मुलीचे वीस एक

तोळ्यांचे दागिने आहेत…नि शिवाय पांचसहा हजार देऊं !…तेंच आपणहून सारं कबूल करताहेत !…काय समजलीस ?…स्वतः मी कांहींच बोललों नाहीं हो त्यांत…( कमळामावशी फोटो पेटीवर ठेवते व अपेक्षेनें तिच्याकडे पहात असलेल्या भाऊंकडे वळून पहाते.)

**कमळा०**--( पटकन् करड्या स्वरांत-) मग आतां मी काय बोलूं म्हणतां ?

**भाऊ०**—( जरा मिळतें घेत…सहास्य-) हा फोटो पाहिलासच आतां ? पसंत आहे ना तुला ?—

**कमळा०**—( प्रथमच राग प्रकट करून-) मला कशाला दाखवताहां तो ? —माझं का व्हायचंय् तिच्याशीं लग्न ?

**भाऊ०**-(नाराजीनें पुरुषी घमेंडींत…) असलं तिढं बोलणं मला नाहीं खपत ! …तुला तिच्याशीं लग्न करायचं नसलं तरी ती तुझी सून ना ?…तूं विनूची आई !

: ११६८ :

**कमळा०**--( जरा कुर्‍यांत-) आतां अगदीं याचक्षणीं कां होते आहे मी विनूची आई…एवढ्या नवलपरीचं म्हणून मला सांगताय् तें ?…

**भाऊ०**--( ताठ्यांत, सारवासारव करीत, घुटमळून-) अग पण…

**कमळा**—( रागानें )…गंधाचं लग्न झालं मागें…तेव्हां तिचीही नव्हते का मी आई ?…त्या वेळींही लग्न उरकून घेण्याची हीच ना होती तऱ्हा तुमची ?

**भाऊ०**—( त्या अनपेक्षित बोलण्यानें विचलित होऊन पण मिळतें घेऊन ) आतां तें मागचं कशाला पाहिजे ?—अग,…विनूच्या लग्नाच्या बाबतींत नको का आतां कांही करायला आपल्याला ?

**कमळा०**—( पटकन् ) हो हो !—मग करा की काय तें !—तुम्हीच ना कर्ते सवरते आहांत घरांतले ?—मला विचारण्याचं कांऽहीं कारण नाहीं !

**भाऊ०** –( त्राग्यानें…) असं कोणी बोलूं लागलं म्हणजे वाटतं…कांही कांही सांगूं नये नि करूं नये !–

**कमळा०**—( रोषानें ) मग यापेक्षां आणखी निराळं काय केलं आहेत आतांपर्यंत तुम्ही ?…

**भाऊ०**—( त्रासून रागानें ) तुला म्हणायचंय् काय, नाहीं समजलं मला ? तुमचं बायकांचं असंच असतं नाही तें नेहमीं !—



**कमळा०**—( उपरोधानें ) आमचं बायकांचं कांहीं तरी, तें असूं या आपलं !…पण ज्याचं लग्न व्हायचंय् त्या पुरुषाला तरी सांगितलंत्–विचारलंत् का ?

: ११६९ :

**भाऊ०**—( घुटमळून ) अं–विचारायचं आतां…

**कमळा०**—( रागानें ) आतां ? त्याला ती समक्ष नाहीं, तर निदान तिचा फोटो तरी दाखवलाहेत का आतांपर्यंत ? आणि काय म्हणतांहां ते त्यांचे दोन मांडवाचे खर्च…दागिने नि पांचसहा हजार…सारं समजलं–पटलं कां तुमच्या मुलाला ?…

**भाऊ०**--( जिकीरीनें– ) अग पण,…तेवढ्याचसाठीं तर मुंबईला गेलों होतों मी काल उठून !…चुकामुकीनें त्याची आमची भेट झाली नाहीं…त्याला काय करणार आतां ?—[ थोडं शांतपणें ] बोलणं झालंय् सारं…आतां एकदां विनूनें मुलगी समक्ष पहायची…नि मुहूर्त तयारीचं सारं ठरायचं !…म्हणूनच सांगून आलों आहोंत आम्ही रावबहादुरांना–'ठरल्यासारखंच समजा' म्हणून ?–

**कमळा०**—[ शांतपणें पण उपरोधानें–] अस्सं ?…मग मुंबईला एक चुकामूक झाली, तरी पण आज तरी आहे ना तुमचा मुलगा इथें ?…

**भाऊ०** —[ विचलित अंतःकरणानें मिळतं घेत ] तेंच तर म्हणतोय्… तूं एकदां पहा…नि लगलीच विचारून टाक त्याला ! नि ठरव तूंच…

**कमळा०** —[ पेंच पाडीत–] मी ?…मी काय म्हणून विचारूं ? माझा काय त्यांत संबंध ? तुम्हीच विचारा कीं, आतां—

**भाऊ०**—[ गुळमुळीतपणें ] मीच मुद्दाम कशाला विचारायला पाहिजे आहे त्याला ?–[ कामसाधूपणें ] तुझ्याबरोबर तो अधिक मोकळेपणें बोलेल–तूं त्याची आई आहेस !–

**कमळा०**--[ रागाचा पारा चढत ] वाटतही नाही कांहीं बोलायला !– तुम्हाला पडला असेल पेंच–त्याला आतां एकदम हें कसं विचारायचं म्हणून–तेव्हां मग मी त्याची आई हें आठवतंय् तुम्हाला मघांपासनं !–कसला प्रसंग आला… गरज पडली…किं तेंवढ्यापुरतं तुम्हाला आठवतं…नाही कां ?…मी तुमची बायको आहे !…नि मुलांची आई आहे ?

: ११७० :

**भाऊ०**--[ न रागावतां ] हें बघ-उगीच रागावूं नकोस अशी !...त्याला नीट विचारलंस सारं, तर तो नाही कां म्हणणार आहे, असल्या चांगल्या गोष्टीला ? त्याच्या चांगल्यासाठींच ना करतों आहोंत हें आपण ?...

**कमळा०**--[ रागांतच... ] आपण ?...मी करतों म्हणा...नि मग काय वाटेल तें करा--मी स्वतः त्याला या कोण त्या रावबहादुरांच्या का रावसाहेबांच्या मुलीबद्दल आतां कांही एक विचारणार नाही...साफ सांगून टाकतें !...

[ भाऊ एकदां रागानें अगतिकपणें कमळामावशीकडे पहातात; थोडावेळ गप्प रहातात. ]

**भाऊ०**--(क्षणभरानें जरा पुरुषी घमेंडीच्या जोरांत...) बरं बरं...तसं कां होईना ?...मीच विचारतों ! झालं ?...आहे कुठें तो ? ( अधिकारी स्वरांत...) जा सांग वासंतीला बोलावून आणायला त्याला...

**कमळा०**--( हळूंच ...) पण एकटा नसेल तो !...ती मुंबईची पाहुणी आहे त्याच्याबरोबर !

**भाऊ०**-(चमकून) कोण?...हं...हं...सकाळीं पाहिली खरी जेवतांना !-( सहज कुतूहलानें ) कोण आली आहे ती त्याच्याबरोबर ?...

**कमळा०**--( थंडपणें ) त्यालाच विचारा तुम्ही...

**भाऊ०**--( साशंकपणें ) म्हणजे ? तुला नाही माहीत ?

**कमळा०**--( विषय टाळून ..) आहे ना...

**भाऊ०**--( जरा रागानें ) मग ?...असं काय तुटक तुटक बोलते आहेस ?-नीट सांगतां नाही येत, काय तें ?...

**कमळा०**--( शांतपणें )—तुम्हाला आवडणार नाही अशी कटु गोष्ट स्पष्ट करून सांगायचा वाईटपणाही, शेवटीं, मीच घेऊं म्हणतां ?...

**भाऊ०**—( अधिक रागानें...) म्हणजे ?...चाललंय् काय हें तुमचं सगळं आज ?—

**कमळा०**—( धीर करून-) माझं कांहीं नाही चाललेलें ! हें विनूनें चालवलंय् !...त्यानेंच वास्तविक तें तुम्हाला सांगायचं !...पण मलाच सांगायला लावतांहां तुम्ही !



**भाऊ०**—(गोंधळून रागारागांत ) काय...काय म्हणालीस ?

**कमळा०**—(क्षणभरानें) बरंऽ-तर ! मग आतां सारं कांहीं एकदमच समजेल असंच सांगतें हं ! (भाऊ तिच्याकडे कावऱ्या बावऱ्या चेहऱ्यानें पहातात) त्या आलेल्या पाहुणीचं नांव वनिता...एका सुशील कायस्थ विधवेची मुलगी आहे ती ! थोडंथोडकं नाहीं...अगदीं आपल्या विनू एवढं शिकलेली...आहे ती ! ( क्षणभर घुटमळून ) ती किनई आपल्या विनूची वाग्दत्त वधू...नि तुमची-माझी भावी सून !...[ भाऊंचा चेहरा भरभर पालटत जातो. ]

: ११७१ :

[ भाऊ क्षणभर हतोडा हाणल्यासारखें सुन्न होतात....मग ओठ-अंग सारें थरथरतें. )

**भाऊ०**-चढत्या आवाजांत ओरडतात...) काय ?...काय? काय ??...बदमाश...हरामखोर...दगलबाज...पाजी...( कमळामावशी शांत रहाते; भाऊंचें तोंड चुकवते. )

**भाऊ०**—( त्वेषानें जागचे उठतात...रागानें ओरडत...)...माझ्या घरांत हा,...हा पोरखेळ ?...गोंधळ ?...कुठें, आहे कुठे तो पाजी उलट्या काळजाचा कारटा ?...माझ्या तोंडाला काळोखी फासलीन् नीचानें !...( जागच्या जागीं जळफळाट करतात; पुन्हां शब्द फुटत नाहींत, अशा आवाजांत ओरडून ) माझा जीव मारून मी त्याला वाटेल तें पुरवलं;...एखाद्या राजाच्या मुलासारखे सारे लाड केले त्याचे;...इतकं शिकवलं...अगदीं सुताइतकंही कमी पडूं दिलं नाही त्याला ?...(अधिकच चवताळून) नि त्या,...त्या सगळ्याचं...त्यानें हें असं उट्टं फेडलं काय ?...( असह्य होऊन डोकें दाबून धरतात...)

**कमळा०**—( हलक्या स्वरांत, अगदीं शांतपणें...) पण आतां त्याला काय करणार बरं आपण ?...शांत व्हा...

**भाऊ०**—( पुढें होत...) कुठें कुठें...आहे कुठे तो पाजी...हलकट...नीच...बदमाश, करंटा ?...त्याला अस्सा ओढून आणतों जाऊन...( सहन न होऊन ) लाथाबुक्क्यांनीं त्याला तरी मारतों मी...नाही तर मी स्वतः तरी मरतों ! मग पाहिजे तर,-आपला बाप मेला म्हणून तो तरी रडेल;...नाहीं...तर, माझा मुलगा मेला म्हणून मी मोठ्यानें रडत बसेन !...

'(भाऊ रागानें अधिकच बेफाम होऊन आंतल्या दाराकडे जाऊं लागतात;... कमळामावशी त्यांना मध्येंच 'थांबा ! थांबा'- म्हणत अडवण्याचा प्रयत्न करते;... ' सोड मला !...' म्हणत ते तिला धक्का देतात...व शेवटीं मोठ्या रागारागानें ते डाव्या बाजूस घरांत निघून जातात. जरा घाबरल्या चेहऱ्यानें कमळामावशी त्यांच्या मागून घाईघाईनें जाते.)

: ११७२ :

[ उजव्या बाजूनें विनय दबकत दबकत प्रवेश करतो; त्याच्यामागून घाबरलेल्या चेहऱ्याची वनिता येते. कोचाजवळ उभे राहून दोघें भांबावल्या नजरेनें एकमेकांकडे थोडावेळ मुग्धपणें पहातात...]

**वनिता०**--( चांचरत ) आतां रे कसं करायचं, विनय ?...भाऊ फारच रागावले आहेत !...बरं झालं जेवल्यावर गेलों होतों मामलेदारांकडे तें...

**विनय०**—( निश्वास टाकून ) मला होती कल्पना हें असं कांही तरी होणार म्हणून !...एवढ्याच साठीं मी भाऊंना पत्र लिहून ठेवून ते येण्यापूर्वींच काल निघून जाणार होतों !...पण आईच म्हणाली;...आलाच आहेस तो भरल्या घरांतून चोरासारखा गपचूप निघून जाऊं नकोस !...आणि आतां हें असं...

**वनिता०**—( भांबावल्या स्वरांत ) पण मग रे आतां ?

**विनय०**—( त्रासानें ) काय सांगूं ? माझं तर डोकं बुवा अगदीं सुन्न झालंय् !-भाऊंच्या असल्या रागांत सांगणार काय मी त्यांना नि ते ऐकणार तरी काय माझं ?

**वनिता०**—( निश्वास टाकून ) तूंच असा धीर सोडूं लागलास, विनय, ...तर या घरांत मी तर परकी ! आतां मी रे काय करायचं ?...

**विनय०**—( कुरकुरत ) पण भाऊंनी तरी इतकं का रागावावं, माझं नीट ऐकून घेण्यापूर्वीच ?...माझं लग्न मी जमवलं यांत इतकं काय वाईट केलंय् मी !—( तक्रारी स्वरांत, जरा मोठ्यानें ) नि आईला तरी सारं ठाऊक आहे ना आतां ?...मग तिनें नको कां कांहीं करायला यांत, भाऊंचं मन वळवायला ?...

( तेवढ्यांत कमळामावशी घरांतून प्रवेश करते. )

**कमळा०**--( थोड्या रागानें ) काय म्हणालास, विनू ?...त्यांचं मन मी वळवायचं ?...म्हणजे रे कसं ?—



**विनय०**—( चमकतो...मग हतबलपणें ) तसं नाही, आई !...पण मग आतां काय ग करूं मी तरी ?

**कमळा०**--( चिडक्या स्वरांत—) शेवटीं प्रत्यक्ष वेळ आली तरी मलाच विचारतो आहेस का तूं तेंही ?...त्यांनीं तुझं लग्न जमवून यावं नि मला सांगावं,... तुझं मन वळवायला !—तूं तुझं लग्न जमवून यावं नि मलाच सांगावं,...त्यांचं मन वळवायला !...आणि आतां मी रे काय करावं ?...तूंच सांग ना ?

: ११७३ :

**विनय०**--( कातर स्वरांत ) पण आईऽ...

**कमळा०**—[ रागानें-] मला नका सांगूं कांही—करा काय वाटेल तें ! दोघेही पुरुषच तुम्ही !...मलाही कांही भावना असतील यावेळीं, असं वाटेलच कसं तुम्हाला ?...

**विनय०**—[ अगतिक ] मी कांही वाईट तर नाही ना करत आहे, आई ?

**कमळा०**--[ उलट प्रश्न करून ] नाही ना करत आहेस कांहीं वाईट ? मग सांग जा ना त्यांना तसं स्पष्ट समजावून...मला का मधें ओढतोस ?— मी नको का म्हणतेय् ?

**विनय०**—[ हतबलपणें ] भाऊंना तोंडीं कसं सांगतां येईल मला हें सारं ? आधींच चिडले आहेत ते इतके !

**कमळा०**—( कठोरपणें ) तोंडीं नाही सांगतां येत ?...मग काल मारे पत्र लिहून जाणार होतास त्यांना न भेटतां, परस्पर !-त्यानें चिडणार नव्हते वाटतं ते ?-विनू, कटु गोष्टी त्या कटुच !-पत्रानें काय नि तोंडीं काय, त्या काय गोड होणार आहेत थोड्याच ?—

**विनय०**—( गोंधळून ) कटु गोष्टी ?—

**कमळा०**—अरे, तुझ्या कल्पनेप्रमाणें तुझं लग्न ही सुखाची गोष्ट !...पण हासभास नसतांना तुझ्या वडिलांच्या कल्पनांना हा धक्काच नाही का बसत आहे एकदम ? तुझ्या हातून कळत नकळत एकदां जखम झाली खरी त्यांच्या मनाला ! तिचा असा बाऊ करून कसं चालेल ?—दुःख झालं तरी एकदां काय ते उपाय योजावे लागतात त्यावर !—

: ११७४ :

**विनय०**—तूं सांगतेस तें खरं, आई !--पण मी भाऊंना त्यांच्या अशा मनस्थितींत कसं समजावून सांगणार सारं ?—

**कमळा०**—( खिन्न हसून ) दुबळा रे दुबळा !–लग्न ही फार मोठी बाब आहे म्हणतोस ना माणसाच्या आयुष्यांतली ?–मग त्यासाठीं धीर नको का करायला तुला ?—येईल त्या प्रसंगाला तोंड नको द्यायला ?–घरच्या व्यवहारांत तें तसं ! स्वतःच्या लग्नाच्या बाबतींत तरी म्हणावं तर आतां हें असं !

**विनय०**—( सुस्कारा टाकून ) मला कोणाला मुद्दाम का दुखवायचंय् ?–पण–( कपाळावर हात घेऊन गप्प बसतो )

**कमळा०**—( जरा त्राग्यानें कठोर शब्दांत ) तूं बस इथं डोक्यावर हात घेऊन...असे सुस्कार टाकत !–ते रागारागानें गेले आहेत माडीवर नि तिथें बसले आहेत उशींत डोकं खुपसून तुझ्या येण्याची वाट पहात !...आतां असल्या या घरांत मी रे काय करायचं म्हणतां ?

**विनय०**—( हळूंच मान वर करून ) आई, तूं सांग ना भाऊंना !... तूं पाठीशीं असलीस म्हणजे मला जरा धीर येईल ?—

**कमळा०**—हाच का तुझा पुरुषार्थ ?...मला समजलं, विनू...तूं सांगतांना मी तुझ्या पाठीशीं असायला नको आहे तुला ! मीच सारं सांगायचं नि तूं फार तर माझ्या पाठीशीं असायचं ठरवलं आहेस मनांत !—

**विनय०**—[ घुटमळून ] पण, भाऊ किती संतापले आहेत याची कल्पना नाहीं का तुला, आई ?--

**कमळा०**--[ रागानें ] अस्सं ?–त्याची कल्पनाही मीच करायची ? म्हणजे त्यांचा भडिमार झेलायला आतां मीच पुढें व्हायचं ?

**विनय०**--[ विनवणीनें ] आईऽऽ...

**कमळा०**--[रागानें पण, वत्सल स्वरांत] 'आईऽऽ' म्हटलं कीं झालं... सोपं असतं कीं नाही तें !–सर्वांना गोड राखावं...नि आपलंही सगळं मनासारखं सुरळीत व्हावं !...अशाच विचाराचीं सगळीं दुबळीं माणसं भोंवतीं असलीं म्हणजे घरांतल्या माझ्यासारख्या दुबळ्या स्त्रीला लहानापासून थोरांपर्यंत साऱ्यांचीच आई व्हावं लागतं घडीघडी !—



: ११७५ :

**भाऊ०**--( पडद्यांत...माडीवरून, रागानें ओरडत ) वासंतीऽ...कुंदाऽ कुठें, गेला कुठें तो तुमचा हरामखोर दादा ?--आतां तोंड लपवून बसला कुठें ?–

[ वनितेचा चेहरा पालटतो. विनय जागचा उठून हतबलपणें आईकडे पहात चाळवाचाळव करतो. कमळामावशी दोघांकडे सहानुभूतीनें पहाते...

इतक्यांत कुंदा, वासंती, घाबरल्या चेहऱ्यानें घरांतून, चोरासारख्या दबकत दबकत प्रवेश करतात...कमळामावशी जवळ धावत जातात, व तिला दोन्ही बाजूंनीं बिलगतात.]

**वासंती०**—( घाबऱ्या आवाजांत...) आई, आई...भाऊ इतके कां ग रागावले आहेत आज, दादावर ?...

**कुंदा०**—( भांबावून ) आतां ग काय करायचं आई ?...

**कमळा०**—( त्या दोघींच्या खांद्यावर हात ठेऊन ) हं...तुम्ही नका आतां इथें उभ्या राहूं...( कोचाजवळ भांबावल्या नजरेनें उभ्या असलेल्या वनितेला सहानुभूतीनें ) वनिता, तूं पण जा बघूं इथून यांच्याबरोबरच...

**वनिता०**—( कमळामावशीकडे कांहीशा दीन दृष्टीनें पहात ) जाऊं ?...

**कमळा०**—(वनितेकडे सहानुभूतीनें पहात) जा ! निश्चिंत जा ! पहायचं आतां काय काय होतंय् तें ! !–(कुंदा, वासंती, वनिता, सर्वांना ) जा–पोरींनों... हॉलमधून तसेंच ओटीवर जा आधीं—( त्या भांबावून मागें पहात जातात.)

[ विनय व कमळामावशी नुसती एकमेकांकडे पहात रहातात. कमळा-मावशी त्याच्याजवळ जाऊन वात्सल्यानें त्याच्या खांद्यावर हात ठेवते. इतक्यांत–]

: ११७६ :

**भाऊ०**—( पडद्यांतून जवळचा रागीट आवाज ) अरे कोणी घरांत आहे कीं नाही ?—गेला कुठें तो विन्या ?

**विनय०**—( गोंधळून ) आई, भाऊ आणखीच रागावतील ग, मी सांगूं लागलों आत्तां तर !—

**कमळा०**—( सहानुभूतीनें ) नक्की ठरवलंयूस ना तुझ्या मनानें विनू, हें लग्न करायचंच, म्हणून ?

**विनय०**—( अगतिकपणें ) हो ग आई...पण...

**कमळा०**—( धीर देत ) मग त्यांच्या रागाला का भितोस ?...तुला योग्य वाटतं तें स्पष्ट बोलायला तुला तोंड नाहीं ?—जरा, पुरुष हो !—

**भाऊ०**—( पडद्यांत... ) माझ्यासमोर ये म्हणावं त्याला !—गेला कुठें काळं करून ?

**: ११७७ :**

[ रागानें बेफाम झालेले भाऊ प्रवेश करतात.

कमळामावशी शांत निमूट रहाते. विनयही खालीं मान घालून गपचूप उभा रहातो.

विनयला पहातांच भाऊंचा थरकांप होतो. क्षणभर रागानें त्यांच्या तोंडून शब्द फुटत नाहीं...]

**भाऊ०**—( क्षणभरानें अडखळल्या शब्दांत संतापातिरेकानें ओरडत )...पाजी-बदमाश-हरामखोर-करंटा! जा! काळं कर या घरातून आतांच्या आत्तां!

**कमळा०**—( शांतपणें ) कशाला त्याला वेडेवांकडे शब्द हे ?...शांत व्हा !—शांत व्हा थोडे...

**भाऊ०**—(रागानें गुरगुरत कमळामावशीकडे पाहून) शांत व्हा म्हणे !—आतां मी मरेन या क्षणीं तरच शांत होईन !...

**कमळा०**—( समजूत घालण्याच्या स्वरांत, पूर्ण शांतपणें ) असं झालंय् काय एवढं...हें असं कांहींबाहींच अभद्र बोलायला ?...त्या दोघांनी ठरवलं लग्न, हा त्यांचा कदाचित् अविचार असेल...पण मग आपल्याला तरी नको का जरा शांत डोक्यानें विचार करायला ?...

**भाऊ०**—( उसळून ) शांत डोक्यानें विचार ?...या कारट्यानें मला असं खालीं मान घालायला लावल्यावर डोकं राहील तरी कसं शांत ठिकाणावर ?

**कमळा०**—( शांतपणें ) आजपर्यंत कधीं तो वांकडं वागलाय् का ?—

**भाऊ०**—( रागानें ) तर तर! हे शिकलेले गाढव ना-मनांत म्हणत होतों-असेनात का यांचे वाटेल ते बदलते आचार-विचार ! हा कॉलेजांत गेल्यापासून आईबापांच्या हयादींतच मिशा भादरूं लागला !...नाहीं आवडले त्यावेळीं तें मला-तरी असल्या गोष्टींत कधीं एका शब्दानें तरी बोललों होतों का मी ?-( एकदम रागानें उसळून ) पण हें हें...काय ?—बाप जिवंत आहे अजून



चांगला डोक्यावर नि असले हे लंपडाव ?...पांचट चाळे ?...नंगे नाच ??—

**विनय०**—(धीर करून अडखळत) भाऊ, जरा शांतपणें ऐकून घ्याल तर मी सारं नीट सांगतों...

**भाऊ०**—( रागानें...अंगावर खसकन ओरडून ) सारं कांहीं आधींच झालंय् नि आतां कशाला सांगतो आहेस ?—कांही बोलूं नकोस !...काळं कर इथून !—पाजी !—

**विनय०**—( रागारागानें ) काय बोलणार तुमच्याबरोबर अशा वेळीं ? जातों मी आई !—( पटकन् निघून जातो. )

**भाऊ०**—( उसळून ) जा जा ! चालता हो !—काळं कर—वाटेल तें कर—मर !—जा—

**: ११७८ :**

**कमळा०**—( आतांपर्यंतचा शांतपणा टाकून थरथर कांपत मोठ्यानें ओरडून भाऊंना एकदम दमांत घेत ) चूप !—गप्प रहा एकदम !...तुम्ही काय लहान पोर आहांत असं बडबडायला ?...कशाला हा तमाशा—पाहुण्यांना नि आसपासच्या लोकांना दाखवतां-ऐकवतां ? ( मोठ्या आवेशानें ) खबरदार एक शद्ब तोंडांतून काढाल तर !...विनू गेलाच तुमच्या पुढून निघून, त्याला एकवेना म्हणून !...आतां आधीं दारं घेते लावून...नि मग खुशाल ओरडा-बोला वाटेल तें !—निदान माझे तरी कान आतां खंबीर झाले आहेत सारं ऐकायला ?——

[ कमळामावशीच्या अनपेक्षित दटावणीनें, भाऊ दचकून एकदम गप्प होतात. कोचावर मान टाकून स्वस्थ बसतात.

कमळामावशी पटकन् दोन्ही दारें लावून परतते व भाऊंसमोर शिसवी पेटीवर बसते.

क्षणभर शांत...मग भाऊ रागारागानें एकदां कमळामावशीकडे पहातात.]

**: ११७९ :**

**कमळा०**—( थोड्या शांत स्वरांत ) माझ्यावर नाहीं का तोच प्रसंग ?

**भाऊ०**—( गुरगुरत ) पण हें सारं मला हा आज सांगतोय् एकदम ! तिकडे मुंबईला आतां त्याचं लग्न जवळ जवळ जमवून बसलोय् मी, तेव्हां !—शिक्षण कुठे चुलींत गेलं याचं ?...

**कमळा०**—( शांतपणें ) पण तो म्हणेल तुम्ही कोण आपल्या न कळत आपलं लग्न जमवणारे ?—

**भाऊ०**—( एकदम चिडून ) चूप...तूं आणखी जास्त फाजीलपणानें बोलूं नकोस !—मी ?—मी कोण त्याचं लग्न जमवणार ?...( ओरडून ) मी...मी त्याचा बाप !—

**कमळा०**—( पुन्हा अगदीं शांतपणें ) तें खरं आहे हो !—तरी पण त्याचं लग्न त्याला न कळत जमवणार तुम्ही ?

**भाऊ०**—( त्राग्यानें ) हें न कळत झालं ?—सांगणार नव्हतों मी ?...

**कमळा०**—( टोमण्यानें )...हो...सगळं ठरल्यावर—

**भाऊ०**—( रागांत ) त्याच्या वाईटासाठीं थोडंच करणार होतों सारं ? मी त्याचा हिंतचिंतकच आहे ना ?

**: ११८० :**

**कमळा०**—( समजावणीच्या स्वरांत ) पण त्यानेंहि आपल्या चांगल्या-साठींच तुम्हांला नकळत ठरवलंय् स्वतःचं लग्न !—तर तुम्ही मात्र असं त्याला मारायला उठणार ?...जिवाचा असा त्रागा करून घेणार ? ..( थोडा आवाज चढवून रागानें ) समजा, त्यालाहि एकदम कळलं कीं, तुम्ही जवळ जवळ त्याचं सारं लग्न ठरवलंय् नि त्यामुळें...तो तुम्हांला रागानें मारायला आला—तर तुमची काय शोभा राहिली ?...काय शोभा होईल ?—समजतं कां ?

**भाऊ०**—( किंचित् संयमानें ) पण तसं तो करील कसं ?—त्याला कांहीं पुढला मागला विचार ?

**कमळा०**—( उपहासानें किंचित् हसून ) वा, खासा न्याय ! . म्हणजे तुम्ही जें जें करतां तें चांगलं नि विचाराचं !...नि बाकीचे सगळे वाईट नि अविचारी ? तुम्ही आपल्या मुलाचं लग्न ठरवलंत तें विचार करून,...नि तुमच्या मुलानें अगदीं आपलं स्वतःचं लग्न ठरवलंन् तें जणुं काय अगदीं विचार न करतांच ?... ( रोखठोकपणें ) तो काय आतां लहान, अशिक्षित नि वेडाविंद्रा आहे ? निदान तुमच्या–माझ्यापेक्षां तरी जास्त शिकला आहे ना तो ?

**: ११८१ :**

**भाऊ०**—( रागानें व तुच्छतेनें ) शिक्षण !...हं...नि विचार म्हणे !...



कसले आले विचार ? हीं शिकलेल्या पोरांचीं तरुणपणचीं थेरं असतात नुसतीं !... चार दिवस गेले लग्नानंतरच्या उन्मादानें कीं चांगले डोळे उघडतील म्हणावं !...

**कमळा०**—( तरीही शांतपणें ) मग त्यावेळीं उघड्या डोळ्यांनीं आपसूक पाहील तो सारं पाहिजे तर !...पण त्याचे असें आजच जबरीनें डोळे उघडण्या-साठीं जीवाचा एवढा त्रागा तरी कशाला उगीच ?

**भाऊ०**—चूप !...तूं कांहीं एक बोलूं नकोस ! ( अधिक संतापून ) तूं ग कां वकिली करते आहेस त्याची, त्याची बाजू घेऊन ? माझ्याकडे ?...मोठा शिकलेला गाढव आहे म्हणतेस तो एवढा, तर त्याला स्वतःचं तोंड नाही ?— ( सहन न होऊन ओरडत ) असा माझ्यासमोर ये ना म्हणावं !...

**कमळा०**—( तितक्याच रागांत कठोरपणें ) पुन्हां ? तें कशाला ?...हा आपल्या चिडलेल्या वडलांचा आतांचा वेडाविंद्रा अवतार पहायला ?—

**: ११८२ :**

**भाऊ०**—( जळफळत व त्राग्यानें ) मग ? कां नाहीं येणार राग मला ? कां नाहीं ग होणार संताप जिवाचा ?...मी काय त्याला रस्त्यावरची एकादी भिकारीण शोधली होती, बायको म्हणून ?—आणि ही कोण म्हणतेस ती काय अशी मोठी स्वर्गांतून पडलेली अप्सरा आहे ?...तीच तेवढी सुखी करणार त्याला होय ?—नि जर माझ्या मनाप्रमाणें वागला असतां—मला समाधान देऊन आपलं लग्न केलं असतंन्, तर काय तो नरकांत पडला असता ?

**कमळा०**—( समजावीत ) नसतां पडला नरकांत !...नाहीं लाभणार त्याला कदाचित् सुख त्याच्या या लग्नानें—पण तुम्ही ठरवलेल्या लग्नानें तो जास्त सुखी होईल हें काय कागदावर लिहून देणार आहांत कां हो तुम्ही ? नाही ना ? मग ?—असेल त्याची चूक !...होईल त्याला दुःख !...पण त्याच्याच चुकीनें त्याला होईल तें दुःख !...तेवढंहि करायला त्याला अधिकार नाहीं ?...रागाच्या भरांत ढोरासारखं मारायला उठणं...असं वेडविद्र ओरडत सुटणं, हाच ना तुम्ही म्हणतां तो तुमचा मोठा विचारीपणा ?—

**भाऊ०**—( रागानें थरथरत ) तूं तूं मला आज मुद्दाम मुद्दाम खिजवते आहेस हें असं !

**कमळा०**—( उपरोधानें किंचित् हसून ) मी ?...मी कशाला बरं तुम्हांला खिजवूं ? परिस्थितीच खिजवते आहे तुमची तुम्हांला !

**: ११८३ :**

**भाऊ०**—( थोडा पारा उतरत ) हं !...काय करूं आतां ?...हें कळल्यापासून मला आज काय वाटत असेल याची कल्पना नाहीं तुला !

**कमळा०**—( उपहासानें ) चांगलीच आहे कीं कल्पना मला ! होऊन गेलेल्या प्रत्येक दिवसाचे अनुभव आहेत माझे तसले !—

**भाऊ०**—( चमकत ) काय म्हणालीस ?

**कमळा०**—( शांतपणें ) कशाला देऊं त्यांची आठवण तुम्हांला ? निदान विनूची मुंज नि गंधाचं लग्न तरी तुम्हाला आठवतं असेल कीं ! सारे कारभार गुपचुप ठरवलेत ! देवकाच्या नि समारंभाच्या वेळीं मोठ्या अधिकारानें हाताला हात लावायला तेव्हढं सांगितलंत नाहीं कां तुम्हीं मला ? त्यावेळीं मला आंतल्या आंत जसं वाटलं असेल तसंच कांही तरी आज तुम्हांला वाटलं असेल !

**भाऊ०**—( जरा रागांत ) तें जुनं कशाला मला पुन्हां सांगतेस ? अशा वेळीं अवेळीं दुःखावर डागण्या द्यायला ?

**कमळा०**—( उपरोधानें ) तें जुनं नको ना ? बरं तर मग नवं, अगदीं आजचं, या विनयच्या लग्नावेळचंच सांगूं ?...आजच्या घटकेचा हा तुमच्या त्रागा झालाच नसता, तुमचं मन जरादेखील दुखावलं गेलं नसतं तुमचा विनय तुमच्या इच्छेप्रमाणें अगदीं सहज त्या कोण त्या रावबहादुरांचा जावई व्हावयाला तयार झाला असता, तर त्यावेळीं, मी वाढवलेल्या माझ्या विनयचं, तुम्हीहि मारे 'विचारानंच ठरवलेलं लग्न' म्हटलं असतं त्याला तुम्ही ! त्याची तयारी....सारं साजरं करण्याची माझ्यावर पाळी आली असती ! मग माझी ती सून लग्नमंडपातच प्रथम मला दिसती ! त्यावेळीं तिला मांडीवर घेतांना मला आंत जें भयंकर दुःख झालं असतं, तेंच-तसंच भयंकर दुःख तुम्हांला याक्षणीं होत आहे !...हो ना ?

**: ११८४ :**

**भाऊ०**—( निश्वास टाकून ) तूं फार फार कठोर बोलते आहेस आज !

**कमळा०**—हो !—तुमचा हा वेडा अविचार पाहून नि फक्त आजच बोलतें आहे असं...पण नुसतं बोलतेंच आहे कठोर !...(निश्वास) मला कठोर



वागतां कधींच आलं नाहीं जन्मांत ! म्हणूनच ना माझी अशी स्थिति झाली ?

**भाऊ०**—(दुःखानें–) माझ्या मनाची आज झालेली स्थिति तुला काय सांगूं ?

**कमळा०**—(सहानुभूतीनें) आहे मला जाणीव !...तुमचें दुःख...तुमचा राग सारं सारं मला कळतं !

**भाऊ०**—( निश्वास ) काय कळणार, कपाळ ?...

**कमळा०**—( गंभीरपणें ) स्वतःला जखमांचे खूप व्रण असले म्हणजे दुसऱ्याच्या भळभळणाऱ्या जखमेची कळ आपल्याला पुरी समजते...उलट त्या दुःखाची जास्तच जाणीव होते !

**भाऊ०**—( जरा सहानुभूतीचा संसर्ग होऊन किंचित् शांतपणें ) विनूनें स्वतःच ठरवल्याचं हें ऐकून तुला कांहींच कां नाही वाटलं ?...

**कमळा०**—हो वाटलं ना ! खूप खूप वाटलं ! वरवर शांत राहिलें तरी गेले पांचसहा दिवस मी खूप धडपडत होतें मनांत...अगदीं जळत होतें...पण काय उपयोग ?...

**भाऊ०**—( आश्चर्यानें ) पांचसहा दिवस ?—विनू तर कालच आला ना इथें ?

**कमळा०**—( शांतपणे ) हो...पण त्याचं पत्र पांचसहा दिवसांपूर्वीच येऊन थडकलं होतं ना माझ्याकडे !

**भाऊ०**—( पुन्हा आश्चर्ययुक्त रागानें ) काय ?...आणि तरी हें तूं मला सांगितलं नाहीस, मी रावबहादुरांकडे मुंबईला जायला निघालों त्यापूर्वी ?

**: ११८५ :**

**कमळा०**—( उपहासात्मक ) तुम्ही मुंबईला रावबहादुरांकडे नि विनूचं लग्न जमवायलाच जाणार होतां,...असं काय स्वप्न पडलं होतं मला ? तरी मी कमीपणा घेऊन विचारलं नाही कां त्यावेळीं ?...पण तुम्ही आपल्याच पुरुषी घमेंडीत होतां ! नाही म्हणायला काळेबापूंनीं सांगितलं...पण तेंहि आम्हा बायकांना पुरुष नेहमी चढेलपणें हिणवतात, तसं !—

**भाऊ०**—( स्वतःवर त्रागा करून ) अग पण तें मी घाईघाईनें सांगणार कसं होतों तुला त्यावेळीं ?—

**कमळा०**—( रागानें ) आणि मग तुम्ही घाईघाईनें घरांतून बाहेर पडतांना त्या काळेबापूसारख्या परक्या माणसापुढें मी तरी काय नि कसं सांगणार

होतें हो तुम्हाला ?...तशा परक्यापुढें डंका पिटवला असंच वाटलं नसतं कां तुम्हाला ?...तुमच्या मनाप्रमाणेंच सारं अगदीं गपचूप करायचीं तुम्हाला जर इतकी घाई तर मी आपणहून कां सांगायचं तुम्हाला ?--

**भाऊ०**—( जरा अधिकारी तोऱ्यांत ) काय झालं असतं, सांगितलं असतंस तूं मला तर ?

**कमळा०**—झाली असती, आज केलीत तसलीच आदळआपट, शिवीगाळ नि पोरकट त्रागा !--त्या काळेबापूंसमोर !!

**भाऊ०**--( रागावत ) पुरे कर तुझं ब्रह्मज्ञान !...( एक निश्वास टाकून गप्प रहातात; मग- ) हं...बापाला बाप म्हणणारीं मुलं राहिलीं नाहीत आतां, एवढं खरं !—

**कमळा०**—( उपहासानें ) पण आश्चर्य नको वाटायला त्याचं ! सगळेच पुरुष असे स्वार्थी नि बेदरकार असतात !...मला सांगा, आज बत्तीस वर्षें संसार केला या घरांत तुमचा मी ! स्वतःच्या स्वार्थाच्या गोष्टी सोडल्या तर तुम्ही तरी सप्तपदी चालवलेल्या आपल्या बायकोला बायको म्हणून कितीसे चाललांत, वागत आलांत ?—

**भाऊ०**—( त्राग्यानें गुरगुरत ) उगीच नको बाई मला अशी टोंचकं बोलून बोलून छळूंस !...जरा स्वस्थ तरी पडूं दे मला !--

: ११८६ :

**कमळा०**--( सहानुभूतीनें ) मी काही कोण तुमची शत्रू नाही तुम्हाला छळायला ? पडा,...स्वस्थ पडा !...शांत विचार करा. (जवळ जाऊन आस्थेनें) चेपूऽ,चेपूं का डोकं ? बरं वाटेल जरा ?--

**भाऊ०**--( अगतिकपणें ) अंऽ?...हं...चेप...कानशीलें चेप...शिरा तडतडताहेत!--( थोडावेळ शांतता...कमळामावशी भाऊंचे डोकें चेपते. )

**कमळा०**—( चेपतां चेपतां अनुनयी स्वरांत ) असं पहा...आपल्याला आवडलं नाही, तरी पण विचारच केला पाहिजे आतां आपल्याला !...आपल्याला खूप वाटतं, पण तें मनांतल्यामनांत धीरानें दडपून टाकणं यांतच आपली खरी शोभा !

**भाऊ०**—( सुस्कारा टाकून ) आऽऽहाऽ !—हं...पुरे ! थोडं हलकं



झालं डोकं...बरं वाटलं...( कमळामावशी थांबते; भाऊ क्षणभर गप्प राहून निश्वास टाकतात. )

**भाऊ०**--( शांतपणें ) ऐकूनही घेतलं असतं मी सारं त्याचं !... ( पुन्हा राग उसळून ) पण हें काय ? आमच्या जातींत कोण भांचोद मुलीच नव्हत्या ?-आतां हें जगजाहीर झाल्यावर चार लोक माझ्या तोंडांत शेण घालतील. तेव्हां काय करूं ? ( मान खालीं घालीत )...च्चच्...फुकट,-सारं आयुष्यच फुकट गेलं माझं !...

**कमळा०**—( सहानुभूतीनें समजावीत ) मलाहि नाही आवडलं तें... पण विलायतेतली मडम घेऊन आला असता तर ?--नाही तर खानपाणंदीकरां-सारखं केलं असतन् तर ? आज समाधानाला जागा तरी आहे ! हा आपल्याला आपला पहिला अनुभव ! पण अशीं काय लग्नं झालीं नाहीत...होत नाहीत बाहेर ?

: ११८७ :

**भाऊ०**—( उसासत-) नुसत्या बोलायच्या नाही आहेत या गोष्टी !- हजारांना हजार तोंडं !...त्यांचे बोल खावे लागतील आतां एकट्या मला !-

**कमळा०**--( शांतपणें )--लाख लोक लाख बोलतील ! आपल्या मनाला तेवढं पटवलं आपण म्हणजे झालं ?

**भाऊ०**--( रागांत-) शास्त्र नाही...धर्म नाही--धर्मलंड लेकाचे !--

**कमळा०**—( थंड स्वरांत ) चालेल ! तें एकवेळ पत्करलं...अनीतीनें तर नाही ना वागला तो ?--अजून आपल्या वधूसह आपल्याकडे येऊन संमति विचारण्याइतका तरी माणूस आहे तो !-तेवढाच पुष्कळ मान समजायचा ! ( इषारा देत ) यावेळीं त्याला विरोध करणें मूर्खपणाचं होईल हो !--त्याचे परिणाम विपरीत होतील, पहा !--

**भाऊ०**—( पुन्हा चिडून ) हो हो तर ! त्यानें मन मानेल तसं धरबंध सोडून वागावं...नि आम्ही फक्त होला हो म्हणावं...नाही करूं तसं तर विपरीत परिणामहोईल म्हणे...( रागांत ) जाईना का गेला तर काळं...करून आम्हांला कांही गरज नाही त्याची...बस म्हणावं तिलाच घेऊन कुठे तो—

**कमळा०**--( शांतपणें ) खरंच का वाटतंय् तुम्हाला तसं ?...विचारा आपल्या मनाला-बरं ! अजून कधीं मधीं कां होईना तो येतोय्, येईल आपल्यांत... पण मग दिसणारही नाहीं कधीं !...चालेल ?

**भाऊ०**—( सांवरून पण त्राग्यांतच-) जिवाचा संताप झाला कीं काय सांगूं आणखी मी ?...( शांत होत...उसासून ) हं...खरंच पण मग असंही वाटतं, होईना का त्याच्या मनासारखं...असेना का कुठेही सुखी...

**कमळा०**—तेंच म्हणतें मी !--शब्दानें शब्द वाढतो...रागानें राग दुणावतो !...दहा अंक मोजावेत आपण...( किंचित् थांबून...) असल्या तुमच्या रागानें त्याचा-आपला नुसता संबंध तुटण्यावरच नाही भागायचं एखाद्यावेळीं...

**भाऊ०**—( न समजून—) म्हणजे ?—म्हणायचंय् काय तुला ?—

**कमळा०**—( शांतपणें-) आज तो तुमच्याकडे तुमचा मुलगा म्हणून विनन्ति करायला येतो आहे...उद्यां तसंच वाटलं त्याला तर तुमच्याशी फक्त कायद्याची भाषा बोलायला येईल...

**: ११८८ :**

**भाऊ०**—( गोंधळून ) कायद्याची भाषा ? ..म्हणजे ?...

**कमळा०**—नाही ना आलं हें तुमच्या लक्षांत . म्हणूनच म्हणतें नुसत्या वेड्या रागापेक्षां नि त्राग्यापेक्षां जरा विचार करा...

**भाऊ०**—(जरा कावून...) कशाबद्दल म्हणते आहेस तूं ?—मला नाही समजलं अजून...

**कमळा०**—उगीच रागावणार नसाल पुन्हा, तरच सांगतें...

**भाऊ०**—( डोकें दाबीत...) सांग...सांग...काय वाटेल तें सांग... आज माझं डोकं फुटून गेलं तरी हरकत नाही...

**कमळा०**—एवढी साधी गोष्ट देखील तुमच्या व्यवहारी दृष्टींतून कशी सुटली ? ( किंचित् थांबून ) मघां त्याला म्हणालांत चालता हो घरांतून...काळं कर !...कोणाच्या हो घरांतून चालतं हो म्हणणार तुम्ही त्याला ?...

**भाऊ०**—( रागांतच पण जरा सांवरत ) तें संतापांत म्हणालों मी... ( पुन्हा थोडा राग चढून ) पण त्यानें इतकं भयंकर दुखवलंय् मला...मग काय झालं म्हटलं तसं तर ?-

**कमळा०**—नाही ! नाही चालणार म्हणून तसं !...मी आपली ऐकतें... तुमचं वाटेल तें...पण तो एक पुरुष आहे ! असं पहा...मनुष्य एकदां तेढ्यांत शिरला, कीं, तो लहानमोठं...आईबाप...भाऊ, कांहीं पहात नाहीं !-अशावेळीं



तो कायदेशीर सवाल टाकील तुम्हाला—' कोणाच्या घरांतून मला चालता हो म्हणतां ?— हें कांहीं तुमचं स्वतःचं घर नाहीं !...माझ्या आजोबांचं आहे घर-मी त्यांचा खराखुरा वारसदार सज्ञान नातू आहे ?'—

**भाऊ०**—( मोठ्यानें दचकून ) काय म्हणतेस काय ?...असं म्हणेल मला आपला विनू ?-

**कमळा०**--( वात्सल्यपूर्ण जाणीवेनें ) नाही नाही...तो तसा दुष्ट नाही; तसं म्हणायला उलटं काळीजच लागेल !-माझा विनू अगदीं मऊ मनाचा आहे... ( पुन्हा कठोरपणें ) तरी कोणी सांगावं ? कल्पनाही नव्हती तरी हें तुमचा संताप होण्यासारखं आज ऐकलंत ना ?...मग असाही प्रसंग ओढवला तुमच्या-त्याच्या विरोधांतून, तर आश्चर्य नको वाटायला त्याचंही !...काय शोभा राहील तुमची-माझी अशावेळीं ? सर्वच दृष्टीनें तें हात दाखवून अवलक्षण !—

**: ११८९ :**

**भाऊ०**—( दुःखातिरेकानें उसासत ) हं...काय काय होतंय् हें आज ? सर्वच दृष्टीनें आज कसा अगदीं नाडल्यासारखा...कैचींत सांपडल्यासारखा झालोंय् मी !...मानहानी !...मानहानी ! नि याला कारण...ज्याच्यावर मी मनापासून प्रेम करतों तो माझा मुलगाच !

**कमळा०**—( सहानुभूतीनें ) इलाज नाहीं त्याला आपला !—( भाऊ गप्प बसतात. )

**भाऊ०**—(निश्वसून) आतां मी त्या रावबहादुरांना काय नि कसं सांगूं ?

**कमळा०**—( निर्विकारपणें... ) जसं काल तुम्हीच जमवून आलांत... तसंच उद्यां जाऊन मोडून यायला पाहिजे तें लग्न तुम्हालाच !

**भाऊ०**--( धुश्श्यांत... ) तुम्हा बायकांना बोलायला काय पटकन्... जमवलंत् तसं मोडा म्हणे !—जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे !

**कमळा०**--(तरी शांतपणेंच ) मला आपलं कळतंय् तें एवढंच...दोन्ही बाजूनी एकच !...टाकलेला शब्द खरा करायचं म्हटलंत तरी अधिकच काळोखी फासली जाईल...नि हाततोंडाशी...नांवारूपाला आलेला आपला वडील मुलगाही हातचा गमावून बसाल !—

**भाऊ०**—( कुर्‍यांत रागानें ) हं ! ही नुसती मनाला दुःख वाटण्याची

बाब नाही ! व्यवहार किती गुंतागुंतीचा असतो,...पुरुषांच्या पायांतला चढाव त्यांना कुठे बोचतो,...तें तुम्हा बायकांना काय कळणार ?—

**कमळा०**—( अजून शांतपणें ) तसली गुंतागुंत शक्य तों होणारच नाही...नि झाली तर आंत न अडकतां स्वतःला बचावून नीट सुटायचं कसं...हें चांगलं जाणतो, त्यालाच पुरुष म्हणतात !—त्याबद्दल असं नुसतं जागच्या जागीं कुरकुरून कसं चालेल ?—

**भाऊ०**—( रागानें ) असं नुसतं बोललं म्हणजे झालं तेवढं !...हं...सत्रा ठिकाणीं पुरं पडावं लागतं आम्हाला ! चुलीजवळची सिधी अक्कल काय कामाची तुमची तिथें ?—

: ११९० :

**कमळा०**—( एकदम रागावून ) काय ? तुमच्यांतला घमेंडखोर पुरुषपणा जागा झाला वाटतं पुन्हा ?...कशाला आतां हुज्जत घालायला निघतांहांत आज आणखी ?...

**भाऊ०**—( बेफिकीरीनें ) यांत हुज्जत कसली ? सरळ गोष्ट आहे !—

**कमळा०**—( अधिक रागावून...) हुज्जत नाही तर काय ? केवळ पुरुष म्हणून पुरुषांना मान द्यावा, या सात्विक वृत्तीनेंच आम्ही नेहमीं नमतं घेतों...गप्प बसतों अनेकदां !...पण तेवढ्यांत समाधान मानतील नि झांकल्या मुठीनें आपला मान राखून रहातील तर ते पुरुष कसले ?—पण मूर्खपणा हा जन्मसिद्ध हक्कच आहेना पुरुषांचा ?—त्याला काय करणार ते ?...

**भाऊ०**—( ताठ्यांत ) काय ? पुरुषांनी आपण पुरुष आहोंत असं बायकांकडे म्हटलं तर चुकलं ?—

**कमळा०**—( कठोरपणें ) नाहीं चुकलं !...पण पुरुषांना उलट आपण देवच आहोंत असं वाटूं लागतं ना !...त्याला काय करायचं ? त्यांचाही दोष नाही म्हणा त्यांत !...( निश्वास ) आम्ही स्त्रियांनीच त्यांना देव केलं आहे, आमच्या भाबड्या भावनांचा शेंदूर फासून !

**भाऊ०**—( रागारागानें ) कां अशी बडबडतेयूस ?...माझ्याशी काय संबंध या तुझ्या बोलण्याचा ?—

**कमळा०**—(रागानें व स्पष्टपणें) संबंध ?...पुष्कळच आहे !...सांगूं ?



आजपर्यंत मी वेळोवेळीं बोललें नाही...आजही बोललें नसतें...पण आज इतकं झालं तरी शहाणे नाहीत झाला तुम्ही ! आतां नाही राहवत मला !...बोलतेंच !—( किंचित् थांबून )...स्त्रियांची नि त्यांच्या अकलेची अवहेलना निदान तुमच्या तोंडीं तरी नाही शोभत !...समजलं ?...

: ११९१ :

**भाऊ०**—( जरा रागांत...) काय ?...काय म्हणालीस ?

**कमळा०**—( न डगमगतां ) होय ! अगदीं त्रिवार होय !—एखाद्या सामान्य स्त्री इतकेच तुम्हीही चिडखोर आहां !...ती भाबडी, हळवी, नुसती भावनाप्रधान अविचारी असते ना ?...तुमच्यांत त्याहून काय निराळं आहे ?

**भाऊ०**—( सहन करीत ) काय ? काय ?—

**कमळा०**—( त्याच ओघांत रागानें थरथरत ) पुरुषांचा विचारी कठोरपणा तुमच्यांत औषधालाही मिळणार नाहीं !...कशाला माझी नि आम्हा स्त्रियांची किंमत करायला जाता ?

**भाऊ०**—( थंडावून अडखळत ) अग पण—हा बाहेरचा व्यवहार—

**कमळा०**—( पुन्हा उसळून ) ते तुमच्या व्यवहाराचं अवडंबर तरी कशाला ? तुम्ही म्हणतां ती आमची स्त्रियांची चुलीजवळची सिधी अक्कल देखील आपल्या व्यवहारांत तुम्ही कधीं दाखवल्याचं आठवत नाही मला...माझ्या संसारी आयुष्यांतच मला पहायला नाही मिळालं तें !...

**भाऊ०**—(थोडें वरमून हताशपणें) तूंच म्हणतें आहेंस हें ?...हरे राम !

**कमळा०**—( कठोरपणा न सोडतां ) हो, मीच ! आजपर्यंत तुम्ही केवळ स्वतःच्या पुरुषी सत्तेनें, अधिकारानें आंधळे झालां होतां !...त्यांत पुन्हां तुमची बायको फारच शांत निघाली;...ती मिटल्या तोंडानें सारं सहन करीत होती. हातानें होईल तितकी आजपर्यंत मदत करीत राहिली !...तिनें तुमचा संसार दक्षतेनें संभाळला !—तुमच्या मुलांना जन्म दिला—त्यांना स्वतः खस्ता खाऊन नि तुमच्या बेफिकीर लाथाही खाऊन संभाळलं—वाढवलं !...पण त्यामुळें तर तुम्ही अधिकच गाफील झालांत...शेफारलांत !—( भाऊ मान खालीं घालतात.)

: ११९२ :

**भाऊ०**—(अगतिकपणें) बोल बाई...घे बोलून !...आजपर्यंत आम्हाला

घरांतलं सगळं संभाळायची कसलीच धडपड नाही करावी लागली, म्हणायचं !--

**कमळा०**—( रागानें... ) पण मामंजींचंच वैभव आहे तसं मोठं... धडपड केली नाही तरी व्यवहार चालावेत !...क्षणभर तुम्ही बाजूला बसलांत, तर विनूलाही तुमची गादी चालवता येईल कीं धडपडीशिवाय !...मला नका कौतुक सांगू तें !...

**भाऊ०**—( हतबलपणें )-बोल बोल !...आज आलाच आहे तसा प्रसंग...

**कमळा०**—( बोचकपणें ) तुमच्या आयुष्यांत आज तरी धरणीकंप झालाय् तो तुमच्यासारख्या एका दुसऱ्या दुबळ्या पुरुषानें तुम्हाला मारलेल्या मर्मी धडकीमुळें !--त्यामुळेंच तुमचे मनांतले तट वाळूप्रमाणें ढांसळले !-क्षणभर तुम्हाला भोंवोळ आली मघां ! रागानें धुंद-वेडे झालांत !-पण मग पुरुष ते पुरुषच !...सुंभ जळला तरी खोट्या पुरुषी घमेंडीचा पीळ नाही सुटत तुमचा अजून...

**भाऊ०**—( अधिकच अगतिक होऊन निश्वास टाकीत ) सुंभवीळ...मला कांही सांगू नकोस !—कधीं नव्हतीस ती तूंही आज मला असं बोलूं लागलीस, एवढं खरं !...मला सगळं जगच खायला आल्यासारखं वाटतंय आज !— ( डोकें एकदां घट्ट दाबतात; सुस्कारा सोडतात ).

**कमळा०**—पण तरी सत्ताधीशाचा आव आहेच कीं अंगांत अजून—

**भाऊ०**-हं...मामांनंतर सरळ मार्गानें व्यवहार पाहिला; कांहीं अनीतीचं माझ्या हातून घडलं नाहीं;...कोणाला लुबाडलं नागवलं नाहीं;...कोणाचं कर्ज केलं नाही;...कसली मोठी चैन केली नाही जन्मांत !...तरी तूं मला हें बोलावंस ? ( निश्वास ) हं...नशीब माझं ?...

:११९३:

**कमळा०**—( रागानें ) हे काय पुरुषांच्या अंगचे गुण वाटतं ?—दुसरं आणखी केलंय् काय तुम्ही आयुष्यांत ?

**भाऊ०**—( निश्वास टाकत ) माझ्या एवढ्या शिकलेल्या मुलानेंच आज सुरवात केली आहे अपमानाची एकदां;...आतां मला कोणीही लाथा माराव्यात !... ( त्राग्यानें, पण शांत स्वरांत ) मारा...मारा...सहन करायला मान वांकवलीच पाहिजे मी !...दुसरं काय ?...

**कमळा०**—( क्षणभर गहिंवरून विचलित होते; पण पुन्हा कठोर होऊन )



हेंच तें !...मी बोलतें तें कठोर असलं तरी आजच प्रथम प्रसंग आला म्हणून खरं खरं तें बोलतेंय् !...आणि तरी त्या लाथा वाटतात तुम्हाला ? इतकंच नव्हे तर त्या सहन करायला मानही वांकवायला तुम्ही तयार !—

**भाऊ०**—( हतबलपणें ) मग काय करणार मी दुसरं ?—

**कमळा०**—( चिडून ) हाच ना तुमचा पुरुषपणा ?...मग त्यापेक्षां आम्ही बायका बऱ्या !—तुम्ही मघां विनूवर हात टाकायला निघाला होतां, रागांत !—माझ्या या बोलण्याचा तुम्हाला राग येऊन तुम्ही माझ्या एखादी खाडकन् थोबाडीत मारली असतींत तरी देखील आनंदच वाटला असता मला त्यामुळें !...पण तेंही होत नाही तुमच्या हातून !—

**भाऊ०**--( त्या कल्पनेनेंच दचकून ) मी ? मी काय रानटी वारली-काथोडी आहे...आपल्या बायकोवर हात टाकायला ?...( किंचित् थंड विचार करीत ) तूंच माझा संसार थाटलास...रात्रंदिवस खपून तूंच तो वाढवलास !... त्याबद्दल मला काय वाटतें मनात तें माझ्या मनाला ठाऊक !...तुला कशाला सांगू ?...तूं वाटेल तें बोललीस तरी अशा साध्वीवर रागांतही मी हात टाकणार नाहीं !—

:११९४:

(कमळामावशी थोडी द्रवते पण पुन्हा कठोर होते...)

**कमळा०**—(क्षणभरानें) पण या घरांतल्या लाथा पत्करल्या, मी म्हणतें-बाहेरच्या चोरापोरांच्या लाथांनाही तुम्ही माना वाकवतां ! त्यांनी तुम्हाला तोंडदेखलं चांगलं म्हणावं म्हणून त्या हसत हसत हरघडी पचवतां...तेंही सारं पुरुषांना शोभण्यासारखंच,. नाही कां ?—

**भाऊ०**—( हळूच वर पहात ) काय केलं मी ?

**कमळा०**—( रागांत ) चोरांना साव ठरवून डोक्यावर चढवायचं !—त्या बगळ्या साधूंशीं भीडमुर्वतीची भागीदारी करायची ! त्यांच्या नादीं लागून लाखाचे बारा हजार करायचे ! शेवटीं प्रत्येक धंद्यांत मूर्खपणाचे नि तोट्याचे एकमेव मालक आपण...नि फायद्याचे मालक ते एकटे !...( तुच्छतेनें ) हं—

**भाऊ०**—( अपराधी मनानें ) आले चारदोन व्यवहार आंगलटी हें खरं !...पण—

**कमळा०**—(रागांत) हाच ना तुमचा...आम्हीं बायकाच्या चुली-जवळच्या सिध्या अकलेला हसणारा पुरुषपणा ?... (निश्वास) म्हणूनच असल्या पुरुषांच्या आसऱ्याला रहात असणाऱ्या आम्हा बायकांचं जिणं अधिकच मेल्याहून मेलं होतं !—(क्षणभर शांत; भाऊही निमूट बसतात.)

**: ११९५ :**

**कमळा०**—(क्षणभरानें, रागांत) ते तुमचे प्रतिष्ठित चोर-काळेबापू ! आज इतकी वर्षे पहात आहे मी...तुमच्या, घरच्या बाहेरच्या,...साऱ्या व्यवहाराच्या कोणत्याही गुंतागुंतींत त्यांचा हात असतो !...एवढंच काय...त्यांनीं पसरलेल्या कोणत्याही गुंतागुंतीच्या जाळ्यांत तुमचा हात...तुम्ही स्वतःच पूर्णपणें अडकलेले असतां ?—हो कीं नाहीं ?...उत्तर द्या ना ?—

**भाऊ०**—(दचकून...) काय ?...हें तुला कसं कळलं ?...

**कमळा०**—(लक्षांत येऊन, पण साळसूदपणें) मला काय कळलं, म्हणतां ?...

**भाऊ०**—(तोंड फिरवून—) रावबहादुरांना त्यांच्या मुलीबद्दल रुकाराचा शब्द मी दिलाय्...त्यांत आतां काळेबापू...

**कमळा०**—(जरा बेफिकीर स्वरांत पटकन्) मला हो काय माहीत असणार तुमचे व्यवहार ?...पण काळेबापू काय...ईश्वरासारखे सर्वव्यापी आहेत तुमचे !...(रागानें) तो कृष्णसर्प मेला इतकीं वर्षं तुमच्या छातीवर निवांतपणें फिरतोय्...पण तरी डोळे बंद करून पडणार तुम्ही !...मऊ हृदयाचे ना ? अगदीं तो पुरा दंशकरीपर्यंत हळुवार हातानें अखेरपर्यंत थोपटतच रहाणार तुम्ही त्याला !...

**भाऊ०**—(न आवडून—) ऐक...उगीच कोणाला कांहीं तरी बोलूं नये असं !

**कमळा०**—(रागानें) उगीच ?...असं बोलूं लागलांत तुम्ही म्हणजे मला रागही येतो नि हसूं ही येतं !...तुम्ही काय ? हलाहल पचविणारे मोठे सांबच पडलां आहांत की नाहीं ?...त्या गोडगोड बोलणाऱ्या नि हळूच दुधांत गरळ ओकणाऱ्याचं विष तुम्हांला कधींच बाधणार-भासणारही नाहीं !

**भाऊ०**—(हळूंच) त्यांना का दोष देते आहेस त्यांत ?—

**कमळा०**—(रागानें) हो बापूंचा नाही, तुमचाच दोष तो ! (किंचित थांबून) तुमचं व्यवहाराचं काय वाटेल तें असेना तिकडे...मला काय करायचंय् ?



पण तो माणूस म्हणूनही महासर्प आहे ! एकदां लांबूनच त्यानें मला दंश करण्याचा प्रयत्न केला. नि तेवढ्यावरूनच मी त्याची पारख केलीय् पुरी...

**भाऊ०**—(जरा अप्रिय वाटून, भीरुपणें—) कशाला काळेबापूंना टाकून बोलते आहेस ? उगीच हवं कशाला आपल्याला दुसऱ्यांचं, नाही तें...

**: ११९६ :**

**कमळा०**—(एकदम संतापून—) दुसऱ्याचं हें ?...माझं स्वतःचं !—पण तुम्हाला कशाला आठवेल ?...

**भाऊ०**—(भांबावून) काय आठवायचं ?...

**कमळा०**—त्या वेळीं तरुण होतें मी ! तुम्ही ही तरुण होता...तो काळे-बापूही तरुण होता !...कुंदा जन्मली त्या आधींचा प्रसंग आहे;...तो एवढा मोठा धंदेवाला नि स्वतंत्र नव्हता त्यावेळीं;...मामंजी गेले होते, तरी काळेबापू थोडा फार आश्रितच होता, या आपल्या घराचा !...बायकोमुलं असून, अजून बिऱ्हाड केलं नव्हतंन् ! (भाऊंचा चेहरा पालटतो.) मग मेल्याला एके दिवशी दुर्बुद्धी सुचली ! आणि मी—त्याच्या आश्रयदात्या मामासाहेबांची प्रत्यक्ष सून,...घरांत एक दिवस एकटीच आहेसें पाहून, त्यानें नको तो लघळपणा करण्याचा,...माझ्यावर हात टाकण्याचा प्रयत्न केलान् !

**भाऊ०**—(हतबलपणें) कशाला उगाच जुंन्या गोष्टी बडबडते आहेस आज त्या ?—(भाऊं हळूंच मान फिरवतात व शेवटीं गप्प बसतात.)

**कमळा०**—(न थांबतां) त्याचा मी धीरानें प्रतिकार केला. त्याचा धिक्कार केला ! तेवढ्यांत कोणी आलं ! ओशाळून तो धूम पळाला...आठवतं का हें ?—(भाऊ वरमून मान पुन्हां खालीं घालतात—पण बोलत नाहीत.) कशाला आठवेल ?—कारण मी त्यावेळीं माझ्या तरुण पतींना सांगितलं...पण त्यांना राग आला नाही;...त्यानी डोक्यावर बर्फाची लादी,...कानाला दडे नि तोंडाला कुलूप घातलं होतं !...

**भाऊ०**—(हतबलपणें) जाऊं दे !...झालं गेलं,...होऊन गेलं !

**कमळा०**—(रागानें) तेंच ना ! दुसऱ्यांना दुखवायला तुम्ही कसे तयार होणार ? त्यावेळींही तुम्ही मला असंच म्हणालात,...'चल्, तुला कांहीं तरी संशय

आला असेल उगीच !' (निश्वास टाकते) हं...आणि त्यानंतरही तो कृष्णसर्प अगदीं आजपर्यंत या घरांत उजळमाथ्यानें वावरत आहे—

: ११९७ :

[ भाऊ थोडावेळ अगदीं गप्प बसतात; कमळामावशी निश्वास टाकते. ]

भाऊ०—( थोड्या वेळानें हळूंच चोरट्या शब्दांत ) पण आतां या मोड-लेल्या लग्नावर अवलंबून असलेल्या व्यवहाराबद्दल काय सांगूं मी काळेबापूंना ? ( सुस्कारा टाकून ) मोठं त्रांगडं झालंय् शिंचं !...

कमळा०-(धिक्कारात्मक-) हं-तो तुमचा तरुणपणांतला पुरुषपणा...नि हा आतां उतरवयांतला !...(संतापून) काळेबापूंना काय सांगूं म्हणे ?...अगदीं कुठल्याही क्षणीं काळेबापूंना एकच गोष्ट सांगायला हरकत नाहीं...

भाऊ०--( आशेने व अधिरपणें ) कोणती ?

कमळा०-(पटकन् रागानें) हेंच सांगायचं, कीं, 'आतांच्या आतां येथून चालता हो !...नि पुन्हा या घराची पायरी चढूं नकोस जन्मांत !'...

भाऊ०--( विरस होऊन रागात्राग्यानें ) पैशाच्या नडी माहीत नस-लेल्या बायकांनीच एकदम बोलावं असं हें...

कमळा०—( रागानें आवाज चढवून ) नि हें आतां बोलतांहां तसं बायकी पुरुषांनीच बोलावं आपल्या बायकांपुढें...

: ११९८ :

( बाहेरून लांबचो हांक ऐकूं येते...' भाऊसाहेब ?...अहो भाऊ... आहेत कां घरांत ?' )

भाऊ०—(गोंधळून गडबडीनें) कोण काळेबापू आले वाटतं ?...जा !... तूं आंत-जा आतां...

कमळा०—( रागानें ) मी आंत जाऊं ?...आणि तें का म्हणून ?...

भाऊ०—( भांबावून ) अग, त्यांना आतां हें सारं...नि दुसरं व्यवहाराचं सुद्धां कसंबसं समजावून सांगायचंय् मला !...

कमळा०—(जागची न हलतां नि कठोरपणें) हें सारं?...म्हणजे विनय-वनितेचं लग्नाचंच ना ?...तें कांही मला गुपित नाही !...नि तुमचं व्यवहाराचं बोलणं देखील जरा ऐकतें कीं मी आज !—पाहूं या तर खरं, पुरुष आपले गुंतागुंतीचे व्यवहार नेहमीं सोडवतात कसे तें !



भाऊ०—( अगतिक होऊन पण रागात्राग्यानें ) फाजीलपणा पुरे झाला तुझा !—जा बघूं...तूं असलीस म्हणजे आम्हाला नीट बोलतां येणार नाही !—

कमळा०--( उपहासानें हंसत...) आम्हां दुबळ्या बायकांना इतके घाबरतां तुम्ही पुरुष ?...

भाऊ०—( अधीरपणें ) सांगतों तें ऐक !...जा...आंत जा. आधीं !—

कमळा०—( एकदम रागानें...) गप्प रहा अगदीं !...तुम्हाला बोलतां येत नसलं, तर मी बोलतें सारं तुमच्या वाटचं !...आज मीसुद्धां अगदीं हट्टालाच पेटलेंय्;...माझ्या हृदयाला कधीं नव्हती इतकी भयंकर आग लागलीय्;...मी येथून जरा देखील हलणार नाही !...समजलं ?—मला योग्य वाटेल तसं वागणार आहे मी आज ! (भाऊसाहेब अगतिक होऊन चरफडतच कोचावर बसकण घेतात.)

: ११९९ :

काळे०--(बाहेरूनच, हसत्या स्वरांत...) भाऊसाहेब, अहो दारं लावून काय चाललंय् ?—( कमळामावशी दार उघडते...हॉलच्या बाजूनें काळे प्रवेश करून हसतात. )

काळे०—काय लग्नांतल्या मानपानाचे हिशेब वाटतं, वहिनी ?—

कमळा०—( जरा कुर्र्यांत, निर्विकारपणें )...मानपानाचे नव्हेत—मानापमानाचे हिशेब—

काळे—(नेहमीच्या पद्धतीनें कृत्रिम हास्य उत्पन्न करीत ) अस्सं अस्सं... म्हणजे आपल्या बाजूचा मान किती करून घ्यायचा...दुसऱ्या बाजूचा अपमान किती करायचा...असंच ना, वैनी ?...

कमळा०—( कुरघोडीनें ) हो...जवळ जवळ तसंच म्हणायला हरकत नाही, काळेबापू !...पण बसा ना आधीं नीट !...( काळे भाऊंजवळ कोचावर चुळबुळत बसतात. )

काळे०--( गप्प भाऊंकडे जरा संशयितपणें पाहून, कमळामावशीला ताठ्यांत ) मग काय वैनी ?—लग्न ठरलं तुमच्या विनयचं !...

कमळा०--हो ना !...तेंच तर मी सांगणार होतें आतां तुम्हाला !

काळे०--(आपल्याच ताठ्यांत...) अहो, मला आहे कीं ठाऊक तें सारं !

कमळा०—( कठोरपणें ) नाही ठाऊक तुम्हाला त्यांतलं कांही, काळेबापू !

**काळे०**--( जरा हिणवल्यासारखं ) तें हो कां, वैनी ? आमच्या मुंबईच्या रावबहादुरांचीच तर मुलगी...मीच नव्हतं कां सांगितलं तुम्हाला परवां... आम्ही मुंबईला जातांना ?...आम्ही बरोबरच गेलों होतों तिथं...भाऊ नि मी !--आम्हीच तर जुळवलं सारं !—नि आतां मगच कळतंय् तुम्हाला ?—

**कमळा०** —[ लाथ मारल्याच्या स्वरांत... ] अहं...तें नव्हे लग्न ! —हें आमच्या विनयचं,...मुंबईच्या वनितेबरोबर जमलेलं लग्न !...माझ्या विनयनें स्वतःच जमवलं !...तुम्ही नि यांनी जुळवलं म्हणतां तें जुळलंच नाहीं मुळीं !

**काळे०**—[मोठ्यानें दचकून] म्हणजे ?...काय म्हणतां काय, वैनी ?... ( गप्प बसलेल्या भाऊंकडे वळून पहात... ) आणि तुम्ही भाऊ आज असे मी आल्यापासून स्वस्थ कां बसलाहां ?...ही काय बुवा नवी भानगड ?...

**कमळा०**--[त्यांच्या आश्चर्याचा धिक्कार करीत...मुद्दाम तोऱ्यानें] भानगड ?...कसली भानगड ?—छेः छेः ! भानगड नाहीं कसली !--आमच्या विनयचं लग्न ठरलं,...यांत हो भानगड कसली ?...सरळ आहे गोष्ट अगदीं ! त्यानें ठरवलं,...मला नि यांनाही पसंत पडलं !...आतां तें लग्न लौकरच होणार आहे !...

: १२०० :

**काळे०**--( जरा भांबावून; पण न रागावतां ) पण मग आतां मुंबईच्या रावबहादुरांना काल समक्ष दिलेला शब्द ?

**कमळा०**--शब्द ?...कोणी दिला ?...विनूनें ?...

**काळे०**--( जुळतें घेत- ) विनूनें नाहीं...पण त्याच्या वडिलांनीं... भाऊंनीच दिला !...अगदीं माझ्यासमक्ष दिला...

**कमळा०**--[ बेफिकीरीनें ] मग त्यांत काय एवढं मोठं ?...विनयलान विचारतां प्रथम शब्द दिला...विनयला विचारल्यावर, त्याला तें नापसंत म्हणून-आतां परत घेतला !-झालं !...

**काळे०**--[ थोड्या लागणाऱ्या रुबाबदार पद्धतीनें ] अहो, तो काय पोरखेळ आहे, वैनी ?

**कमळा०**--[ शांतपणें ] लग्न म्हणजे पोरखेळ असं मी कुठं म्हणतें आहे म्हणूनच तर सांगतेंय् मी तसं...

**काळे०**—( धोरणानें ) पण मग तें आतां शक्य कसं होईल, वैनी ?...



छे छे !...वेड लागलंय् ? अहो तें आम्हा दोघांना आतां कसं करतां येईल ?... कांहीं रीतभात...लाजलज्जा आहे की नाहीं ?...

**कमळा०**—(उपहासानें) ती सोडा, म्हणा !...पण शक्य हो कां नाहीं हें ? लग्न कोण करणार होतं रावबहादुरांच्या मुलाशीं ?...तुम्ही की हे ?-( भाऊ जागच्या जागी गपचूप चुळबुळ करतात. )

**काळे०**—( जरा वरमून ) असं काय बोलतां ?...विनयचं !...पण...

**कमळा०**--( कठोरपणें ) मग झालं तर !...त्याचं लग्न वनितेशीं ठरलं आहे !-त्याची इच्छा नाहीं त्या रावबहादुरांच्या मुलीशीं लग्न करायची ! नि विनयची आई म्हणून माझीही इच्छा नाहीं तें लग्न व्हावं अशी !-झालं ?...आतां समजलं सारं ?...

**काळे०**--( क्षणभर थांबून...धोरणानें शांतपणें ) वहिनी, आज वेड्यासारखं काय मांडलं आहे तुम्ही हें ?

**कमळा०**--( उपरोधानें ) हो...माझ्या साऱ्या आयुष्यांत मी आजच एकदां काय तो शहाणपणा करायचं ठरवलंय्...तेव्हां अशावेळीं तुम्ही मला वेडी म्हणणारच !--नाहीं ठरवलंत तरच आश्चर्य !!...

: १२०१ :

**काळे०**—( निमूट बसलेल्या भाऊंचा आधार घेण्यासाठीं...) कांहो... भाऊ ?--अगदीं स्वस्थ बसलां आहांत आज तुम्ही ?...( हळूंच ) यांना अजून ती आपल्या पैशाअडक्याची नि व्यवहाराची दुसरी भानगड ठाऊक नाही वाटतं ?

**कमळा०**--( भाऊ बोलण्यापूर्वीच...पटकन्... ) कसली म्हणतां ?...हं हं !...तो गिरणींतल्या भागीदारींत सहा हजारांचा तोटा झाला;...यांच्याकडे रोख नाहीत सध्यां !...तुमच्या गवताच्या धंद्याची तुम्हाला निकड आहे !...पैशाच तुम्हाला फार फार जरूर आहे !...हीच ना म्हणतां तुम्ही दुसरी भानगड ?... ( जरा बेफिकीर हसून ) यांनी नको मला सारं सांगायला तें, आतां !-माहीत आहे मला सारं...

**भाऊ०**--( एकदम तोंड उघडून, आश्चर्यानें...) म्हणजे ?...म्हणतेस काय ?...तुला ठाऊक आहे तें सारं ?...( थोड्या रागांत कोणी सांगितलं ?--

**कमळा०**-(भांबावून बघणाऱ्या काळेबापूंकडे पहात) यांनी काळेबापूंनीच !-

भाऊ०--काय ?...बापूंनीं सांगितलं ?...

काळे०--( आश्चर्यानें ) मी ?...मी तुम्हाला सांगितलं ?...वैनी, कांहीं तरीच सांगतां, झालं ?—

कमळा०--( काळेबापूंना... ) मला नाहीं सांगितलंत तुम्ही, काळबापू ! मला कशाला सांगाल तुम्ही तें ?...सांगितलंत् यांनाच !--हो, अगदीं इथंच बसून मात्र, मी तें सारं प्रत्यक्ष माझ्या या कानांनींच...त्या पडद्यापलीकडे तिथें बसून ऐकलं !-समजलं ?...तेव्हांपासूनच होता मला सारा संशय !-

काळे०--(आश्चर्यानें) म्हणजे ? काय म्हणतां काय, वहिनी ?

भाऊ०--( अवमानित वाटून ) नि तूं तें आमचं बोलणं सारं चोरून ऐकलंस ?...

कमळा०—(बेफिकीरीनें) चोरून ?...(तुच्छेतेनें) हंः ! चोरून कशाला ऐकूं ?...माझ्या खोलींत माझ्याच पलंगांवर बसलें होतें मी, माझं शिवणाचं काम करीत !...प्रत्यक्ष माझ्या पतींचा व्यवहार तरी काय चाललाय् तें अगदीं सहज ऐकूं येत होतं मला तेथूनच !...म्हणूनच कान जरा उघडे ठेऊन बसलें होतें...ऐकत होतें...समजून घेत होतें...एवढंच !—

भाऊ०--[ थोड्या रागांत- ] अस्सं !-मग यापूर्वीच कां सांगितलं नाहींस तूं मला ?...

कमळा०--[जरा झिडकारणीनें] काय कारण मला सांगायचं ? म्हटलं,... पहावं तरी...पुरुष आपल्या व्यवहाराची गुंतागुंत बायकांहून निराळ्या अकलेनें कशी सोडवतात आपणच, ती !...

: १२०२ :

भाऊ०--[ जरा कुरकुरत... ] मग आतां तरी काय ठरवलंस त्यांतून ?

कमळा०--(शांतपणें) आमच्यासारख्या बायकांचा मार्ग तुमच्यास रख्या पुरुषांहून निराळा असतो...अगदीं निराळा आहे !...

काळे०—[ न डगमगता, जरा धोरणानें, लाडीगोडीच्या स्वरांत ] मग आतां तुम्हीच पहा हो, वैनी !...अशा परीस्थितींत सर्वांचीच गाडी सुरळीत यायला ही रावबहादुरांच्या मुलीशीं विनूचं लग्न करण्याची तोड सरळ साधी आहे कीं नाहीं ? ..ही सर्वच दृष्टीनें चालून आलेली सुखाची संधी गमावणं...



कमळा०—[ रागानें उसळून- ] अगदीं गप्प रहा एकदम, काळेबापू ! तुमचा पैसा नि तुमचा स्वार्थ यांची तुम्हाला जितकी किंमत आहे, त्याहून हजार पटीनें जास्त, मला माझ्या विनूची नि त्याच्या सुखाची आहे !...

काळे०—[ थोड्या कोडगेपणें, पण धोरणी स्वरांत- ] असेल...अगदीं साहजिक आहे तें !...पण मग,...वैनी, तुम्ही भाऊंवरचा आजचा प्रसंग नीट ध्यानांत आणलेला नाहीं दिसत !...

कमळा०—[ झिडकारून ] माझ्या पतींबद्दल निदान तुमच्यापेक्षां तरी मला जास्त काळजी आहे, काळेबापू !...तुम्ही नको मला तें सांगायला !... म्हणूनच तर हे 'नको नको' म्हणत असतां, अशी तुमच्यापुढें उभी राहिलें आहे मी आज !...शेवटीं रक्तच पाण्यापेक्षां अधिक दाट असतं !...

काळे०—[थोडें चपापून, पण मानभावीपणें ]...आणि वैनी, मग आजपर्यंत आम्ही भाऊंच्या हितासाठीं त्यांच्या खांद्याला खांदा भिडवून वागलों, तें...

कमळा०—[ रागानें उसळून ] बस्स करा !...ओळखतें मी तुम्हाला ! त्यांना खांद्या देण्याचं तेवढंच काय तें बाकीं ठेवलं आहेत तुम्ही !—काळेबापू,... लक्ष्यांत ठेवा !...तुम्ही मामासाहेबाच्या सुनेशी बोलतांहां याक्षणीं !...मामासाहेबांच्या मुलाबरोबर आजपर्यंत जो गोडगोड-मानभावी लघळपणा केलांत, तो एकदम बंद करा माझ्यापुढें !—[ भाऊ बेचैन होतात. ]

: १२०३

काळे०—[ थोड्या करड्या आवाजांत ] वैनी, माझा तुम्ही नाहक अपमान करतांहां ! मी असं काय हो वाईट चिंतिलं-केलं आहे भाऊंचं ?...अनाठायीं तुमच्या मनांतल्या संशयाच्या सुतानें तुम्हाला अज्ञात अशा व्यवहाराच्या स्वर्गाला पोहोंचतांहां तुम्ही !—पण हीं बायकांचीं कामं नव्हेत, वैनी !...

कमळा०— [ चिकाटीनें व उपहासाच्या कठोर वाणींत ] मला वाटलं होतं, निदान...मनांतल्यामनांत समजून, यावेळीं तरी गप्प बसण्याइतके चाणाक्ष असाल तुम्ही, काळेबापू !...पण नाहीं...एखादा मनुष्य एकदां आपल्या सगळ्या वाकड्या मार्गांतील झटपट यशें मोजूं लागला, कीं, तो अगदीं खूपच बेडर होत जातो !...काळेबापू, तुमच्यांतील पुरुषी घमेंड माझ्यासारख्या जन्मजात दुबळ्या स्त्रीला धूर्ततेनें गप्प बसवण्याचा धाडशी प्रयत्न करते आहे !...माझी इच्छा

नव्हती...पण आतां इलाज नाहीं माझा !--ती तुमची घमेंडच तुमच्या पापांचा पाढा वाचायला लावणार आज मला...

**भाऊ०**—(सहन न होऊन जागच्याजागीं चुळबुळत...) गप्प बस ग...

**कमळा०**—( भाऊंकडे वळून, उसळत ) एकदांच सांगतें पुन्हां...मी मुळींच गप्प बसणार नाहीं !--आजपर्यंत झालं तें पुष्कळ झालं !...आज पाहिजे तर गप्प बसण्याची वेळ तुमची स्वतःची आहे !--

**काळे०**—( धोरण बदलून . भलावणीनें, हळूच ) तुम्ही आज फारच रागावलेल्या दिसतां हां आमच्यावर, वैनी !...काय बरं झालं असं आमच्या हातून ?...चुकत असलं तर तसं सांगा ?...

: १२०४ :

**कमळा०**—( रागानें--) तुमचं सारंच चुकलं आहे !--नि हो ! मी रागावलेलीही आहे !...पण आजच नाहीं...जन्मभर ! !...आज मला तोंड फुटलं आहे एवढंच !...आणि मी रागावलें आहे ती यांच्यावर...तुमच्यावर नाही... ! मी तुमच्यावर रागावण्याइतकं तुमचं भाग्यच नाही, काळेबापू ! (क्षणभर गप्प रहाते.)

**भाऊ०**—( कुरकुरत ) आज आहे काय तुझ्या मनांत, समजत नाहीं मला ?

**कमळा०**—( भाऊंना दुर्लक्षून काळ्यांना ) बापू, यांना कदर असती तर आजचा हा एवढा मोठा राग मला येण्याचा प्रसंगही आला नसता ! [ पुन्हा क्षणभर थांबून ] नि तुमच्या बरोबर रागानें बोलण्याचा किंवा प्रत्यक्ष तुमचाही आतांपर्यंत या माझ्या घराशीं कसला संबंध रुजून राहिला नसता !...

**काळे०**—[ निरपराधी त्राग्याच्या स्वरांत... ] पण मी असं काय... केलं काय...तुम्हाला राग येण्यासारखं ?...[ नाटकीपणें ] वऱ्हाडांतून या खेड्यांत आलों...मामासाहेबांनीं मला उदारपणें आश्रय दिला !...कसं विसरेन मी तें ?

**कमळा०**—[उपरोधानें] वाः ! बरंच लक्ष्यांत राहिलंय् मागलं तुमच्या !

**काळे०**—[ निरपराधी स्वरांत ]...प्रथम त्यांच्या आश्रयाला राहिलों... नि त्यांच्या पश्चात् आमच्या भाऊंनाही धरून राहिलों...आतां ईश्वरकृपेनें चार पैसे जवळ केले !...हाच का अपराध माझा ?...

**कमळा०**—[ उपहासानें ] आमचा धर्माही मामंजींच्या आश्रयाला आला...त्यानें देखील त्याच्या मानानें चार पैसे जवळ केले आहेत आतां !...



**काळे०**—[ किंचित् चिडून ] धर्माचा काय संबंध माझ्याशीं ?

**कमळा०**—[ खोंचून ] बापू, एखादी साधी वेल मोठ्या झाडावर चढली तर आमचा धर्मा तिकडे दुर्लक्ष करील !...पण तिच्यासारखंच वरवर निरुपद्रवी दिसणारं बांडगुळ त्या झाडावर चढलं...त्याचा रस शोषून खूप फोंफावलं...मूळचं आश्रयाचं झाड दिवसेदिवस सुकूं लागलं-तर काय होईल आहे माहीत ? त्या झाडाच्याच संरक्षणासाठीं, त्या झाडाची बापडी इच्छा असो नसो .. मालकाच्याही इच्छेशिवाय, तें प्रथम तोडून टाकील, धर्मा ! समजलं ?...यांतच काय तें जाणून घ्या !...

: १२०५ :

**भाऊ०**—( पुन्हां चरफडत चुळबुळून ) कां उगीच बडबडत राहिली आहेस ग ? काळेबापूंना कां उगीच दुखवते आहेस ?..

**कमळा०**—( त्यांच्यावर उसळून ) तुम्ही आजपर्यंत गप्प रहाण्याचं दुबळं व्रत घेतलं होतं ना...म्हणून ! त्यामुळेंच मला आज बडबडण्याचा झपाटा आला आहे एकाएकी !—आतां आणखी थोडावेळ तुमचं व्रत चालूं ठेवा पुढें ! तुम्हाला माझं बडबडणं नको असेल तर तुम्ही तरी मधें मधें बडबडूं नका !— या काळेबापूंनाच माझं बडबडणं पाहिजे आहे !—

**भाऊ०**—( अगतिकपणें समजावीत ) ऐक, ऐक !...काय हें ?...

**कमळा०**—( उसळून )...मी त्यांना दुखावत नाहीं आहे ! त्यांनांच आज आपलं सारं चरित्र व चारित्र्य माझ्या तोंडून ऐकून घेण्याची मूर्ख लहर आलेली आहे !...ते तुमचे जिवाचे भागीदार ! आपल्या आयुष्यांत, या मामासाहेबांच्या घरांत, त्यांनीं काय काय पराक्रम केले ते तुम्हाला कळले नाहीत, याची तर खात्रीच आहे त्यांना !--पण तुमच्या बायकोला...माझ्यासारख्या दुबळ्या स्त्रीला,...तीं आपलीं शेकडों शतकृत्यें समजलींत कीं नाहीं...हें अजमावून पहाण्याची इच्छा दिसतेय् त्यांची !...हो ना हो, काळेबापू ?...असंच कीं नाही ?

: १२०६ :

**काळे०**—( उठत, जरा घुश्श्यांत-) वैनी, आज तुम्ही भरमसाट बोलतां-हां अगदीं !...तुम्ही शांत होईपर्यंत जरा गप्प बसां कशा !...मी जातों आपला;... सहज आलों होतों;...तसं कांहीं विशेष काम नव्हतं माझं...

**कमळा०**—( जाऊं लागणाऱ्या काळेबापूंना जरा दरडावीत ) हं... खबरदार !...कांहीं जाऊं नका !...बसा तिथेंच !...तुमचं विशेष काम नसलं... तरी माझं सारं आयुष्यांतलं काम मला आजच या घटकेला उरकून ध्यायचंय्... ( काळे मंत्रमुग्धाप्रमाणें खालीं बसतात. ) तें एकदां झालं, कीं, तुम्हाला मी बसवून ठेवणार नाहीं...एक मिनिट थरसुद्धां...इथें, बापू !...

**काळे०**—( अवसान आणून ) मी केलंय काय ?...तुम्ही माझ्यावर...

**कमळा०**—(उसळून) पुन्हा तेच साळसूद प्रश्न विचारतां नाहीं का ?... कां नाही हो मी तुमच्यावर रागावूं ?...मामंजींचा सुरवातीचा आश्रय तुम्हाला अजून आठवतो...हें मोठें नशीबच म्हणायचं त्यांचं !...

**काळे०**—( नाटकी कृतज्ञपणें ) मामासाहेब केवढे मोठे !——त्यांना कसा विसरेन मी ?...

**कमळा०**—हो ना ? म्हणूनच तुम्ही त्यांच्यापुढें हात जोडून उभे असायचेत ! पण तेच तुम्ही आज मामंजींच्या एकुलत्या एका चिरंजीवांच्या तक्क्याशीं तक्क्या लावून बसण्याइतके मोठे झालांत !...एवढंच नाही...तर त्यांना पडणाऱ्या पैशाच्या निकडींत अगदीं आपुलकीनें सल्लामसलत...मदत देण्याइतके वाढलांत !

**काळे०**——[ बेडरपणें ] नशीबानें परिस्थिती बदलली, वैनी !...

**कमळा०**——हं ! हें तुमचं नशीब...तुमचं कर्तृत्व तर खरंच !...त्या उलट तो धर्मा !——सरळपणा नि प्रामाणिकपणा हे जगांतले मोठे दुर्गुणच म्हणायचे ! अजूनहि धर्मा...मामासाहेबांच्या घरीं एक साधा भांडीघाशा नोकर राहिला तो यामुळेंच !...

**काळे०**——[ किंचित् रागांत ] माझा धर्मा गड्याशीं बरोबरीचा संबंध जोडतां, वैनी ?

**कमळा०**—[ कुत्सित हसून ] हो ! कारण त्यानें मामासाहेबांच्या घरच्या बैलांपुढें...तुमच्या वखारींतल्या चार गवताच्या गुंड्या टाकतांच...त्याच्या बापाचा नि यांच्या बापाचा उद्धार तुम्ही बरोबरीनेंच कलांत !—तोही याच तुमच्या कर्तृत्वावर !...हो ना ?...मग आतां मधला काळ तुम्हीच आठवा कीं...म्हणजे येईल तुमच्या लक्षांत तुम्ही काय काय केलंत तें !...



: १२०७ :

**काळे०**—( गुरगुरत ) वैनी...तुम्ही कांही तरी अर्धवट ऐकतां—एकांगी बायकी विचार करतां—नि संशयाचे इमले उभारून दुसऱ्याचा नाहक पाणउतारा करतां ! हें नाही खपणार मला !...

**कमळा०**—( किंचित् उपहासानें हसून—) पाहिलंत ना ?...तुम्ही चाणाक्ष पुरुष असलांत तरी माझ्यासारख्या स्त्रीला ती स्त्री आहे असं पटवून... वेळ मारून नेण्याचा हास्यास्पद प्रयत्न केलांतच !—( नव्या जोरानें आवाज चढवून ) पण आज तेवढ्यावरच भागूं देणार नाही मी तुमचं !—मी अर्धवट माहितीनें एकांगी नि संशयानें बोलतें आहे, नाही का ?...बरं तर मग अगदीं चुणूक म्हणून वस्तुस्थितीतलं कांहीं...

**काळे०**——( निष्पापपणाचा आव आणून जरा कुरघोडी करीत...) मला माहीत आहे मी काय केलंय् तें...माझं मन मला साक्ष देत आहे त्याची...तुमच्या सारख्यांच्या कुत्सित बोलण्यानें मी कशाला घाबरावें ?...मला कांहीं सांगूं नका—

**कमळा०**—( काळे बापूंना दरडावीत...) ऐकलंच पाहिजे तुम्हाला !—मामंजींच्या दराऱ्यांत तुम्ही सरळ होता...त्यांच्या पश्चात्ही प्रथम तुमचं सरळ मन शाबूत होतं ! पण मग यांचा स्वभाव जाणल्यावर सुरवात झाली तुमची !... सुरवातीला नुसता भिडस्त माणसाचा चाणाक्षपणें घेतलेला गैरफायदा,...पण मग एकदां चटक लागल्यावर नि परिस्थितीची खात्री झाल्यावर तुम्ही स्वतःच मोठे होण्याच्या मार्गाला लागलांत !...

**काळे०**——( बेडरपणें... ) बोला ! तुमच्या तोकड्या बुद्धीला झेपेल तेवढं बोलून घ्या !—पण काय हो...स्वतः मोठं होण्याची खटपट करणं ही काय चूक आहे ?...भाऊंसारखं मला काय आयतं डबोलंबिबोलं नव्हतं ना मिळालं जन्म-तःच ?...मी जन्मभर तुमचा आश्रित राहिलों असतों तरच फक्त प्रामाणिक ठरलों असतों तुमच्यामतें...

: १२०८ :

**कमळा०**—( धिक्कारानें हसून— ) आयतं डबोलं मिळायलाही भाग्य लागतं, काळेबाप...!...आणि स्वतः डबोलं मिळवायचेही मार्ग असतात !...तुमचा मार्ग मात्र निराळा होता.

**भाऊ०**—( चुळबुळत ) कां बोलतें आहेस तूं हें ?—

**कमळा०**( उपाहासानें ) सांगूं ?—याचं काळीज बदललं...डोळे पालटले ...आयतं डबोलं तुमच्या गाफील हातीं दिसलं किं चाणाक्ष माणूस झटपट मोठा व्हायला लागतो...( काळ्यांकडे वळून ) पण तुमचे मोठे होण्याचे व्यवहार स्वतंत्र नव्हते...ते सारे यांच्याशीं केलेत...किंवा यांचेच उचललेत !...

**काळे०**—( रागारागांत ) काय ? बोलतां काय हें, वैनी ?—

**कमळा०**—या तुमच्या मोठे होण्यासाठींच यांचे-तुमचे सगळे भागीचे व्यवहार प्रथम चांगले चाललेले दिसले !...यांचा भाबडा गाफीलपणा वाढला;...तुम्ही तर अगदीं भागीचा धंदातल्या सुरवातीच्या सत्यनारायणापुढेंच, भागीदाराला बुडवून त्याच्या तोंडाला पानें फासण्याचा प्रत्येक वेळीं संकल्प केलेला असे !...असलेच ना तुमचे गवत, लाकूड, गॅसलेट, भात...सारे भागीचे धंदे...

**काळे०**—( साळसूदपणें... ) आतां तुम्हाला मला दोष द्यायचा असला तर इलाज नाहीं;...पण धंद्यांत असे पैसे जातात येतात, हें मी कसं समवणार तुम्हाला ?—पुन्हां कांहीं कांहीं अशा भानगडी झाल्या, कीं, त्याला माझा इलाजच नव्हता !—तरी पुन्हां मीच दोषी कां ?...

**कमळा०**—(कुत्सित हसून) कांहीं कांहीं भानगडी म्हणजे कोणत्या ?...

**काळे०**—(साळसूदपणें) गवताच्या वखारीला आकस्मित आग लागली, जंगल कूपाची रक्कम माल कमी निघाल्यामुळें अंगावर आला,...असल्या गोष्टी काय माझ्या हातच्या होत्या ?

**कमळा०**—( धिक्कारात्मक म्हणून ) मग या भानगडी काय आकाशांतून पडल्या ?...तें सोडा...गॅसलेटचा धंदा केलांत...मुंबईहून माल पुरवणाऱ्या गुजराथ्याला शेवटीं पंधरा दिवसच आधीं नव्या मालासाठीं तुमच्या कुबेरांच्या कंपनीकडून पांच हजाराइतकी मोठी रक्कम आगाऊ पोहोंचलीय् ! मोठं आश्चर्य !...

**काळे०**—( मनाचा गोंधळ सांवरीत ) व्यवहाराला धरूनच होतं तें सारं !—

**कमळा०**—असं नाहीं ?—जगांत दुसऱ्या कोणाला नाहीं,...तरी यांना मात्र वरवर सरळ दिसणारे असले व्यवहाराचे देखावे तुम्हीं छान केलेत...ते यांना तरी पटवलेत !...

**काळे०**—खरं असल्याशिवाय उगाच पटेल ?



**कमळा०**—( उपरोधानें ) ..खरंच तें !—यांचा-तुमचा प्रत्येक भागीदारी धंदा बुडायला...नि आधीं पचलेल्या रकमांत, शेवटीं त्या त्या बुडत्या धंद्याचीं असलीं पळतीं पिकं गुप्तपणें पचून त्यांची भर पडायला खूपच मदत झाली, या तुमच्या भानगडींची !...

**: १२०९ :**

**काळे०**—( कुरकुरून– ) माझ्या भानगडी ?—वैनी, माझ्यावर तुम्ही विनाकारण खोटे संशय घेतांहां...पण तुमच्या तोंडावर कोण हात ठेवील !... निदान भाऊंना विश्वास आहे माझा—

**कमळा०**—( जरा रागानें– ) म्हणूनच तर आमचं सगळं गेलं...तुम्ही मोठे झालांत !—तरी पण माझ्या तोंडावर हात ठेवयची तुमची छाती कशी होईल ?—मी सगळी माहिती असून बोलते आहे.

**भाऊ०**—( कुरकुरत ) नको तिथें नको तें बडबडते आहेस तूं !—

**कमळा०**—[ खोंचून ] हो हो ! खरंच तें ! [ क्षणभर थांबून ] गंमत मात्र मला एवढीच वाटली, कीं...एवढ्या ठेंचा खाऊनही बापूंची-तुमची कोणती ना कोणती भागीदारी पुढेंही आव्याहत चालूंच राहिली !...ज्या ज्या बुडलेल्या धंद्यातून ठोकर बसल्यावर तुम्ही घाबरून आपलें अंग कायमचें काढून घेतलें, तो तो धंदा बापूंनीं मात्र पुढें चालूं ठेवला !...तो त्याच्या एकट्याच्या हातीं मात्र यशस्वीपणें चालला !—

**काळे०**—[ तोऱ्यानें ] कुठल्याही धंद्याला घाम ढाळावा लागतो !—अंगात कर्तृत्व लागतं ! तुम्हाला कसं माहीत असणार तें ?

**कमळा०**—[उपाहासानें] दुसरं कुठलं मला माहीत नाहीं !...पण हें मात्र तुमचं कर्तृत्व कोणाला...तुमच्या शत्रूलाही कबूल करावं लागेल !...[ चरफडून ] पण इतकं असूनही यांनी तुमच्या ओंजळीनें आजपर्यंत पाणी पिण्याचा अट्टाहास केला...नि शेवटीं, आपला घसा तेवढा कोरडा होण्याचीच आज पाळी आली आहे यांच्यावर !—

**काळे०**—[रागानें] वैनी, मला जाणून बुजून दुखवतां आहां तुम्ही !

**कमळा०**—[बेफिकीरीनें] हो !—मला ठाऊक आहे तें !...अगदीं शेवटचा उरला सुरला भागीचा धंदा म्हणजे आतांचा हा गिरणीचा !—तो तेवढा संपवण्याची

: १२१२ :

**काळे०**--('शेषं कोपेन' प्रकारें) वहिनी, गप्प रहा एकदम !...आतांपर्यंत तुमची हीं सारीं कुजकीं बोलणीं खूप ऐकून घेतलीं मी !--माणसाच्या सहनशीलतेलाही कांहीं मर्यादा असते !...मी कांहीं तुमच्या घरचा भोंडीघाशा गडी नाहीं, कीं...कुणाही नाहीं !...कशाला एवढा तोरा करतां माझ्यापुढें ?...काय म्हणून ऐकून घेईन मी माझा हा सारा अपमान ?...तुम्ही बाई माणूस म्हणूनच तुमचा मान ठेवण्यासाठीं जरा तोंडाला तोंड देण्याचं आवरलं !...

**कमळा०**--( तेवढ्याच जोरांत- ) कांहीं नको बाई म्हणून माझी गय करायला तुम्ही !--मी तुमच्यासारखीच एक माणूस तरी आहे ना एक !... खुशाल बोला तुमच्याकडे कांहीं बोलायला असेल तर...वाटेल तसं,...नि बोलायचं असेल तें !...(तुच्छतेनें हसून) मी कुठें आज स्त्रीपणाचा धरबंध ठेवला आहे,... तर तुम्ही माझा स्त्री म्हणून निराळा मान ठेवावा ?...(ओरडून) बोला ना !...बोला !

**काळे०**—( लटका संयम दाखवून ) काय बोलायचं उगीच !...पण तुम्ही जर चोराला सोडून असं संन्याशालाच सुळी द्यायला लागलांत...तर कां नाही राग येणार माणसाला ?

: १२१३ :

**कमळा०** –( तुच्छतेनें हसत ) झालं ? संपलं अवसान ?--काळेबापू, नुसता राग कोणालाही येतो...आपल्या मनासारखं झालं नाही म्हणजे !...पण त्या रागाबरोबरच...दुसऱ्यांना तोंडानें सांगण्यासारखं...नि त्यांना पटण्यासारखंही कांही तरी असावं लागतं आपल्याकडे !...( जरा रागानें )...आणि काय हो, चोर कोण,...काळेबापू ?--तुम्ही जर संन्याशी,...तर कोण ते देव...किं हे चोर ?- हे कसे झाले चोर ? ?...( निश्वास टाकून ) एका दृष्टीनें बाकी खरंच आहे तुमचं म्हणणं ! नाही तरी भित्र्या माणसाला खऱ्या मरणापूर्वी हजार मरणं मरावींच लागतात !--आपल्याच घरांत तो असा चोर ठरतो, शेवटीं !--

**भाऊ०**—( अगतिकपणें ) अग पण...

**कमळा०**—( भाऊंना दुर्लक्षून ) बरं पण काय हो, काळेबापू ? मी विचारतें,...माझ्या विनूच्या लग्नाशीं तुमचा कसा संबंध पोहोंचतो ?--

**काळे०**—( बेफिकीरीनें ...) आतांपर्यंत केवळ स्नेहाचा,...घरोब्याच्या,



आपुलकीचा होता !...त्या दृष्टीनेंच भाऊंना मदत करीत होतों मी !...पण तुम्हाला जर असं वाटत असेल...तर तो संबंध तुटला याचक्षणीं, मी म्हणेन !... माझा स्नेह तुमच्यावर कांहीं लादतां तर नाही ना येत मला ?

**कमळा०**--( अधिक बेफिकीरीनें ) छे छे...लादूं नकाच मुळींच ! आणि आम्हाला असला स्नेहसंबंध तुटल्यानेंही दुःख नाही होणार कसलं, जन्मांत !

: १२१४ :

**भाऊ०**--( अजीजीनें विनवणीच्या स्वरांत--) बाई ग, मी हात जोडतों पाहिजे तर...पण आतां तरी गप्प रहा !...माणसं एका क्षणांत तोडतां येतात... पण जोडायला फार वेळ लागतो !...माझं ऐक !...असा अविचार करूं नकोस...

**कमळा०**—( कठोरपणें ) कृपा करा नि तुम्हीच गप्प बसा !--तुमच्यापेक्षां आज प्रत्येक गोष्ट मीच अधिक विचारानें करीत आहे !--

**काळे०**—( चिडून...धोरणी भाषेंत...) अस्सं काय ?--बरं तर, वैनीं,... आतां तुमच्या विनयच्या लग्नाशीं पोंचणारा माझा व्यवहारी संबंध सांगतों तर !... भाऊ माझे तीन हजार देणं आहेत ...भाऊंकडे आज पैसे नाहींत,...ते हुंड्यांतून येणाऱ्या पांच हजारांतून माझ्या रकमेची फेड करणार होते;...आतां तुमचा आजचा 'विचार, विचार' काय जो म्हणतांहां मघांपासून तो सांगा मला !-

: १२१५ :

**कमळा०**—( तेवढ्याच बेफिकीरीनें ) अस्सं अस्सं !-हें यांच्या--तुमच्या स्नेहानंच सांगितलं असेल तुम्हाला ?...आपलं देणं देण्यास यांच्याकडे पैसे नाहींत तर त्यांच्या मुलाचा लिलांव करून पैसे उभे करावेत !...त्याविशीं जमीन गहाण टाकून पैसे देण्याची कल्पना तुम्ही स्नेहानें सांगतांच यांना पटेना; पण मुलाला गहाण टाकून पैसे देण्याची कल्पना तुम्ही स्नेहानें सांगतांच यांना पटली ! असंच ना ?

**भाऊ०**—( दुबळ्या रागानें ) काय बोलतें आहेस काय तूं ?—जरा जिभेला हाड ?...

**कमळा०**—( भाऊंना रागानें ) हेंही चुकलंच कां माझं ?...मी एक परक्याच्या आश्रयानें वाढलेली पोरकी पोरगी !—पण तरीही मामासाहेबांनीं बिनखर्चानें मला आपल्या घरांत सून म्हणून घेतली !–नि तुम्ही ?...आपल्याच गबाळ्या व्यवहाराच्या चक्रांत सांपडलांत; म्हणूनच कां होईना—पण आपल्या

नि आपल्या ताब्यांत येण्याची वाट पहात असाल तुम्ही !...म्हणजे आपला तुमचा मोठेपणाचा मार्ग निष्कंटक !—

**काळे०**—( दरडावून ) वैनी ?...

**कमळा०**—( बेडरपणें ) त्यांत पुन्हा यांच्याकडे आज रोख सुटे पैसे नसण्याची एकच वेळ आली आहे ! हें तुमच्या चाणाक्ष दृष्टीतून सुटलं नाहीं !—

: १२१० :

**काळे०**—[ कांगाव्यानें ] काय, काय बोलतांहां तुम्ही, वैनी ?—त्याचा अर्थ समजतो का तुम्हाला ?...( नाटकीपणें ) नशीब माझं !...म्हणजे गिरणींतल्या भागीदारींत माझे गेल्या तीन वर्षांत सहा हजार अडकले,...भाऊंच्य तोव्यांतील हिश्शाचे तीन हजार मला अजून मिळालेले नाहीत !—मी कसा बसा आपला भागवून घेतोंय् माझा व्यवहार,...भाऊंची नड संपेपर्यंत !—आणि इतकं करून पुन्हां मीच अपराधी—

**कमळा०**—( न डगमगतां ) मग ? खोटं काय आहे त्यांत ?

**काळे०**—( कागाव्यानें ) छान...शेळी जाते जिवानिशीं नि खाणारा म्हणतो वातड ? (आव्हान देत)—हिशेबाच्या वह्या पहा वैनी...हिशेबाच्या वह्या पहा !...त्याच तुम्हाला सांगतील सारं कांहीं !...पहा नि मग बोला काय तें !—

**कमळा०**—( चटकन्...) पाहिल्या बरं पाहिल्या, बापू !—नि मगच बोलतेय् कायतें !...हें सारं सांगितलं मला त्या हिशेबाच्या वह्यांनींच !...सहा हजारांचा तोटा कसा झाला तें सारं समजलं !...

**काळे०**—( चपापून ) काय म्हणतां ?—कसा झाला म्हणजे ?—

**कमळा०**—( पटकन् ) यांना मुंबईला जाण्यापूर्वी तुम्ही मोघमच समजवलंत...पण मला तें आतां तपशीलवार माहीत आहे !—

**काळे०**—( साशंकपणें ) तुम्हाला कसं समजलं तें ?

**कमळा०**—( क्षणभर थांबून )—तुम्ही दोघे मुंबईला गेल्यावर देव इंजिनिअरच समक्ष माझ्याकडे आले होते...माझ्या इच्छेवरूनच त्यांनीं सगळया वह्या मला इकडे आणून दाखवल्या !—पाहिल्या नि त्यांच्याकडून ऐकलंहि आणखी पुष्कळ !—



: १२११ :

**भाऊ०**—( बऱ्याच वेळानें जागे होत—) कोण ? देव इजिनिअर घरीं आले होते ?...

**काळे०**—( बिचकून एकदम...) त्याला काय इथं घरीं येण्याचं कारण ?

**कमळा०**—( भाऊंना उपहासानें ) हो हो...तेच आले होते इथें !...( काळेबापूंना ) त्यांना इकडे येण्याचं कारण ?...कारण, देवांना अन्न देणारं...मान देणारं घर आहे हें !—सगळेच कांही खाल्ल्याघरचे वासे मोजीत बसत नाहीत जगांत, काळेबापू !...

**काळे०**—( त्राग, राग, कांगावा...समर्थन...करीत ) पाहिलंत, भाऊ ! देव चांगला चांगला म्हणत होतों आपण ! ( तुच्छतेनें ) हंः—पहा !—त्याच्या या असल्या कारवाया !—तुमच्या बायकामंडळींना तो व्यवहार समजावून सांगणार ! नि त्यांतलं नीट कांही समजलं नाही—तरी तुमच्या, आमच्या तोंडावरच कांहीं कारण नसतां आम्हाला त्या खाल्ल्या घरचे वासे मोजणारे ठरवणार ! !...(किंचित् थांबून...रागानें ) हं...देव म्हणे !...सर्पाची जात आहे सर्पाची जात !—असं कल्पना नसतां एकदम उलटून, तुमच्या...आमच्यांत बीष भिनवतोय् !...वारे देव ? सर्प !...सर्प ! !...

**कमळा०**—( हेटाळणीनें ) हं—सर्प !—या आमच्या पुरुषांनीं तुमच्या हातांत गिरणीच्या तिजोरीची किल्लीच दिली होती !...पण तो देव एकटाच रक्षक भुजंगाप्रमाणें तिच्या भोंवतीं जागरुक घिरट्या घालीत होता ना !...आणि त्यामुळें तुम्हाला सगळयाच थैल्या पळवतां आल्या नाहीत !...हाच तुमचा राग त्याच्यावर ? अशाळभूत नजरेला देवासारख्या रक्षकाच्या ठिकाणीं नुसता सर्पच नाहीं तर दुसरं काय दिसणार ?...

**भाऊः**—( अगतिकपणें )—तूं हें म्हणतें आहेस काय ?—

**कमळा०**—तुम्हाला कोणाला याची कल्पना नव्हती हेच बरं होतं !...देव तितके हुशार आहेतच !—मी आधींच त्यांना तुमच्या बाबतींत सावधगिरी ठेवायला सांगितलं होतं...म्हणूनच तर तुम्ही त्यांच्यावर आजवर विश्वास ठेवलांत...नि सारं मला कळूं शकलं त्यांच्याकडूनच—

मुलाला न विचारतां रावबहादुरांकडे गपचूप रकमांचे हिशेब करून समाधानानें घरीं आलांत ! ( भाऊ चुळबुळतात. ) त्यांत हे भले स्नेही तुमचे सल्लागार नि मदत-नीस !—(काळेबापूंस) पण काय हो काळेबापू , आपल्या मुलानें आपल्या मुलाचा असा सौदा मांडलेला पाहून मामासाहेबांच्या स्वर्गांतल्या आत्म्याला मोठा संतोष वाटला असेल, नाहीं ?––मामंजींचे एकेकाळचे आश्रित या दृष्टीनें तुम्ही त्यांना एकदां चांगले ओळखत होतां !...म्हणून विचारतें ?—

**भाऊ०**––( अगतिकपणें ) अग अग...काय बोलतेंस ?...

**काळे०**—( रागानें ) पुरे झाले तुमचे कुजके टोमणे !––माझ्या चांगुल-पणाचा विपर्यास झाला तो झाला;...हा तुमचा खाजगी प्रश्न तुम्ही वाटेल तसा सोडवा घरांत––माझ्या देण्याचा मुद्याचा प्रश्न आतांच काय तो सोडवा म्हणजे झालं, या बैठकींतच !—

**: १२१६ :**

**कमळा०**—( तुच्छतेनें हसत ) वाटलंच होतं मला...याचा असाच शेवट होणार तें !—( भाऊंकडे डिंवचून पहात ) पाहिलांत आपला स्नेही ? मामासाहेबांच्याच घरांत हे काळेबापू बोलताहेत हो हें !...ही काळेबापूंच्या नांवाची सार्थता मी पूर्वीपासूनच जाणत होतें !––

**काळे०**—( रागानें ओरडून ) वहिनी, तोंड संभाळून बोला...मी वाटेल तसा असेन...तुम्हाला काय त्याची पंचाईत ?—मी माझा राजा आहे !...आज माझी गरज तुम्हाला आहे !...तुमची नाहीं मला ! तुमचे उपदेश ऐकायला नि शहाणा व्हायला नाही आज येथें आलेलों मी !...आतां इतकं झाल्यावर माझ्या पैशांचे काय करतां तेवढं आतांच्या आतां बोला !—मग इथं मी क्षणभरही रहायला तयार नाहीं !...

**कमळा०**—( जरा पेंच पडल्यासारखें दाखवून ) पण हा आला व्यवहा-राचा प्रश्न !—यांना पुरुषांनाच विचारा...आम्ही बायका काय सांगणार–कर-णार त्यांत ?...

**काळे०**—(रागानें–) बायकांना बडबड करतां येतें का ?...घाळून पाडून बोलतां येतं ?...मग आतां तुम्हीच विचारा–निस्तरा ना काय नि कसं तें !



**: १२१७ :**

**कमळा०**—(शांतपणें) मी विचारूं ?...बरं तर !...तुमच्या कां मनासारखं होईना !– भाऊंना) काय हो,...बोला !...तुमच्या या आजवरच्या जानी दोस्ताशीं तुम्ही भागीदारी केलीत मारे !...त्यांतल्या तोट्याच्या तुमच्या हिश्शाचे तीन हजार रुपये तुम्ही आतां यांना कसे देणार आहांत ?—

**भाऊ०**––[ अगतिक होऊन मोठ्या रागारागानें ] आतां मला कशाला विचारतेस ? आहे कुठें एवढी रक्कम आज माझ्याकडे ?–तुला माहीत नव्हतं ?... मघांपासून मी सांगत होतों...'ऐक ऐक, तोंड आवर !'...पण तुझा पट्टा चालला होता तोंडाचा !...माणसं तोडणं सोपं असतं...पण...

**कमळा०**—( शांतपणें ) हें बाकी खरंच !–असली माणसं तोडणं अग-दींच सोपं असतं !––

**काळे०**––[ एकदम मोठ्यानें हसत ] आतां मात्र तुम्हीं अगदीं खऱ्या वेड्यासारखं बोलूं लागलांत खरंच !...पहा...भाऊ, पहा...

**कमळा०**––( शांतपणें ) वेड्यासारखं नाहीं...खरंच सोपं असतं !—

**भाऊ०**—( भांबावून ) काय ? खरंच वेड लागलंय् कां तुला ?...

( कमळामावशी कांहींच बोलत नाहीं. निमूटपणें खुर्चीवर बसते. )

**: १२१८ :**

**काळे०**—( पुन्हा मोठमोठ्यानें हसत ) पाहिलंत, वैनी ?...व्यवहार हा अस्सा असतो बरं ?...अशावेळीं कसं अगदी गरगरल्यासारखं वाटतं,...सारं जग आपल्या भोंवतीं !...नाहीं ?...तुमचा काय अनुभव आहे ? ( पुन्हा हसतात. ) असलं कांहीं नको असतं, म्हणूनच, भाऊ शांत स्वभावानें...समजूतदारपणें, वागतात आमच्याशीं ! व्यवहार म्हणजे व्यवहार;...तें कांहीं बायकांचं काम नव्हे !... ( मोठमोठ्यानें बिजयी हसतात... )

**भाऊ०**––(जिकीरीला येऊन) बापू...बापू !...तुम्ही तरी शांत रहा... माझ्याकडे जरा पहा !...

**काळे०**––(जरा ताठ्यांत, पण उपकारी गोडीनें) भाऊसाहेब,...मी तसा तुमच्या बाहेर मुळीच नाहीं !...कधींच नव्हतों !–पण आज वैनींनींच हें अन-पेक्षितपणें आकांडतांडव केलं...अजून चालवलंय्...! मी शांतच राहिलों आहे !

—नि तुमच्याकडे पाहूनच, यांनीं मजवर केलेला सारा भडिमार मी शांतपणें सहन केला, आतांपर्यंत !...

(कमळामावशी तिरस्कारानें मोठमोठ्यानें एकदमच हसूं लागते !—काळेबापू बोलतां बोलता गप्प रहातात. भाऊ व ते दचकून तिच्याकडे पहातात. )

**काळे०**—(नाटकी आस्था दाखवून) भाऊ,...भाऊ !...वहिनींना काय झालं हो ?...पहा...

: १२१९ :

**कमळा०**—( तशीच हसत ) मला कांहीं झालेलं नाही !...मी चांगली शुद्धीवर आहे;...पण असंच हसून मात्र वेड लागलं असतं मला !—तरी पण तें तुमचीच आतांची गंमत पाहिल्यामुळें...( काळेबापूंना ) काळेबापू, माझ्याशीं हेटाळणीनें बोलतां बोलतां—शेवटीं, आधारासाठीं यांची तुम्ही खुषामतच करूं लागलांत !—बायकांना हसतां हसतां,...दोन पुरुषांनीं...भित्र्या मनाची व्यवहाराची तात्पुरती निरवानिरव कशी चालवली होती, तें पाहूनच मला एवढं हसूं आलं !... ( हसते. ) क्षणभर हिशेब करायला मी गप्प राहिलें—तेवढ्या एका मिनिटांत, जगांतल्या पुरुषी मूर्खपणाचं केवढं मोठं प्रदर्शन केलंत तुम्ही दोघांनीं ?

**भाऊ०**—( आश्चर्यानें ) हिशेब ?...

**काळे०**—( चमकून ) कसला हिशेब...म्हणतां ?

**कमळा०**—( रोषानें ) दुसरा कसला असणार, काळेबापू ?—तुमच्या काळ्या कृतकर्मांचा तर झाला !—आतां राहिला हिशेब तुमच्या रोख पैशांचा !...

( भाऊ व काळे दोघेही कमळामावशीकडे टकमक पहातात. )

: १२२० :

**काळे०**—( थोड्या चिडक्या स्वरांत ) आजपर्यंत भाऊंसाठीं मी केलं तें तुम्ही एका क्षणांत सारं काळं ठरवून टाकलंत !...म्हणा बापड्या !—( कठोरपणें ) पण नुसत्या असल्या शब्दांनीं रोख पैशांचा प्रश्न सुटत नाही, वैनी !...

**कमळा०**—( कुत्सित हसून ) पण आधीं तुमच्या कागदी काळ्या हिशेबाची रोख किंमत तर ठरायला पाहिजे ना ?—नि पुन्हां यांचा तुमचा पैशाचा संबंध खरंच आहे कीं काय, तें तरी सिद्ध झालं पाहिजे ना ?...

**काळे०**—( धमकावणीच्या स्वरांत ) म्हणजे काय ?...



**कमळा०**—( शांतपणें ) जरा व्यवहाराला धरून वागा, काळेबापू !... तुम्ही म्हणतां एवढ्यावरूनच तुमची–आमची भागीदारी कशी हो सिद्ध होणार ? तुमचा–आमचा व्यवहार–संबंधच नव्हता मुळीं. असं मी म्हटलं तर ?

**काळे०**—( कुचेष्टेनें हसून ) हीच तुमची व्यवहाराची कल्पना वाटतं ?... नि हाच व्यवहार भाऊंना शिकवणार तुम्ही ?...( मोठ्याने हसत ) पण असले बायकी तोंडी व्यवहार निदान हा बापू काळे तरी करत नाही, वैनी !...समजलं ?

**कमळा०**—( बेफिकीरपणें ) मग काय करतां तुम्ही, काळेबापू ?—

**काळे०**—( बेदरकार हसत ) प्रत्येक गोष्टीचा वज्रलेप असतो वज्रलेप, माझ्यापाशीं !—बायकांना बडबड करणंच मोकळं असतं !...पण पुरुषांना लिहिण्याचीही कला अवगत असते ना !...

: १२२१ :

**कमळा०**—( जरा गोंधळल्याचा आव आणून ) म्हणजे काय, बाई ?...

**काळे०**—(आपले खिसे चांचपून, त्यांतून एक कागद बाहेर काढतात.) ही पाहिलीत कागदाची घडी ?...माझ्या भागीदारानें...तुमच्या भाऊसाहेबांनीं, अगदीं स्वतःच्या हस्ताक्षरांतच काय तें सारं लिहिलं आहे त्यांत !...त्यांनांच विचारा त्याबद्दल समक्ष, म्हणजे झालं !...

( कमळामावशी साभिप्राय भाऊंकडे पहाते; भाऊ रागानें एकदां तिच्याकडे पहातात, मान वळवतात व गप्प बसतात.)

**कमळा०**—( निरुपद्रवीपणें, गोंधळल्यासारखें ) काय आहे त्या कागदांत ?

**काळे०**—( हसून ) तुम्हाला अगदीं ब्रह्मांड आठवेल एवढं सारं कांहीं आहे त्यांत ! ..( घडी उघडत हसून ) तुमच्या गिरणीच्या मालकींतली माझी चालू भागीदारी सविस्तर लिहिली आहे त्यांत !—हा चिटोरा दिसतो,...पण लाख रुपये किंमतीचा आहे, लाख ! तरी मी निदान त्याची आज रोख किंमत किमान सहा हजार धरतो !...

**कमळा०**—( भांबावल्यासारखें ) सहा हजार ?...बरीच मोठी रक्कम ?

**काळे०**—( ताठ्यानें बेफिकीर हसत ) हॅ हॅ...म्हणूनच तर वहिनी, सांगतोय्...आतांपर्यंत पुष्कळ बोललांत !—भाऊंकडे रोख सहा हजार आहेत कीं काय, त्याची आधीं चौकशी करा ! नि मग पुढें बडबड करा !...पण मग मला ती ऐकण्याचंही कारण पडणार नाही त्यानंतर...

: १२२२ :

**कमळा०**—( सचिंत ) बराच भयंकर कागद दिसतो म्हणायचा !...

**काळे०**—(कुत्सित हसून) हं !...इतके दिवस तो गप्प पडून होता माझ्या खिशांत;...पण आजच्या तुमच्या उतावळ्या वेड्या बडबडीनें तो बाहेर आलाय !... नि आतां खिशांत मुकामुकी परत जाऊन बसायला तयार नाही तो !...तुमच्या नुसत्या बेफाट शब्दांच्या उष्णतेनें तो विरघळून जाणार आहे थोडाच, वैनी ?

**भाऊ०**—( गोंधळून, अगतिक स्वरांत...) बापूऽ...बापूऽ...आहे काय तुमच्या मनांत आज ?...माझ्याकडे पहा...

**काळे०**--( ताठरपणें...) तुमच्याचकडे पहात होतों आतांपर्यंत मी, भाऊ !...पण तुम्ही असे गप्प !...मग वहिनींना कोण आवरणार आहे इथें ?...

( भाऊ रागारागानें पण निमूटच कमळामावशीकडे पहातात...)

**कमळा०**--( रागानें ओरडून, बापूंना ) मला कोणी आवरूं शकणार नाही आज, बापू ! तुम्ही माझ्याशींच बोला--काय व्हायला पाहिजे आहे तुम्हाला ?--मला सांगा...

**काळे०**--( घमेंडींत ) माझ्या स्नेहापेक्षां व्यवहार पाहिजे आहे ना तुम्हाला ?--ठीक तर...( कागद पुढें नाचवीत ) हा दस्तैवज नुसता खिशांत परतावा असं म्हणत असाल,...तरी भागीदारींतल्या तोट्याचा हिशेब करा !...तीन हजार पुढें उभे करा...कागदाच्या अटींप्रमाणें भागीदारी पुढें चालू राहील ! ( किंचित् थांबून, कावेबाजपणें )...आतां तेवढेही रोख नसले तर माझा रोखीचा आग्रह नाहीं. माझ्याकडे तुमचे तीन गवती नंबर मक्त्यानें आहेत; ते मला माझ्या मालकीचे करून द्या !...

**कमळा०** —[बेफिकीरीनें] पण एवढे उपकार तरी कशाला तुमचे यांच्यावर, काळेबापू ? एवढीच ना त्या कागदाची किंमत ?...[ तुच्छतेनें] अं ! मग तो आतां तुमच्या खिशांतच नको जायला पुन्हां !...अगदीं आजच्या आजच सारे पैसे तुमच्या तोंडावर फेंकून तुमचं तोंड बंद करायला पाहिजे !...(भाऊंना) नाहीं का हो ?...

[ भाऊ भोळ्यानें दचकतात; काळे दोघांकडे पहात रहातात. ]



: १२२३ :

**काळे०**-[जरा धमकावणीच्या स्वरांत] हा पोरखेळ आतां बंद करा, वैनी !

**कमळा०**--[ त्याच स्वरांत, पण थंडपणें ] मी तेंच म्हणतें !...बापू, असल्या धमकावण्या देण्यापेक्षां मला फायद्यातोट्याचा हिशेब द्या !...

**काळे०**—[ बेडरपणें ] घ्या कीं हिशेब !—पै नि पै वह्यांत मांडून ठेवलेली आहे...खुशाल पहा...

**कमळा०**—[ एकदम ] पाहिल्या...मोठ्या चाणाक्षपणें लिहिल्या आहेत तुम्ही ! पण खरा तोटा दीडदोन हजारांहून जास्त नाहीं !...

**भाऊ०**—[चमकून] काय ?...काय म्हणालीस ?...वेड लागलंय् तुला !

**कमळा०**—( रागानें भाऊंना...) मला नव्हे...तुम्हाला !...( बापूंकडे करड्या नजरेनें पहात ) देवांनी व मी दोघांनीं बसून तुमच्या दोन्ही प्रकारच्या वह्या पडताळून सारा हिशेब केलाय् !...समजलं, बापू ?...

**भाऊ०**—( गोंधळून ) दोन्ही वह्या ?...म्हणजे ?--

**काळे०**--( क्षणभर गोंधळतात; पण पुन्हा स्वतःला चलाखीनें सांवरीत, बेडरपणें ) तें देवाचं शहाणपण मला नका सांगूं इथें, वैनी !--मला खडान् खडा तपशील दाखवतां येईल तुम्हाला !--

**कमळा०**--( धिक्कारानें ) खरंच तें !--देवाचं शहाणपण तुम्हाला सांगण्यांत अर्थ नाही !--माणुसकी सोडूनच वागत आलाहांत तुम्ही आजपर्यंत !—पण तुमच्या वह्यांतल्या तपशीलांतले खूप खडे काढून ठेवले आहे देवांनीं ! आज अगदीं या घटकेला खऱ्या-खोट्या दोन्ही वह्या आहेत देवांच्या ताब्यांत !...म्हणजे माझ्याच !...प्रकरण कायद्याच्या उजेडांत आलं तर त्यातल्या प्रत्येक खड्यानें कपाळमोक्ष होऊं शकेल तुमचा !...आलं लक्षांत, बापू ?

**काळे०**—( वर वर बेडरपणाचा आव आणून, मोठ्यानें ओरडत...) वहिनी, फार गंभीर, धादांत आरोप करताहांत तुम्ही माझ्यावर !...आतांच्या आतां मागें घ्यावे लागतील शब्द तुम्हाला !

**कमळा०**--( हेटाळून ) अस्सं ऽ ?...या घरांत चालणारी तुमची ही शेवटचीच धमकी, बापू !...तुमच्या डोळ्यांवर झांपड आली आहे...

**काळे०**--( निरपराध्याच्या सात्विक संतापाचें नाटक करीत ) कर नाही

त्याला डर कसली ?—कुठें आहेत त्या वह्या ?...आणा माझ्यासमोर !...नि त्या नंदीबैल देवालाही आणा माझ्यासमोर...

: १२२४ :

[ लांबून फटफटीचा सूक्ष्म आवाज येतो; कामळामावशी निमूट कानोसा घेते...फटफटीचा आवाज मोठा मोठा होत जातो... ]

कमळा०--( सूक्ष्म हास्य चेहऱ्यावर आणून ) देव पाहिजे होते ना तुम्हाला, बापू ? तेच आले वाटतं तुम्हाला भेट द्यायला !...(तुच्छतेचें स्मित करीत) बोलावलं होतं मी त्यांना साऱ्या वह्या घेऊन !...

भाऊ०—( चमकून ) कोण देव ?...यावेळीं ?...इथं ?...

[ काळे खुर्चीच्या पाठीवर मान टेंकतात. त्यांचे तोंड बंद होते... फटफटीचा मोठा आवाज व मग अंगणांत ती थांबल्याचा आवाज येतो;...तसतसा काळ्यांचा चेहरा साफ पालटत जातो. ]

[ सात आठ लहान मोठ्या वह्या घेऊन देव प्रवेश करतात; काळे चपापतात; पण तसेच खुर्चीवर निमूट बसून रहातात. ]

देव०—( गंभीरपणें ) ह्या साऱ्या वह्या !...( पैशाच्या पेटीवर वह्या ठेऊन बैठकीवर बसत ) उशीर झाला, वैनी ?...

कमळा०--( सस्मित ) छे छे !...अगदीं देवदूतासारखेंच आलांत तुम्ही, बाप्पा !...

: १२२५ :

[क्षणभर गंभीर शांतता; काळेबापूंचा चेहरा अधिकच पडतो. देव त्यांच्याकडे रोखून पहातात. कमळामावशी त्यांच्याकडे पाहून सूक्ष्म स्मित करते.]

कमळा०--वह्या टिपणें सारं घेऊनच आलां आहांत;...तेव्हां आतां बापूंच्याच वह्या बापूंना दाखवण्याचं कारण नाही पडणार, मला वाटतं !-( बापूंकडे वळून ) खरं ना, बापू ?—

[काळेबापू कांहीं बोलत नाहीत; देव त्यांच्याकडे पुन्हां एकदां रोखून पहातात. भाऊ, काळे व देव यांच्याकडे आलटून पालटून पहातात. ]

कमळा०--[ खोंचून ] आतांच त्यांना देव पाहिजे होते समोर...नि या वह्या पाहिजे होत्या, बाप्पा ?...तुम्ही आलांत तें पाहिलंच त्यांनी !...आतां त्यांना पाहिजे असल्या तर वह्याही पाहतील ते !...



देव०—( शांतपणें ) काय पहायचंय् तुम्हाला वह्यांमधलं, बापू ?

काळे०--( एकदम रागानें ओरडून ) चूप बस तूं, देव !...उलट्या काळजाचा !--नीच...

: १२२६ :

देव०--( शांतपणें ) रागावण्यांत अर्थ नाही आतां, बापू !...देव बदललेला नाही. आतांपर्यंतचा तुमचा झोंपलेला भागीदार तेवढा...एकदम जागा झाला आहे !...पण त्याला माझा काय इलाज ?...

काळे०--( रागाच्या तिरमिरीनें ) गप्प...एकदम गप्प !...

कमळा०—( उपहासानें ) हो !...यावेळीं तुम्ही गप्प रहाणंच योग्य, बाप्पा ! मलाच बोलूं द्या !...बापूंना आजच्या आज एकदम गप्प करायचंय् मला !—नाही तरी या लढाईच्या दिवसांत पैशाची किंमत कमीच झाली आहे बाजारांत !--रोख रकमेनें बापूंकडचा तो कागद आजच्या आज विकत घ्यायचाय् मला !—

भाऊ०—( मध्येंच गोंधळून, त्रागानें ) अग पण...आतां काय करावं बुवा तुला ?...इतके पैसे द्यायला आहेत कुठे माझ्याकडे ?...

काळे०—( काव्यानें, हळूंच ) पण मला कांही आजच मिळाले पाहिजेत असं नाही, भाऊ !...द्या सावकाश !...

कमळा०-(पटकन् रागानें काळ्यांनी) ही निरवानिरव पुरे झाली, बापू ! ( रागानें भाऊंकडे वळून ) तुमच्याकडे नसतील तर माझ्याकडे आहेत...मी करीन सोय !—पण हें शुक्लकाष्ठ मात्र आजच संपवणार मी !—

( काळेबापू अधिकच भांबावतात;...भाऊ गोंधळतात.)

: १२२७ :

कमळा०--( स्वाभिमानानें ) सोन्याची सध्यां बाजारांत काय किंमत असेल हो, बाप्पा ?...

देव०—(रोख न समजून, जरा गोंधळत...) असेल ऐंशीपर्यंत !...कां ?

कमळा०--( बेफिकीरीनें ) मग पासष्टसत्तरला सोनं मिळालं तर कोणी घेईल का ?--

देव०--( कमळामावशीकडे चमकून पहात ) हो अगदीं आनंदानें !—

कमळा०--( बापूंना अधिकारी वाणीनें एकदम ) मग ठेवा तर तो

हातांतला कागद या इथें,...बापू ! ( आपल्या दागिन्यांना हात घालते. ) ज्या स्त्री-धनाला हात लावण्यापेक्षां मरण पत्करलं म्हणून तुम्हाला सांगत होते हें,...त्या दिवशीं,...साऱ्या जन्मांत एकदांच तुमच्यावर रागावून,--तेच हे माझे दागिने !... स्वखुषीनें देत आहे--अगदीं यांना मी !...त्या कागदाचा मोबदला म्हणून त्यांच्याकडून घ्या ! ( एक एक दागिना काढून ठेऊं लागते-) पंचेचाळीस तोळे आहेत सारे !— त्यांत झीज तूट धरा पाहिजे तर...

**काळे०**—(जरा घाबरल्यासारखे...) हें हें काय, वहिनी ? ठेवा, ठेवा ते ! मी इतका का भावनाशून्य आहे अगदीं ?...असं नका करूं, वहिनी !...मला अगदीं अशा तऱ्हेनें भागवून घेण्याइतकी आजच नव्हती जरूरी पैशाची !—

**कमळा०**—( पटकन् करारी स्वरांत-) पण मला आहे ना !...माझ्या घरचं सारं दारिद्र्य आजच्या आज घालवून द्यायचंय् मला तुमच्याबरोबर...

**: १२२८ :**

**भाऊ०**—(भांबावून, काय करावें तें न समजून) हें...हें...तूं काय... चालंवलंय्स काय आज ?—तुझं तूंच ठरवतें--करतें आहेस मघापासून सारं ! मी...मी कोणीच कां नाही इथें या घरांत ??—

**कमळा०**—( दराऱ्याच्या शब्दांत-) नाही !...याक्षणीं तरी कोणी नाही !—या काळेबापूंच्या व्यवहारांतून एकदां हात धुवून मोकळं होइपर्यंत ! आज तुमची बायको म्हणून बोलत नाही आहे मी !...( तैलचित्राकडे बोट दाखवून ) त्या मामासाहेबांची सून म्हणून—माझ्या नि तुमच्या मुलांची आई म्हणून !...समजलं ?...

( कमळामावशी सारे दागिने काढून काळेबापू व भाऊ यांच्यामध्यें ठेवते; सर्व अगदी गप्प बसतात;...काळे गोंधळलेले असतात. )

**कमळा०**—( शांतपणें पण अधिकारी स्वरांत ) विकून काय जास्त कमी झाली रक्कम तर तुम्हीच ठेवा, काळेबापू !...(देवांकडे वळत) समजलं का, बाप्पा ? मी आपला सरसकट पासष्ट रुपये भाव धरलाय्—बापूंना मोठी निकडच आहे म्हणतात; यांचा संबंध तोडण्याची मला तर त्याहून जास्तच निकड आहे !— तेव्हां,...(बापूंना), बरं, मिळाली ना...तुमची सगळी रक्कम गिरणींतल्या व्यवहाराची ? पावती द्या आतां...



**: १२२९ :**

**काळे०**—( जरा वचकून ) हो हो !—देतों ! ठरलेले तोळ्याचे तीन हजार मिळण्यांचीच पावती ना ?...

**कमळा०**—(पटकन्) छे छे...तीन हजारांची नको आहे पावती मला;... यांच्या हातचा तो तुमच्याकडचा कागद पाहिजे आहे !...तुमचा-आमचा भागीदारीचा संबंध आजं अगदीं या घटकेपासून संपला,...असं सरकारी स्टँपावरही लिहून पाहिजे आहे आजच्या आज मला !...आमचे देव करून घेतील तें सारं...

**काळे०**—(थोडं गोंधळून) पण तसं कसं ?...तो सौदा तर...सहा,... व्याजासह सात हजारांचा—

**कमळा०**—( खोंचून...) सात हजारांचा का सौदा तो ?...अस्सं ?— बरं तर सात हजारांचा !—आज आम्हाला थोडा महाग पडला तरी तोच फायदेशीर होईल शेवटीं !...आजपर्यंतची ही गाफील भागीदारी बंद करतांना...त्यांतलं सांचलेलं पाप धुवायला, कांही जास्त खर्च हा धरलाच पाहिजे कीं !—

**काळे०**—( घुटमळून ) पण हे दागिने तर...

**कमळा०**—( कुत्सित हसून ) अहो असे उतावीळ नका होऊं, काळे-बापू ! एकदां व्यवहार हातांत घेतल्यावर—तो पुरा केल्याशिवाय कशी राहीन बरं मी ?...हा तर माझ्या हातचा पहिलाच व्यवहार ! करते ना तुमची रक्कम पुरी...

**: १२३० :**

( कमळामावशी उठून आंत जाते—आपले कपाट उघडूं लागले;... भाऊ व बापू भांबावतात;...कमळामावशी पांच थैल्या व एक पाकीट बाहेर काढते; कपाट बंद करून थैल्या काळेबापू व भाऊ यांच्यामध्यें आणून ठेवते—दोघे स्तिंमित नजरेनें तिकडे पहातात. )

**कमळा०**—( चार थैल्या बाप्पांपुढें करीत ) हं घ्या, बाप्पा ! हे यांचे उरलेले चार हजार ! या दोन थैल्यांत रोख नाणीं नि यांत पांच-दहाच्या नोटा आहेत—( पांचवी थैली भाऊच्या बाजूस करीत- ) या उरलेलीमध्यें असतील फार तर सातआठशेंच ! ठेवा आपल्या तिजोरींत—आतां विनयच्या लग्नाला लागतील ना खर्चायला आपल्याला ?—

( भाऊ-बापू दोघेही गोंधळून तिच्याकडे पहात रहातात. )

: १२३१ :

**कमळा०**—(हातांनलें पाकीट काळेबापूकडे करीत) आणि हो काळेबापू, या देवाना,...तुम्ही दुरुस्तीचा फुगवलेला हिशेब गुप्त ठेवण्यासाठीं दिली होतीत ती ही तीनशें रुपायांची लांच !–( भाऊ देवांकडे चपापून पहातात; देव गप्प रहातात. काळे मान खालीं घालतात.) त्यांनी मागेंच माझ्याकडे आणून दिली !... म्हणाले 'मला पचणार नाही ती'...! आणि आतां मला तरी कशी पचेल ती ?—ध्या, तुमच्याकडेच ठेवा तें आमच्या घरांत आलेलं तुमचं उरलंसुरलं पाप !–( काळेबापू भाऊंकडे हळूंच पहातात.)

**देव०**—( बापूंची काचकूच पाहून जरा कठोर आवाजांत). हं ! ध्या, बापू ! आतां नाही म्हणण्यांत काय अर्थ ? ( बापू शेवटीं घेतात–भाऊंचा चेहरा त्यांच्याकडे पाहून पालटत जातो !–क्षणभर शांतता... )

**भाऊ०**—( एकदम... )काळेबापू,...हें खरं ? (देवांकडे वळत) देव, हें खरं ?? ( देव कांही बोलत नाहीत; काळ्यांचा चेहरा काळा पडतो. )

**काळे०**—( काचरतं ) पण वैनी,—

**भाऊ०**—( रागानें आवाज न फुट्न ) चूप !–निघा इथून...

**कमळा०**—( काळेबापूंना ) माझ्याबरोबर कांहीं बोलण्याचं कारण नाही आतां, बापू !—झालं ना सर्व ?—( काळेबापूंकडील कागदाची घडी हातांत घेत, उघडून) हाच ना हो तो कागद,...तुमच्या–यांच्या कराराचा ? (भाऊ मानेनें 'हो' म्हणतात—) चला तर...( रागानें तो फाडून चिंधड्या करते–) चला–मामंजींच्या घरांतलं सारं दारिद्र्य गेलं आतां यापुढें—( काळेबापूंना ) बापू, आतां तुम्हां माडीवर जाऊन पैसे मोजून ध्या देवांसमोर...( आंत पहात ) धर्मा, ए धर्माऽ !...धर्मा कुठें आहे ?...

**धर्मा०**—( प्रवेशून .. ) काय् वैनी ?—बोलावलंत् मला ?—

**कमळा०**—हो ! हें बघ–त्या थैल्या घे...नि काळेबापूंना घेऊन माडीवर जा देवांबरोबर—

**धर्मा०**—व्हय् वैनी ( थैल्या उचलतो...बापूंकडे खंवचटपणें पहातो. )

**कमळा०**—( देवांना ) बाप्पा, पैसे मोजून ताब्यांत ध्या बापूंच्या;... कागद बिगद लिहून ध्यायचा तो तयार करा !...नि हें बघा...आजच्या आज,



रात्र झाली तरी गिरण ताब्यांत ध्यायचीय् आपल्या !—नाही तर उद्यां नुसतं लोखंड रहायचं आंत एखाद्या वेळीं नेम नाही !...( देव जाऊं लागतात; धर्मा काळेबापूंकडे पुन्हां पहातो...थैल्यांसह जाऊं लागतो–) सगळं झाल्यावर यांना भेटून जा, बाप्पा !—(बाप्पा मानेनें 'हो' म्हणतात.)

**काळे०**—(जातां जातां–) बराय् भाऊ...(मान जरा वळवत) बरं वैनी,...

**कमळा०**—( प्रशांतपणें ) जा...काळेबापू !—निश्चितपणें जा !–हा एवढा व्यवहार सरळ पार पाडलांत शेवटपर्यंत, कीं, आमच्याकडून कसलाच उपद्रव पोचणार नाहीं तुम्हाला ! कमी जास्त शब्द गेला असेल बोलतांना, तर सोडून द्या इथेंच !—पण मामंजींच्या या घराचा नि तुमचा आजवर झाला इतका संबंध आतां तरी पुरे नाही कां झाला ? ( काळे गपचूप जातात. )

: १२३२ :

( कमळामात्रशी कोचावर बसते. निश्वास टाकते–आणि अगदीं श्रमित झाल्याप्रमाणें गप्प पडून रहाते. )

**भाऊ०**—( तिच्या जवळ जाऊन, पुढें उभे रहात ) कोठून आणलेस हे पैसे तूं ?—सांग ना मला !...

**कमळा०**—( श्रमित चेहरा...पाण्यानें डबडबलेले डोळे–जरा रागांतच) बायका कुठून आणतात जगांत पैसे ?—आणले चोरून !...जादूनें !...माझ्या बापानें पाठवून दिले स्वर्गातून मला...

**भाऊ०**—(व्यथित होऊन, गद्गदित स्वरांत) या घराला शाबूत ठेवायला इतकी धीरानें, प्रेमानें झगडलीस तूं आज !...तरी पण माझ्याशीं किती किती कठोर बोलतें आहेस ग तूं अजूनही ? ( कमळामावशी त्यांच्याकडे पहाते— दुःखी होते. )

**कमळा०**—( पटकन् उठून त्यांच्या पायाजवळ वांकत एकदम ) क्षमा–क्षमा करा मला...( भाऊ तिला उठवतात. ) आयुष्यांत एकदांच आज मोठ्या प्रयासानें कठोर झालें मी !–तुमचा खूपखूप अपमान केला !...रागावूं नका, रागावूं नका...माझ्यावर!–साऱ्यांच्याच सुखासाठीं मला तसं कठोर होणं भाग झालं आज !–

: १२३३ :

**भाऊ०**—( तिच्याजवळ जाऊन कोचावर बसत ) ऐक ऐक...असं बोलूं नकोस !...( गहिंवरून ) खरंच...खरंच ! तूं एक देवी आहेस !—

**कमळा०**—( पटकन् निर्विकारपणें ) पुरे...मला उगीच चढवूं नका अशी !...माझं कर्तव्यच मी करीत आलें...आजपर्यंतसारखंच आजही मी मऊ वागलें असतें, तर या घराला बारा वांटा फुटल्या असत्या !–इतक्या जागतेपणीं वाढवलेल्या विनूच्या सुखाचाही पाहतां पहातां नाश झाला असतां !...( क्षणभर थांबून) हे चालतेबोलते सुखी जीव माझ्या भोंवतीं सुखानें...आनंदानें वांवरले,...कीं तेंच माझं सुख...तेंच माझं वैभव...असं वाटतं मला !–

**भाऊ०**—(हळुवारपणें...) पण मला सांग ना आतां...ते पैसे कुठले ?–

**कमळा०** —( सात्विक चेहऱ्यानें, निश्वास टाकीत ) ती तुमच्याच वडिलांची...माझ्या मामंजींचीच पुण्याई !–इथें तुमच्याबरोबरच या घरांत संसार करत असतानां गोळा केलेली —माझ्या साऱ्या आयुष्यांतली पुंजी !—( क्षणभर थांबून, कृतज्ञतेनें, आदरानें...) मामजी केवढे मोठे !...त्यांच्या घरच्या नुसत्या केरांतूनही,...अगदीं माझ्यासारख्या दुबळ्या स्त्रीला देखील,...पै पै करून इतकं गोळा करतां आलं ! !–(मागें...तैलचित्राकडे पहाते...) मामंजी !...मामंजी ! !...

( भाऊंचे डोळे पाण्याने डबडबतात. )

: १२३४ :

**विनय०**—( आंत दबकत दबकत–डोकावून पहात ) आई,...हा धर्मा ग काय सांगतोय् मला ?–

**कमळा०**—काय रे धर्मा ?...तूं कां इकडे आलास ?...

**धर्मा०**—( निष्पापपणाचा आव आणून, हळूंच ) नाय्...देव मोजून येताहेत पैसं,...काळेबापूला !...तवा विनूदादाला म्हनलं,...त्यो कागूदबिगूद करताना तुमी लिवायला–वाचायला शिकलेली शेटमानसंबी तितंच असा !...आन् दादांना म्हनलं,...धाकले श्येट तुम्ही !...तवा गिरनीत बी चला मंग आमच्या संगात !...दुसरं काय नाय् , बाय् !...

**कमळा०**—( सौम्य हसत ) असं म्हणतोस होय ?...अरे खरंच कीं !–बरं–बरं...धर्मा, जा तूं आतां माडीवर !...येतोय् हो मग विनू...( धर्मा हसत जातो–**विनू** दाराशीं घुटमळतो; त्याला धर्मा जातां जातां हळूंच आंत लोटतो.) ये विनू,...ये ना आंत !–बस जरा पांच मिनिटं इथें...अरे दोघांनीही रागावून कसं चालेल ? कोणीतरी एकानें पडतं घेतलं पाहिजे !



: १२३५ :

( विनू खुर्चीवर बसतो;...बापलेक दोघांकडेही कमळामावशी आळीपाळीनें पहाते;...विनू भाऊंची दृष्टी चुकवतो...भाऊ रागानें विनकडे पहातात. )

**कमळा०**—( सहानुभूतीनें–भाऊंना ) असं नुसतं रागानें पाहूं नकां त्याच्याकडे !...–त्याला नीट विचारासवरा काय तें !—तो काय आतां लहान आहे ?–आतां त्याचं सुख तेंच आपलं सुख !...नाही कां ?—

**भाऊ०**—( घुश्श्यांत...पण हळूंच ) तो लहान कसा असेल ?–त्याचं त्यानेंच तर ठरवलं!...आम्ही काय आपलीं गावंढळ माणसं—अशिक्षित! ते आतां प्रोफेसरसाहेब आहेत ना ?—ते कशाला विचारतील मला ?—करा म्हणावं...कांही करा–तुमचे तुम्ही !...( निश्वास...) हं...असो—चाललंय् ! हा आजचा जमानाच आहे !—

**विनू०**—( हळूंच, आईला मध्यें घालून ) आई,...पण मला धीर होत नव्हता भाऊंना स्पष्ट सांगायला पूर्वी,...म्हणून—( भाऊ चुळबुळतात. )

**कमळा०**—( शांतपणें ) विनू, बाबा प्रत्येकाला आपल्या आयुष्यांतल्या चुकाही करायला अधिकार असतो !—तुला सुख वाटत असेल तर त्या मार्गानेंच जा तूं ! आमची दोघांचीही कांहीं आडकाठी नाहीं तुला, बरं !...आशीर्वादच आहे तुम्हाला—

: १२३६ :

( कुंदा व वासंती, खुसखुसत वनितेला लोटीत, घरांतून प्रवेश करतात. )

**वासंती०**—( हंसत हंसत ) आई, ही सूनबाई बघ तुझी...लाजतेय् ग आंत यायला—( तिला लोटण्याच्या गडबडींत खांकेतील 'उषा' पडते. तिकडे लक्ष नसतें. )

**कुंदा०**–(हंसून) अय्या !–वहिनी ?–शिकलेल्या मुलीही एवढ्या भितात ? अशा लाजतात कां हो मामंजींना ?—( सगळे सौम्य हास्य करतात. )

**वासंती०**—(भाऊंना–) भाऊ...भाऊ,–तुम्ही बोलवा ना हो वैनीला ! मग येईल ती तुमच्यापुढें—(कमळामावशी विनय त्यांच्याकडे आशेनें पहातात.)

**भाऊ०**—(क्षणभर घुटमळून–शेवटीं संकोचानें, पण प्रेमानें)...ये ये...इकडे...पुढे ये ना !—

( वनिता पुढे येते; भाऊंना उभ्यानें नमस्कार करते. )

**कमळा०**—(पटकन्, सहास्य...) हं...हं...असा नाही नमस्कार करूं ! आपल्या घरांत तरी नेहमी थोडं खालींच वाकावं, बरं कां ?...त्यानें कधीं नुकसान होत नसतं आपलं !--

( खाली वांकून वनिता पुन्हां नमस्कार करते; भाऊ आपला हात तिच्या डोक्यावर पुढें धरून आशीर्वाद पुटपुटतात;...त्यांचे डोळे पाण्यांत भरलेले असतात.)

: १२३७ :

**विनय०**--( हळूंच धीर करून ) रागावलांत माझ्यावर, भाऊ ?--

**भाऊ०**—( शांत चेहरा करण्याचा प्रयत्न करीत डोळे पुसतात; नकारात्मक मान हलवून ) छे ! नाही ! का। उपयोग आतां तुमच्यावर आम्ही रागवून ? तुम्ही एवढे शिकलांत, मोठे झालांत !...

**वासंती०**—( हसून नाचत ) ओऽ...आतां दादाचं लगीन !--

**कुंदा०**—( तिच्यावर ताईगिरी गाजवीत ) लागली नाचायला !...

**वासंती०**—(हसत नाचत...) आमच्या दादाचं लगीन! दादाचं लगीन!

: १२३८ :

बाइ माझ्या दादाचंऽलगीऽन !–दादाऽचंऽ लगीऽन !
गममत् जममत् होणार !–माझ्या दादाऽचं लगीऽनऽ !

वऱ्हाडि कोण कोण जमणार ?–आतांऽ दादाचं लगीऽनऽ !–
गममत् जममत् होणार !–माझ्या दादाऽचं लगीऽनऽ !–
भावोजी अन् गंधाताई !–सुधीर–‘ अक्कल–कांदा ! ’
आइ नि भाऊ !–दादाभवतीं लुडबुडणारी कुंदा !–
घेऊन् येइल धर्मा बाइल्–डोबी, बोबड–कांदा !–
मांडव् सारा खच्चुन् भरला !–
आतां रीघ न ग मुंगीला !–
दादाचंऽ लगीऽन !—दादाऽचं लगीऽन. १

[ भाऊ लाजतात; विनय लाजतो; कमळामावशीं हसते; कुंदा वासंती वनिता मोठमोठ्यानें हसतात. ]



कपडे काय काय करणार ?–माझ्या दादाऽचं लगीन !–
गममत् जममत् होणार !–आतांऽ दादाऽचं लगीऽनऽ !–
रुमाल, कांशे, फेटे, पगड्या,...मांडव झगमगणार !–
कोणी येतिल् नेसुन् शालू, जरिचे लफ्फेदार !—
कुंदाताइ नि तिच्या मैत्रिणी फटाकड्या बनणार !—
आई इंदुरचीऽघडि मोडिल ! –
भाऊ नवीन टोपी घेतिल् !--
दादाचंऽ लगीऽन !--दादाचं लगीऽन !– २

[ कमळामावशी भाऊंकडे व भाऊ कमळामावशीकडे पाहून लाजत हसतात; तरुण मंडळींत खसखस पिकते. ]

फराळ काय काय करणार ?–आतां दादाऽचंऽ लगीऽन !
गममत् जममत् होणार !--अमच्या दादाऽचं लगीऽनऽ !
चकल्या, शेव, काजू घालुन् करतिल् खमंग चिवडा !–
करंज्या, लाडू, तऱ्हेतऱ्हेचा होइल् फराळ गोडा !--
रुखवत् घेऊन् विहिणी येतिल् !–चला दरोडा पाडा !–
मोतिचुराचाऽ चेंडूऽ उडवूंऽ !—
दादाला चिडचिड्वुन् रडवूंऽ !
दादाऽचं लगीऽन ! दादाऽचं ऽ लगी ऽ न ! ३

[ वासंती पुढें होऊन मान हलवत व हातवारे करीत गाणें पुढें म्हणते. ]

वाजंत्रि काय काय वाजणार ?–आलंऽ दादाऽचंऽ लगीऽनऽ !–
गममत् जममत् होणार !–आतांऽ दादाऽचं लगीऽनऽ !–
मुसलमान तो ताशा,...तड्तड् तण्तण् फोडिल् कान !
बॅन्डवाला ढऽम्म ढऽम्म्...हलविल अपुली मान !—
सनईची ती तान्...आणी ढुमुढुमु खणणक्खण्
ताशापाशीं विस्तव ठेऊं,...
गुंड्या गवताच्याही देऊं !
दादाऽचं लगीन ! दादाऽचं लगीऽन ! ४

[ विनयकडे पाहून त्याला चिडवत वासंती पुढें म्हणतें— ]

दादा काय काय करणार ?–आतां दादाऽचंऽ लगीनऽ !
गममत् जममत् होणार !–आलंऽ दादाऽचं लगीऽन !—
खिळा डगला, शर्ट, पागडी, धोतर रेशिम्–काठी !—
हलतिल माना बाशिंगासह !–करति करवल्या दाटी !–
नवरदेव–बोहलें थाटलें !—वधू–वरांच्या भेटी !—
दादा जाइल् खुसुंखुसुं हांसत्...
मागुन वहिनी मुरकत् मुरकत् !—
दादाऽचंऽ लगीऽन !—दादाऽचं लगीऽनऽ !— ५

[ वनितेकडे पहात वासंती हसत हसत हातवारे करते. ती लाजते. तिला चिडवत वासंती गाणें पुढें म्हणते. ]

वहिनी काय काय करणार ?–आलं वहिनींचंऽलगीऽन !
गममत् जममत् होणार !–वहिनीदादाचंऽलगीऽन !
केंस मोकळे, लुगडे पिवळें,...पुजेल गौरीहार;
मग येईल् ती नटुनी थटुनी मिरवत चपलाहार !
विड्या तोडतिल दादा–वहिनी !–दादावरती हार !!
अमुच्या दादाऽची तीऽ राणी !
उखाण्यांत गोंधळेल वहिनी !
गडबडगुंडा छान् !–होईल् गडबडगुंडा छान् ! ६

[ वासंती मोठ्या आनंदानें नाचते, उड्या मारते; सारीं कौतुकानें हसतात.]

आमच्या दादाऽचंऽ लगीनऽ !...दादाऽचंऽ लगीऽनऽ !
गममत् जममत् होणार !–आलंऽ दादाऽचंऽ लगीऽनऽ !!
दादाऽचंऽ लगीऽनऽ !!!

**कमळा०**—हं पुरे तुझं कौतुक ! चला रे बाळांनों–विनय, कुंदा, वासंती, वनिता !...तुम्ही सारींच जा फिरत फिरत आतां गिरणीत, धर्माबरोबर—

**भाऊ०**--( विनयला हळूच ) विनू...देवांना कागद बिगद लिहिण्यांत मदत कर जा !–आपल्या नजरेखालून गेलेलं असलं म्हणजे बरं सारं !–



**विनय०**--हो...जातों ना !...(सारीं जातात,...वासंती खालीं पडलेली बाहुली विसरते; भाऊ व कमळामावशी दोघेंच रहातात. )

: १२३९ :

**भाऊ०**--( क्षणभरानें हळूंच– ) हें पहा...विनूला खरंच कां ग सुख लाभेल या लग्नात ?—तुला खात्री वाटतेय् ?...

**कमळा०**--(शांतपणें) हा आपला प्रश्नच नव्हे मुळीं !...त्यांचा आपला मार्ग निराळा धरून चाललं पाहिजे आतां आपण यापुढें ! त्यांच्यापासून सहज-सहजी मिळेल तें सुख आपलं ! नाहीतर संपलंच म्हटलं पाहिजे !...

**भाऊ०**—( क्षणभर थांबून– ) तुला मदत होईल कां कधीं तिची ?–ती एवढी शिकलेली...तुला मान तरी देईल का तुझी सून ?...ठेवील कां तुझी मर्जी ?–

**कमळा०**–या असल्या अपेक्षा का असतात कधीं आम्हा आयांच्या मनाला ?...त्यांच्या सुखानें आम्ही सुखी !...

**भाऊ०**--( धोतरानें डोळे पुसत ) हं...चला...आजच्या दिवस सर्वच दृष्टीनें कांहीं निराळा होता !–डोकं अजूनही जड जड वाटतंय्...साफ धुवून येतों–

( भाऊ धोतराच्या सोग्यानें तोंड पुसत घरांत जातात. )

: १२४० :

( कमळामावशी एकटीच इकडे तिकडे पहाते, फिरते;...मामासाहेबांच्या फोटोकडे पहाते...सौम्य हसते;—वाटेंत पडलेल्या वासंतीच्या बाहुलीकडे दृष्टी जाते...उचलून घेते;...बाहुलीकडे पहात हसते.–इतक्यांत वासंती 'उषा कुठें गेली ?...उषा !—' करीत आंत येते; आईच्या हातांत बाहुली पाहून तिच्याकडून ती लगबगीनें घेते;...बाहुलीचे पापे घेते व आपल्याच तंद्रीत धांवत जाते.—तिच्याकडेच पहात कमळामावशी तटस्थ सस्मित उभी रहते...)

**कमळा०**—( स्वतःशीच ) बाहुली ! बाहुलीचा संसार !—( भाऊ टॉवेलनें तोंड पुसत, तिला न कळत आंत शिरतात. ) खरंच हे बाहुल्यांचे संसार !...( निश्वास ) हं...आतां पुन्हा मी आपली या घरांत एकटीच !...

: १२४१ :

एकल्या ऽ !...एकल्या ऽ ! !
जगिं एकल्या महिली !...अहा !...त्या एकल्या !...त्या एकल्या !
हो, एकल्या, त्या एकल्या !...आल्या नि गेल्या एकल्या !...१

त्या जोंवरी जगीं राहिल्या...प्रेमाश्रुधारा वाहिल्या !—
जागीं एकल्या येती !...पुन्हां...जातीहि अंतीं एकल्या !... २

दुर्लक्षितीं सारीं जणें !...अज्ञात त्यांचीं जीवनें ! —
जलदापरी त्यांचें जिणे !...जल देउनी संतोषगें !—३

ना आस ग्रासे मानसा !...ना स्वार्थ–हेतू मानही !...
महिलाच आम्ही चालवूं...फुलवूं सदाची ही मही !...४

[ भाऊंची चुळबुळ; ते मागून तिच्या जवळ जवळ चालत जातात. ]

: १२४२ :

**भाऊ०**—( पुढें होऊन तिच्या खांद्यावर हात ठेवीत ) असं कां बरं म्हणतेस ?—मी नाही कां ?—

**कमळा०**—( त्यांच्याकडे चमकून हंसून पहात, गंभीरपणें ) तुम्ही ?--

**भाऊ०**—( आत्मविश्वासानें ) हो !–कां ?--तरुणपणीं नाही जमलं मला म्हणून म्हातारपणीं सुद्धां प्रेम नाही कां करतां येणार आपल्याला ?--(कमळा-मावशी सौम्य हसते.) खरंच...( विचारी स्वरात...) आज मला अगदीं निराळंच कांही तरी वाटतंय् बघ !...कधीं नाहीं एवढं एकदम एका दिवसांत–शिकलों मी आज !—( हृदय भरून येऊन ) खरंच, खरंच !...आज समजलं मला...

**कमळा०**—( सहास्य ) काय समजलं ?...

**भाऊ०**—(प्रेमळपणें हसून) एवढंच, कीं, माझ्या घरांतच एक साऱ्यांची पाठिराखी कनवाळू देवी आहे—( तिचा प्रेमानें हात धरतात; तिच्याकडे प्रेम-भरल्या डोळ्यानें पहातात. )

**कमळा०**—( प्रशांत गंभीर हसून ) कोण ? मी देवी ?...मग असल्या आणखी किती पडल्या असतील अज्ञातवासांत,...घरोघरच्या देवी !--[ पडदा. ]

## अंक ४ था

**—' शाप-उःशाप '—**

## —( घरोघरच्या देवी )—

**( पूर्ण–विराम. )**

रघुवीर सामंत संपादित

## अमर ज्योति वाङ्‌मय

९ नऊ पुष्पांच्या सेटची किंमत रु. चार छोटें कॅलेंडर सप्रेम भेट.

चार रुपयांची म. ऑ. करा. अन रजिस्टर्ड बुक पोस्टनें सेट घरपोंच येईल.

* कोणतेंही पुस्तक पाहिल्याबरोबर मुलें अगदीं आकर्षित होतील.
* एकदां हातीं घेतांच तें शेवटपर्यंत वाचून काढतील.
* एकदां वाचून झाल्यावर तें पुन्हां वाचतील!
* प्रत्येक पुस्तक त्यांना सात्विक मनोरंजन, कलात्मक रसिकता व सुलभ ज्ञान मिळवून देईल.

### – प्रथम वर्षांतील दीपावली प्रकाशनें –

#### — मनोरंजन विभाग —

[ किशोर श्रेणी ]

न्याय-चातुर्य कथा-१-२-३
१ मडक्यांतला न्याय
२ जलदेवतेचा न्याय
३ नशिबाची परीक्षा
सचित्र अभिनय-गीतें-१
४ गीत-ज्योती-१

[ कुमार श्रेणी ]

न्याय-चातुर्य-कथा-४
१ अजिंक्य पंडित
सत्यकथा-१ २
२ शूरांचा गांव
३ कड्यावरील गाढी
चरित्र-कथा-१
४ प्रफुल्लचंद्र रे

#### — ज्ञान विभाग —

१ माणसाचें शेंपूट (कुमार श्रेणी; शास्त्रीय कुतूहल-१)

#### — कुमार श्रेणीचीं खालील तीन पुष्पें छापत आहेत —

[ मनोरंजन विभाग ]

१ चार वीर (चरित्र कथा)
२ कांहीं कमळें (दीर्घ कथा)

[ ज्ञान विभाग ]

१ मी लेखक होणार!'
(वाङ्मयीन ग्रंथनावरील अभिनव पुस्तक)

चालक—सौ. स्नेहल सामंत, बी. ए.
अमर ज्योति प्रकाशन–१९९-६०, व्हिन्सेन्ट रोड, दादर, मुंबई १४